


## अ ठ रा शे

# सत्तावनचा महाराष्ट्र

लेखकः— पु. पां. गोखले, कराड

# अ ठ रा शे
# सत्तावनचा महाराष्ट्र

***

लेखक

**पुरुषोत्तम पांडुरंग गोखले**, कराड

आगरकरांशीं ओळख, जागृत सातारा,
लोकप्रिय भाऊसाहेब सोमण
इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

::

किंमतः– एक रुपया पन्नास नये पैसे

प्रकाशक
द. रा. परांजपे
६, शनिवार पेठ, सातारा

प्रकाशन काल
पहिली आवृत्ति ५ जुलै १९५७
दुसरी आवृत्ति ८ ऑगस्ट १९५७

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक
अनंत कृष्ण कुलकर्णी
आनंद प्रिंटिंग प्रेस सातारा प्रा. लिमिटेड
१८२, सोमवार पेठ, सातारा

# अर्पण पत्रिका

***

इंग्रजी राजवटीच्या प्रारंभापासून इंग्रजी राजवट
जाण्यासाठी ज्या ज्या भारतीयांनी
आपल्या जीवनाचा व संसाराचा
होम केला त्या सर्व
लहानथोर भारतीयांना
सादर समर्पण.

पु. पां. गोखले
कऱ्हाड

# कृतज्ञतेची वाङ्मयी पूजा

अठराशे सत्तावनची रणधुमाळी उत्तरेंत उठली तेवढीच ! दक्षिणेंत त्या रणधुमाळीचें नांवहि नव्हतें आणि पूर्वीच्या मुंबईइलाख्यांत तर कांहीच घडलें नाही, अशी समजूत कितीतरी दिवस होती. पण दिवसेंदिवस नजरेसमोर येत गेलेल्या कागदपत्रांवरून आणि ग्रंथांवरून महाराष्ट्रांतील सातारा व इतर सर्व जिल्ह्यांतून थोडीफार आहुति त्या रणांगणांत भारतीय स्वातंत्र्यासाठी पडली होती असें आढळून आलें. यंदा अठराशेसत्तावनची शतसांवत्सरी भारतदेशभर साजरी व्हावयाची असल्याने, आपलेजवळ संग्रहित झालेली माहिती मी नवीनांच्या नजरेवर यावी म्हणून सुदर्शन, सह्याद्रि, समर्थ अशा नियतकालिकांतून प्रसिद्ध केली. ती ग्रंथरूपाने आज वाचकवर्गाच्या सेवेला सादर होत आहे, ही साताराजिल्हा स्वातंत्र्यसमरशताब्दि-महोत्सव-समितीची कृपाच होय. समितीने माझ्या लिखाणाला ग्रंथरूप द्यावयासाठी जो जिव्हाळा दाखविला व सत्तावनच्या समर-शूरांची वाङ्मयी पूजा साधली, याबद्दल मी समितीचा व तिच्या सहाय्यकांचा शतशः कृतज्ञ आहें. पुस्तकाचें कौतुक ना. यशवन्तरावजी चव्हाण यांनी आपली प्रस्तावना देऊन केलें याबद्दल त्यांचे आभार मानावयास माझें शब्द अपुरे आहेत.

कऱ्हाड
५-७-५७

पु. पां. गोखले.

## पुनश्च

या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. उत्तर सातारा जिल्हा-स्वातंत्र्य-समर-शताब्दि-महोत्सव-समिति, आमच्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी श्री. भ. रा. पाटील, दे. रा. ना. गोडबोले यांनी माझ्या लेखमालेबद्दल दाखविलेल्या आपुलकी-मुळेच हें शक्य होत आहे. मुंबईच्या प्रकाशनखात्याचें प्रोत्साहन तितकेंच प्रेरक आहे. नियतकालिकांतील माझ्या लेखमालेला पुस्तकाचें मूर्तस्वरूप शुद्ध सात्विकतेनें यावयास गु. श्री. दत्तोपंत परांजपे यांचे दक्षतापूर्वक परिश्रम कारणीभूत आहेत. आनंद छापखान्याचे श्री. अनंतराव कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी यांच्या परिश्रमांचा उठाव हाहि विसरतां येणार नाही. पहिल्या आवृत्तींतील चित्रें याहि आवृत्तींत छापतां यावी म्हणून उत्तर सातारा-जिल्हा-स्वातंत्र्य-समर-शताब्दि-महोत्सव-समितीने व सातारा हायस्कूलने व व्यायाम मंडळाचे वतीने श्री. विठ्ठलराव सोमण यांनी आपले ब्लॉक्स वापरण्यास देण्याची उदारता दाखवली हें मी कसें विसरूं ? नियतकालिकांतून माझी लेखमाला प्रसिद्ध होत असल्यापासून ज्या रसिकांनी व इतिहासप्रेमीनी लेखमालेला पुस्तकरूप यावें म्हणून आग्रह केला त्यांचा जिव्हाळाहि अविस्मरणीय आहे. या सर्वांना कृतज्ञतेचा नमस्कार केल्याशिवाय मला राहवत नाही.

कऱ्हाड
८-८-५७

पु. पां. गोखले.

# निवेदन

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हिंदी जनतेने इ. स. १८५७ साली परकीय सत्ते-विरुद्ध पहिला लढा पुकारला. त्यास आज शंभर वर्षे पूर्ण झालीं. भारतीय स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर हा शंभरावा वाढदिवस येत आहे हें आपणा सर्वांचें भाग्य होय. जिल्हा-निहाय हा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जावा असा आदेश आपल्या सरकारकडून मिळाला. त्यानुसार जिल्हाधिकारी श्री. मा. बा. साळवी यांच्या अध्यक्षतेखाली उत्तर सातारा-जिल्हा-स्वातंत्र्य-समर-शताब्दि-महोत्सव-समिति स्थापन झाली.

या महोत्सव-समितीने अनेक उपयुक्त व स्फूर्तिदायक अशा योजना आखल्या आहेत. १८५७ सालच्या ऐतिहासिक पुराव्यावर आधारलेली महाराष्ट्रांतील स्वातंत्र्य-संग्रामाची माहिती प्रसिद्ध करणें ही एक त्यांपैकीच योजना होय. या कामीं आमच्या समितीचे एक व्यासंगी चिटणीस श्री. पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले यांना आम्ही विनंती केली. त्यांनी ती आनंदाने मान्य केली एवढेच नव्हे तर पहिल्या आवृत्तीचे सर्व हक्क महोत्सव-समितीला बहाल केले. अशारीतीने महोत्सव-समितीची पहिली योजना यशस्वी करण्याचे कामीं बाबूरावजींनी जें सहाय्य केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावें तेवढे थोडेच होणार आहेत.

बाबूरावजींनी या पुस्तकास ' १८५७ चा महाराष्ट्र ' असें समर्पक नांव देऊन त्यांत महाराष्ट्रांतील ज्या ज्या लोकांनी पहिल्या स्वातंत्र्य संग्रामांत हिरिरीने भाग घेतला त्यांची माहिती दिली आहे. त्यावरून महाराष्ट्रांतील निरनिराळ्या थरांतील हजारो देशभक्तांनी केलेल्या त्यागाचें व बलिदानाचें चित्र डोळ्यासमोर उभें राहातें. भूमिगत होणें, हद्दपारी व जन्मठेपी भोगणें, बंदुकीच्या गोळ्या खाणें, फांसावर लटकणें, तोफेच्या तोंडीं जाणें, यांतच जीविताचें सर्वस्व मानणारे धन्य ते नरवीर ! त्यांना आमचे शतशः प्रणाम. गतकालच्या या तेजस्वी इतिहासाने वाचकांच्या मनांत स्वदेशाभिमान व स्वदेशप्रेम जागृत व्हावें आणि मिळविलेलें स्वातंत्र्य चिरकाल टिकविण्याची व त्याचें सुराज्य बनविण्याची ध्येयदृष्टी भावी पिढींत निर्माण व्हावी याच हेतूने हें पुस्तक आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत.

आपल्या मुंबई राज्याचे कर्तबगार प्रधान मंत्री नामदार यशवंतरावजी चव्हाण यांनी महोत्सव-समितीच्या विनंतीस मान देऊन या पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली व आमच्या पहिल्या योजनेचा गौरव केला, त्याबद्दल-महोत्सव समितीच्या वतीने मी त्यांचें हार्दिक आभार मानतों.

रणरागिणी झांशीची राणी लक्ष्मीबाई यांचें अश्वारूढ चित्र मलपृष्ठावर घालण्याचें आम्ही ठरविलें. लगेंच श्री. विठ्ठलराव सोमण यांनी त्या चित्राचा ब्लॉक वापरण्यास दिला व या पुस्तकाचे बहिरंग आकर्षक करण्यास मदत केली. श्री. मुंडफण मुख्याध्यापक सातारा हायस्कूल यांनी छत्रपति प्रतापसिंह महाराज यांचा ब्लॉक देऊन, श्री. वासुदेवराव तांबे यांनी राणी लक्ष्मीबाईचें गृहिणी वेशांतील तैलचित्र ब्लॉक करण्यासाठी देऊन व प्रबोधनकार श्री. ठाकरे यांच्या पुस्तकांतील चित्राच्या आधारें चित्रकार श्री. देशपांडे यांनी श्री. रंगो बापूजी गुप्ते यांचें ब्लॉक करितां चित्र तयार करून देऊन या पुस्तकाचें अंतरंग सुशोभित करण्यास बहुमोल सहाय्य केलें त्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणें हें माझें कर्तव्य समजतों.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरविल्यापासून तों आजतागायत ज्यांनी आम्हाला हरतऱ्हेची मदत केली, त्या सर्वांचे विशेषतः आनंद छापखान्याचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांचे आभार मानून हें निवेदन पुरें करतों.

उत्तर सातारा जिल्हा<br>
स्वातंत्र्य-समर-शताब्दि-महोत्सव-<br>
समिति, सातारा<br>
५–७–१९५७

**भ. रा. पाटील**<br>
जिल्हा–शिक्षणाधिकारी<br>
व प्रमुख चिटणीस,<br>
स्वा. स. श. महोत्सव समिति.

# प्रस्तावना

कऱ्हाडचे ख्यातनाम समाजसेवक श्री. बाबूराव गोखले यांनी १८५७ च्या क्रांतियुद्धाची समर्थ नियतकालिकांमधून लिहिलेली लेखमाला या पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे. त्याची प्रस्तावना लिहिण्यास मला फार आनंद होत आहे.

१८५७ च्या क्रांतियुद्धासंबंधीचे जे अनेक गैरसमज प्रचलित आहेत, त्यापैकी एक असा की या क्रांतियुद्धाचा वणवा फक्त उत्तर हिंदुस्थानापुरताच मर्यादित होता. दक्षिणेकडच्या श्री. नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, रंगो-बापूजी वगैरे क्रांतियुद्धांतील नेत्यांचें कार्यक्षेत्र उत्तर हिंदुस्थानापुरतेंच मर्यादित होतें. परंतु श्री. गोखले यांनी या गैरसमजुतीचें साधार निराकरण करून दक्षिणेंत आणि बृहन्महाराष्ट्रांतहि त्यावेळी कसा उठाव झाला होता आणि तो अखिल भारतीय क्रांति-युद्धाचाच भाग कसा होता, हें दाखवून दिलें आहे. हें करतांना श्री. गोखले यांच्या संशोधक-बुद्धीने जुने ऐतिहासिक कागदपत्र धुंडाळले, ज्ञानोदय व ज्ञानप्रकाशासारख्या पत्रांचें १०० वर्षांपूर्वीचें अंक चाळले, गॅझीटिअरसारख्या सरकारी प्रकाशनांचें आणि भारतीय व परदेशीय पंडितांच्या ग्रंथांचें परिशीलन केलें व त्यांच्या आधारेंच आपले सिद्धांत मांडले, असें दिसून येईल. संशोधनाने मिळालेली माहिती श्री. गोखले यांनी आपल्या अस्सल मराठी भाषाशैलीने सविस्तर पण व्यवस्थितपणें जनतेपुढे मांडून महाराष्ट्रांतील क्रांतीयुद्धाच्या इतिहासावर पुष्कळच प्रकाश टाकला आहे.

या क्रांतीयुद्धांत परकीयांशीं झुंज करण्यास राजेरजवाड्यांच्या बरोबरच सामान्य जनताहि कशी सज्ज झाली होती हें दाखविण्यांत श्री. गोखले यांनी एक राष्ट्रीय कामगिरी बजावली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

ही लेखमाला वाचत असतांना भारतांतील आजच्या परिस्थितीच्या अनुषंगाने माझ्या मनांत जे विचार आले तेहि येथे मी मांडतों.

१८५७ च्या स्वातंत्र्य-समरांत महाराष्ट्रांतील ब्राम्हणवर्गापासून तो सामान्य वर्ग समजल्या जाणाऱ्या रामोशी आणि बेरडापर्यंतच्या सर्व जातीचे लोक होते आणि त्यांनी खांद्यास खांदा भिडवून लढाया केल्या आणि आपलें क्षात्रतेज प्रगट केलें. जातिभेद तेथे आड आले नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, क्रांतीचा उठाव झाला व आपले लोक शौर्याने लढले तरी तें शौर्य वैयक्तिक व विस्कळित स्वरूपाचें होतें. व त्यामुळे आपला लढा यशस्वी झाला नाही आणि शत्रु संख्येने कितीहि लहान असला तरी तो शिस्त व संघटनेच्या जोरावर मात करूं शकला. इतिहासाचे हे धडे ही लेखमाला वाचून ठसठशीतपणें डोळ्यांत भरतात. या दृष्टीनेहि श्री. गोखले यांनी महाराष्ट्राच्या ग्रंथभांडारांत एका उपयुक्त पुस्तकाची भर घातली त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

सचिवालय, मुंबई.<br>
दिनांक २-७-१९५७

यशवंतराव चव्हाण

# अनुक्रमणिका


अर्पणपत्रिका


कृतज्ञतेची वाङ्मयी पूजा– पु. पां. गोखले

स्वातंत्र्य-समर-शताब्दि-महोत्सव-समितीचें निवेदन [पहिल्या आवृत्तीसाठी.]

प्रस्तावना– नामदार यशवंतरावजी चव्हाण

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | स्वाभिमान–जागृतिच्या मंगलनिधाना, नमस्ते | १ |
| २ | नानासाहेबांना नमस्कार | ४ |
| ३ | महाराष्ट्राची तेजस्विनी झांशीची राणी | १० |
| ४ | टोपकरांना टाप देणारे तात्या टोपे | १६ |
| ५ | सत्तावनची एक देवता, मैनावती भट पेशवे | १८ |
| ६ | बादशहा बहाद्दूरशहा ! | २१ |
| ७ | १८५७ ची अवस्था | २२ |
| ८ | उत्तरेंतील उठाव | २४ |
| ९ | महाराष्ट्राचें मन | ३० |
| १० | उठावाचीं कारणें | ४० |
| ११ | सातारा छत्रपतींच्याकडील उठाव | ४८ |
| १२ | कोल्हापूर-नागपूर छत्रपतींच्याकडील उठाव | ५६ |
| १३ | जमखिंडी प्रकरण | ६५ |
| १४ | सावंतवाडी ते बडोदा | ७४ |
| १५ | जनसामान्यांचा उठाव | ८० |
| १६ | शेवटच्या थरांतील विरोध | ९० |
| १७ | उठवांतील आठव | ९७ |
| १८ | उरलेला उमाळा | १०३ |
| १९ | सत्तावनचा वारसा | ११३ |



सातारा स्वातंत्र्य–समराचें स्फूर्तिस्थान

**छत्रपति प्रतापसिंह महाराज राजे भोसले**

| | |
|---|---|
| जन्म १७९३ | राज्यारोहण १८०८ |
| मृत्यु १८४७ | पदच्युति १८३९ |

[ १ ]

# स्वाभिमान-जागृतीच्या मंगलनिधाना, नमस्ते

ता. २९ मार्च !

१८५७ च्या सशस्त्र क्रांतियुद्धाची ठिणगी पडली. काडतुसाला गाईची व डुकराची चरबी वापरलेली आहे आणि तिचा वापर एतद्देशीय शिपाई न करतील तर त्याना नौकरीवरून कमी करण्यात येईल. त्या आगोदर त्यांना युरोपियन फौजे-कडून धडा मिळेल ! अशा वार्ता मिळाल्यामुळे, आपल्या धार्मिक कल्पनांचा चक्काचूर होतो, या भावनेने ज्याचा स्वाभिमान आणि आत्मविश्वास एकदम उफाळून आला, त्या मंगल पांडे या ३४ व्या पलटणींतील एका शिपायाने २९ मार्च रोजी आपल्या सहकारी बंधूंत व पर्यायाने राष्ट्रबांधवांत स्वाभिमान-संस्कृतीची ज्योत जणु पेटविण्यासाठी बराकपूरला युरोपियनांस हात दाखविला ! त्याचें पर्यवसान त्याला ता. ६ एप्रिल १८५७ रोजी फांशीची शिक्षा सांगण्यांत व ता. ८ एप्रिल रोजी ती अमलांत येण्यांत झालें ! ! मंगल पाण्ड्याच्या या कार्याची षष्टचब्दिच साजरी करण्याकरितां जालियनवाला बागेंतील अत्याचार ओडवायर-डायरनी केले की काय, अशी कोणी कदाचित् कवीला साजेशी तरल कल्पना बांधित बसेल ! ! पण इतिहासाला अशा तरल कल्पना मंजूर नसतात. मंगल पाण्ड्याच्या शतकपूर्व बलिदानाने, त्याच्या व्यवसायबंधूंत व पुढे देशबंधूंत स्वाभिमान जागृत झाला आणि या स्वाभिमानाने जागृतीचा वारसा पुढे बदललेल्या काळांत व बदललेल्या साधनांनी चालवूनच भारतदेश स्वतंत्र व स्वराज्यशाली झाला आहे.

१८५७ च्या भारतीयांनी केलेल्या उठावाने ब्रिटिश सरकार डळमळतें की काय अशी एक वेळ अवस्था आली होती. त्या भारतीय आन्दोलनाचा प्रारंभ ज्याने केला, तो मंगल पाण्डे चांगला धट्टाकट्टा व सशक्त असा ब्रिटिश सरकारच्या सैन्यांतील ब्राह्मण सैनिक होता. १८५७ च्या प्रारंभी सर्व बाजूंनी शांत, शांत वातावरण असतांना, एकाएकी हिंदुस्थानी सैन्यांत एक वार्ता पसरली की, ब्रिटिश

सरकारने हिंदुस्थानी सैन्यांच्याकरतां, चर्बी लावलेलीं काडतुसें तयार केलीं आहेत. त्या वार्तेचा आणखी भयानकपणा असा की त्या काडतुसांना लावलेली चर्बी गाईची व डुकराची आहे. म्हणून बातमी लागल्याबरोबर हिंदु व मुसलमान, दोन्ही धर्माचे शिपाई ब्रिटिश सरकारकडे वाईट दृष्टीने पाहूं लागले. थोडयाच दिवसांत बराकपुरामध्ये " तारे " चे ठाणें जाळण्यांत आलें; त्यानंतर एकामागून एक इंग्रजी अधिकाऱ्यांचे बंगलेहि भस्मसात होऊं लागले. बराकपुराहून फार दूर असलेल्या राणीगंजामध्येहि वरील तऱ्हेचें अग्निकाण्ड सुरू झालें ! त्यानंतर देशी शिपायांच्या सैन्यांतील मंडळींच्या सभा झाल्या ! एका तुकडीकडून दुसरीकडे काडतुसांच्या निषेधाचे संदेश पोंचविण्यांत आले !! तेव्हा, इंग्रजांविरुद्ध बंडच करून उठावें, ही भावना प्रथम क्रमांक ३४ च्या व नंतर क्रमांक १९ च्या सैन्यांत धर धरू लागली. त्यांतून २७ मार्च १८५७ ला आलेली बातमी सनसनाटीची होती. बराकपूर येथे त्या तारखेस तिसरे प्रहरीं अशी दाट वदंता होती की कलकत्त्याला जहाजांतून कित्येक गोरीं बाळें उतरलीं आहेत व लवकरच बराकपूरला येणार आहेत. कमालीच्या धार्मिक अशा मंगल पांड्याला तो सर्व प्रकार म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखा वाटला ! !

सात वर्षे तो शौर्य आणि राजनिष्ठा यांचीं बाणीं राखून ब्रिटिश सरकारची सेवा करीत आला होता. २९ मार्च १८५७ ला नवी गोरी पलटण येत आहे, अशी वार्ता ऐकल्यापासून मंगल पांडे भांग प्यालासारखा गडबडला. त्याच्या डोक्यांत विचार आला की इंग्रजांच्या हातून आपल्या जाती व धर्माचा काळ होण्याचा प्रसंग आला आहे !! या विचाराने वेडा झालेला मंगल पांडे आपल्या बराकींतून बाहेर पडला तो सशस्त्र होऊनच ! तो सैनिकांना सांगत सुटला की अपवित्र काडतुसांना कोणी हात लावू नका !! जवळच बिगुलवाला होता. त्याला बिगुल वाजवून सर्व सैनिकांना एकत्र करण्याबद्दल मंगल पांडेने आज्ञा दिली. बिगुलवाला काय करतो, हें पहावयास मंगल थांबतो आहे कशाला ? तो बंदूक सरसावूनच चालावयास लागला. दूरवर एक इंग्रज अधिकारी उभा होता. त्याच्यावर पिस्तुलांतील एक गोळी मंगलने रोखली. पण शिकार झाली नाही की क्रमांक ३४ च्या पलटणीने त्याचवेळी मंगलची साथ केली नाही.

लेफ्टेनंट बक् नांवाचा एक इंग्रज यावेळी ३४ व्या पलटणीचा अडज्यूटंट होता. त्याला मंगल पिसाटल्याची खबर मिळाली. खबर मिळतांच लष्करी पोशाख चढवून व घोडयावर स्वार होऊन तो आला आणि मैदानांत येऊन गिल्ला करू लागला. " कुठे आहे मंगल ? कुठे आहे मंगल ?" जवळच एक तोफ होती. तिच्या आडून मंगल पाण्डेने बंदुकीचा नेम धरला. गोळी बक्च्या घोडयाला लागली. घोडयाबरोबर बक्ही जमीनदोस्त झाला. पडल्याबरोबर उठून बक्ने पिस्तुलांतून

गोळी झाडली !! पण मंगलवरील नेम चुकला !!! इतक्यांत एकजण क्रोधानें लाल होऊन, तलवार घेऊनच मंगलवर धांवला. एक गोरा अधिकारीहि तलवार घेऊन पहिल्या तलवारबहाद्दराच्या मदतीला धांवला. तलवारीचा जबाब तलवारीने द्यावयास मंगल पाण्डे तयार होता. तिघांच्या तलवारी चमक दाखवू लागल्या. तो देखावा चहूंबाजूंनी सुमारे चारशे सैनिक उभेच्या उभे पहात होते. दोघांच्या माऱ्यांतून स्वतांचा बचाव करून मंगल पाण्डेने एक गोरा अधिकारी जखमी केला !!

एक गोरा अधिकारी जखमी पाहून दुसऱ्या अधिकाऱ्याचे बचावासाठी शेख पल्टू नांवाचा शिपाई पुढे आला. इंग्रज अधिकाऱ्यावर तलवारीनिशी मंगल तुटून पडला असतांच, मागच्या बाजूने पल्टूने मंगलचा बावटा पकडला. पल्टूचा डावा हात रक्तबंबाळ झाला !! पण त्याने मंगल पाण्डेंस सोडलें नाही. त्यामुळे जखमी व रक्तबंबाळ झालेले दोवेहि इंग्रज अधिकारी कसे तरी तेथून पळ काढून निसटले!

दुसऱ्या कित्येक शिपायांनी पल्टूला सांगितलें की, मंगलला सोडून दे, नाही तर आम्ही तुला मारून टाकू मंगल सुटला पण सैन्यांत झालेली गडबड जनरल हेयर्स यांस पोचली. तावडतोब तो आपल्या दोन चिरंजीवांसह घोड्यावर बसून येऊन दाखल झाला. परेडच्या मैदानावर येतांच सेनापतीस कळून चुकलें की, मंगल पाण्डे सर्व सैन्यांत जातीचें व धर्माचें रक्षण करण्याबद्दल प्रचार करीत सुटला आहे.

सेनापति हेयर्स व त्याचे तरणेबांड मुलगे तिकडे गेले. सेनापतीला पहातांच मंगलने आपली बंदूक सावरली. सेनापतीच्या एका मुलाने इशारा केला की, "बाबा, मंगल पाण्डे या बंडखोराने आपल्यावर बंदुक रोखली आहे !!" सेनापतीने सांगितलें की, "माझा अन्त झाला, तर त्याचा सूड तू घे."

मंगलने गोळी झाडलीच नाही. ज्या शिपायांच्या धर्मरक्षणाकरतां आपण मरतों आहोंत, ते शिपाईच सेनापतीला साथ देत आहेत, हें पाहिल्यावर मंगल हताश झाला. बंदुकीची गोळी त्याने स्वतःवरच उडवून घेण्याचा प्रयत्न केला आणि जखमी होऊन जमिनीवर पडला.

मंगलला दवाखान्यांत पाठविण्यांत आलें. तो बरा होण्याची कोण कशाला वाट पहातो ? ता. ६ एप्रिल १८५७ रोजी त्याचा खटला चालला व त्याला फांशीची शिक्षा झाली ! ! जखम जिव्हारी असूनही मंगल पांडेने हूं की चूं केलें नाही. ता. ८ एप्रिल रोजी सर्व सैन्यासमक्ष मंगल पाण्डेस फांशी देण्यांत आलें.

मंगल पाण्डेच्या बलिदानाने शिपाई मंडळींत एकच एक खळबळ उडाली. मंगल पाण्डेच्या सांडलेल्या रक्ताने रक्तरंजित क्रांतियुद्धाचा स्फुलिंग फुलविला ! ! आत्मविश्वास व स्वाभिमान विसरलेल्या जीवनांत नवचैतन्य रसरसविण्याचें काम मंगल पाण्डेच्या मृत्युने केलें !! सरंजामशाहीच्या त्या काळांतील स्वाभिमान जागृतीचा तो स्फूर्तिकिरण भारतीय स्वातंत्र्याच्या उषःकालाचा पहिला किरण ठरला आहे. धन्य मंगल पाण्डे ! त्या मंगल निधनाला शतशः प्रणाम असोत !!

[ २ ]

# नानासाहेबांना नमस्कार

नमस्ते, वीरवरा, नमस्ते ! पेशवे घराण्याच्या इतिहासांत शेवटची बाजी राखणाऱ्या महापुरुषा, नमस्ते ! दत्तक असूनहि जनक पुत्रापेक्षा जिव्हाळ्याने घराण्याचें नांव राखणाऱ्या विचारवन्ता, नमस्ते ! नांवाचा धोंडोपंत तू; पण " पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा ! " हें वचन सार्थ करणाऱ्या मर्दा, नमस्ते !

नानासाहेब, १८५७ साल होतें. त्यावेळी आपण कानपूरजवळ ब्रह्मावर्तास रहात होता. आपले दत्तक वडिल दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांचें पेन्शन आपणांसहि वारसाहाक्काने चालू रहावें, असा आपण प्रयत्न केलात, पण तो फसला. फसायचाच होता तो. आपली तशीच खात्री होती ना ? पण, आपल्या मनांतील हेतु साध्य करावयास कांही न्याय्य दिसेल, अशी उघड सबब हवी होती. त्यासाठी आपण आपल्यातर्फे एक मुसलमान वकील अजीम–उल्लाखां यांना ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांकडे शिष्ठ म्हणून पाठविलेत. अजीम–उल्लाखां जसे रंगेल गडी होते, तसेच इंग्रजी भाषेचे अस्खलित पंडितहि होते. फ्रेंच व जर्मन या भाषांतहि खाँसाहेब वाकबगार होते. असा हा आपला मुख्य सल्लागार आपण विलायतेस धाडलात; अपयशाने त्याची पाठशिवणी करतांच तो युरोपची मजा लुटीत लुटीत तुर्कस्थानच्या राजधानीमध्ये येऊन पोहोंचला. ती वेळ काय, साधीसुधी होती ? क्रिमिअन युद्धामुळे सगळें युरोप त्यावेळी पेटल्यासारखें झालें होतें.

त्या आगींत खांसाहेबांना एक दृष्टांत झाला, रशियन तोफांच्या भडिमारांत इंग्रजी सैन्याची दाणादाण होत असलेली खाँसाहेबांच्या नजरेला आली. मनांतल्या मनांत बेहद्द खूष होऊन गेली स्वारी. हिंदुस्थानांत परत आल्यावर खाँसाहेब आपल्याला येऊन भेटले, नानासाहेब ! इंग्रजांची नस आणि युरोपांतील परिस्थिति यांची माहिती त्यांनी आपणांस दिली. मग आपण हात चोळत बसलात ! त्या हात चोळण्यांतून एक नवीनच ठिणगी निर्माण होत होती. आपल्या राजवाड्यांत आणखीहि आपली आप्तेष्ट मंडळी होती. आपले बन्धु बाळासाहेब होते, बाबा भट्टहि होते. अजीम-उल्लांच्या इतकेच तात्या टोपे देखील आपले जीवाभावाचे सल्लागार होते. त्यांनी आपल्या हातचोळणीमुळे निघणारी ठिणगी पाहिली.

पुढे कानपुरांत त्या ठिणगीचा प्रकाश चमकूं लागला. त्या प्रकाशाने कानपुरचे इंग्रज चांगलेच चमकले ! आपल्या बायकांचे काय होणार, आपल्या मुलाना वाली कोण, इंग्रजी खजिन्याचें संरक्षण कसें व्हावयाचें, हीच फिकीर प्रत्येक इंग्रज करूं

लागला. आतांपर्यंत आपल्या वाड्यांत येऊन इंग्रजांनी कितीतरी वेळा आपला हात उष्टावला होता. आपल्या भरंवशावर इंग्रज कानपुरांत निर्धास्त रहात. पण आपणच जेव्हा लखनौहून एकाएकी ताबडतोब निघून आलांत, त्यावेळी इंग्रज सेनापति सर जॉन् लॉरेन्स याच्या मनाने पाल खाल्ली. तरी पण, कानपूरच्या कलेक्टरचा विश्वास आपल्यावरच होता. म्हणून, नानासाहेब, ता. २२ मे १८५७ रोजी आपण दहा बारा लाखांचा तो इंग्रजी खजिना सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारलीत. आणि तरीहि, दुसरेच दिवशीं सर जॉन् लॉरेन्सने लखनौहून एक युरोपियन तुकडी कानपूरच्या खजिन्याचे संरक्षणार्थ पाठविली ! बायका व पोरें यांच्या संरक्षणार्थ एका सुरक्षित जागीं तटबंदी करण्यांत आली. आपण म्हणालात, " ठीक आहे. देव तुमचें भलें करो ! "

सगळीकडेच सैन्यासैन्यांत गडबडी होत होत्या क्रमांक दोनचा रिसाला पहिल्याने बंड करून उठला ! हिंदुमुसलमानांत सारेच शिपाई धर्मावर घाला आला म्हणून बिघडून गेले होते, दुसऱ्याहि कित्येक सबबीवर कित्येक ठिकाणी बंडाची उठावणी होऊं लागली होती. बंडखोर तुकडीचा सुभेदार टाकासिंह, नानासाहेब, आपल्याला येऊन भेटला व म्हणाला ना ? की—

" आपण इंग्रजांचा खजिना, बंदीखाना व तोफखाना सांभाळणार आहांत, की बंगालच्या सैन्याप्रमाणे एक होऊन उठणाऱ्या आम्हां हिंदुमुसलमान शिपाई मंडळींना सांभाळणार आहां ? "

आणि आपण सांगितलेत, नानासाहेब, की " मी शिपाई मंडळींना सांभाळीन." खरें ना हें ? या आपल्या उत्तराची तारीख ५ जून १८५७ होती. होय ना ? मग? मग काय, बंडखोर शिपायानी खजिना व तोफखाना यांचा कबजा केला ना ?

आणि तटबंदीच्या आंत सर्व युरोपियन वसाहत निर्धास्त होती, नव्हे ? सेनापति हिलरच्या आज्ञेने प्रत्येक तगडा इंग्रज स्वसंरक्षणार्थ सज्ज होऊन राहिला होता. बंडखोर सैनिकांचा धांगडधिंगा आतां त्या इंग्रजांच्या कानांमध्ये घुमूं लागला. त्यांना समोर कोणी इंग्रज भटला की ते त्याला ख्रिस्तवासीच करीत. त्यांतच पुण्याई सांठवली आहे, असा त्यांचा सिद्धांत झाल्यासारखा दिसत होता. तटबंदीच्या आंत असलेली मंडळी विशेषतः त्यामधील पोटिशी असलेल्या सुवासिनी अगदी गर्भगळित होऊन गेल्या ! ! सेनापति हिलरने पंजाब, लखनौ, अलाहाबाद येथून कुमक मागवली; पण कोठूनच आली नाही ! ! अन्नपाण्यावांचून इंग्रज आंतल्या- आंत तडफडून मरूं लागले. २६ जूनपर्यंत त्यांनी कड काढली पण त्या दिवशी नानासाहेब, " तारा की मारा " ते म्हणून आपले स्वाधीन झाले ! !

ता. २७ जून रोजी सकाळी दहा वाजतां सती–चीरा घाटावरून नांवामधून ही मंडळी बाहेर पडावयाची होती. नानासाहेब आपण यावेळी आपल्याच वाड्यांत होता, तिकडे एकाएकी काय बिघडलें हें आपणांस ठाऊकहि नाही! बंडखोर सैनिकांना कांही कारणाने चीड येऊन प्रकरण हात-घाईवर आलें व कर्नल इवट्स् याचेवर हल्ला झाला. मग काटाकाटीस काय उशीर? आपल्याला ही बातमी लागतांच, आपण आज्ञा केलीत की, " अरे, सामनाच द्यावयाचा तर मर्दाशीं द्या. बायका पोरांच्या अंगालाहि हात लावूं नका " त्या आज्ञेसरशीं सव्वाशे स्त्रिया आणि त्यांचीं पोरें यांना कैद करण्यांत आलें. बरोबर आहे ना. नानासाहेब, ही बातमी? त्यांना एका कोठडींत कोंडून ठेवल्यावर सती-चीरा-घाटावर सर्व इंग्रज पुरुषांना एका रांगेंत उभे करण्यांत आलें. नव्हे कां? त्या सुमारें शंभर मंडळींपैकी अवघे चारजण कसे तरी जिवंत पळाले! बाकी शहाण्णव कुळी सपशेल कामाला आली. त्यानंतर बरोबर आठरा दिवसांनी म्हणजे १५ जुलैला कानपूरच्या बीबीगढींत सव्वाशे स्त्रिया व त्यांचीं अर्भकें यांची कत्तल झाली आणि त्या सर्वांचीं प्रेतें एका विहिरींत फेकलीं गेलीं!! जे इंग्रज, ज्या इंग्रजी स्त्रिया आणि जीं इंग्रजीं मुलें नावांतून बसून गंगेपार होऊं पहात होतीं, त्यांना किनाऱ्यावरून गोळचा झाडण्यांत येऊन जगापार करण्यांत बंडखोर शिपायांनी भूषण मानलें. आणि हें सारें, नानासाहेब आपण करवलेंत, अशी त्यावेळच्या इंग्रजी जनतेचीच काय, पण आजच्याहि इंग्रजी इतिहास–लेखकांची समजूत आहे. खरें–खोटें एक ईश्वराला की आपणाला अगर त्या बंडखोरांना ठाऊक!! पण तेव्हापासून जळीं, स्थळीं, काष्टीं, पाषाणीं इंग्रजांनी आपली दहशत खाल्ली, ही गोष्ट खरी!! आपली नांवनिशाणी देखील या मृत्युलोकांत राहू द्यावयाची नाही, अशी घोर प्रतिज्ञा इंग्रज सरकार मनोमन करून बसलें!

शेवटी १७ जुलै १८५७ ला हॅवलॉकच्या सैन्याने कानपूरला येऊन हिंदुस्तानी लोकांची कत्तल आरंभिली. नानासाहेब, आपण त्याच्याशी सामना देण्याचा प्रयत्न केलात; पण शक्ति कमी पडत आहे, असें पाहिल्यावर, आपण नांवेंतून पार झालात.

तेथून नानासाहेब, आपण खरोखर कोठे गेलांत, हें इतिहासाला अजूनहि गूढ आहे. १८२४ च्या ८ डिसेंबरास जन्मलेले आपण ७ जून १८२७ ला दुसऱ्या बाजीराव साहेबांचे चिरंजीव दुसरे नानासाहेब पेशवे म्हणून दत्तक झालात आणि २८ जानेवारी १८५१ ला बाजीराव साहेब वारल्यावर आपल्याकडे फक्त तीस लाख रुपये, पांचशे पायदळ व एक घोडदळाचा रिसाला उरला असतां, इंग्रज मंडळींत मिळून मिसळून राहतां राहतां शिपायांनी बंड उभारल्या बरोबर १८५७ साली अगदी पहिल्या बाजीरावांचे चिरंजीव पहिले नानासाहेब पेशवे यांच्या प्रमाणेच आपल्या आयुष्याचें, आपण, पानिपत काय म्हणून करून घेतलेंत? वसईचा

तह दुसऱ्या बाजीरावांनी करून जी पीडा हिंदुस्थानच्या वरांत आणि महाराष्ट्राच्या माजघरांत घेतली होती, ती आपल्या परीने सारण्याच्याच दृष्टीने. होय ना ?

बंडखोर सैन्यामध्ये संघटितपणा व शिस्त नसल्यामुळे व मिळालेल्या संधीचा फायदा न घेतल्यामुळे कानपूर, काल्पी, ग्वाल्हेर व झांशी या ठिकाणी बंडवाल्यांचा पराभव झाला आणि नानासाहेब, आपल्या कुटुंबांतील मंडळीसह नेपाळच्या हद्दींत जाणें भाग आलें ! आश्रय द्यावयास कोणी धजत नाही, प्रगट झाल्यास मरणाशिवाय गति नाही, जिंकत राहिल्याशिवाय परकीय सत्तेला अस्वस्थहि करतां येत नाही, अशा पेचांत आपण असतांना, नानासाहेब, अनेक हालअपेष्टा सहन करीत आणि अज्ञातवास कंठित कंठितच नेपाळांतील ठाडा गांवापासून सात कोसावरील देवखडी येथे दोषीज्वर येऊन आपला १८५८ सालीं अंत झाला, अशी लोकसमजूत आहे. खरी आहे ना ती ?

आपली बहीण बयाबाईसाहेब आपटे यांनी तसें निवेदन केलें असूनहि, लोक साशंक आहेत. कारण, निवेदन पन्नास वर्षांपूर्वीचें आहे; तर त्यापूर्वी कितीतरी वर्षे, आपण परलोकवासी झालात, या गोष्टीवर स्वतः इंग्रजांचाच भरंवसा नव्हता! आपले ते पाणीदार आणि वाघासारखे डोळे, आपली घोड्यावरील पटाईत स्वारी आणि आपलें शूरत्व, आपल्या साध्या, सरळ स्वभावावर मात करून इंग्रजांना एवढी दहशत लागून राहिलेली की आपण जिवंत आहां अशा अनेक अफवा अनेक वेळां उठल्या व चौकशाहि झाल्या. आपण गुप्तवेषाने कोठे तरी साधुवृत्तीने काळ कंठीत आहां, असा अनेकांचा विश्वास होता. म्हणून आपल्या तीन समाध्या भारतांत भोळे लोक सांगतात, दाखवतात. आपण १९०३ साली समाधि घेतली, असें कोणी सौराष्ट्रांतले आपले भक्त म्हणतात, तर १९१७ साली मॉंटेग्युसाहेब येथें भारतांत आले असतां, आपणांस पकडण्यासाठी प्रथम पन्नास हजारांचें व नंतर एक लक्ष रुपयांचे बक्षीस जें १८५७ सालीं ब्रिटिश सरकारने लावलें होतें तें कायम असल्यास, आपणांस मॉंटेग्यु साहेबांच्या स्वाधीन करण्याची तयारीहि एका महाभागाने दाखविली असल्याची नोंद आढळते. नानासाहेब, असे आपण गहनगुढ पुरुष असलात, तरी आपल्यामुळेच सहनशीलतेची शांतिमूर्ति आपली एकुलती एक कन्या मैनावती ही जशी महाराष्ट्रमांगल्याची देवता भारताच्या इतिहासाला लाभली, तशीच आपल्या बरोबर वीर वृत्तीचे धडे घेतलेली झांशीची रणदेवता लक्ष्मीबाई ही देखील देवता लाभली. तात्या टोपे हा आपला दोस्त तर इंग्रजी साम्राज्याला खवीसच वाटत होता. अशारीतीने, नव्या स्वातंत्र्यलढ्याचा श्री गणेशाय नमः आपण आपल्या हयातींतील शेवटच्या संग्रामांत करून दिलात व महाराष्ट्राचें स्वातंत्र्यप्रेम अखंड तेवत ठेवावयास आम्हां आजचे महाराष्ट्रीयांनाहि स्फूर्तिस्थान झालात.

वूलवेअर लटन याने म्हटल्याप्रमाणे भूतकाळ हा शब्दशक्तीने अमर राहिलेला असतो. नानासाहेब, इंग्रजांनीच आपल्यासंबंधी खालील माहिती जाहीर केली नाही काय ?

" श्रीवर्धनाचा मूळचा कुलकर्णी जो गार्ग्य गोत्री भट्टवंश, त्यांतील बाळाजी विश्वनाथ शाहूचे कारकीर्दीत पेशवा झाला. बाळाजीने सासवडच्या बर्वे घराण्यांतील मुलगी केली होती. त्यांचा मुलगा बाजीराव याने चासकरांची मुलगी केली होती. त्याने व त्याचा भाऊ चिमाजी आप्पा याने मुसलमानी आणि पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांना सळो कां पळो करून सोडलें. बाजीरावाचा मुलगा बाळाजी ऊर्फ नानासाहेब सतराशे एकसष्टच्या पानपतच्या संग्रामाच्या वेळी पेशवा होता तर त्याचा भाऊ रघुनाथराव याने अटकेपार झेंडे लावले होते. हे दोघेहि सुधारक होते. बाळाजी बाजीरावाने कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे अशा तीनहि पोट–जातींत विवाह केले होते तर रघुनाथराव आपली पत्नी आनंदीबाई हिच्या शहाणपणानेच चालत असे. चिमाजी आप्पाचा मुलगा सदाशिवराव याने पेठे घराण्यांतील मुलीशीं लग्न लावलें होतें व तोच पानिपतच्या मोहिमेंत पेशव्यांचा " गर्दीत घुसणारा " सेनापति होता. बाळाजी बाजीरावाचा मुलगा विश्वास पानिपतास गमावला. दुसरा मुलगा व पानिपताची हानी भरून काढणारा माधवराव मुत्सद्दी व योद्धा होता. पण क्षयाने मेला व त्याची बायको रमा त्याच्याबरोबर सती गेली. त्याचा भाऊ नारायणराव असातसाच होता. त्याचा रघुनाथराव पेशव्याने गादीच्या लोभास्तव बळी घेतला. नारायणाचा मुलगा सवाई माधवराव आत्महत्त्या करून मेला. रघुनाथरावाच्या राज्यलोभानेच इंग्रजाला मराठेशाहीत हात खुपसावयास संधि सांपडली. यांचेच चिरंजीव, रावबाजी, चिमाजी व अमृतराव. अमृतरावाचे चिरंजीव विनायकराव व नातू नारायणराव आणि दत्तक नातू माधवराव. पण या शाखेचा आपण इंग्रजांनी बेमालूम बंदोबस्त केला आहे. रावबाजीचे दत्तक चिरंजीव बाळासाहेब, दादासाहेब व नानासाहेब. त्यापैकी पहिले दोन सभ्य गृहस्थ असून उठाठेवी काय तो धोंडोपंत नानासाहेबच आहे. हा लुच्चा बापाचें दहा लाखाचें पेन्शन आपणांस मिळावें म्हणून खटपटीस लागला. त्यांत निराशा आल्यावर तो युरोपियनांतच फिरुं लागला. पण आंतून कारस्थान करीत होता. बहादूरशहापासून रंगो बापूजी व कोल्हापूरचा चिमासाहेब आणि नरगुंदचा भावे बाबासाहेब यांच्या–पर्यंत सगळ्यांशीं संकेताच्या पत्रव्यवहारांनी याने संबंध ठेऊन बंडाची उठावणी केली आहे. झांशीच्या कोवळ्या राणीला बंडांत यानेच आणली ! याच्याजवळ सतरा करोल माणसें असून कांही तर याच्यासारखी दिसणारी व याच्या चालीची आहेत. तेव्हा भलताच मनुष्य पकडून नानासाहेब सांपडला अगर फांशी गेला, अशा भ्रमांत राहणें इष्ट नाही. " नानासाहेब, केवढा आपला हा दरारा ! ! महाराष्ट्राच्या पराक्रमा, नमस्ते.

## नानासाहेब पेशव्यांची जनक घरची वंशावळ
( १८५७ साली इंग्रजांच्या गुप्तहेरांनी मिळवलेली )

- गणेशभट
  - नारायणभट
    - विश्वनाथभट
      - पठ्ठ्याभट ( बडोदा )
      - राघोबाभट ( १८५७ त बंदी )
        - काशिनाथभट
      - सीताराम ऊर्फ पांडुरंग रावसाहेब (दुसरे बाजीरावांचे विधवेने दत्तक घेतला तो )
    - गणेश ऊर्फ रावजीभट
      - दादाभट
    - माधवरावभट
      - नानाभट
      - धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब ( दुसरे बाजीरावाने दत्तक घेतला तो )
      - बाळासाहेब ( दुसरे बाजीरावाचा दत्तक )
    - त्र्यंबकभट
      - आबाभट
    - भास्करभट ऊर्फ दाजीबा

[ ३ ].

# महाराष्ट्राची तेजस्विनी झांशीची राणी

१८५७ च्या क्रांतियुद्धाचा नायक गणला गेलेला धोंडोपंत नानासाहेब पेशवे त्यावेळी अवघा तेहतीस वर्षांचा होता तर त्याच्यापेक्षांहि रणरागिणी ठरलेली त्याची आप्त बहिण त्या क्रांतियुद्धाची नायिका ठरली ती अवघी त्या वेळी साडेबावीस वर्षांची होती. दुसरे चिमाजीअप्पा पेशवे इंग्रजांचें आठ लाखाचें वार्षिक मानधन घेऊन काशीला हरिहरि करीत बसल्यावर, त्यांच्या आश्रयाला जीं कुटुंबें गेलीं, त्यांत सातारा जिल्हयांतील धावडशीचें तांबे कुटुंबहि होतें, त्या कुटुंबाचे प्रमुख मोरोपंत हे चिमाजीअप्पांचे कारभारीच होते. ता. १९ नोव्हेंबर १८३५ रोजी म्हणजे त्या सालच्या नरकचतुर्दशीला मोरोपंतांच्या पोटीं पारतंत्र्याच्या नरकासुरावर शस्त्र धरणारी नवी सत्यभामा जन्माला आली. १८०२ साली वसईचा तह घडवून आणून पेशवाई ताब्यांत घेतल्याने सर्व भारतभर जो ब्रिटिशांचा मनु सुरूं झाला होता, त्याला ठोकर देऊन स्वातंत्र्यप्रेमाचा नवा मनु सुरूं करणारी ही क्रांतिदेवता काशीक्षेत्रीं आपल्या पोटीं येत आहे, असे डोहाळे मोरोपंतांच्या पत्नीला होत होते की नाही, कोणास ठाऊक ! पण अवघ्या पन्नास रुपये दरमहावर चिमाजीअप्पांचा चिमणा कारभार करणाऱ्या त्या तांबे यांच्या कुटुंबाला आपल्या मुलीचें नांव " मनु " ठेवण्याची बुद्धि झाली, एवढें खरें. आपल्या आईने ठेवलेलें नांव सार्थ करावें, अशी ईर्षा सर्वच मुलें बाळगतील तर या पृथ्वीचें नंदनवन व्हावयास वेळच लागणार नाही. पण सगळीं मुलें तशी महत्त्वाकांक्षा बाळगत नसलीं तरी, मोरोपंतांच्या त्या कन्येने तशी बाळगली आणि आईची इच्छा तृप्त करून ती धन्य झाली ! ! हें सर्व तिने आईच्या देखरेखीखाली केलें नाही. आईच्या मायेचा हात शाबासकीसाठी पाठीवर फिरावयास, अगर चुकीच्या वेळी गालावर बसावयास, परमेश्वराने मनुला तिच्या तिसऱ्या वर्षांपुढे आईच ठेवली नव्हती ! आई अभावी मनु आणि आश्रयाअभावी मोरोपंत १८३८ साली उघडे पडले. चिमाजीअप्पा पेशवे त्या साली परलोकवासी झाले. आणि पुढे एकोणिस वर्षांनी जिचें नांव इतिहासाने शिरोधार्य मानलें, ती स्वरूपसुंदर मनु जणुं तलवार-तेजस्विनी होण्याकरतां काशीहून ब्रह्मावर्ताला यऊन दाखल झाली.

होय; तेथेच दुसरे बाजीराव पेशवे त्यावेळी रहात होते. त्यांनी आपल्या भावांकडील आधार तुटलेलीं कुटुंबें काशीहून ब्रह्मावर्ताला बोलावून घेतलीं, त्यांत मोरोपंत तांब्यांना आवर्जून बोलावून घेतले. ब्रह्मावर्तास दुसरे बाजीराव साहेबांचे चिरंजीव नानासाहेब, रावसाहेब, बाळासाहेब आपल्यामध्येच तांब्यांच्या मनुला शिकायला-खेळायला घेत. त्या बन्धू प्रेमाची परिणति अशी झाली की पेशव्यांच्या

मुलांसारखीच मनु तांबे ही पुस्तकी शिक्षणांत आणि लष्करी कवायतींत तरबेज झाली.

भारतभर इंग्रजी राज्य होऊन पंचविशी पालटावयाची वेळ आली होती; तरी जनरूढींतील बदल फारसें झपाट्याने होत नव्हते. राव-बाजींचा विवाह-कायदा त्यावेळी जारीच होता. नऊ वर्षाचे पुढे मुलगी लग्नाची राहिली तर ती " घोडनवरी " मानली जाई. म्हणून मनु तांबेचें लग्न तिच्या सातव्या वर्षीच बाजीराव साहेबांनी जुळविलें. झांशीचे राजे गंगाधर-राव नेवाळकर हे नुकतेच विधुर झाले होते. त्यांची गृहलक्ष्मी म्हणून १८४२ मे ( वैशाख ) महिन्यापासून लक्ष्मीबाई झांशीवाली झाली.

वय वाढत गेले तशी लक्ष्मीहि मोठी झाली. झांशींत आल्यापासून तिच्या पायगुणाने झांशीची उत्तरोत्तर उन्नति होत गेली म्हणून लोक तिला देवता मानूं लागले. आपला जन्म काशीला झाला, आपल्या आईचें नांव भागीरथी होतें, आपल्या पतीचें नांव गंगाधर आहे. छोटचा कां होईना पण एका संस्थानची आपण राणी आहोंत, इतक्या सर्व जाणीवांनी नेवाळकरांची ही लक्ष्मी अशी भारली होती की, गरीबींतून श्रीमंतीला चढल्यामुळे तिला कसलाहि ताठा येण्याच्या ऐवजी " विनयवती कान्ता " होण्याच्या पावित्र्याने तिची प्रत्येक कृति ओतप्रत भरलेली असे. अशा विलोभनीय अवस्थेंत लक्ष्मीबाईचे पोटीं १८५१ साली झांशी संस्थानचा वारस जन्माला आला. झांशीभर राजपुत्राचा जन्मोत्सव साजरा झाला. पण झांशीचा हा रामचंद्र तीन महिन्यांतच मावळला ! गंगाधरराव नेवाळकरांनी तेव्हापासून इतकें खालीं घेतलें की स्वतांच्या समाधानासाठी व लक्ष्मीच्या सेवेसाठी आणि संस्थानचे मालकीसाठी त्यांनी आपले एका आप्ताचा मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव आनंदराव होतें. बुंदेलखंडाचा पोलिटिकल एजंट एलिस व लष्करी अधिपति मार्टिन या ब्रिटिश प्रतिनिधींच्या समक्ष यथाविधि दत्तक घेतलेल्या त्या मुलाचें नांव दामोदरपंत ठेवण्यांत आलें.

त्या पुत्र सुखाचाहि आस्वाद झांशीकरांस फारसा घेतां आला नाही. संस्थानचे व लक्ष्मीचे मालक १८५३ च्या नोव्हेंबरांत म्हणजे राणी लक्ष्मी केवळ पूर्ण अठरा वर्षाची असतांनाच परलोकवासी झाले ! !

आपल्या ऐहिक जीवनाचा निरोप घेण्यापूर्वी आणि दत्तविधान झाल्या-बरोबर गंगाधररावजी नेवाळकरांनी आपले मंत्री नरसिंहराव, झांशीचे नगरशेठ लाहोरीमल आणि मोरोपंत तांबे यांच्या देखत दत्तक घेतलेल्या त्या मुलाबद्दल आपल्या दिवाणजीकडून ब्रिटिश सरकारला लिहिलें होतें की– ' ब्रिटिश सरकारशीं झांशी संस्थानने जो तह केला आहे, त्याच्या दुसऱ्या रकान्याप्रमाणे दामोदरपंताला

मी दत्तक घेतला आहे. तेव्हा ब्रिटिश सरकारने मेहेरबानी राखावी व माझा मुलगा आणि माझी पत्नी यांचें सर्व बाबतींतील स्वातंत्र्य अबाधित राखावें."

मेजर एलिसच्या हातीं हें पत्र ब्रिटिश सरकारास गेलें. हें पत्र गेल्यावर दोनच दिवसांनी ता. २१ नोव्हेंबर १८५३ रोजी गंगाधररावजी कैलासवासी झाले.

झांशीची लक्ष्मी करुणा झाली. पण तिला सती जाण्याची सोय नव्हती. सती-बन्दीचा कायदा झाला होता म्हणून नव्हे, तर दामोदरपंताला "राजा" म्हणून संगोपण्याची जबाबदारी अंगावर पडली होती म्हणून. तें सतीचे वाण लक्ष्मीने पत्करलें. पण तहाचे कागद म्हणजे रद्दीबट्टींतल्या चिठोऱ्या करण्याचा कारखाना ब्रिटिश दौलतीने त्यावेळेला भारतांत काढला होता. त्यामुळे कोणत्या संस्थानावर केव्हा गिधाड-धाड येईल याचा नेम नव्हता. झांशीच्या बाबतींत तीच दृष्टी प्रत्ययाला आली. मालकम या इंग्रज प्रतिनिधीने गव्हर्नर जनरलकडे "झांशीचा दत्तक मुलगा कबूल न करतां राणीला महिन्याला पांच हजार रुपयांची नेमणूक करून देऊन संस्थान खालसा करण्यांत यावें" म्हणून शिफारस केली. शिफारशीप्रमाणेच नेमणूक व राजवाडा राणीला मिळून दत्तक मुलगा फक्त खाजगी इस्टेटीला मान्य असल्याबद्दल कलकत्त्याहून लिहून आलें. त्याबरोबर ता. ७ मार्च १८५४ रोजी एलिसने संस्थान व किल्ला ताब्यांत घेतला. इंग्रजांना आपल्या सासऱ्याने कठिण प्रसंगी कितीदां मदत केली, याबद्दल राणीने ब्रिटिश सरकारला जाणीव दिली; इतकेंच नव्हे, तर विलायतेला कोर्ट ऑफ् डायरेक्टर्सकडे आपले व कंपनीसरकारचे तह कशाप्रकारचे आहेत व सध्या संस्थानवर कसा अन्याय होत आहे तो दाखवून, तो न व्हावा म्हणून, तिने दाद मागितली. प्रार्थनांनी कां लुटारू हात हे वरद होतात ?

राज्य गेल्यावर शोकग्रस्त अंत:करणाने राणीसाहेब त्यावेळच्या सर्वसाधारण गंगाभागिरथीप्रमाणेच देवपूजेला लागल्या. तीन एक वर्षे तपस्विनीचें जीवित त्यांनी घालविलें आणि १८५७ साली ?

त्या साली ब्रिटिशांच्याकडील फौजेंतील असंतोषामुळे त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध उठाव केला. त्यांत दुसरे नानासाहेब पेशवे की ज्यांनी झांशीच्या लक्ष्मीला आपल्या बहिणीसारखी अगदी लहानपणापासून मानली होती ते सामील झाले. अयोध्येचा नबाब त्यांत मिळाला. दिल्लीचा बादशहा बहाद्दूरशहा त्या उठावाचा एक मातबर पुढारी ठरला. साऱ्या भारत वर्षांत तो उठाव फैलावतां फैलावतां झांशीपर्यंत येऊन पोहोंचला. यावेळी झांशीमध्ये सत्तर-ऐंशी इंग्रज सहकुटुंब सहपरिवार वास्तव्य करून होते. ब्रिटिश फौजहि एक हजारभर होती. त्या फौजेने इंग्रजावर हात टाकला. सगळीकडे अराजक माजलें. त्यावेळी लक्ष्मीबाई राणी या नात्याने


झांशीच्या महाराणी श्रीमंत सौ. लक्ष्मीबाई नेवाळकर
जन्म काशी
विवाह झांशी
स्वर्गारोहण ग्वाल्हेर
ता. १८ जून १८५८

आपलें कर्तव्य करावयाला पुढे सरसावल्या. त्यांनी तपस्विनीचा अवतार टाकला; तेजस्विनीचा अवतार घेतला. असहाय्य इंग्रज कुटुंबांची अन्नपाण्याची सोय लावली. किल्ल्यांत कोंडले गेलेल्या इंग्रजांना तरीहि राणीची योग्यता कळली नाही. त्यांनी तिला शत्रूच लेखलें. प्रसंग बाका ठेपला. राणीने मग पराकाष्ठा करून ७ जून १८५७ ला झांशीचा किल्ला व दारूगोळाहि ताव्यांत घेतला.

बंडखोर सैनिकांनी राणीच्या नांवाची द्वाही फिरवली. एक लाख रुपये काखेला मारून लष्करी बंडखोर दिल्लीवाटे मोर्चे वळवून गेले. बंडाबद्दलचे इषारे इंग्रजांना राणीसाहेबांनी अनेकानेक केले तरी त्यांचा तो गनिमी कावा मानण्यांत आला. गंगाधररावजी नेवाळकरांच्या कर्जफेडीच्या नांवाखाली राणीसाहेबांच्या खाजगी मिळकती जप्त करण्याच्या हिकमतीहि इंग्रज खेळूं लागले. त्यामुळे इंग्रजांच्या कृतघ्नतेचाच ठसा राणीसाहेबांचे मनावर फार बसला. अर्थातच मग त्या बंडवाल्यांना उघड उघड मिळाल्या.

मग काय ? राणीसाहेबांचा पाडाव करण्यासाठी ब्रिटिश सरकारने सर ह्यू रोजची योजना केली. त्याचे हाताखाली अफाट सेना दिली. झांशीच्या किल्ल्याला इंग्रजांचा वेढा पडला. ती तारीख २० मार्च १८५८ होती. राणीसाहेबांनीहि आपले कृतक बंधु नानासाहेब पेशवे आणि त्यांचे सावधचित्त सेनापति तात्या टोपे यांना आपल्या दिमतीस बोलावले होते, ता, २३ मार्च १८५८ ला युद्धाला प्रत्यक्ष तोंड लागलें. दोन्हीकडून तोफेचे गोळे सुटले. दोन्हीकडील वीरवर धारातीर्थी पडू लागले. मर्दानी पोशाख करून घोड्यावर स्वारी भरून यावेळी राणीसाहेब सैन्याचें संचालन करीत होत्या. कांही दिवस मातबर युद्ध झालें. पण एके दिवशीं इंग्रजां-कडील तोफेच्या गोळ्यामुळे राणीसाहेबांचा दारूखाना पेटून नाहीसा झाला. तात्या टोपे पंधरा हजार लोकांसह मदतीला आले. त्यांनी इंग्रजावर बाहेरून हल्ले केले. याचवेळी किल्ल्यांतूनहि तोफांचा भडिमार झाला असता तर सर ह्यू रोजची दाणादाण झाली असती. पण वरील कारणामुळे तो भाग्यशाली ठरला. किल्ल्यांत फितुरीने दगा दिला. इंग्रजांनी शहरांत व किल्ल्यांत घुसून हत्याकांडाला सुरवात केली. म्हातारे कोतारे आणि पोरेंबाळें यांचेहि शिरच्छेद झाले. राणीसाहेबांनी आपले चिरंजीव दामोदरपंत यांना पाठीशीं घेऊन तीनशे लोकांसह " मेरी झांशी नहीं दूंगी " म्हणून निकराचा सामना केला. पण अखेर त्याच आपल्या स्वारी शिबंदीनिशीं राणीसाहेबांना काल्पीचा रस्ता काटावा लागला.

काल्पीमध्ये रावसाहेब पेशव्यांचा तळ होता व ते बंडवाल्याचें मुख्य ठिकाण होतें. झांशीला अखेरचा मुजरा करून काल्पीकडे धांवत सुटलेल्या राणीसाहेबांना पकडण्यासाठी लेफ्टनंट वॉकर जीवाचें रान करून आला असतां, राणीसाहेबांनी त्याचे दांत त्याच्या घशांत घातले व त्याला पळतां भुई थोडी केली. अशा कठीण

प्रसंगांतून जात असतांनाहि पाठीशीं बांधलेल्या दामोदरपंतासह चोवीस तासांत एकशेंदोन मैलांचें अंतर तोडून राणीसाहेब काल्पीला आल्या.

पेशव्यांनी अर्थातच राणीसाहेबांचें स्वागत केलें. भाऊबीज म्हणून सर्व प्रकारचें सहाय्य करण्याच्या वचनाची ओवाळणी राणीसाहेबांना मिळाली. ही बातमी मिळतांच रोजसाहेबाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याने मोऱ्याच्या जागा काबीज करण्याचा सपाटा चालविला व १६ मे रोजी स्वतःच काल्पीच्या रणमैदानवर हजर झाला. तेथेहि सामना झडला. महाराणी साहेबांचें युद्धकौशल्य पाहून शत्रु व मित्र दोघेहि आश्चर्यचकित झाले. पेशव्यांचे सैन्यांतील गाफील शिस्तीचा फायदा घेऊन रोजने काल्पी काबीज केली.

यावेळी राणीसाहेब, पेशवे व तात्या टोपे यांच्यापुढे बिकट समस्या उभी राहिली. कोठल्या तरी किल्ल्यावर तळ दिल्याशिवाय विजय-पताका फडकविणें अशक्य होईल, असा धीरांचा सल्ला राणीसाहेबांनी दिला. त्यामुळे प्रथम ग्वाल्हेरचा किल्ला सर व हस्तगत करण्यांत आला. लक्ष्मीबाई राणीसाहेब व तात्या टोपे यांच्या पराक्रमाने मुख्यतः तें काम झाल्यावर, एक वेळ पेशव्यांचा मांडलिक असलेला जयाजीराव शिंदे इंग्रजांचा दोस्त बनला असल्याकारणाने तो आग्र्याच्या बाजूनें पळ काढीत काढीत इंग्रजांच्या आश्रयाला चालता झाला, ग्वाल्हेरच्या विजयाने पेशव्याकडे आनंदी आनंद झाला. ता. ३ जूनला येथे नानासाहेब पेशव्यांच्या नांवाची ग्वाही फिरवण्यांत आली. हा काळ असल्या फुशारकी मारण्याचा नाही, उलट, सैन्यसंघटन करण्याचा आहे, असा राणीसाहेबांनी इशारा केला, पण पालथ्या घड्यावर पाणी झालें.

पेशव्यांच्या या दिमाख--खोरपणाचा सर रोजने भरपूर फायदा घेतला. त्याने आग्र्याहून जयाजीराव शिंद्याला परत आणलें व त्याच्या कैवाराने युद्ध सुरू केलें. त्यामुळे शिंद्यांचें जें सैन्य इंग्रजांच्या विरुद्ध लढावयाचें, तेंच आतां इंग्रजांच्या बाजूने पण शिंद्यांच्या नांवाने लढूं लागलें. तात्या टोपे व पेशवे यांनी राणीसाहेबांना ग्वाल्हेरच्या पूर्व बाजूने रक्षण करण्याचें काम सांगितलें. जयाची आशा दिसत नसतांहि त्यांनी तें पतकरलें. ता. १८ जन १८५८ रोजी स्मिथने प्रथम चाल केली. दुसऱ्या बाजूने रोज राणीसाहेबांवर चाल करून आला. युद्धास निकराने तोंड लागलें. राणीसाहेबांनी दाखविलेल्या पराक्रमामुळे शत्रूचे टाके ढिले व्हावयाची वेळ आली. मानाने मरेन पण शरणाईने सुख पहाणार नाही, अशा इषीमीने राणीसाहेब लढल्या, त्या वीरांगनेला जीवंत कैद करावी, अशी इंग्रजांची इच्छा होती. म्लेंच्छाचा हस्तस्पर्श आपल्या जीवंतपणीं तर राहोच, पण मृत्युनंतरहि आपल्या शरीराला होऊं नये, अशा स्वाभिमानाने राणीसाहेबांच्या मनीं पीळ धारण करून युद्धास सहाय्य करणाऱ्या आपल्या सेविकांना देखील त्यांनी आपली

मनीषा कळवून युद्धांत उडी घातली होती. त्यांच्या पिछाडीवरही इंग्रजांनी आपले सैनिक सोडले होते. राणीसाहेबांच्यावर एका इंग्रजाने स्वदस्तुर हल्ला केला तेव्हा राणीसाहेबांनी स्वदस्तूर त्याला परमेश्वरचरणीं रुजूं केला. याचवेळी दुसऱ्या एका इंग्रजाने राणीसाहेबांच्या एका सखीवर हल्ला चढविला. राणीसाहेबांनी त्यालाहि यमसदनाला रवाना केला. या वेळी राणीसाहेब तलवार मारीत तशाच पुढे गेल्या असत्या ! पण एक खंदकच्या खंदक तेथे होता. तो पाहून राणीसाहेबांचा घोडा अडला याचवेळी आणखी इंग्रज सैनिक तेथे येऊन पोंचले. झांशीहून आणलेला आपला स्वामिनीभक्त घोडा त्या खंदकाला अडला नसता ! पल्लेदार उडी मारून पार झाला असता ! पण तो अगोदरच गोळी लागून देवाघरीं गेल्यामुळे, शिंद्यांच्याकडील घतलेला हा अबलख घोडा शिंद्यांच्याप्रमाणेच अडला, याची जाणीव राणीसाहेबांना आतां तीव्र झाली. आपल्या मागच्या बाजूच्या तोफखान्यावर रोजने हल्ला केला असतां आणि स्मिथने तोफांचा भडिमार करून आपले लोक मारण्याचा सपाटा चालविला असतां, आपण इंग्रजांची फळी कापीत कापीत खंदकापर्यंत आलों आणि जीवास जीव देणाऱ्या दहावीस मंडळीनिशीं खंदकापार व्हावयाचा मोका असतांना घोडा अडला, तें खरोखर दुर्दैव आडवें आलें. याची बोंचणी राणीसाहेबांना लागली. कारण रणांगणीच्या परिश्रमांनी त्या आतां थकल्याहि होत्या. इतक्यांत एका सभ्य इंग्रजाने मागून त्यांच्या डोक्यावर सणसणून वार केला. त्याने त्यांच्या मेंदूचा उजवीकडील भाग खाली उतरूं लागला. अशाहि स्थितींत राणीसाहेबांनी त्या हल्लेवाल्याला कंठस्नान घातलें. एवढ्यांत दुसऱ्या एका इंग्रजाने राणीसाहेबांच्या छातींत भाला भोंकसला. त्यालाहि यमसदनाचा रस्ता तशा स्वतःचे मरणप्राय स्थितींत दाखवून राणीसाहेबांनी आपल्या तलवारीची तहान तृप्त केली. राणीसाहेबांचा हा पराक्रम पाहून इंग्रज सैरावैरा धावूं लागले. पण यावेळी राणीसाहेबांना आपली मरण-वेळा जवळ आल्याची जाणीव झाली. त्यांनी आपल्याबरोबर असलेल्या आपल्या रामचंद्रराव देशमुखांना खूण केली. त्याने दोन तीन सहाय्यकांच्या मदतीने राणीसाहेबांना जवळच्याच बागेंतील एका झोपडींत नेलें व राणीसाहेबांच्या तोंडांत गंगा घातली. झोपडीचे मालक बाबा गंगादास यांच्या कमंडलूंतील ती गंगा होती. स्वर्गीय तेज मुखमंडलावर चमकत असतांच, अवघ्या बावीस वर्षें ७ महिन्यांच्या हयातीच्या या तेजस्विनीने गृहलक्ष्मी व रणरागिणी यांचे आदर्श जगापुढे ठेवून या जगाचा निरोप घेतला ! !

[ ४ ]

# टोपकरांना टाप देणारे तात्या टोपे

" नाही, मी राजद्रोहीं नाही ! बंडखोर तर नाहीच नाही ! ! इंग्रजांनी मला बंडखोर म्हणावयास मी काय इंग्रजांचें लागतों ? मी माझे धनी पेशवे यांची चाकरी इमाने इतबारें केली. यांत चुकलें काय माझें ? मी इंग्रजांना हैराण केलें, म्हणतां ? होय, केलें; पण तें मी माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलें. "

फांशी जातांना असे उद्‌गार तात्या टोप्यांनी काढले. १८५९ च्या एप्रिलची ती १८ तारीख होती. त्यापूर्वी फक्त अकराच दिवस तात्या इंग्रजांच्या हातीं लागले होते. त्यांत इंग्रजांची कांहीच कर्तबगारी नव्हती. महाराष्ट्राच्या पांचवीला पुजलेल्या फितुरीने तो दगा तात्यांना नर्मदा कांठच्या एका जंगलांत दिला होता. या वेळी तात्यांच्या जवळ अवघे दोनतीनशेंच सैन्य होतें. त्याच्या जीवावर तात्या इंग्रजांना " दे माय धरणी ठाय करीत " स्वत: वनवास भोगत होते. त्यांच्याजवळ हालअपेष्टांनी दिवस काढणें आणि ते राष्ट्रीय बाण्याने काढणें येरा गबाळाचें काम नव्हतें. अशा एका येरा-गबाळानेच इंग्रजांनी लावलेल्या बक्षिसाला भुलून तात्यांना शत्रूचे स्वाधीन केलें.

करीना कां ! त्या आधी तात्यांना जें साधावयाचे होतें तें साध्य झालें होतें. आपल्या गोड बोलण्याला आणि चतुर वागण्याला हिंदुस्थान भुलला आहे व आपलें पारतंत्र्य विसरला आहे, असा जो भ्रम इंग्रजांना १८२३ पासून झाला होता, तो तात्या टोप्यांचे हालचालींनी पार उतरविला होता. वनवासांत दिवस काढूं पण परकीय सत्ता मानणार नाही, असा बाणा आपल्या दोनतीनशें लोकांनिशीं इंग्रजांच्या अनेक सेनापतींना मधून मधून हात दाखवून तात्यांनी पाळला होता व भावी पिढीचे अंत:करणांत प्रज्वलित केला होता.

१८५७ च्या क्रांतियुद्धाचा उपशम झाल्यावरची वरील स्थिति होती. क्रांतियुद्ध चालू असतां, आपल्या धूर्तपणाने, शौर्याने व धाडसाने तात्यांनी इंग्रज सेनापतींचा दोनदां पराभव केला होता. सर ह्यू रोजने तात्यांची धास्तीच खाल्ली होती. " कहाँ है तात्या टोपे ? " असें ह्यू रोज झोपेंतहि बरळत असे, असें म्हणतात. कारण, इंग्रजांच्या कवायती सैन्याला तोंड देण्यासारखा शिस्तीचा व शिकलेला फौजफाटा तात्यांच्याजवळ नसतांना तात्यांनी अनेक इंग्रज सेनापतींना चकित करून सोडलें होतें.

तात्यांच्याजवळ बिन शिकलेलें सैन्य असेल, पण कित्येकवेळां तें हजारोहजार शिपायांचें असे. त्यांना काबूत राखून त्यांच्याकडून अपेक्षित काम करवून घेणें हें " जावें त्यांच्या वंशा तेव्हा कळे ! " असें काम आहे. बेरवाच्या लढाईंत तात्यांच्या हाताखाली बावीस हजार शिपाई होते. दिल्ली, लखनौ, जगदीशपूर, कानपूर या ठिकाणच्या लढायांत तात्या अग्रेसर होते. १० आक्टोबर १८५७ ला आग्रा येथे कर्नल ग्रेथडच्या फौजेवर तात्यांच्या नेतृत्वाखाली हल्ला चढविण्यांत आला होता. झांशीसहि राणी लक्ष्मीसारख्या रणरागिणीला सहाय्य करावयास तात्या गेले होते. तात्यांचे त्या त्या वेळचे पराक्रम आणि सामान्य माणसांपर्यंत तात्यांनी बंडासाठी दिलेली स्फूर्ति गुजराथेपासून गोव्यापर्यंत अशी पसरली होती की तात्यांनाच शेवटी बंडाचा पुढारी मानण्यांत इंग्रज गर्क झाले होते.

तात्यांनी त्या क्रांतियुद्धांत मोठ्या हिरिरीने भाग घेण्याचें कारण म्हणजें इंग्रजांनी पेशव्यांना व सातारकरांना कसें वागविलें होतें, हें तात्यांनी अगदी लहानपणापासून पहिलें होतें. टोपे घराणें नाशिक जिल्ह्यांतील येवल्याचें खरें ! पण १८१४ त जन्मलेला हा टोपे वयाच्या पांचव्या वर्षापासून आपल्या रावबाजी-बरोबर गेलेल्या कुटुंबांत होता म्हणून ब्रम्हावर्तासच वाढला. त्यामुळे, नानासाहेब पेशव्यापेक्षा दहा वर्षांनी वडील असल्यामुळें, त्यांचा नौकर झाला तरी वडीलभावासारखा त्यांच्या उपयोगी पडला. तात्या टोपे यांचाच बाणा त्यांचा मुलगा पांडुरंगपंत हा चालवी. हा तर नानासाहेब पेशव्यांच्या बरोबर नेपाळांतहि गेला होता. राणीगंज येथे नानासाहेब पेशव्यांच्या मंडळींचे सेवेंत तात्या टोप्यांचे चारहि चिरंजीव होते. तेथील सेवा संपल्यानंतर त्यांच्याच पैकी एक जण भटकत भटकत सातारा जिल्ह्यांतील वाळवे तालुक्यांत नरसिंहपुर येथे येऊन, " नरसिंहाचा सेवेकरी " म्हणून राहिला होता. अनेक वर्षे या दाढीधारी पुरुषाला अनेक माणसें वेळी अवेळी भेटून जात. पण " देहं वा पातयेत् ध्येयं वा साधयेत् " अशा ब्रीदाच्या वडिलांच्या पोटीं जन्म झाल्याकारणाने " परमेश्वरी अधिष्ठानासाठी आपले ऊर्वरित आयुष्य " त्याने व्यतीत केलें. धन्य धन्य तें स्वामीभक्त घराणें !! आणि त्रिवार धन्य ते तात्या टोपे, ज्यांचा शब्द पिळाचा, पाऊल ठामपणाचें आणि एकंदर रुबाब वचक बसविणारा. १८५७ च्या दुर्धर प्रसंगांतील त्या वीराला शतशः प्रणाम.

[५]

# सत्तावनची एक देवता मैनावती भट पेशवे

"गव्हर्नर जनरलच्या आज्ञेशिवाय हें शक्य नाही ! नानासाहेब पेशव्यावर इंग्रजांचा केवढा राग आहे, याची कांही तरी तुम्हांला कल्पना आहे काय ? नानाचा वंशज किंवा त्यांचा वाडा यांपैकी कशावरहि दया होईल, हें कालत्रयी शक्य नाही!"

इंग्रजी सैन्याचा प्रमुख सेनापति जनरल औटरॅम याचें हें ठाम उत्तर जनरल "हे" यांस होतें. जनरल हे याला नानासाहेब पेशव्यांचा ब्रम्हावर्ताचा वाडा जळूं नये, असें नुकतेंच वाटूं लागलें होतें; म्हणून त्याने त्याच क्षणी तेथे येऊन पोचलेल्या जनरल औटरॅमला विचारलें होतें की, "काय हो, कोणत्याहि तऱ्हेने नानाचा हा वाडा वाचूं शकणार नाही काय ?".

नानासाहेब पेशवे १८५७ च्या उठावाचे पुढारी असतांना आणि त्यांनी कानपूर येथे अनेक युरोपियन स्त्री पुरुषांना "दे माय धरणी ठाय !" करावयास लावलें असतांना, तो भयंकर प्रसंग विसरून त्याचा वाडा वाचविण्याइतकी सहानुभूति जनरल हे याला कां उत्पन्न झाली ? कां तो इंग्रजांशीं फितूर झाला? यांपैकी कांहीच नव्हते. कारण, धोंडोपंत नाना पेशव्यांनी कानपूरमध्ये हार खाल्ल्यानंतर, इंग्रजांनी सूड म्हणून तेथे भयंकर हत्याकांड केलें! आणि मग, इंग्रजी सैनिक ब्रह्मावर्ताकडे वळले. तेथे त्यांनी प्रथम नानासाहेबांचा राजवाडा लुटला. या लुटींत त्यांच्या हातीं फार थोडी दौलत लागली ! तेव्हा त्यांनी नानासाहेबांचा वाडा तोफांच्या गोळ्यांनी उडवून लावण्याचा निश्चय केला. इंग्रजी सैन्याने जेव्हा तोफा डागल्या, तेव्हा वाड्याच्या एका पडवीला-व्हरांड्यांत एक स्वरूपसुंदर कन्यका येऊन उभी राहिली, सबंध वाडा आपण लुटीच्या वेळी कानाकोपऱ्यांतून धुंडला त्यावेळी इकडेतिकडे कोठेंच न आढळलेली मुलगी आतां एकदम कशी प्रगट झाली याचें आश्चर्यच इंग्रजी सैनिकांना व विशेषत: त्यांच्या सेनापतीला वाटलें !

ती बालिका उभी राहिली होती, तेथूनच तिने, गोळीबार करून धुमधडाका न उठविण्याबद्दल इशारा केला ! सेनापतीने तिला विचारलें–"म्हणणें तरी काय तुझें ?"

कन्यकेने शुद्ध इंग्रजी भाषेंत उत्तर केलें की– "काय, कृपा करून आपण हा वाडा शाबूत ठेवाल कां ?" सेनापतीने विचारलें–"अशी प्रार्थना करण्यांतील तुझा उद्देश ?"

कन्येने उलट विचारलें–" हा जमीनदोस्त करण्यांतील आपला तरी उद्देश सांगा !" सेनापतीने सांगितलें की–" हा वाडा बंडखोरांचा पुढारी नानासाहेब पेशव्याचा आहे. त्याची राखरांगोळी करण्याची आज्ञा सरकारने फर्मावली आहे."

कन्यका त्यावर गंभीरपणें म्हणाली " आपल्या विरुद्ध ज्यांनी शस्त्र धरलें, ते दोषी असतील ! पण या बिचाऱ्या वाड्याच्या दगडा–धोंड्यांनी आपला काय अपराध केला आहे ? हा वाडा वाचला तर वाचविण्यांत माझा उद्देश एवढाच आहे की हा वाडा माझा लाडका आहे."

त्यावर हळहळ व्यक्त करून सेनापतीने स्पष्ट केलें की, " कर्तव्याची पूर्तता म्हणून मला हा वाडा जमीनदोस्त केलाच पाहिजे !" मग ती कन्यका धीटपणाने म्हणाली " आपण जनरल " हे " च ना ? आपली लाडकी कन्या मेरी ही माझी जिवाभावाची मैत्रीण होती. कांही वर्षांपूर्वी मेरी माझ्याकडे रोज बिनचूक येई आणि त्याकाळी आपणहि कधी कधी आमचेकडे येत असां व आपल्या मुलीइतकेंच माझेंहि कौतुक करीत असां ? गेली ती मेरी, हें खरें; पण तिचें एक पत्र आजहि मजजवळ आहे व तें मी जीवापलीकडे जपलें आहे !" सेनापति हे एकदम भान विसरला व उद्गारला " मग काय तू नानासाहेब पेशव्यांची मुलगी मैना आहेस?"

होय. ती नानासाहेब पेशव्यांची मुलगी मैनावतीच होती. कानपूरच्या कत्तलीनंतर आलेल्या वावटळीमुळे नानांला पळ काढावा लागला आणि त्या धांदलीत ते मैनावतीला सोबत घेऊं अगर देऊं शकले नाहीत. ती ब्रह्मावर्ताच्या वाड्यांत एकाकिनीच राहिली. त्या धीरगंभीर मैनावतीला जनरल हे म्हणाला " कांही असले तरी इंग्रज सरकारचा प्रामाणिक नोकर म्हणून मला माझें कर्तव्य केलेंच पाहिजे !" आणि तो तोफा डागावयास जलदी करविणार इतक्यांत औटरॅम येऊन दाखल झालेमुळे प्रारंभी दिलेला संवाद दोघांत झाला. औटरॅमने शेवटीं निकरानेच सांगितले की " आम्ही हा वाडा धुळीस मिळविल्याशिवाय आणि नानाच्या मुलीला गिरफदार केलेशिवाय सोडणार नाही !"

औटरॅमच्या या बोलण्याने जनरल हे हा दु:खीकष्टी मनाने तेथून चालता झाला !! औटरॅमने वाड्याचें फाटक फोडलें आणि वाड्याचा सारा कानाकोपरा धुंड–धुंड–धुंडला. पण कोठेंहि मैनावतीचा पत्ता लागला नाही. त्या दिवशींच्या संध्याकाळी औटरॅमच्या आज्ञेने तोफेचे गोळे वर्षाव करूं लागले आणि ? आणि एका तासाच्या आंतच नानासाहेब पेशव्यांचा वाडा मातीला मिळाला.

तारीख ६ सप्टेंबर १८५७ चा लंडन टाईम्स त्यासंबंधी लिहितो की " आजपर्यंत हिंदुस्थान सरकार त्या दुष्ट नानासाहेबाला पकडूं शकलें नाही ही मोठ्या दु:खाची गोष्ट होय ! जोपर्यंत आमच्या धमन्यांतून इंग्रजी रक्त वाहतें

आहे, तोंपर्यन्त कानपूरच्या हत्याकांडाचा बदला घेतलेशिवाय, आम्ही कधीहि राहणार नाही. सर टॉमस हे याने नानांची मुलगी मैनावती हिला दया दाखवावी म्हणून जें प्रार्थना पत्र इंग्लंडला लिहिलें होतें, त्याची हौस ऑफ लॉर्डस्‌ने फार टर केली. नानाची मुलगीच काय, पण कोणीहि आप्त हा फासावरच चढला पाहिजे, असा अभिप्राय व्यक्त करून "हे" याच्या देखतच मैनावतीस फाशी द्या, असा सरकारला लॉर्डाच्या सभेने आदेश दिला."

त्याच सप्टेंबरांत पुढे एकेदिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास चांदण्याच्या स्वच्छ प्रकाशांत स्फटिकवत पांढरें पातळ नेसून, ब्रह्मावर्ताच्या नानापेशवे-वाड्याच्या झालेल्या राखेच्या ढिगावर एक कन्यका अश्रु गाळित बसली होती. जवळच जनरल औटरॅमची सेना गराडा देऊन होती. रात्रीच्या वेळी रडण्याचा आवाज ऐकून सैनिक तेथे गेले. बालिका रडतच राहिली. सैनिकांनी चौकशी केली. पण कन्यका आपल्या रडण्यांत चूर होती.

तोंच स्वत: जनरल औटरॅम आपला रुद्रावतार धारण करून तेथे आला. त्याने मैनावतीला ताबडतोब ओळखलें. एकदम जवळ जाऊन तो त्या कन्यकेला म्हणाला, "इंग्रज सरकारच्या हुकमाने मी तुला कैद केले आहे."

त्याच्याकडे भरलेल्या डोळ्यांनी पहात मैनावतीने प्रार्थना केली की "पोटभर रडून घ्यावयाला मला थोडा वेळ द्या!"

ती तिची शेवटची इच्छा पुरविण्याइतकी माणुसकीहि दाखविण्यांत आली नाही. ताबडतोब तिला हातकड्या घालण्यांत आल्या. कानपूरकडे बंदोबस्तांत चालवून तिला तेथे बंदीखान्यांत ठेवण्यांत आले.

पुढे दोनच दिवसांनी "वारबर" पत्रामध्ये महादेव चिटनवीस या महाराष्ट्रीयाचें पत्र प्रसिद्ध झालें की "काल कानपूरमध्ये एक अमानुष हत्याकांड झालें. नानासाहेब पेशव्यांची एकुलती एक मुलगी मैनावती धगधगत्या आगीत उभी भस्मसात्‌ करण्यांत आली. प्रखरतम पेटलेल्या आगींत शांत चित्ताने निश्चल राहून जळणाऱ्या मैनावतीला पाहून, सर्व लोकांनी तिला देवी समजूनच नमस्कार घातले."

अजूनहि भाविक मनाच्या स्त्रिया मैनावतीचा अंगारा म्हणून दहनभूमीची माती आपल्या मुलांना लावतात.

[ ६ ]

# बादशहा बहाद्दूरशहा !!

शेवटचा मोंगल बादशहा म्हणन इतिहासाला तरी औरंगझेबाचीच आठवण आहे. तरी पण त्याचे पाठीमागे दिल्लीच्या तक्तावर त्याचे वंशज बसत आलेच. म्हणून संख्येच्या गणतीने बोलावयाचे तर बहाद्दूर शहा हा शेवटचा मोंगल सम्राट होय, हे कबूल करावयास हवे. हा १८३७ साली गादीवर आला. शहाअलम पासून दिल्लीची बादशाही ही इंग्रजांच्या हातचा पोपट होऊनच राहिली होती. स्वतः बाहशहा दिल्लीस फार हालांत तुटपुंज्या वर्षासनावर गुजराण करीत असे. शहा–अलम, त्याचा मुलगा अकबर व पुढे बहाद्दूर यांच्या कारकीर्दी तशाच गेल्या. बहाद्दूरचा विरंगुळा म्हणजे, उत्कृष्ट उर्दू कविता तो करीत बसे, तोच. तीनशे–सव्वातीनशे वर्षे दिल्लीला बादशाही गाजविणाऱ्या मोंगल घराण्यांतील बहाद्दूरची ही केविलवाणी अवस्था पाहून ब्रिटिश राजवटीबद्दल खुद्द बादशाही घराण्यांतच धुसफूस सुरू होती. १८५७ चे उठावाचे वेळी बहाद्दूर शहा " बुढ्ढे बाबाच " होता. पतीच्या परधार्जिण्या वृत्तीने त्याच्या राणीचें म्हणजे झिन्नतमहालचें रक्त उसळत असे. तिच्या त्या प्रदीप्त इच्छाशक्तीच्या दर्शनाने बहाद्दूरशहाच्या पुत्रांनी, वरून, निष्पाप दिसणाऱ्या कारणासाठी सर्व हिंदुस्थानभर फिरती केली आणि दिल्लीच्या सिंहासनाचे निष्ठावंत कोठे कोठें आणि कसकसे आहेत याचा अंदाज घेतला. घरच्या मुलांचीच अशी तयारी असल्यामुळे मीरतहून " चलो दिल्ली " म्हणून बंडवाले सनिक दिल्लीस येऊन त्यांनी दिल्ली सर केल्यावर, बहाद्दूर शहा इषीमीने बंडांत सामील झाला. एवढेच नव्हे तर यशस्वी बंडखोरांनी दिली सर केल्यावर, तो त्यांच्या इच्छेप्रमाणे दिल्लीचा मूर्धाभिषिक्त बादशाहहि ठरला !! त्यासरसा त्याने " गाझीओंमें बू रहेगी जबतक ईमानकी । तबतक लंडनतक चलेगी शान हिंदोस्तानकी ।। " अशी भुलावणी केली व भारतीय प्रदेशांच्या संघराज्याचा नेता राहण्याची तयारी दाखविली. पुढे त्याच्याच नांवाने बंडवाल्यांनी इंग्रजांशी युद्ध केलें. येथेच त्याचें दुर्दैव ओढवलें. पुढे इंग्रजी सैन्याने दिल्ली घेतल्यानंतर या बिचाऱ्या बादशहास इंग्रजांचा कैदी व्हावें लागलें. बादशहाचे दोन मुलगे व एक नातू यांना हॉड्सन साहेबाने चांदणी चौकांत बादशहाच्या देखत गोळ्या घालून ठार केलें. नंतर स्वतः बादशहाला कोर्टापुढे खेचून. त्याला फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली. पण पुढे ती कमी करून बादशहाला रंगून येथे हद्दपार केलें. तेथेच बादशहा सामान्य माणसाप्रमाणे १८६२ मध्ये कालवश झाला !!

# १८५७ ची अवस्था

१८५७ च्या उठावांतील अखिल भारतीय मंडळींच्या जीवनिका पाहिल्यावर, त्या उठावापूर्वीची सामाजिक अवस्था सांगणारा एक पोवाडाच हातीं लागला आहे, तो आतां वाचूं.

हिंदुस्थानचे हिंदु लोक, जागे व्हा तुम्ही अजुनी ।
अपुल्या घरोघर चोऽर शिरले, नेलें सारें ठकवूनी ।। धृ ।।
हिंदुस्थान ही हिंदुची जागा, तंबुर फिरला त्यावरती ।
नयऽन असतां अंध बनला, विपरित भासऽते गती ।।
अप्‌ला सारा मुलूख असतां, दुसरा बळ्‌काउन बसला ।
नाना तऱ्हेचे जुलूऽम केले, बराच माजविला खटला ।।
मान्‌भावीचें कसब दावितो, काळिज घेतो ओढून ।
बाह्यात्‌कारी गोऽड दिसतो, आंऽत कप्‌टी हा पूर्ण ।।
जळू पाहतां डसऽत नाही, रक्त शरीरांतिल घेती ।
तशीच वृत्ती मज्‌ला भासे, पुढे दिसतसे घोर गती ।।
घरचा मालक घरांत असतां, दुसरा म्हणतो मालक मी ।
हिंदुस्थान्‌चें तसेंच झालें, भल्‌ताच चालवितो हुकमी ।।
याची ईर्षा मनीं बागवा, झोंप घालवा डोळ्यांची ।
धूळधाण सर्वांची झाली, नाहिं राहिली कोणाची ।।
थोर थोर जन भीक मागती, प्रसंग पडला लोकांना ।
कष्ट कष्ट बहुजनाशि दिधले, त्रासुनि गेले दुःखानं ।। १ ।।
शाहु छत्रपति, प्रधान पेशवे, यांनी बरेंच सांभाळिले ।
हिऱ्यापोटिं परि गार निपजलीं, त्याणें अवघें गमावलें ।।
पाठीमागून्‌ शहाणे राहिले, त्याणीं अकला सोडियल्या ।
निमकहरामी करून अवघे, बळेच सांपडले जाळ्यां ।।
दगडाखाली हात गुंतला, तो युक्तीने काढावा ।
प्रालब्धावर दूषण देऊन, हात तसा कां ठेवावा ? ।।
श्रीमंतीचा लेश मिळेना, दरिद्र झालें चोहिकडें ।
नीच जातिचें दैव उघडिलें, वरिष्ठ त्यांच्या पायिं पडे ।।
हिंदु लोक हे शाहणे असतां, बळेंच वेडे कां झाले ? ।
मद्यपान एकदां करोनी, अमलामध्ये जणुं चढले ।।
कुणी कुणाची भीड धरीना, अपसांमधिं करिती दंगा ।
समजदार जर समजुनि जाती, मूर्खापाशीं काय सांगा ।।

ज्याचें त्याला हित समजेना, जन्म धरावा काय् कामा ?।
सांगितल्याने लाभ कोणता ? झाली बोलण्याची सीमा ।।
आळस दैवत मूळच तुमचें, त्याचें करतां सुपूजन ।
सर्व तुम्हांला समजत असतां, बरें घेरला भ्रांतीनं ।। २ ।।
एक विचारी अन्य पाहिले, हिंदू लोकीं कट नाही ।
सारे अनुभव मनांत समजा, येथे सांगिल कुणि कांही ।।
वतन्दाराचीं वतनें गेलीं, इनाम-जहागिर गेली ।
हरण कराया लष्कर जमले, जब्बर खुब गर्दी झाली ।।
नाना तऱ्हेचें दुःख पाहती, परंतु उघडित ना डोळा ।
म्हणती अमुची सद्दी सरली, दूषण देताती काळा ।।
हिंदू लोकीं तारिफ मोठी ! कट होईना एकाचा ।
लूटकऱ्यांनी हल्ला केला, त्रास मांडिला हा तुमचा ।।
यत्नांवाचुनि उगीच बसतां, भीक मागतां परिणामीं ।
लाज न् लज्जा सोडुनि अवघे, कसे जाहला बेशरमी ?।।
घरांत तुमच्या दाणे नसता, ठेव दाविता चोराला ।
ठाउक त्याशीं एकच असतां, दुसरें दाखवितां त्याला ।।
जिनगी सारी घेऊन जातां, बळेंच देतां दुष्टाला ।
सर्व बाबती कबूल करतां, काय वदावें तुम्हांला ?।।
सर्व जनांचा वैरी वाटे, सूड उगवितो हट्टानं ।
तरफड, तरफड करतां करतां, जातिल हिंदूचे प्राण ।। ३ ।।
सर्वत्रांचें नशीब फिरलें, याचक झाले चोंहिकडे ।
प्रभुरायाशीं दया येइना, जरा पाहिना कुणाकडे ।।
इलाज मजला एकच सुचला, कऽट करावा अवघ्यांनी ।
नाना तऱ्हेची हिकमत काढुनि, सुखी असावें सर्वांनी ।।
छिछोर हलकट टवाळांचिया, कधींच नादि लागुं नये ।
ज्यावर त्यावर क्रोध केलिया, कट कैसा मग जमुनी ये ?।।
शहाणपणाची गोष्ट शिकवितो, त्याला हुडकोनी काढा ।
त्याच्या सांगीपरि वागोनी, बेकी दवडा ती द्वाडा ।।
सारे हिंदू लोक जमोनी, विचार काढावा पुरता ।
मनांत तुमच्या नाहि वागलें, मग खालच पुरता गोता ।।
सत्ताधारी जुलूम करतो, ठार निजवितो दुनियेला ।
डोळे उघडुनि कसे पहाना ? कोणि येइना समयाला ।।
हीच प्रार्थना करुनि विनवितो, राग नसावा हृदयांत ।
झोपमोड मी तुमची करतों, उभा राहिलों दृष्टींत ।।
राव बर्वे हा लीनपणाने, सांगत फिरतो सर्वांना ।
सर्वत्रांची कृपा असावी, हें द्यावें मजला दान ।। ४ ।।
– ज्ञानप्रकाश ता. १४ एप्रिल १८५६ पानें १७३-१७४.

[ ८ ]

# उत्तरेंतील उठाव ! !

१८५७ साली हिंदुस्थानांत २३८००० सैनिकांपैकी सारे ३८००० युरोपियन होते व त्यांतील १३००० युरोपियन एकटचा पंजाबांत बंदोबस्ताकरतां गुंतले होते. त्यामुळे देशी सैनिकांना इंग्रजांपासून आपलें राज्य परत मिळवण्यास फार अनुकूल संधि होती. दिल्ली व अलाहाबाद हीं मुख्य लष्करी ठाणीं सर्वस्वी हिंदी सैन्याच्या हातांत होतीं. कलकत्ता ते अलाहाबाद या प्रदेशांत ब्रिटिशांची एकच पलटण होती.

मंगल पांडे–नंतर मीरत येथील शिपायांनी चरबी लावलेलीं काडतुसें वापरण्याचें नाकारलें. त्यामुळे त्यांना कैद करण्यात आलें. ता. १० मे रोजी सायंकाळी येथील शिपायांनी एकदम तुरुंगावर हल्ला करून कैदी–शिपायांची सुटका केली. जो कोणी गोरा इसम भेटेल त्यास ठार करून ते पुढे जाऊं लागले. युरोपियनांचीं घरेंहि जाळण्यात आलीं. त्यानंतर त्यांनी दिल्लीचा रस्ता धरला. तेथेंहि धर, पकड, मार, असा प्रकार करीत त्यांनी गोऱ्या मनुष्यांची कत्तल केली. परंतु तेवढचांतून एका युरोपियन अधिकाऱ्याने तारेने पंजाबांत या दंगलीची बातमी दिली. पुढे शिपायांनी दिल्ली येथील दारुगोळा ताब्यांत घेण्याचा प्रयत्न केला. त्या ठिकाणी नऊ युरोपियन अधिकाऱ्यांनी दारुगोळ्याचें रक्षण करण्याचा प्रयत्न केला, शेवटीं आपलें कांही चालत नाही असें पाहून तो दारुगोळा निदान बंडखोरांच्या हातांत जाऊं नये, म्हणून त्यांनी त्यास आग लावून दिली. त्यांतच त्यांच्यापैकी चार नाहीसे झाले. तरी देखील बंडखोर शिपायांच्या हातीं बराच दारुगोळा लागला व दिल्ली पूर्णपणें त्यांच्या ताब्यांत आली. तेव्हा बहादूरशहास मोठचा समारंभाने गादीवर बसवून मोंगल बादशाही स्थापन झाल्याचें बंडखोर शिपायांनी जाहीर केलें, यामुळे ब्रिटिशांच्या इभ्रतीसच धक्का बसला कारण दिल्ली म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासाची किल्ली. ती सहा महिने उठाववाल्याकडे होती.

लवकर बंडाच्या ज्वाळा जूनच्या सुमारास मध्यहिंदुस्थान, रोहिलखंड, बुंदेलखंड, बिहार, लखनौ, कानपूर, बनारस, झांशी, नसराबाद इत्यादि ठिकाणी पसरल्या. बिहारमधील बंडाचा मोड विल्यम टेलरने केला. बनारस ऊर्फ काशी येथे कर्नल नीलने बंडवाल्यांना मोक्ष दिला. जॉर्ज लॉरेन्सने राजपुताना भडकूं दिला नाही. पंजाबमधील शीख, काश्मीरचा गुलाबसिंग, ग्वाल्हेरचे शिंदे, भोपाळच्या बेगमा, हैद्राबादचा निजाम, नेपाळचा पंतप्रधान सर जंग बहादूर यांनी आपलें इमान ब्रिटिशांशीं राखलें. बंडवाल्यांपैकी लखनौ, कानपूर, झांशी वगैरेचे शिपाई तेथेच लढण्यांत गुंतून राहिले. परंतु बाकीच्या ठिकाणचे शिपाई आपल्या ठाण्यावरील गोऱ्या लोकांची कत्तल केल्यावर दिल्लीचा रस्ता धरूं लागले.

दिल्ली फिरून काबीज करण्याकरतां इंग्रजांची एक पांच हजारांची तुकडी शहरावर पंजाब मधून चाल करून आली. त्यासरसा दिल्लीच्या बंडास जोराने तोंड लागलें. सप्टेंबरच्या १४ व्या तारखेस मोठें युद्ध झालें. बरेच इंग्रज कामास आले. तरी शेवटीं काश्मीरवेस काबीज झाली. तेथून इंग्रज आंत शिरले. बाहाद्दूर-शहा बादशहा त्यांच्या हातीं सांपडला. त्याच्या दोन्ही मुलांस हडसनने दिल्लीच्या चांदणी चौकांत बादशहाच्या समोर ठार मारले. निकल्सनच्या हाताखालील सैन्याचा हा सारा सहा दिवसांचा पराक्रम होता. त्यामुळे इंग्रज बेफामच झाले होते. त्यांनी शहराची लूट केली व पुष्कळ निरपराध लोकांना यमसदनास पाठविलें. बंडवाल्यांना मदत करण्याच्या आरोपावरून बादशहा बहाद्दूरशहाला रंगूनला पाठविण्यांत आलें, तिकडेच त्याचा पुढे बंदीवासांत अंत झाला !!

दिल्ली येथील बंड चालूं असतांच कानपूर येथे धोंडोपंत बाजीराव ऊर्फ दुसरे नानासाहेब पेशवे यांनी तेथील रेसिडेन्सीवर हल्ला चालूं केला. जूनच्या ६ व्या तारखेपासून २५ व्या तारखेपर्यंत तेथील गोऱ्या लोकांनी तग धरला. ते फक्त चारशे लोक होते. पण शेवटीं शस्त्रें खाली ठेवून ते नानासाहेबास शरण गेले. बायकामुलांसह गंगानदीवरून नांवेंतून अलाहाबादला जाण्याची त्यांनी तयारी दाखविली. नानासाहेबांनीहि संमत्ति दिली; पण बायकामुलांसह नावेंत बसतांच नानासाहेब पेशव्यांना खुंटीवर ठेवून बंडवाल्या मंडळींनी त्या ब्रिटिश मंडळीवर गोळ्या घातल्या. त्यामुळे फक्त चारच लोक अलाहाबादला पोचले. मराठ्यांनी ही दगलबाजी केली असें इंग्रज मानतात तर आम्ही गनिमी कावा करून आमचा हेतु साधला, असें नानासाहेबांचा हुकम वा मनीषा मोडून वागणारे मराठे म्हणत आले आहेत. ता. ११ जून पर्यंत इंग्रजांनी अलाहाबाद शांत करीत आणलें होतें. तेव्हा तेथूनच आतां ७ जुलै रोजी हॅवलॉक कानपूरच्या कत्तलीचा सूड घेण्यासाठी निघाला. वाटेंत त्याने हिंदी शिपायांशीं ठिकठिकाणी युद्ध केलें. जुलै २५ रोजी हॅवलॉक कानपुरास आला. तो आला हें कळतांच नानासाहेब पेशव्यांच्या लोकांनी कैदेंतील लोकांस ठार मारून टाकले. मग हॅवलॉकने जी सरबत्ती केली, तिच्यापुढे नानासाहेबांचे कांही न चालल्यामुळे त्यांनी कानपूर सोडलें व हॅवलॉकने सर केलें.

इतके झाल्यावर हॅवलॉक लखनौकडे वळला. लखनौचा वेढा २६ जुलै पासून २५ सप्टेंबरपर्यंत चालला. ब्रिटिश वकिलातीला बंडवाल्यांनी वेढा घातल्या-वर सर हेन्री लॉरेन्स मारला गेला होता. हॅवलॉक व जनरल औटरॅम यांनी लखनौवर हल्ला करतांना बंडवाल्याशीं तीन वेळ सामना दिला होता. पण बंडवाले हटले नव्हते. पण पुढे कॅंबेलने त्यांचा पुरा पराभव केला. लखनौ व दिल्ली सुमारे एकाच वेळी हातीं आल्यावर लखनौ ता. १६ नोव्हेंबर रोजी औटरॅमच्या स्वाधीन करून कॅंबेल कानपुरास गेला. तेथे वीस हजार सैन्य घेऊन आलेल्या शूर तात्या

टोपेचा त्याने पराभव केला. ही डिसेंबरची ६ वी तारीख होती. फिरून लखनौ येथे कँबेल परतला व मार्च १८५८ पर्यंत त्याने क्रांतिकारकांना हाकलून लावले. नंतरच्या मे महिन्यांत त्याने रोहिलखंडांत बरेली येथे कामगिरी केली.

बुंदेलखंडांतील बंडवाल्यांचा बंदोबस्त करणें हें काम कठीण होतें. त्या कामगिरीवर सर ह्यू रोज याची नेमणूक झाली होती. तें काम करीत करीत रोज झांशीस येऊन पोचला. त्याने झांशीच्या किल्ल्यास वेढा दिला. झांशीची राणी बंडांत सामील झालीच होती. तिने किल्ला मोठ्या पराक्रमाने लढविला. पण शेवटी तिला ब्रिटिशांच्या वेढ्यांतून निसटून जाणें भाग पडलें. ती तात्या टोपे यांस मिळाली. दोघांनी ग्वाल्हेर काबीज केलें. शिंद्यांचें सैन्य त्या दोघांना मिळालें. शिंदे इंग्रजांकडे पळाले. नानासाहेब पेशवे यांस पेशवा म्हणून जाहीर करण्यांत आला. ह्यू रोज ग्वाल्हेरवर चालून गेला. तेथे लक्ष्मीबाईने लढण्याची शर्थ केली. पण ती पडली. तात्या टोपेचा ब्रिटिशांनी पाठलाग केला. अखेर शिंद्यांच्या एका सरदाराने तात्याला ब्रिटिशांच्या स्वाधीन केलें. बंडाच्या आरोपावरून तात्याला फांशी देण्यांत आलें. नानासाहेब पेशवे नेपाळच्या जंगलांत पळून गेले.

१८५७ च्या १० मे पासून सुरू झालेला तो उठाव बहुतेक ९ जुलै १८५८ पर्यंत उत्तर हिंदुस्थानांत तरी शमत आला. त्यांतून उद्‌भवलेल्या नवीन अकांक्षा आणि उरलेले असंतोष यांनी पुढे कांही काळ, निदान दक्षिणेंत तरी, अनेकदां डोकें वर केलें. तोहि इतिहास वरील इतिहासासारखाच कुतूहल वाढविणारा आहे.

## उठावाचें तारीखवार समावलोकन

१८५७ साली १० मे रोजी मीरत शहराच्या लष्करी छावणींत हिंदु-मुसलमान शिपाई ब्रिटिश राज्य उलथून पाडण्यासाठी उठले. दुसऱ्या दिवशी मीरतच्या शिपायांनी दिल्ली शहर ताब्यांत घेऊन तेथे मोगलबादशाहीच्या वृद्ध वंशजाला–बहादूरशहाला-आपल्या उठावाचा पुढाकार दिला. " गाझीओमें बू रहेगी जबतक इमानकी । तबतक लंदनतक चलेगी शान हिंदुस्थानकी । " असें बहादूरशहाने उत्तेजन दिलें. त्याचा एकंदर आढावा असा:–

**९ मे १८५७**– मीरत येथील एका फलटणींतील ८५ शिपायांनी ग्रीज लावलेल्या काडतूसांना हात लावण्याचें नाकारल्यामुळे त्यांना लष्करी कोर्टापुढे उभे करण्यांत आले आणि प्रत्येकी १० वर्षें सक्तमजुरीची शिक्षा सांगण्यांत आली. **१० मे**– मीरत येथील तीन फलटणींनी बंड पुकारलें, तुरुंगांत असलेल्या शिपायांची मुक्तता केली. फलटणी दिल्लीवर चालून जातात. **११ मे**– शिपाई दिल्ली काबीज करतात आणि बहादूरशहा बादशहा झाल्याची घोषणा करतात. **१३ ते ३१ मे**– फिरोझपूर, मुझफरनगर, अलिगड, नौशेर, इटावा, मणीपुरी, रूरकी, नसिराबाद, मथुरा, लखनौ, बरेली आणि शहाजानपूर या ठिकाणी बंडाचा फैलाव. **१ ते ५ जून**– मुरादाबाद, बादौन, अझामगड, सीतापूर, नीमच, बनारस, कानपूर,

व झांशी येथे उठावणी. ६ जून– कानपूरला नानासाहेब वेढा देतात. ७–८ जून– झांशीचा किल्ला सर; राणी लक्ष्मीबाईच्या हातीं सत्ता, बदली सराईची लढाई; दिल्ली नजीकची टेकडी ब्रिटिशांच्या हातीं. १ ते १८ जून– दरियाबाद, फत्तेपूर नौगांव, ग्वाल्हेर, व फत्तेगड, या ठिकाणी उठाव. २७–२८ जून–नानासाहेब कानपूरवर झेंडा लावतात. १ जुलै–हाथरस व इंदूर येथे बंड; ज्वालाप्रसाद व टिक्कसिंग यांच्या हाताखालील नानासाहेबांच्या सैन्याचा फत्तेगड येथे पाडाव. १६ **जुलै**– कानपूरची लढाई, नानासाहेबांच्या फौजा ब्रह्मावर्ताकडे माघार घेतात. २७ **जुलै**– कुंवरसिंगकडून अर्राहवर ताबा. ३ **ऑगस्ट**– अर्राहवर ब्रिटिशांची कुमक. १३ ऑगस्ट– कुंवरसिंगचा जगदीशपूर येथे पराभव. १६ **ऑगस्ट**– तात्या टोपे यांचा बिहारमध्ये पराभव. १४ **सप्टेंबर**– दिल्ली येथील काश्मिरी दरवाजा ब्रिटिश उडवितात. १९ **सप्टेंबर**– दिल्ली येथील लाहोरी गडाची गढी ब्रिटिशांच्या हातीं. २० **सप्टेंबर**– दिल्लीवर ब्रिटिशांचा पुन्हा ताबा. २१ **सप्टेंबर**– बहादुरशहा हुमायूनच्या कबरस्थानी ब्रिटिशांना शरण जातो. २२ **सप्टेंबर**– बहादूरशहांच्या मुलांना अटक; त्यांच्यावर गोळीबार. २३ **ऑक्टोबर**– सिकंदराबाद बागेंतून आगेकूच करून ब्रिटिशांचा लखनौवर पुन्हां ताबा. २६ **ऑक्टोबर**– पंडु नदीच्या तीरावर तात्या टोपेचा पराभव. २७ **ऑक्टोबर**– कानपूरमधून तात्या टोपे ब्रिटिशांना हुसकावून लावतो. व ते पुन्हा पादाक्रांत करतात. कँबेलकडून तात्या टोपेची उचलबांगडी; तात्या टोपे लक्ष्मीबाईस जाऊन मिळतो. ९ **डिसेंबर**– काल्पी येथील संग्राम. तात्या टोपेची माघार. ५ **मार्च** १८५८– चांदा येथील ब्रिटिश छावणीवर चरदा व गोंडा येथील राजे व मेहंदी यांचा हल्ला. २१ **मार्च**– ब्रिटिशांनी लखनौवर पूर्ण ताबा मिळविला. १ **एप्रिल**– राणी लक्ष्मीबाईच्या मदतीसाठी २५००० जणांची फौज घेऊन आलेल्या तात्या टोपेचा बटेवाच्या किनाऱ्यावर ब्रिटिशांकडून पराभव. ३ ते ५ **एप्रिल**– झांशी किल्ला पडला; राणी लक्ष्मीबाईचें पलायन; आझमगढ येथे कुंवरसिंगकडून ब्रिटिशांचा दुसऱ्यांदा पराजय. २६ **एप्रिल**– कुंवरसिंग यांचें निधन. ६ **मे**– बहादुरखानाकडून ब्रिटिशांनी बरेलीचा ताबा घेतला. ११ **मे**– शहाजानपूरला ब्रिटिशांचा वेढा. २२ **मे**– कुल्र्याची दुसरी लढाई. २३ **मे**– काल्पीची लढाई ब्रिटिशांनी जिंकली. १ **जून**– राणी लक्ष्मीबाई, रावसाहेब, बांदाचा नवाब यांनी ग्वाल्हेर जिंकले, नानासाहेब पेशवा झाल्याचें जाहीर करण्यांत आले. १७ **जून**-- ग्वाल्हेरला ब्रिटिशांचा वेढा. लढतां लढतां लक्ष्मीबाई धारातीर्थी पडली. तात्या टोपे यांचें पलायन. २० **जून**– ब्रिटिशांनी ग्वाल्हेर जिंकलें. १४ **ऑगस्ट**– केत्राची लढाई व तात्या टोपेचा पराभव. १५–१६ **ऑक्टोबर**– जगदीशपुराला भेट. २१ **जानेवारी** १८५९– शिकारच्या लढाईंत तात्या टोपेचा पराभव. ७ **एप्रिल**-- विश्वासघाताने तात्या टोपेला कैद करण्यांत येतें. १८ **एप्रिल** -- तात्या टोपेला फांशी.

# १८५७ च्या प्रख्यात

( ज्ञानप्रकाश ता. ११ आक्टोबर

| क्रमांक | नांव | जात | वय | बांधा | तोंडावळा |
|---|---|---|---|---|---|
| १ | धोंडोपंत बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे | दक्षिणी ब्राह्मण | ३२ | गोरा,पोट मोठें, उंची मध्यम | वाटोळा |
| २ | गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब | ,, | २८ | काळा, कृश व उंच | लांबट |
| ३ | नारोपंत ऊर्फ बाबा भट्ट | ,, | ५५ | तांबूस, उंच | दीर्घ वर्तुळाकृती |
| ४ | पाण्डुरंग ऊर्फ रावसाहेब | ,, | २० | गोरा, पातळ व उंच | लांबट |
| ५ | सदाशिवपंत ऊदगर | ,, | ५५ | काळा. रुंद, ठेंगणा | पसरट |
| ६ | आबा धर्माधिकारी | ,, | ६० | गोरा, लठ्ठ, ठेंगणा | पसरट |
| ७ | नारायण मराठे ऊर्फ नारोपंत | ,, | ४२ | गोरा, ठेंगणा | वाटोळा |
| ८ | तात्या टोपे | ,, | ४२ | काळा, बळकट उंची मध्यम | जाडा |
| ९ | गंगाधर तात्या | ,, | २३ | गोरा, बळकट उंची मध्यम | जाडा |
| १० | रामचंद्र तात्या | ,, | २५ | तांबडा, कृश, उंची मध्यम | जाडा |
| ११ | ज्वाला प्रसाद | कनोजा | ४० | काळा, कृश | लांबट |
| १२ | गोपाळ सार | माहिती नाही. | | | |

सदरील चेहरेपट्टी कानपूरचे असिस्टंट कमिशनर लेफ्टेनंट जे. पकिन्स

# हिंदु बंडखोरांची चेहरापट्टी

(१८५७ ची पुरवणी )

| नाकाची ठेवण | डोकें व शरीराची ठेवण | कृत्रिम खुणा |
|---|---|---|
| सरळ | शेंडी मोठी, त्याचे पायाचे अंगठ्यावर डाक्तरचे लॅन्सेटची खूण आहे | नवीन दाढी वाढविली आहे. यवनाप्रमाणे दिसतो. हा बाजी–रावाचा दत्तक पुत्र |
| लांब व वक्र | शेंडी मोठी, तोंडावर वण, गुडघे कांही फिरलेले | धोंडोपंताचा बंधु व त्याचे अमलांतील कम्यांडर इन्चीफ ( सेनापति ). |
| लांब व रुंद | लांब शेंडी, करडे केश | बाजीरावाने याचे बापास दत्तक घेतल्यानें धोंडोपंतांचा आप्त |
| लांब, रुंद व मोठें | लांब शेंडी, तोंडावर वण, कपाळ उंच | नानाने जप्त केलेल्या मालमत्तेची देखरेख करण्याचे कामावर नेमला आहे. |
| लांब, रुंद, मोठें, वाटोळें | तोंडावर थोडे वण, डावरा आहे | नानाचा एक सेनापति. |
| चपटें, रुंद, लहान | करडे केश | नानाचा सेनापति. |
| सरळ, तांबूस व मोठें | मोठी शेंडी; उजवे डोळ्यावर तरवारीचा घाव. | याची बहीण बाळा–साहेबांस दिली आहे. |
| चपटें व मोठें | तोंडावर थोडे वण | तात्या टोपे अशी नेहमीं सही करी. बाजीरावाचा कप्तान. |
| चोचीप्रमाणें तांबूस | मोठी शेंडी | बाबा भट्टाचा पुत्र याचा सहाय्यक |
| लांब व काळें | मोठी शेंडी | नानाचे ताब्यांतील प्रदेशावरील अधिकारी. |
| लांब व सुंदर | तोंडावर वण, डोक्यावर केश व गेंगाणा | नानाचे सैन्यास पगार वाटणारा. |

माहिती बाही

---

यांणीं केली आहे ती ग्याझीटावरून घेतली.

[ ९ ]

# महाराष्ट्राचें मन

सन १८५७ साली ब्रिटिश राजवटीला भारतांतून परतवून लावण्यासाठी मोठाच सशस्त्र संग्राम झाला. त्याला १९५७ साली शंभर वर्षे भरतात, म्हणून भारताला इंग्रजांच्या पारतंत्र्यांतून सोडविणाऱ्या भारतव्यापी लढयाची कृतज्ञतेने पूजा करावी आणि ज्या महाभागांनी, महाशयांनी, महापराक्रम्यांनी त्यांत भाग घेतला, त्यांच्या–पासून देशभक्तीची ज्वलंत स्फूर्ति घेऊन स्वतंत्र भारताच्या तेजोवर्धनाचें कामीं ती उपयोगावी, अशी स्वाभाविक इच्छा सर्वच भारतीयांना झाल्याशिवाय रहाणार नाही. तथापि मराठ्यांना तर ती तीव्रपणेंच होईल. कारण मराठ्यांनी कोणत्याच, व त्यांतल्या त्यांतहि इंग्रजांसारख्यांच्या परकीय सत्तेला मनापासून मूलतःच मानलें नव्हतें.

आपल्या इतिहासाच्या दुसऱ्या खंडांत लॉर्ड मेकॉलेने म्हटल्याप्रमाणे मराठे हेच आपल्या आमदानींत बाकीच्या सर्व राजशक्तींना 'भयानांभयं, भीषणं भीषणाम्' होते; इंग्लंडच्या भाग्यश्रीपुढे व बुद्धिमत्तेपुढे मराठे नमले ते सुद्धा अनेकानेक प्राणपणाने सामने दिल्यावर नाइलाजाने. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर, त्याच्या ऐसपैस साम्राज्याचा कोपरा नि कोपरा मराठ्यां नुसतें नांव उच्चारतांच हादरत असे. इंग्रजांशीं आपलीं कारस्थानें रचावयास रघुनाथराव पेशव्यांनी सुरवात केल्यापासून मराठी साम्राज्याला उतरती कळा लागली. एरवीं, जरी शिवाजीने मोंगल साम्राज्याविरुद्ध बंड उभारण्यापूर्वी इंग्रजांनी महाराष्ट्रांत तळ दिला होता, तरी शिवाजीने राजापूरची वखार लुटल्यापासून मराठ्यांशीं आपलें संबंध इंग्रजांनी नमत्या सहकाराचेच ठेवले होते. रायगडच्या राज्याभिषेकाचे वेळी इंग्रजांनी शिवाजीचें अधिराज्य मान्य केलेंच. आपल्या उत्पन्नावर अडीच टक्के करहि शिवाजीला देण्याचें त्यांनी पत्करलें. संभाजीच्या कारकीर्दींतहि त्याच सवलती त्यांनी मोठ्या खुबीने मिळविल्या होत्या.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे उदयाबरोबर मराठी साम्राज्य चमकूं लागलें असतांच, अठराव्या शतकांत कुलाब्याच्या कान्होजी अंग्र्यांनी मुंबईबेटावर हल्ला चढविण्याचा प्रयत्न केला होता. मुंबई बेट त्यावेळी चार्लस्बून नांवाच्या प्रजाहिततत्पर सुलतानाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी ठेवलें होतें. सन १६८० पासून जवळ जवळ चाळीस वर्षे तंबाखूचा व्यापार करून वैभवास चढलेल्या रामजी कामताकडे देशी (नेटिव) सैन्याचें पुढारीपण मुंबईत सोंपविण्यांत आलें होतें. सन १७१८ मध्ये रामजी कामत आपला स्नेही भंडारी याच्यासह

आंग्र्यांचा साथीदार असल्याचा आरोप इंग्रजांनी त्यावर ठेवला. त्या अर्थाचें कागदपत्र पुढे आणवून तें सिद्धहि करण्यांत आलें. अर्थातच ता. २१ एप्रिल १७२० रोजी, सात्विक असा तो सारस्वत ब्राह्मण रामजी कामत इंग्रजांनी जन्मठेपेवर पाठविला व त्याची रु. ५७९८९ ची मिळकत कंपनी सरकारने जमा केली. रामजीने १७२८ मध्ये इहलोकची यात्रा संपविली. रामजीचा निष्पापपणा या वर्षी इंग्रजी कंपनीसरकारच्या प्रत्ययाला आला. तरीहि रामजी कामताच्या वारसाला तरी कांही नुकसान-भरपाई वा अन्यथा कांही मदत द्यावी, असें कंपनी-सरकारने मनांतहि आणलें नाही. असें पाप पचलें तरी पहिल्या बाजीरावांच्या अधिकाधिक दैदिप्यमान पराक्रमामुळे मराठ्यांच्या वाटेला जावयाचें इंग्रजांच्या मनांतहि आलें नाही. तो मोका त्यांना रघुनाथराव पेशव्याने दिला. आपल्या महत्त्वाकांक्षेपायी आपल्या पुतण्याच्या विरुद्ध रघुनाथराव पेशवे मदत मागूं लागतांच, मराठी साम्राज्यांत आपले नाक खुपसतां येईल तेथे खुपसावें व शक्य तर आपलेंच साम्राज्य मराठी मुलखासह सर्व भारत भरून करावें, असें इंग्रजांच्या डोक्याने घेतलें. ती त्यांची इच्छा रघुनाथराव पेशव्यांचे चिरंजीव ( दुसरे ) बाजीराव यांच्या कारकीर्दींत सफळ झाली. कारण त्यावेळी महादजी शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन, हरिपंत फडके हे मराठी साम्राज्याचे दणगट आधारस्तंभ अठराव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत मृत्यूने हिरावून नेले होते, आणि बाजीरावास योग्य मार्गदर्शन करावयास अगर दूरदर्शी सल्ला द्यावयास कोणी मातबर उरला नव्हता. आपल्या "यंग इंडिया" या ग्रंथांत लाला लजपतराय यांनी वर्णन केल्याप्रमाणे एकाच्या उरावर दुसरा घालण्याच्या कुटिल नीतींत इंग्रज तरबेज होते. तसें करण्यांत त्यांचा हेतु फक्त लुटमारीचा होता. त्यांनी लूटमार केली आणि तें मराठी साम्राज्य पोखरून सोडलें. तसें करतांना बाकीच्या सर्व गोष्टी गौण लेखून प्राप्त परिस्थितीचा इतका अचूक फायदा इंग्रजांनी घेतला की बाजीराव पेशवा इंग्रजांच्या हातचा केवळ एक कैदी होऊन बसला.

मराठ्यांनी जें समर्थ साम्राज्य स्थापन केलें होतें, त्याच्या सूत्रांवर नजर ठेवून तीं हलविण्याचें काम पुण्याहूनच होत असे. मराठी साम्राज्याच्या ऐन भरांत, ड्यूक ऑफ विलिंग्डनने नोंद करून ठेवल्याप्रमाणे मराठीसत्ता एवढीच एक अशी सत्ता होती की देशभक्तीचें व राष्ट्रीयत्वाचें चैतन्य त्यांत होतें व त्याच्या जोरावर त्याने जवळ जवळ अर्धे शतकपर्यंत भारतवर्षाच्या राष्ट्रीयत्वाचीं धोरणें आंखून दिलीं. पण अठराव्या शतकाच्या अखेरीस, दिल्लीच्या बादशाही राजवटीच्या सर्व तारा व्यवहारतः छेडणारे महादजी शिंदे १७९४ त व नाना फडणीस १८०० त परलोकवासी झाल्यावर मराठी साम्राज्याचा दमच उखडला. यावेळी म्हैसूरची सत्ता व तिचा अधिपति मातीमोल केलेले होते आणि दक्षिणेंत व पूर्वेस मराठी

साम्राज्याच्या ऐसपैस व्यापाला तोंड देणें ईस्ट इंडिया–कंपनीला भाग आलें होतें पण मुळांतला दम उखडून गेला असल्याकारणाने, मराठी साम्राज्य म्हणजे सर्वांच्या सहकार्याने सुसंगत धोरण फार काल न चालवूं शकणाऱ्या सर्वतंत्र स्वतंत्र राजे रजवाड्यांचा एक लुळा संघ झालें होतें. स्वतःचें खरें हित कशांत आहे हेंच न कळल्यामुळे मराठ्यांनी यावेळी इंग्लंडच्या अडचणींचा फायदा घेण्याचें बाजूस सारलें. तसें त्यांनी केलें नसतें तर ईस्ट इंडिया कंपनीचा म्हैसूर राज्याशीं झगडा चालू असतांच भारताच्या घरांत शिरून आडवें होणारें तें उंटाचें पिल्लूं मराठ्यांना मूळांतच नामोहरमकरतां आलें असतें. मराठ्यांच्या त्या दुर्लक्षामुळे हैदर व टिप्पू यांच्यावर मात करणाऱ्या इंग्रजांनी स्वतः मराठ्यांवरच जेव्हा मोहरा वळवला, तेव्हा त्या आपल्या समान शत्रूला सर्वांनी मिळून हात दाखवण्याची वेळ असतांना मराठी राजेरजवाड्यांनी आपसांतील मतभेद विसरण्याचा शहाणपणा दाखविला नाही. ईस्ट इंडिया कंपनीचें राजकारण म्हणजे एक उंटाचें पिल्लूं आहे, याची खातरजमा फक्त महादजी शिंद्यांना होती आणि म्हणून त्याला हाणून पाडण्यासाठी त्यांनी सगळ्या मराठेशाहीची कंबर नेहमी कसलेली ठेवली होती. त्यांच्या मृत्यूनंतर मराठी साम्राज्याच्या कपाळीं दुर्दैवाशीं अनेक तऱ्हेने सामने करण्याचें चांगलें १८०२ पर्यंत आलें.

त्या साली पेशव्यांनी जरी सर्व मुलूख परत मिळविला होता, तरी दैव पेशव्यांच्या पाठीस हात धुवून लागलें होतें. त्यामुळे वसईचे तहाच्या शर्ती इंग्रजांच्या मुत्सद्दिगिरीचा डिंडिम ठरला. महाराष्ट्रांत त्यायोगे इंग्रजांनी फळ्या पाडल्या आणि शस्त्र उपसल्यावाचून पेशव्यांच्या मुलखांत नुसता पाय ठेवला नाही, तर मराठी साम्राज्याच्या अंतर्गत कारभारांत हात घालण्याचा अधिकारहि इंग्रजांनी मिळविला. या संबंधांतील 'आशिया अँड वेस्टर्न डॉमिनन्स' हें पण्णीकरांचें पुस्तक अगर एरिक विल्यम शेपर्डचें 'शार्ट हिस्टरी ऑफ ब्रिटिश आर्मी' हें पुस्तक वाचलें असतां, ब्रिटिशांना वर वर्णन केलेलें सत्कृत्य करणें सुतराम् सोपें कसें गेलें हें स्पष्ट होतें.

बाजीराव पेशव्याचें सरकार व त्याचा कारभार ही दोन्ही पद्धतशीरहि नव्हती व परस्परांशी साखळीसारखी जोडलीहि नव्हती. प्रत्येक हलक्यासलक्या नोकराला देखील वाटे की, आपण आपल्या 'सजा' चे राजे आहोंत. अधिकाऱ्यांनी जरी प्रजेस राजरोस लुटले तरी कांही चूक आहे, असे कोणीच मानत नव्हता; फार काय, आपल्या वरिष्ठांशीं कोणी बेइमानी केली तरी त्यांत अस्वाभाविक असें कांहीच वाटत नसे. नगररक्षक म्हणून कसें तें शिस्तीचें नसें आणि सैन्यें तर भाडोत्र्यांच्या भरतीने सजत असत. ता. ५ मे १८५१ चा 'ज्ञानप्रकाश' यापुढेहि जाऊन म्हणतो की, 'न्याय म्हणून कसा तो दुर्मिळच होता!' तात्पर्य, तो काळ

म्हणजे हाल-अपेष्टा आणि जुलूम, फसवाफसवी आणि चोरवाटा यांचाच होता. ड्यूक ऑफ विलिंग्डन सांगतो की ' पेशव्यापासून पुण्याचे बाजारांतील हमालापर्यंत, १८०४ साली तरी कोणावरहि असा विश्वास ठेवण्याची सोय नव्हती की, हातीं घेतलेलें काम ती व्यक्ति बिनचूक करील ! ' एडमंड सी फॉक्स आपल्या ' शॉर्ट हिस्टरी ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी ' या पुस्तकांत लिहितो की कोणाहि मराठ्याला काम करावयास लावावयाचें तर त्याचें मरण कशांत आहे, हें त्याला पटवूनच काम लावता येत असे त्या काळी !

अशा स्थितींत बाजीरावाच्या राज्याची परिसमाप्ति व्हावी, असें लोकमत झालें असल्यास, नवल काय ? तथापि विचारी व वीर वृत्तीच्या लोकांना मात्र तळमळ लागून राहिली होती की काय वाटेल तें करून वसईच्या तहाच्या चिंधड्या उडाल्या पाहिजेत. या बाबतींत पुढाकार घेऊं पहाणारे दोन वीर होते. एक साता-रचा चतुरसिंग भोसले आणि दुसरा, बाजीरावाचा लाडका सेनापति त्र्यंबकजी डेंगळा. चतुरसिंगाची खरी इच्छा अशी होती की, मराठी साम्राज्याचा खरा स्वामी सातारचा राजा असल्याने त्याने आपल्या हातीं सगळा कारभार घ्यावा. उलट, बाजीरावसाहेबच जिकडे तिकडे तोऱ्याने पहिल्यासारखे मिरवावेत अशी त्र्यंबकजी डेंगळ्याची इच्छा होती. वसईच्या तहाने आपल्याला ब्रिटिशांच्या ताटा-खालचें मांजर केलें आहे. या जाणीवेने त्या तहाच्या कचाट्यांतून आपण एकदांचे सुटावे, असें स्वतः बाजीरावासहि वाटत होतें. प्रत्येकजण आपापल्यापरी उद्योगाला लागला आणि ' सर्वांचें काम तें कोणाचेंच काम नव्हे ' याचा अनुभव आला. पुण्यांत बसून बाजीरावाने शेवटची पंधरा वर्षें राज्यकारभार केला तो भानगडीचाच झाला. वैयक्तिक हेव्यादाव्यांशिवाय त्यांत होतें काय ? शिवाजी आणि पहिले चार पेशवे यांच्या काळीं दिसणारा मराठ्यांचा पराक्रम, देशाभिमान आणि राष्ट्रीयत्व ' अहा ! तें लोपलें सारें !! ' असें होऊन आतां बसलें होतें. सर्वसामान्य लोकांना बाजीरावाचेंहि राज्य नको होतें आणि परकीय सत्ताहि नको होती. त्यांना योग्य नेताच मिळेना त्या काळीं. तल्लख मेंदू, चमकदार तलवार, खानदानी घराणें यांपैकी एकावर अगर या सर्वांपैकी कांहीच्या समुच्चयावर नेतृत्व वाट्याला येत असे. ज्यांनी समाजाचें नेतृत्व करावें अशी अपेक्षा, तेच कपाळाला हात लावून बसल्या-वर, सामान्य माणसाला काय करावें तें सुचत नसें. त्यामुळेच एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींतच मराठ्यांचा सर्व गाशा गुंडाळणें इंग्रजांना सहज साधलें. १८१८ मध्ये पेशव्यांचा सर्व मुलुख इंग्रजांचा झाला. शिंदे, होळकर गायकवाड त्याचप्रमाणे पटवर्धन, घोरपडे, भोसले या साऱ्यांनी इंग्रज सत्तेला मान तुकविली. सातारच्या गादीवर प्रतापसिंह राजे भोसले होते. नमत्या सहकारानेंच ते इंग्रजी सत्तेशी वागत. उच्छृंखल मराठ्यांना शांतपणे काबूंत ठेवून वरील करामत माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने केली.

अशा निराशाजनक आणि नीतीस ओहोटी लावणाऱ्या परिस्थितींत महाराष्ट्रांतील सर्व वर्गाच्या मराठ्यांनी परकीय सत्तेशी जुळवून घेतल्यासारखें दिसलें तरी ते आंतल्या आंत जळतच होते. त्यांतल्या त्यांत अतिउत्साही होते ते आणि पायदळीं तुडविले जात होते ते समर्थ नेतृत्वासाठी गणपती पाण्यांत घालून बसले होते.

वसईच्या तहाने बेफाम झालेला चतुरसिंग भोसला हा सातारच्या प्रतापसिंहाचा चुलता होता. तो जातीवन्त देशभक्त असल्याकारणाने त्याने बाजीरावाच्या धांदरट दादागिरीपासून आणि परकी ब्रिटिश सत्तेपासून मराठी साम्राज्याची धडगत लावण्याचा प्रयत्न केला होता. मराठी साम्राज्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत हिंडून सर्व मराठ्यांनी मिळून टाळक्यावर कोसळणाऱ्या इंग्रज--शाहीला एकमुखाने तोंड द्यावे म्हणून त्याने जीवाचें रान केलें. नागपूरकर भोसल्याशिवाय त्याला कोणी जिव्हाळ्याचा दोस्त भेटला नाही. त्याच्या मदतीने त्याने असई आणि असिरगड येथे ब्रिटिशांशी मातबर सामना केला होता. पण तेरा वर्षांचा वनवास काढूनहि त्याच्या प्रयत्नाला फळ आलें नाही. १८११ मध्ये त्याला त्र्यंबकजी डेंगळ्याने दगाबाजी करून पकडले आणि परिणामतः पेशव्यांचा कैदी म्हणूनच चतुरसिंगाला १५ एप्रिल १८१८ रोजी इहलोक सोडण्याचें कपाळीं आलें!

चतुरसिंगाचा बावटा पडल्यानंतर सन १८१९ सालीं पुण्यांत कांही पिसाटांनी कट केल्याचें उघडकीस आलें. पुणें व सातारा येथील युरोपियनांस यमसदनाला पाठवावें, मुख्य मुख्य किल्ले जिंकावेत आणि स्वतः सातारच्या राजाचाच हात धरावा असा तो कट होता. एल्फिन्स्टन्च्या लक्ष्यांत आल्याबरोबर त्याने मोठ्या चपळाईने कटवाल्यांचा कबजा घेऊन कटाच्या पुढाऱ्यांना तोफेच्या तोंडी देण्याचा हुकूम केला होता, ' सदर शिक्षेने अपराध्यांना देहान्त प्रायःश्चित तर मिळतेंच पण प्राणानिशीं जाणारांना अत्यल्प हाल होतात तर पहाणारांची चांगलीच हबेलंडी उडते ' असें तोफेच्या तोंडांतील तत्त्व एल्फिन्स्टनने सांगितलें होतें.

ब्रिटिशांची सत्ता हिंदुस्थानांत स्थापन व्हावी, हे त्र्यंबकजी डेंगळ्याला तरी कधी परवडत होतें ? म्हणून इंग्रजांना येथून हाकलून लावण्याकरतां बाजीरावाने पुढाकार घेऊन लढाईची खटपट करावी असे त्याला मनापासून वाटे. म्हणून त्र्यंबकजीने एक उपद्व्याप करून वसईच्या तहाला हरताळ फासण्याचा घाट घातला. तथापि पंढरपुरास गंगाधरशास्त्री पटवर्धनांचा जो खून झाला, त्याने डेंगळ्याचें पाणीच झालें. त्यामुळे त्र्यंबकजीस आपल्या स्वाधीन करा, म्हणून इंग्रजानी बाजीरावास सारखा तगादा लावला. पेशव्यांनी कांही काळ टाळाटाळ केली पण कर्नल फोर्डच्या हाताखाली काम केलेल्या मोरो दिक्षीत मराठ्यासारख्या माणसाने अव्वल

सल्ला दिल्यामुळे बाजीरावाने त्र्यंबकजीस पकडून वसंतगडावर बंदींत ठेवले. तथापि एका आठवड्याच्या आंतच त्र्यंबकजीची बदली ठाण्यास झाली. तेथून तो एक वर्षाच्या आंतच सूंबाल्या ठोकून पळाला. त्याला पकडून देण्याबद्दल फिरून बक्षिस जाहीर करणें पेशव्यांना भाग आलें. पण १८१७ त माहुलीस मालकमची भेट झाल्यावर बाजीरावाने आपल्या गोडबोलीने त्याच्याकडून पेंढारी चिरडण्यासाठी रंगरूट भरतीची परवानगी हळूच मिळवली. होळकर-शिंदे वगैरे मराठेशाहीच्या सरदारदरकदारांशी रंगरूट भरतीसंबंधी पत्रव्यवहार करण्यास बापू गोखल्याला बाजीरावाने एका बाजूने फर्माविले तर दुसऱ्या बाजूने भिल्ल-रामोशांची भरती करण्यास बाजीरावाने त्र्यंबकजी डेंगळ्यास उत्तेजिलें. त्र्यंबकजी ठाण्याच्या तुरुंगांतून निसटल्यावर अहमदनगर, नाशिक, खानदेश या जिल्ह्यांच्या कडेकपारींत हिंडूनच दिवस काढीत होता. त्याने रानटी जमातींतून जागृति केली व आपला धनी बाजीराव पेशवा याच्या संगनमताने लढाईची तयारी चालविली. नाशिक गॅझीटिअरमध्ये यासंबंधी भरपूर पुरावा आहे. डेंगळ्यांचा हा क्रम पुष्कळ काळपर्यंत चालू होता. मग बाजीरावच स्वतः ब्रिटिशांवर उठला. पण अष्टीच्या रणसंग्रामांत बापू गोखले पडल्यावर बाजीरावास पळ काढणे भाग आलें. मग मात्र त्र्यंबकजी आपल्या नशीबाला हात लावून शेती करून दिवस कंठू लागला. त्याच्या जुन्या दोस्तांना त्याची गंध वार्ताहि नव्हती. इंग्रजाची नजर मात्र त्याच्या शोधार्थ घारीसारखी फिरत होती. त्यांनी कोणा एका माने नांवाच्या गृहस्थाच्या मदतीनें नाशिक जिल्ह्यांतील असरे गांवी त्र्यंबकजी असल्याचा माग काढला. तो तेथे आपल्या सासुरवाडीस होता. इंग्रज त्या सासऱ्याच्या घरांत वेढा देऊन घुसले. पण त्र्यंबकजीला पकडणे सोपें नव्हतें. त्र्यंबकजीच्या गृहलक्ष्मीने हातांत भाला घेऊन एक तासाच्यावर इंग्रजी सैन्याला लढत दिली आणि त्या रणरागिणीने आपला देह टाकल्यावर इंग्रजांना त्र्यंबकजीस पकडणे शक्य झालें. त्यानंतर चुनारगडच्या बंदीखान्यांतच त्र्यंबकजीला आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस मोजावे लागले.

स्वतंत्र संस्थानचे आपण सर्वतंत्र संस्थानिक आहोत, असा दावा सावंतवाडीकर तर सन १८१४ पासून सांगत होते, त्यांच्या या हक्काकडे कोणीच लक्ष न दिल्यामुळे सन १८१९ च्या जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यांत राणी दुर्गावतीने ता. २ अक्टोबर १८१२ च्या झालेल्या तहनाम्याच्या शर्तीविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. सावंतवाडीकरांना तो तह १८१७-१८१८ च्या युद्धाने शून्यप्रायच झाला होता. म्हणून राणी दुर्गावती २७ जानेवारी १८१९ ला ब्रिटिशांच्या विरुद्ध तलवार उपसून उभी राहिली. ता. १३ फेब्रुवारीपर्यंत तिने मातबर लढाई दिली. पण त्या दिवशी नेवतीचा किल्ला इंग्रजांनी काबीज केल्यावर तिला आपली तलवार म्यान करावी लागली. पेशवे दप्तरांत राणी दुर्गावतीच्या पराक्रमाची विपुल माहिती आहे.

राणी दुर्गावतीच्या बरोबरीने त्या काळी सामान्य माणसांपैकी इंग्रजाविरुद्ध कोणी बंड केलें असलें तर तें मात्र उमाजी नायकाने. पुरंदर-किल्ले विभागाचा हा रामोशी प्रमुख. आपला चुलत भाऊ राघोजी खोमणे याच्या पुढारीपणाखाली सन १८१५ मध्ये पेशवे सरकारच्या व ते सामील झाले होते त्या इंग्रजांच्याहि विरुद्ध बंडाचा उठाव घेऊं लागला. पुरंदरकिल्ल्याच्या गडकरीपणाचे हक्क हें त्याने निमित्त केलें होतें. १८२६-२८ पासून १८३१ पर्यंत उमाजी नायकाचें बंड तेजींत होतें. ठाणें, कुलाबा, आणि विशेष म्हणजे पुणें, सातारा या भागांत त्याने भलता जोर धरला होता; ठाणें जिल्हयांतील प्रवळगडावरून १८२७ साली उमाजीने असा जाहीरनामा काढला की ' यापुढे शेतसारा ब्रिटिशांना बिलकूल न देतां तो उमाजी नाईकाला द्यावा. उमाजी नाईक त्याचा उपयोग गोरगरिबांकरतांच करतील.' नंतर, त्यावेळी भोर संस्थानांत असलेल्या नसरापूर येथे १८२९ मध्ये कॅप्टन रॉबर्टसन व डेबी यांच्यावर त्याने हल्ला चढविला. त्यापूर्वी १८२८ त पाली येथील दादाजी गोंधळेकरालाहि त्याने प्रसाद दिला होताच. १८२९ त उमाजी साताराच्या गादीवर असलेल्या प्रतापसिंह महाराजांना सरळ जाऊन भेटले आणि आपल्या पुरंदरच्या वतनाची मागणी करून राहिले. ईस्ट इंडिया कंपनीच्या सर्वच अधिकाऱ्यांना ती भारी आसामी होती. शेवटी मॉकिन्टॉश याने त्यांस पराभूत करून पकडलें तें १८३१ च्या प्रारंभी पंढरपुरास. तथापि त्याच मॉकिन्टॉशने लिहिलेल्या उमाजी खोमणे नाइकांच्या चरित्रांत कबूल केलें आहे की शिवाजीचा आदर्श उमाजीपुढे होता आणि असें असूनहि बंडाबद्दल पुण्याच्या सेशनजज्जांनी उमाजीला फांशीची शिक्षा दिली ती १३ फेब्रु. रोजी येरवड्यास १८३२ मध्ये अंमलांत आली.

चारच वर्षें गेलीं. पेशवाई उडविली ती पचली. आतां साताराची गादी उडवा-वयास हरकत नाही, असें इंग्रजांच्या मनाने घेतलें. त्या दृष्टीने कारवाया सुरूं झाल्या. इंग्रजांविरुद्ध प्रतापसिंह बंड करीत असल्याचा आरोप सिद्ध धरून १८४० त अन्यायाने व जुलमाने प्रतापसिंहांना इंग्रजांनी काशीला हद्दपार करून पाठविलें. या अन्यायाविरुद्ध बंड करून उठला कोळे येथील धार-राव पवार. १८४० च्या एप्रिलपासून साताराजिल्हयाच्या कऱ्हाड-प्रचीतगड एवढ्या भागांत मे महिन्याच्या मध्यापर्यंत इंग्रज राजवट आहे की नाही, अशी अवस्था त्याने आणून सोडली. त्या सुमारास धारराव पवारांच्या अनुषंगिक असलेल्या एकशेतीस कर्त्या पुरुषांना इंग्रजांनी साताराचा तुरुंग दाखविला. पण त्या उठावाचें सर्वस्व बनलेला धारराव पवार इंग्रजांच्या हातीं कधीच लागला नाही.

इकडे धारराव पवारांचा धुमाकूळ चालू असतांनाच पुण्यास लष्करी आणि मुलकी अधिकाऱ्यांना इंग्रजांविरुद्ध उठवण्याचा प्रयत्न रामचंद्र खंडेराव सटवे करीत होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या विरुद्ध पुढल्याच वर्षी म्हणजे १८४१ च्या मे महिन्यांत सातारा-राजाचे नांवाने आणखी एक बंड उठलें. कोहीरीराव व निंबाजी

कोठावळे यांचें तें बंड होतें. त्यांनी रंगरूट-भरतीलाच सुरवात केली होती. दक्षिण हैद्राबादपासून त्यांनी आपल्या मोहिमेला सुरवात केली आणि निपाणी, कोल्हापूर, बदामी येथपर्यंतचा पल्ला त्यांनी गाठला. १८४१ च्या मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत देवदुर्गास ते असतांना, सहाशे घोडेस्वार व तेराशे पायदळ ही त्यांची लष्करी शक्ति होती. यादवगिरीपर्यंत त्यानी आपली ही मोहिम रेटली, तेथे निंबाजीचा भाऊ नरसप्पा अगर नरसिंगराव या नांवाने ओळखला जाई. हा एक आंधळा आहे, अशीच सर्वांची समजूत होती. पुण्यास खटपटी करणाऱ्या रामभाऊ सटवे यांच्याशीं नरसप्पा व कोहिरी यांचें चांगलेंच सूत होतें. साताऱच्या प्रतापसिंह महाराजांना लिंब येथे एका गोठ्यांत ठेवून पुढे त्यांची कावड इंग्रजांनी काशीला काढावयापूर्वी प्रतापसिंहाला भेटून कांही संकेत करून बाहेर पडलेला गृहस्थ म्हणजेच हा कोठावळे असा अंदेशा इंग्रजांसहि होता. कांही असलें तरी प्रतापसिंहांचे हे सगळे हितचिंतक 'डर तो पीछे रही' या वृत्तीचे होते. तरीहि १८४१ च्या ता. १६ जूनला बदामीचा किल्ला पडला आणि कोहीरी नि तो कोठावळे यांना त्यांच्या शंभर अरबांसह बेळगांवला बंदीखान्यांत आणून दाखल करण्यांत आलें. तेथे त्यांनी उघडच सांगून टाकलें की, शिराळे पेट्यांतील खंडेराव भोसले (जि. सातारा) हे आपले धनी असून चतुरसिंग फिरंगी हा आपला पुढारी आहे. आपल्या या प्रयत्नांत आपल्याला दोनशे घोडेस्वार आणि शंभर शिबंदी अशी मदत मुधोजीराव महाडिक यांनी केल्याचेंहि सांगण्यास ते चुकले नाहीत. इंग्रजांविरुद्ध इतक्या सर्व शक्ति फिरत आहेत. हें पटविण्याचा उपयोग एवढाच झाला की, गोकाक-कडील कांही अरब इंग्रजी बंदीखान्यांतून सुटले व ईस्ट इंडिया कंपनीला जो मुगुटराव नांवाचा बंडखोर अजिंक्य वाटत होता तो मात्र कंपनीचा जानीदोस्त बनला. सातारा-दफ्तरांतील या सर्व प्रकारांची माहिती मोठी उद्बोधक व अभ्यसनीय आहे.

प्रतापसिंह महाराजांचे स्नेही, हितचिंतक व अनुयायी यांच्या वरील सारख्या प्रयत्नाला १८४४ मध्ये सुभाना निकम या गृहस्थाने साथ दिली. सातारा जिल्ह्यांतील लिंब गांवचा राघो जनार्दन आपटे हा सुभाना निकमाचा साथीदार होता. त्यांनी लष्करी हालचाली सुरू केल्या व इंग्रजांची टपाल व्यवस्था सर्व गोंधळून सोडली. याच सुमाराला कोल्हापूर संस्थानांतील सामानगड येथे इंग्रजांचें विरुद्ध बंड उठलें होतें, तेथेच सुभाना निकमाने तळ दिला होता. निकमाजवळ पांचशे बंडखोर होते. पंचगंगेखालील दक्षिणेकडील टपाल व्यवस्था सर्वच्या सर्व बंद पडली होती. प्रतापसिंहांच्या त्या सर्व पक्षपात्यांना वठणीवर आणण्याचें काम साताऱ्यास रेसिडेंटच्या जागेवर असलेल्या कर्नल ओव्हॅन्सकडे सोंपविण्यांत आलें होतें. प्रतापसिंहांच्या त्या पक्षपात्यांच्या हातांत एव्हांना पन्हाळा व पावनगड पडलेले होते. म्हणून १८४५ चे जानेवारींत ओव्हॅन्स साताऱ्याहून कोल्हापूरकडे धांवत चालला, पण, कऱ्हाडपासून दहा मैलावरील कासेगावांत बंडखोरांनी ओव्हॅन्सला कैद केलें व पन्हाळ्यावर पळवून बंदिस्त केलें तथापि १८४५ मध्ये

एप्रिलांत सामानगडचें बंड शांत करण्यांत आल्यावर सातारकर मंडळींचाहि समाचार घेण्यास ईस्ट इंडिया कंपनीने कमी केलें नाही. कर्नल ओव्हॅन्स मोकळा झाला व सुभाना निकम यास कंपनीचा बंदी होणें आलें. ओव्हॅन्सचा बंदीवास ईस्ट इंडिया कंपनीच्या अंतःकरणाला एवढा भिडला होता की, १५ एप्रिल १८४५ रोजी इस्लामपुरास शंभर घोडेस्वारांचा लष्करी तळ कंपनीनें बसविला. सामानगडच्या बंडांत त्या भागांतील तीनशे लोकांनी भाग घेतला असल्याकारणानें बंडखोर इस्लामपुरासच आपल्या हालचालीचें नवें केंद्र उभारतील असा कंपनीचा अर्थातच अंदाज होता. या संबंधांतील सातारा दफ्तरामधील माहिती चाळून पहाणारांना मग खालील गोष्टीविषयीं मुळीच आश्चर्य वाटणार नाही.

सामानगडास बंड उभें असतांनाच १८४४ त व १८४५ च्या प्रारंभाला कोल्हापूर-सावंतवाडी भागांतहि भूदरगड आदि करून सर्व भागांत दंगल व्हावयास चुकली नव्हती. इनाम–कमिशन ईस्ट इंडिया कंपनीने नेमलेलें होतें आणि गडकऱ्यांचीं इनामें जप्त केलीं होतीं. त्या अन्यायाविरुद्ध गडकरी उभे राहिले. पण त्यांना १८४५ नंतर डी. सी. लामोटीने वठणीवर आणलें. या गडकऱ्यांच्या बंडाचें खरें कारण म्हणजे कोल्हापूरमध्ये इंग्रजांनी सुरू केलेली दाजी पंडितांची कारभार कुशलता होय. विशाळगडकर, सामानगडकर प्रभृती मग सामील झाले. यांत अस्वाभाविक कांहीच नाही. पंधरा घोडेस्वार व चाळीस शिबंदी येवढ्याच सामुग्रीनिशीं प्रचीतगडावर प्रथम बंडाचें निशाण रोवण्यांत आलें. चिकोडी (जिल्हा बेळगांव) च्या खजिन्याची लूट करण्यांत आली. तेथील कैदीहि मोकळे सोडण्यांत आले होते. इंग्रजांचीं सरकारीं दफ्तरें जाळण्यांत आलीं. १३ आक्टोबर रोजी घेतलेला सामानगड व कोल्हापूर हे भाग सुद्धा कित्येक महिने बंडखोरांच्या अमलाखालीच होते. भूपालगडच्या लोकांनी बंडाच्या डोंबाळयांत सामील होण्याचें ठरविल्यावर लालसिंग गोसावी व सखाराम फाळके यांनीहि परिस्थितीचा फायदा उठविण्याचें ठरविलें. पण यशवंत विठ्ठल शिरगांवकर यांनी फितुरी केल्यामुळे सगळाच मामला संपुष्टांत आला, आणि जिकडे तिकडे शांत शांत झालें.

बंडखोरांच्या तलवारी यावेळी म्यान झाल्या. पण इंग्रजी राज्याबद्दलची रुखरुख शमलीच नव्हती. मराठ्यांच्या इतिहासांतील शेवटचा मुत्सद्दी व इंग्रजी राजवटींतील सनदशीर चळवळीचा कडेलोट करणारा इंग्लंडांत गेलेला पहिला भारतीय वकील रंगो बापूजी गुप्ते देशपांडे रोहिडेकर याने प्रतापसिंह राजांची बाजू ब्रिटिश पार्लमेंटापुढे मांडून इंग्रजांची बोटें इंग्रजांच्याच डोळ्यांत घालण्याची पराकाष्ठा केली. आपल्या ( १८४० पासून १८५३ ) सुमारे १४ वर्षांच्या इंग्लंडमधील रहिवासांत याने २५ सभा घेतल्या आणि (स्वतःला मुळांत इंग्रजी येत नसतांहि इंग्रज भाषा आत्मसात करून) इंग्रजी जनतेला प्रतापसिंहावरील अन्यायाची जाणीव एवढी करून दिली की, १८४७ चा इंग्लंडचा अर्थसंकल्प पार्लमेंटांत मंजूर होईल की नाही, अशी कांही काळ धास्ती निर्माण झाली होती. पण, शेवटी रंगो बापूजीला निराश होऊन परतावें लागलें. त्याच सुमारास

बाजीरावास चालूं असलेले पेन्शन आपणास मिळावें म्हणून बाजीरावाचा दत्तक मुलगा नानासाहेब याने खटपट चालविली होती, तिलाहि अपयश आलें होतें. सातारकर आणि पेशवे यांच्या विलायतेहून हिंदुस्थानांत निराशेंने परत येत असलेल्या वकिलांना क्रिमियन वॉरमध्ये इंग्लंडविरुद्ध काय काय युरोपांत घडत होतें याची थोडीफार कल्पना माल्टा येथे आली. 'इंग्लंडची अडचण तीच हिंदुस्थानचें संधिसाधन' हें पुढे प्रचलित झालेलें सूत्र यावेळी या मंडळींना सुचलें होतें की नाही, ठाऊक नाही ! पण हिंदुस्थानांत आल्यावर ही मंडळी ज्या खटपटीला लागली, त्यांतून १८५७ चा उठाव जोरास लागला. कारण हिंदुस्थानांतहि दक्षिणेंत व उत्तरेंत ब्रिटिश राजवटीबद्दल असंतोष पसरलेला होता व तो स्फोट घेण्याच्या क्षणाची वाट पहात होता. वसईच्या तहापासून रंगो बापूजी इंग्लंडहून परत येईपर्यंत महाराष्ट्रांतहि इंग्रजांचेविरुद्ध जे उठाव झाले, ते सर्व विस्कळीत नसले तरी विखुरलेले होते; संघटित नव्हते. १८५७ च्या उठावाला कांहीसें संघटित स्वरूप आणि तेंही अखिल भारतीय सशस्त्र अशा पहिल्या स्वातंत्र्य-युद्धाचें आहे. त्याचीच शतसांवत्सरी साजरी करतांना तें ज्या परंपरेमुळे संघटित झालें ती महाराष्ट्रापुरती परंपरा वरीलप्रमाणे होती.

इंग्रजी राजवटीने भारतांत शिक्षण सुरूं करून आपल्या कारभारास कारकून आणि केरोपंत मिळविण्याचा एक कारखाना निर्माण केला होता. तरी इंग्रजांचा आणि युरोपचा नवा-जुना इतिहास अभ्यासलेल्या आणि त्या अभ्यासाचे जोरावर आपल्या देशाच्या स्थित्यंतराचा विचार करणाऱ्या मेंदूचा कधीच तुटवडा पडला नव्हता.

इंग्रजी राज्य ही ऐक परमेश्वरी कृपा आहे असे बोलणारा सुशिक्षितांचा एक वर्ग भारताच्या इतर प्रदेशा-प्रमाणे महाराष्ट्रांतहि निर्माण झालेला होता. तरीपण महाराष्ट्रांत इंग्रजी राज्याच्या आगमनाने आनंदाच्या उकळ्या कुणालाच फुटल्या नव्हत्या. इंग्रजी राजवटीला टिचण्याचे मार्ग इंग्रजांनी दिलेल्या विद्येंतूनच कसे काढावयाचे याचा विचार " वाघीणीच्या दुधाचा गूण लागलेले लोक " करूं लागले होते.

विष्णुबुवा ब्रह्मचारींनी पार समाजवादापर्यंत राजकारण बोलून टाकलें होतें. आपले समाजांतील अनेक दोष घालवून इंग्रजांचे अनेक गुण आपण उचलले पाहिजेत असें सांगता सांगता भारताचें म्हणून स्वतंत्र पार्लमेंट झालेंच पाहिजे असें लोकहित-वादीनी स्पष्टपणें दिग्दर्शन केलें होतें.

आपण चटक लावलेल्या शिक्षणापासून पगडया धोतरें पेहेरणारे साहेबच तेवढे निर्माण व्हावेत. ही मेकॉलेने केलेली अपेक्षा फोल ठरली. इंग्रजी राजवटीचें स्वागत महाराष्ट्रांत मनापासून कधीच झालें नाही याचा साक्षात्कार पेशवाईला उठवून लावणाऱ्या मालकमलाहि झाला होता. तो साक्षात्कार पुढे घालूनच पुण्याच्या डि. सु. पोलीसांनी १८५७ च्या उठावाचे वेळी आपला अहवाल ता. १४ ऑगस्ट रोजी वरिष्टांकडे धाडला होता. त्यांत इंग्रजी विद्या न शिकलेले लोक आपापल्या-परीने इंग्रजी राजवटीला उठवून लावण्याच्या उद्योगांत कसे होते याचें वर्णन होतें.

[१०]

# उठावाचीं कारणें

इंग्रजी राज्य आल्यामुळे भारतांत झालेल्या राजकीय जमान्याच्या बदलाने कोणासच समाधान नव्हतें, भूतकाळांत ज्यांनी हक्क, इज्जत आणि अधिकार उपभोगले होते, त्यांना ते आपले हक्क, इज्जती आणि अधिकार, शक्य होईल तर परत मिळविण्याची इच्छा होती. रस्त्यावरील जनसामान्य तर असंतुष्टच असंतुष्ट होता. शेवटच्या बाजीराव पेशव्यांच्या कारभारामुळे जो तो वैतागला होता, ही गोष्ट खरी, पण त्या अवस्थेला रावबाजींची नादानी कारण आहे हें प्रत्येकास ठाऊक होतें. ती नादानी जशी कोणालाच नको होती, तशीच परसत्तेचें जोखडहि मानेवर घेणें कोणास आवडत नव्हतें. 'इंडिया स्ट्रगल्स फॉर फिरडम्' हें इतिहासकार मुजुमदार (बंगाल) यांचें पुस्तक या सत्यावर विशेष प्रकाश पाडणारें आहे. उमाजी नाईक, नानासाहेब पेशवे, रंगो बापूजी यांनी उभारलेल्या बंडांत, समाजाचा सर्वांत खालचा समजला गेलेला हा थर मनापासून सामील होता, हें इंग्रज सरकारने प्रसिद्ध केलेल्या सातारा, पुणें, नाशिक, नगर, खानदेश या जिल्ह्यांच्या गॅझीटरांवरूनहि सिद्ध होईल. श्री. के. एम्, पण्णीकर तर आपल्या 'आशिया अँड वेस्टर्न डॉमिनन्स' या पुस्तकांत स्पष्ट म्हणतात की, 'भारतीय लोक जिंकले गेले तरी नमविले गेले नाहीत. त्यांनी एका महाराष्ट्रीय पेशव्याच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या मोंगल बादशहाच्या नांवानें, परकीय सत्ता झुगारून देण्याचा शेवटचा प्रयत्न १८५७ आणि पुढील वर्षांत केला.' त्या प्रयत्नांत त्यांना यश आलें नाही आणि तरीहि त्या प्रयत्नानंतर ज्यांना जिवंत रहाणें भाग आलें, ते संन्यासी, गोसावी किंवा फकीर होऊन राहिले, पण पुन्हा संसारांत म्हणून पडले नाहीत.

ईस्ट इंडिया कंपनीचा भारतांतील राज्यकारभार बघणारांचा मुख्य कलकत्त्याच्या मूळ वसतींतून कारभार हाकी. त्यापैकी डलहौसीच्या कारकीर्दीत हिंदी लोकांचीं 'राज्यें' खालसा करण्याचा सपाटा सुरू झाला. महाराष्ट्रांतील सातारा, तासगांव वगैरे संस्थानांवर गदा फिरली. भारताच्या नकाशाला ब्रिटिशांचा एकच एक तांबडा रंग फासावयाचा, हा डलहौसीचा इरादा, एवढेंच मात्र १८५७ च्या उत्थापनाचें कारण नव्हतें. ब्रिटिशांच्या दृष्टीनें 'फोडा आणि झोडा' ची नीति यशस्वी होत आली होती. आणि पेशवे, पेशव्यांच्या पाठोपाठ ते ज्या सत्तेला मानाचा मुजरा करीत होते ती सातारची गादी ही जर ब्रिटिशांनी निर्धास्तपणे पटकावून टाकली होती, तर ज्या मराठ्यांच्या मनगटावर, मेंदूवर व मनावर दिल्लीची मोंगल पादशाही महादजी शिंद्याच्यापासून आपलें जीवन अवलंबून

ठेवीत होती, तीच चाटून पुसून खावयाच्या उद्योगाला लागण्याचा काळ आतां जवळ आला आहे, असें ईस्ट इंडिया कंपनीच्या सूत्रधारांना वाटलें असल्यास नवल नाही. पण मनुष्य आखतो एक व कागद फाटतो भलताच ! ईस्ट इंडिया कंपनीने भारतांत राजकीय सत्तेची पाऊलवाट पाडावयास सुरवात केल्यापासूनच तिच्या–बद्दलचा जो असंतोष भारतांत धुमसत होता त्याचा वास तिला एकामागून एक मिळत गेलेल्या राजकीय धोरणांतील विजयामुळे, फारसा आला नाही.

प्लासीच्या लढाईपासून म्हणजे १७५७ पासून इंग्रजांचे राजकीय पाय या भारताच्या भूमीवर टेकले. त्या प्लासीच्या लढाईपासून सात वर्षांनी पांच बंगाली बटालियन्सनी आपल्याला आवश्यक मिळावयास हवी होती, ती बक्षिसी मिळाली नाही, म्हणून आपली तीव्र नापसंती व्यक्त केलीच होती. त्यांनी धमक्यांचें सत्र सुरू केलें आणि आपल्या हक्काच्या बक्षिसीपैकी उरलेला भाग मिळवला. त्यामुळे त्यांना अवसान सांपडलें आणि पुढे थोड्याच महिन्यांनी सर्वांत वडिलधाऱ्या रेजिमेंटने उघड उघड बंड केलें. १७६४-६५ च्या त्या काळांत, त्या बंडखोरांचे पुढारी गिरफदार करण्यांत येऊन तोफेच्या तोंडीं चढविण्यांत आले आणि त्यांच्या बटालियन्सना ऐसा धडा देण्यांत आला की तो त्यांचा त्यांनाच माहित !

सन १७९६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या सगळ्या संघटनेतच बदलाबदल झाली. तींत मग इंग्लंडच्या बादशाही हुकमतीच्या जुन्या अनुभविक सन्माननीय वृद्ध अधिकाऱ्यांच्या डोक्यावर नव्या दमाचीं गोरीं पोरें अधिकारी म्हणून बसलीं, तेव्हा साहजिकच त्या सेवावृद्धांना सनदशीर संताप आला आणि त्यांनी गडबड केली. पण 'वृद्धास्ते न विचारणीय चरिताः' हाच न्याय येथेहि लागू झाला. याशिवायहि वेलोर आणि अन्यत्र अशा गुप्त बंडाळ्या चालूंच होत्या की ज्यांच्या योगाने ईस्ट इंडिया कंपनी अस्वस्थ होती. पण त्या सर्व विखुरलेल्या शक्तींत दम नव्हता.

सन १८५६ च्या जुलैपासून मात्र निराळेंच वारें वाहूं लागलें. लॉर्ड कॅनिंग या ईस्ट इंडिया कंपनीच्या गव्हर्नर जनरलने तेव्हा असें फर्माविलें की सरकारी सत्ता पाठवील तेथे मुकाट्याने जावयाची ज्याची तयारी नसेल, अशा कोणत्याहि माणसाची कोणत्याहि कारणाने रंगरूट म्हणून भरती होऊं नये. हा हुकूम झाला मात्र की सर्वत्र एकच बातमी बोकाळली की इंग्लंडच्या राणी सरकारांनी म्हणजे व्हिक्टोरिया राणीने लॉर्ड कॅनिंगची जो नेमणूक हिंदुस्थानांत केली आहे, तीच मुळी हिंदुस्थानांतील सर्व सैनिकांना ख्रिस्ती बनवून सोडण्यासाठी ! ! 'जनरल सर्व्हिस एन्‌लिस्टमेंट ॲक्ट' ही त्या धोरणाची पहिली पाऊलटाक असून हिंदी प्रजेच्या छळाची ती नांदी आहे ! या कल्पनेला ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्य–कारभाराबरोबरच आपला धर्म-प्रसार करीत राहणाऱ्या मिशनरी मंडळींच्या हालचालीमुळे बळकटी आली. कारण रावबाजीच्या ब्रह्मावर्ती निवासापासून ख्रिस्ती

पाद्री आपल्या धर्मांतराच्या हालचाली जोरजोराने चालवीत आले होते आणि कॅनिंगसाहेबाचा वरील हुकूम निघण्याचे पूर्वी सुमारें वर्ष-सव्वा वर्षच पाद्र्यांनी असा एक जाहीरनामा काढला होता की, इंग्रजी राज्याबरोबर इकडे हिंदुस्थानांत जीं जहाजें येत आहेत आणि आगगाड्या होत आहेत, त्यांच्या योगाने इंग्लंड आणि हिंदुस्थान यांना एकाच धर्माचे अनुयायी म्हणून आध्यात्मिक संघटना करून नांदावें लागेल.

त्यांत पुन्हा, पुनर्विवाहाचा कायदा करून ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारने ती कल्पना चेतावली. देवा ब्राह्मणांनी दिलेला नवरा काळाने ओढून नेला तर तो आपल्या पूर्वार्जितीमुळे ओढून गेला असें मानून त्या मृत नवऱ्याच्या नांवासाठी हिंदू विधवा संन्यस्तवृत्तीने जन्मच्या जन्म काढावयाची. हिंदुधर्माच्या एकजिनसीपणांतील हिंदू स्त्रीची पतिसंबंधाची ही निष्ठा हा एक अविभाज्य भाग होता. त्यालाच पुनर्विवाहाच्या कायदेशीरपणाने बोट लावल्यावर, ख्रिस्ती पाद्रीच काय पण इंग्रजी राजवट ही हिंदुधर्मावर उठली, अशी भावना पसरल्याशिवाय राहिली नाही.

या सामाजिक विपर्यासाला आळा घालावयास कोणी पुढे सरसावला नाही, याचेंहि कारण असें होतें की प्लासीला क्लाइव्हसाहेबांनी जो विजय मिळविला होता त्याची शंभर वर्षें भरतील त्या दिवशी इंग्रजी राज्याचीहि भरतील आणि ही शंभर वर्षें भरण्यापूर्वी बरोबर एक वर्ष हिंदुस्थानांत सगळीकडे नद्यांचे पूर आणि हागओकीचा आजार धुमाकूळ माजविल्याशिवाय सोडणार नाहीत, असें ज्योतिषांचें भविष्य होतें. अगदी साधी भोळी माणसेंहि असें समजत होतीं की सीतामाऊलीने तिच्या शुद्धिनंतर वानरसेनेला ‘ तुम्ही शंभर वर्षें या भारतभूमीवर राज्य कराल ’ असा आशीर्वाद दिला होता, तीच ही वानरसेना ताम्रमुखी माण--सांच्या रूपाने प्लासीच्या लढाईपासून शंभर वर्षें हिंदुस्थानवर राज्य करीत आहे. आणि सीतामाईच्या आशीर्वादाचें सामर्थ्य संपुष्टांत आलें की इंग्रजांचें ठाणें या देशांतून उठणार आहे. अशा स्थितींत सामाजिक सुधारणेच्या संकीर्तनांचा आणि राजकीय उलाढालींच्या मीमांसांचा कांहीएक उपयोग नव्हता; कांही झालाच असता, तर इंग्रजांविरुद्ध धुसणारा असंतोष शून्यप्राय करण्यांतच झाला असता ! म्हणूनहि ज्यांना इंग्रजांचें राज्य देशांत नको होतें, ते त्या सामाजिक लोकशिक्ष--णाच्या व्यापांत शिरले नाहीत. आणि १८५६ साली खरोखरच नद्यांना पूरच पूर येऊं लागल्यावर आणि हागओकीचा आजार सुरू झाल्यावर, इंग्रजांचें राज्य आतां आंचके देऊं लागले असा भास सामान्य जनतेला झाला असल्यास तें स्वाभाविकच नाही काय ?

खुद्द दिल्लीसहि बादशाही घराण्यांतच ब्रिटिश राजवटीबद्दल धुसपुस सुरू होतीच. मराठ्यांच्या मर्दुमकीच्या काळांत महादजी शिंद्यांनी आपल्या मनगटावर दिल्लीचा बादशहा पोपटासारखा नाचविला होता. ही गोष्ट जशी दिल्लीच्या

बादशाहिणीला रुचत नव्हती, तशीच ब्रिटिशांचा पगडा हिंदुस्थानवर बसल्यावर त्यांच्या हातांतलें बाहुलें होऊन दिल्लीच्या बादशहाने रहावें, ही गोष्टहि तिला खपणारी नव्हती. दिल्लीचा बादशहा बहादूरशहा यावेळी 'बुढ्ढे बाबा' च होता. पण त्याची राणी झिन्नतमहाल हिच्या नसांतून नादिरशहाचें रक्त वहात होतें. आपल्या पतीच्या परधार्जिण्यावृत्तीने तिचें रक्त उसळत असे. तिच्या त्या प्रदीप्त इच्छाशक्तीच्या दर्शनाने, बाबराच्या वंशांतील राजपुत्रांना दिल्लीची बादशाही ही प्रभावी बादशाही करण्याची प्रबळ इच्छा झाली. त्यासरसा दिल्लीच्या राज-पुत्रांनी, वरून निष्पाप दिसणाऱ्या कारणांसाठी सर्व हिंदुस्थानभर फिरती केली आणि दिल्लीच्या सिंहासनाचे निष्ठावन्त कोठे कोठे आणि कसकसे आहेत याचा अंदाज घेतला.

दिल्लीच्या राजपुत्रांचा वरीलप्रमाणे कार्यक्रम चालू असतांच नोव्हेंबर १८५६ मध्ये मुंबई बंदरांतून इंग्रजी सैन्य इराणच्या शहाविरुद्ध चालून गेलें व त्याने हिरात शहराचा धुव्वा उडविला. परिणामतः इराणच्या शहाने हिंदुस्थानांत ब्रिटिशांच्या विरुद्ध असंतोषाची ताडी चांगलीच आंबवली. १८५७ च्या मार्च महिन्यांत दिल्ली शहरांतील भिंती भिंतीवर जाहीरनामे लागले की इराणचा शहा आपल्या सैन्यानिशीं हिंदुस्थानांत येत असून इंग्रजांना हिंदुस्थानांतून हाकलून लावणें हें त्याचें ध्येय आहे. त्यासाठी हिंदुस्थानांतील सर्व मुसलमान मंडळींनी आपापलें चिलखत अंगावर चढवून शहाला येऊन मिळावें.

ब्रह्मावर्ताला ठेवलेले रावबाजी सन १८५१ मध्येच निवर्तले होते. त्यांचें दहा लाखांचें वार्षिक पेन्शन वारस या नात्यानें आपल्याला चालू रहावें म्हणून धोंडोपंत नाना या रावबाजींच्या दत्तक पुत्राने खटपट केली; पण ती वाया गेली. त्यामुळे निराश झालेला नानासाहेब मनांतून इंग्रजाबद्दल कडवट झाला तरी, आपला तो सारा कडवटपणा झांकून ठेवून इंग्रजी समाजांतून हवा तसा हिंडू लागला. पेन्शनच्या खटपटीसाठी लंडनला पाठविलेला त्यांचा मुनीम अझीमुल्लाखान हिंदुस्थानांत परत येतांना 'क्रिमिया' ला जाऊन आला होता. हिंदुस्थानांत येतांच, आपल्या धन्याच्या कानाशीं तो लागला आणि इंग्लंड हें युरोपांत कसें दुबळें राष्ट्र बनलें आहे याचें रसभरित वर्णन त्याने केलें व मिटक्या मारीत ते नानासाहेब पेशव्याने ऐकलें. या संबंधांत एडमंड कॉक्सचा मुंबई इलाख्याचा इतिहास अभ्यासकांनी वाचण्यासारखा आहे.

१८५६ च्या जानेवारींत त्या कानगोष्टींना तोंडहि फुटल्यासारखें झालें. रावबाजींचे दुसरे एक दत्तक भाऊ अमृतराव पेशवे म्हणून होते. त्या भल्या गृहस्थाचे चिरंजीव नारायणराव आणि माधवराव यांनी 'राजद्रोह' केल्याचा संशय इंग्रजांना आला आणि त्यांपैकी नारायणरावाला दरमहा सातशे रुपयांची नेमणूक करून देऊन इंग्रजांनी हजारीबागेस अडकवूनहि ठेवले. ( ता. २४ जानेवारी १८५६ चा ज्ञानप्रकाश )

पेशव्यांच्या बाजूने अशा हालचाली होऊं लागल्या होत्या तर सातारच्या गादीकडूनहि स्वस्थता नव्हती, सातारचे राजे प्रतापसिंह महाराज यांना पदच्युत करून काशीस ठेवल्यानंतर त्यांच्यावरील अन्याय दूर करून घेण्यासाठी त्यांचे वकील रंगो बापूजी गुप्ते इंग्लंडला गेले होते; त्यांनी भरपूर तेरा वर्षं राज्यासाठी खटपट केली. ती वाया गेली. दरम्यान १८४७ साली राजे प्रतापसिंह महाराज यांचाच कैलासवास झाला. तेव्हा रंगो बापूजी हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यांनी काशीस प्रतापसिंहाच्या राण्यांची गांठ घेतली व त्यानंतर १८५४ साली सातारचा राणीवसा सातारला परत आला. तेव्हापासून त्यांनी इंग्रजी राजवटीबद्दल कट उभारण्यास सुरवात केली होती आणि त्याचें कारण इंग्लंडची अडचण तीच हिंदुस्थानचें संधिसाधन करतां येईल, अशी भावना त्यांना इंग्लंडचें जें रशियाशीं बिनसलें होतें, त्यावरून झाली असावी. या संबंधांत सातारा जिल्हा गॅझीटिअर वाचण्यासारखें आहे.

अशा तऱ्हेने १८५७ उगवण्याच्या आंतच सर्व हिंदुस्थानभर राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि लष्करी असंतोष धुमसत होता. तो पेट केव्हा घेईल याचा नेम नाही, याची जाणीवहि कंपनी सरकारास नव्हती, असें नाही. त्या जाणिवेशिवाय कां इंग्रजांनी १८५७ च्या प्रारंभालाच आपल्या भाईबंदांना इषारा दिला की, त्यांनी सावध असावें म्हणून ? हिंदुस्थानच्या नागरिकांनीहि इंग्रजांना बजावले की इंग्रजांनी यापुढे सावध असावें आणि शक्य असेल तर मायभूमीकडे धांव घ्यावी. निदान, आपलीं बायकामुलें तरी त्यांनी इंग्लंडला पोंचवावीत. फेब्रुवारी १८५७ च्या दुसऱ्या पंधरवडचाचे शेवटी शेवटी लॉर्ड एल्फिन्स्टनसाहेबांच्या हातीं असा एक कागद पडला की, ज्यांत उघड उघड राजद्रोहाचा पुकारा होता. त्याच्यावर सही कोणाचीच नव्हती. तरी सार्वजनिक असंतोषाचीं कारणें त्यांत नमूद होतीं. इनामें आणि सारामाफ जमिनी यांच्याबाबत चाललेल्या कमिशन-मार्फतची चौकशी हें एक असंतोषाचें कारण त्यांत नमूद केलें होतें. एका खेडचांतून दुसऱ्या खेडचांत अशी चपात्यांची देवाण चालू होती की त्यावरून 'कठीण समय' येऊन ठेपला आहे याची जाणीव लोक घेत होते. या चपात्यांच्या प्रसारांतून ता. १२ जून १८५७ ही बंडाची सार्वत्रिक तिथी सर्वांना कशी उमगली हें एक संशोधकांसाठी अजूनहि गूढ आहे. पण ती उमगली, एवढें खरें. याच वेळी रणांगणावर वापरावयाच्या रायफलींमधून जीं काडतुसें घालावयाचीं त्यांना डुकराची व गाईची चरबी वापरण्यांत वास्तविक इंग्लंडमध्ये आली. पण त्याबाबतचे हुकूम हिंदुस्थानांत कानीकपाळीं गेले आणि हिंदुस्थानच्या लष्करांतच असंतोष पेट घेऊ लागला. यासंबंधांत हॅरिंग्टन या त्यावेळच्या लष्करी अधिकाऱ्याचें असें स्पष्ट म्हणणें आहे की लष्करांत पसरलेल्या असंतोषाची कमिशंड किंवा नॉन कमिशंड अशा कोणत्याच अधिकाऱ्याने आपणांस वर्दीच काय, सूचनाहि दिली नाही, इतका तो असंतोष संघटित होता.

हिंदुस्थानांतील या सर्व बाजूंनी फेर धरणाऱ्या असंतोषाचा स्फोट जेव्हा होईल तेव्हा आपणांस त्याचें पुढारीपण पत्करावें लागेल, असें स्वप्नहि मराठी मुलखांतील बहादुरांना आरंभी तरी नव्हतें. मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथे येऊन वखारी घालणारे परदेशी व्यापारी कधीकाळीं आपले राजकीय सत्ताभिलाषी सामनेवाले होतील याचें स्वप्न छत्रपती शिवाजी महाराजांना पडलें असल्यास ठाऊक नाही ! पण मराठी साम्राज्याच्या धुरंधरांपैकी महादजी शिंद्याशिवाय कोणास असावें, असें म्हणण्यास जागा नाही. तथापि १८०३ मध्ये व १८१८ मध्येच नव्हे, तर १८५७–१८५८ मध्येहि ब्रिटिशांशीं आव्हानपूर्वक सामना द्यावयास कोणी उभे राहिले असले तर ते मराठेच होते, हा योग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. श्री. के. एम्. पण्णीकरांचें 'आशिया अँड वेस्टर्न डॉमिनन्स' हें पुस्तक जिज्ञासूंनी वरील संदर्भांत आपल्या समाधानासाठी मुद्दाम वाचण्यासारखें आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाचे प्रारंभ-काळांत महाराष्ट्रामध्ये राजकीय असंतोषाची खाईच होती. ता. १६ मे १८५३ चा 'ज्ञानप्रकाश' साफ सांगतो की नानासाहेब पेशव्यांनी वडिलांचें पेन्शन आपणांस मिळावें म्हणून जरी आपले दिवाण पिराजीराव, मिस्तर बेल्डार्ड आणि होमर्सजी हे पारशी गृहस्थ मिळून मातबर शिष्टमंडळ पाठविलें असलें तरी त्याला यश येण्याची बिलकुल आशा नाही. त्याप्रमाणें नानासाहेबांची निराशा झाल्यावर, प्रतापसिंह महाराजांचा वकील म्हणून गेलेल्या व हात हलवीत परत यावें लागलेल्या रंगो बापूजीने प्रथम सातारा येथे काशीहून परत आलेल्या राणीसाहेबांशीं सल्ला मसलत केली आणि नंतर नानासाहेब पेशव्यांचीहि गांठ घेतली. तेवढ्यावरच रंगो बापूजी थांबले नाहीत. त्यांनी तात्या टोपे यांचेशीं 'गुफ्तगू' केलें. तात्या टोपे त्यावेळी बहाद्दूरशहा बादशहाची महाराणी झिन्नतमहाल यांच्याशी बातचीत करीत होते. या साऱ्या गांठीभेटींचा व सल्लामसलतींचा रोख इंग्रजांविरुद्ध उघड उघड सशस्त्र बंड उभारण्याचा होता. यासंबंधांत कॉक्स यांनी लिहिलेला मुंबई इलाख्याचा इतिहास आणि सांगली संस्थानचे दप्तरीं असलेली रोजनिशी अभ्यसनीय ठरतील. त्याप्रमाणे धागेदोरे जुळविल्यावर महाराष्ट्रीय बरकंदाजांनी पुढाकार घेऊन सत्तावनचा उठाव साजरा केला. उत्तर हिंदुस्थानांतील त्या 'दंग्याची' बातमी महाराष्ट्रांत प्रथम साताऱ्यास आली. ती एका खासगत पत्रांतून. १८५७ च्या जूनचे प्रारंभास ती बातमी आली. त्यावरून हें स्पष्ट झालें की त्या उठावाच्या सामर्थ्यसंपन्न पुढाऱ्यांपैकी एक जे धोंडोपंत नानासाहेब पेशवे ते पुणें, सातारा, कोल्हापूर येथील मंडळींशीं गुप्त पत्रव्यवहार करीत होते आणि त्या मंडळींतील साताराचे रंगो बापूजी गुप्ते व कोल्हापूरच्या राजांचे बंधू चिमासाहेब या मातबर मंडळींचीं नांवें इतिहासाने शिरोधार्य मानलीं आहेत.

पैकी रंगो बापूजी उत्तरेंतून नानासाहेब पेशव्यांची गांठ घेऊन आल्यावर परळी खोऱ्यांत ( सज्जनगड, सातारा ) सहा महिने राहिले व येथे त्यांनी लष्करी

भरतीहि व्यवस्थित केली. परळी खोऱ्यांतील आणि भोर संस्थानचे हद्दींतील म्हणजे शिवाजी महाराजांच्या प्रिय डोंगरी भागांतील मावळे आणि रामोशी मंडळीमधूनच ही भरती मुख्यतः झाली. इराणमध्ये पाठविलेल्या ब्रिटिश सैन्यांतील मंडळी तेथून परत येण्यापूर्वीच वरील भरती बहुधा होऊन गेली होती. भरती झालेल्या मंडळीं-च्यामधून एक लष्करी तुकडी उभारण्यांत आली. साताऱ्च्या राजासाठी आपल्या रंगोभाऊंनी ऊर्फ रंगो बापूजींनी खटपट करून पदरीं आलेल्या निराशेचा बदला घेण्याचा त्यांचा निश्चय झालेला पाहून, आपल्या राजासाठी खटपट करणाऱ्या त्या निष्ठावन्ताच्या शब्दाला मान देऊन भराभर लष्कर भरती होऊं शकली. सातारा, भोर, पंढरपूर, बेळगांव एवढ्या सर्व भागांत रंगो बापूजींनी काशीवासांतच कैलासवास केलेल्या प्रतापसिंहाचे चिरंजीव शाहू महाराज यांच्या नांवाने बंड उभारण्याचें ठरविलें होतें. सदर शाहू महाराज हे प्रतापसिंहांनी दत्तक घेतलेले चिरंजीव असून, ते मूळ प्रतापसिंहांचे सेनापति बाळामहाराज याच्या पत्नीला काशीच्या वाटेवरून जंगलांत झाल्यामुळे 'जंगली महाराज' या नांवाने प्रसिद्ध होते आणि काशीहून परत येऊन साताऱ्यास राहिल्यावर 'सातारचे काशीकर राजे' या नांवानेहि ओळखले जाऊं लागले होते. त्यांच्या नांवाने बंड उभारण्याची कल्पना लोकांना एवढी पटली की त्या भोर-बेळगांव पट्टयांतून लोक लष्करांत प्रेमाने भरती होऊं लागले. कारण अनेक अपयशांतूनच शेवटीं यश येतें हें लोकांना ठाऊक होतें. रंगो बापूजींनी आतां शस्त्रबंडाचा पाठपुरावा करण्याचें मनावर घेतलें याचा लोकांना आनंद झाला. कारण साताऱ्च्या राजाच्या नांवाने देखील बंडाचे अगदी आरंभी जे प्रयत्न झाले ते व्यक्तिशः व विखुरलेले होते. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झाल्यावर, साताऱ्च्या राजाला आपल्या हातचें बाहुलें करून इंग्रजच खरे राज्यकर्ते झाले. या घटनेने संतापलेले गोपाळ हरि पटवर्धन, अण्णाजी शेंडे आणि विठूजी कुंडलकर तसेच सन्तू घाटगा व यशवंतराव चव्हाण यांनी सन १८२१ सालीच बंड उभारलें होतें. पण त्या पांचहि जणांना कॅप्टन रॉबर्टसन याने ता. ३० आक्टोबर १८२१ रोजी पुण्यास गिरफदार करून, ब्रिटिशसरकाराविरुद्ध कट केल्याच्या आरोपावरून न्यायासनापुढे उभे केलें होतें, याची आठवण १८५६ सालीहि लोकांस झाल्याशिवाय राहिली नाही. ब्रिटिश लष्करांतील शिपाई वश करून घ्यावे आणि तुरुंगावरील पहारेकऱ्यांचे हात ओले करून घ्यावे; अशा तऱ्हेने कैदेंतून मोकळे झालेले कैदी व ब्रिटिशांचे फौजेंतून विटलेले शिपाई यांच्या जोरांवर बंड उभारावें असा त्या पटवर्धन-चव्हाण प्रभृति पंचकडीचा प्रयत्न होता. त्याप्रमाणे कांही यशाची पावलें टाकलींहि होतीं. साताऱ्च्या लष्करांतील शिपायांना बनवून त्यांना बंडास प्रवृत्त करण्याच्या कारस्थानावरून 'रूपसिंग' परदेशी सापडला. त्याला इंग्रजांनी बन्दीखान्यांतहि कोंडले. पण तेथून कडेकोट बंदोबस्तावर ताण करून रूपसिंग निसटला आणि अप्पासाहेब राजे असें नांव धारण करून

बंडाचें निशाण उभारतांच, लष्करांतून फुटलेले शिपाई तर त्याला मिळालेच पण इतरहि पांचशे रंगरूट त्याच्याकडे भरती झाले. त्या कटवाल्यांनी एकंदर दोन हजार माणसें बंडासाठी उभी केली आणि ब्रिटिशांच्या तीन बटालियन्सवर हल्ला करून तोफखाना पेटवून देण्याचा मनसुबा टाकला होता. न्यायमंदिरापुढे हें सर्व सिद्ध झाल्यावर गोपाळ हरी पंडित पटवर्धन यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना प्रथम देहांत प्राय:श्चिताचीच शिक्षा सुनावण्यांत आली होती; पण पुढे तिचे रूपांतर जन्मठेप सश्रम काळेपाण्याची शिक्षा म्हणून झालें. अण्णाजी शेंडे यांनी जामीनावर मोकळे रहावें अगर बंदीखान्याचा मार्ग सुधारावा असा हुकूम झाला. विठूजी कुंडलकराच्या कपाळीं तोच भोग आला. सन्तू घाटगे निर्दोषी सुटला पण यशवंतराव चव्हाणाला दहा वर्षें तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यांत आली. पुणे येथील कमिशनर विल्यम चॅप्लिन यांना या संबंधांत रॉबर्टसन्ने केलेला रिपोर्ट सांगतो की ब्राम्हणाना इंग्रज काय किंमत देतात, विशेषत: पुण्याच्या ब्राह्मणांना, तें कळावें म्हणूनच वर सांगितल्याप्रमाणे शिक्षा देण्यांत आल्या. सदर प्रकरणी प्रकाश पाडण्यासारखा मुंबईसरकारचे १८२२ चे दप्तरीं पुरावा मिळणें शक्य आहे. तो आपल्यापुढे नसला तरी या पावशतकापूर्वीच्या घटनांचे स्मरण रंगो बापूजी रंगरूटभरती करीत असतांना लोकांना होतें, असें दिसतें कारण रंगो बापूजींच्या रंगरूट भरतीच्या मोहिमेंत वरील गोष्टी आठवून आठवूनच, होणाऱ्या परिणामाला तोंड देण्याच्या तयारीने लोक बंडांत सामील होत होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांनाहि रंगो बापूजी बंडाबिंडाच्या पेचांत सांपडावा अशी मनापासून इच्छा होती. रंगो बापूजींनी इंग्लंडांत जाऊन साताऱ्च्या राजांची वकिली केली हाच त्यांचा भयंकर अपराध असे ते अधिकारी मानित होते. कांही ब्रिटिश अधिकाऱ्यांना तर रंगो बापूजींच्या रक्ताचीच तहान लागली होती. कारण १८५७ च्या बंडाला प्रवर्तक अशीं इतर कोणतींहि कारणें असोत, त्याची इंग्लंडमधील शिष्टाई ही बहुतांशीं कारणीभूत आहे. अशी त्यांची समजूत होती. त्यामुळे इंग्रजांचा नक्षा उतरविण्याला जेवढे रंगो बापूजी टपले होते, तेवढाच इंग्रजहि रंगो बापूजीवर टपला होता. या सामन्याला आलेलें अटीतटीचें रूप असें रंगलें आणि त्याने दक्षिणेंतहि असा व्यापकपणा घेतला की पार कानाकोपऱ्यांतील खेड्यापाड्यांतूनसुद्धा, आठदहा वर्षांचीं पोरेढोरेंहि बंडाच्या घडामोडीची चर्चा करींत, असें विनायक कोंडदेव ओकांनी आपल्या ' शिपायांचें बंड ' पुस्तकांत नमूद केलें आहे.

[ ११ ]

# सातारा छत्रपतींच्याकडील उठाव

इंग्लंडहून प्रतापसिंहाची वकिली करून परत फिरलेले रंगो बापूजी माल्टा येथे कांही काळ थांबून १८५४ च्या फेब्रुवारींत हिंदुस्थानांत परत आले. यानंतर जुलै १८५४ पासून डिसेंबर १८५५ पर्यंत ते 'गुप्तरूपे' हिंडले. त्यांत त्यांनी कानपूर येथे नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे यांच्याशीं केलेल्या 'गुफ्तगूं' ला अनुसरून काशीराजा ऊर्फ प्रतापसिंहाचे चिरंजीव शाहू यांच्या नांवाने दक्षिण महाराष्ट्रभर रंगरूटभरती केली असली तरी स्वतः राजपुत्राने त्या कामी प्रत्यक्ष भाग घेतल्याचें दिसत नाही. तरी पण राजघराण्यांतील 'काकासाहेबा'नी म्हणजे प्रतापसिंहांच्या सेनापतींचे चुलत्यांनी रंगो बापूजी आणि त्यांची मंडळी जे करीत होती त्या कामी थेट ११ जून १८५७ पर्यंत आस्थेने लक्ष घातलेंच होतें. रंगो बापूजींनी अखिल भारतीय उठावाला मदत करण्याकरतां आणि प्रत्यक्ष साताऱ्यांत उठाव करण्याकरतां डिसेंबर १८५६ पासून जिवापाड मेहनत घेतली आणि आपला पुतण्या वासुदेव गुप्ते याच्या हाताखाली पांचशे माणसांची कुमक नानासाहेब पेशव्यांकडे प्रथम पाठवून दिली. याचा दाखला मुंबई गॅझीटिअरच्या सातारा जिल्हा विभागांतच मिळण्यासारखा आहे.

डिसेंबर १८५६ पासूनच्या पुढील सहामाहींत रंगो बापूजी तेवढाच उद्योग करून थांबले नाहीत. त्या काळाच्या उत्तरार्धांत रंगो बापूजी आणि त्यांच्या साथीदारांनी आपल्या हेतूपूर्तीसाठी माणूसबळ, द्रव्यबळ आणि साधन-बल मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. येनवडे, वाठार, देऊर, वर्धनगड, वारूगड, अरबी, कळंबी, कऱ्हाड, अरळे, अर्जुजगड, येकमुल्ली, जकातवाडी, फलटण, पंढरपूर, बेळगांव, शहापूर आणि कोल्हापूर असे रंगरूट-भरतीचे मुख्य मुख्य चव्हाटे होते. एप्रिल १८५७ पासून तर रंगो बापूजींच्या पायाला दम नव्हता. त्यांचें मुख्य ठाणें साताराच-म्हणजे सातारा-मेढे रस्त्यावरील (अ)हमदाबाद होतें. खुद्द साताऱ्यांत-देखील रंगो बापूजी निरनिराळ्या ठिकाणी मुक्काम ठोकीत. मंगळवार पेठेंतील बाळाजी शिंप्याचें घर, कृष्णेश्वर मंदिराजवळील गोसावी वाडा आणि विठोबाचे नळाजवळील सखाराम दाजी काबाडे यांचें बिऱ्हाड, ही रंगो बापूजींचीं मुख्य आश्रयस्थानें होतीं. कोल्हापूरास असलेला सातारचा तात्या फडणीस, कऱ्हाड येथील दौलता पवार, कोकणांतील रंगो बापूजींचा मेहुणा केशव नीळकंठ ऊर्फ अण्णामामा चित्रे, भोरमधील शेटचे बन्धु, सातारच्या बावीसावे नेटिव पलटणीकडे दप्तरदार असलेले गणेश सखाराम कारखानीस, अशी कांही नांवें रंगो बापूजींचे अनुयायी आणि प्रतिनिधी म्हणून आढळांत येतात. त्यांच्या सहाय्याने कमींत कमी दोन हजार माणसांची अव्वल कुमक मिळवावी आणि तिच्या सहाय्याने साताऱ्यांत

इंग्रजी कैदखान्यांत असलेले तीनशे कैदी मोकळे करावेत; सातारा–यवतेश्वर–महाबळेश्वर येथील युरोपियनांच्यावर हल्ला करून त्यांना यमसदनालाहि पाठवावें; शिवाय सरकारी तिजोरीवरहि डल्ला मारावा आणि साताऱ्यांत उठावणी करावी, अशी आंखणी रंगो बापूजींनी केली होती. ही आंखणी करतांना रंगो बापूजी व त्याचे साथी यांनी आपल्या अनुयायांपुढे ठेवलेलें ध्येय असें होतें की, साताऱ्यास छत्रपतींच्या गादीची पुन्हा स्थापना करावयाची, तिच्यावर प्रतापसिंहांचे दत्तक चिरंजीव शाहू ऊर्फ काशीराजा अथवा घरगुती वर्तुळांतून ओळखला जाणारा जंगलीमहाराज किंवा बोवा महाराज याला गादीवर बसवावयाचें आणि हिंदुस्थानांत इंग्रजाविरुद्ध जो उठाव होतो आहे, त्याला हातभार लावावयाचा. या कामी सुलभता यावी म्हणून साताऱ्यास इंग्रजांनी ठेवून दिलेली बावीसावी नेटिव फलटण फितूर करून घ्यावयाची असाहि मनसुबा होता. हिंदुस्थानांत व्हावयाच्या उठावाच्या बातमीचा प्रसार चहूंकडे करीत करीत जानेवारी १८५७ पासून रंगो बापूजी ठिकठिकाणी कटवाल्यांच्या सभाहि घेत आले होते. शेवटच्या सभेंत 'पराभवाने आपणाकडून शेवटची पाठ फिरवली पाहिजे' असा निकराचा प्रयत्न करण्याचे वचन रंगो बापूजीला मिळालें होतें. मानसिंग हा एक मामुली शिपाई; सातारा–तुरुंगाचा पहारेकरी; पण त्याने देखील रंगो बापूजींना वचन दिलें की आपण बावीसावी फलटणच काय पण 'घेंडा रेजिमेंट' म्हणजेच स्थानिक घोडदळ, तसेंच मुंगलाईसवार अथवा दक्षिण–मराठा–रेग्युलर घोडदळ सहाय्य करून घेऊं, या सैन्याबरोबर जो काय दारूगोळा मिळेल, त्याशिवाय भोरमध्ये दारूचे कोठार आणि तोफेचे कुल्पी गोळे रंगो बापूजींनी तयार ठेवले. त्यांचा पाठिराखा आत्माराम ऊर्फ आप्पा ऐतवडेकर याने स्वतःच आठशेवीस स्फोटक चेंडू तयार ठेवले होते तर बाकीच्या साथ्यांनी तरवारीसारखीं जुनीं शस्त्रास्त्रेंहि जमवून ठेवलीं होतीं. तेव्हा दोन हजार माणसांनिशी हल्ला चढवावयाचा, तीनशे कैदी साताऱ्यांतून मुक्त करावयाचे आणि भोरच्या पंतसचीवांनी या कामी सर्वथैव सहाय्यक व्हावयाचें तर बाकीच्या पेशवेछत्रपतींच्या मांडलिकांनी योग्य मोका मिळतांच त्या उठावाला येऊन मिळावयाचें, असा संकेत करून आणि सातारच्या राजवाड्यांत रहाणाऱ्या राजघराण्याला बित्तंबातमी पुरवून सगळा कारभार चालवावयाचा, असा शेवटचे सभेंत निर्णय घेणेंस रंगो बापूजी कचरले नव्हते.

रंगो बापूजींनी अशी तयारी चालविली असतांनाच, ईस्ट इंडिया कंपनीकडील सातारा–पोलिसांचे प्रमुख व बोवासाहेब या नांवाने ओळखले जाणारे अंबाजी राजे शिर्के यांना सातारच्या राणीसाहेबांनी चांगलेच वळवून घेतले होते. प्रतापसिंहांच्या थोरल्या राणीसाहेबांची ही करामत होती. उठाव होईल त्यावेळी सर्व पोलिस हात जोडून बसविण्याचें त्यांनी मान्य केलें होतें. आदले साली म्हणजे १८५६ साली साताऱ्यास चाळीस हजार रोहिला आणविण्याच्या कारस्थानांत राजे शिर्के होतेच. भोरपासून खानापूर (बेळगांव) तालुक्याच्या शेवटच्या टोकापर्यंत इंग्रजाविरुद्धच्या उठावासाठी गुप्तपणे पैसाहि उभारण्यांत येत होता.

कोल्हापूरकडील खालील भागाशी संबंध अबाधित राखण्यासाठी वाळवे हें केंद्र तयार करण्यांत आलें होतें व तेथून बऱ्याच धामधुमी चालत. दक्षिण महाराष्ट्राच्या दक्षिण केंद्राचा संचालक म्हणून कोल्हापूरचे चिमासाहेब काम पहात होतें आणि त्यांचे सल्लामसलतीनेच सावंतवाडीपर्यंत आपल्या उठावाचे धागेदोरे रंगो बापूजींनी विणले होते.

## ' परमेश्वरी कृपा '

अशा या सज्जतेनिशीं कानपुरीं, ज्या ता. १२ जून १८५७ रोजी इंग्रजविरोधी उठावाचा बार उडविण्याचें ठरविलें होतें, त्याच तारखेस साताऱ्यास रंगो बापूजींनी उचल करण्याचें ठरविलें होतें. त्यासाठी प्रतापसिंहाचे चिरंजीव शाहू आणि सेनापति ( प्रतापसिंहांचे सेनापति बाळासाहेब यांचे दत्तक चिरंजीव ) दुर्गासिंग यांचे घोडे जेरबंद करून सज्ज ठेवण्यांत आले व त्या दोघांनी स्वातंत्र्य-संग्रामाच्या उठावाचा पुढाकार घेण्याकरितां बाहेर पडावयाचें, म्हणून एके रात्रौ सर्व सिद्धताहि झाली. या सिद्धतेची सूचना मानसिंगाला मिळतांच ता. ११ जून १८५७ रोजी बावीसाव्या फलटणींतील वजनदार आणि मातबर माणसें फितविण्याचा त्याने कसून प्रयत्न केला. पण ' परमेश्वरी कृपेने ' हा सर्व कट ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळला ! ही ' परमेश्वरी कृपा ' म्हणजे दुसरें तिसरें कांही नसून महाराष्ट्राच्या पांचवीला पुजलेली फंदफितूरीच होय ! सन १८३१ मध्ये उमाजी नायकाला ज्याने पकडण्यासाठी इंग्रजांना सहाय्य केलें तोच रामोशी नाना रहा चव्हाण यावेळीहि पुढे झाला. आणि पंतसचीवांनी याला नोकरींतून कमी केले असल्याकारणाने या असंतुष्ट आत्म्याने भोरकरांचा कांटा काढण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांचे कानांशीं लगट केली. बातमी मिळण्याचा अवकाश की सातारचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट रोज यांनी हालचालीस सुरवात केली आणि लोकांच्या उठावावर घणाचे घाव घालण्याच्या निश्चयाने कामास लागले ताबडतोब त्यांनी मानसिंगास धरलें. लष्करी कोर्टापुढे उभे केले आणि ता. १२ जून रोजीं मानसिंगाला त्यांनी तोफेच्या तोंडीं दिलें. तोफेच्या तोंडीं जातांना भोंवताली जमलेल्या लोकांना उद्देशून मानसिंग गरजला की, " तुम्ही जातिवंत हिंदू आणि जातिवंत मुसलमान असाल, तर तुम्ही या गोऱ्या लोकांचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही. " ज्ञानप्रकाश ( २१ जून १८५७ चा ) वृत्त जसें देतो तसेंच १७ ऑगस्ट १८५७ चा ज्ञानप्रकाश असेंहि वृत्त देतो की ' गेले गुरुवारीं साताऱ्च्या थोरल्या राणीसाहेबांचे दत्तक चिरंजीव, काशी महाराज, यांना भल्या सकाळीं सहा वाजतां धरून नेण्यांत आलें. राजवाड्याला मुगलसवार फलटणींतील दोनशें सोजिरांनी वेढा घातला होता. दोन भरून आणलेल्या तोफाहि आणण्यांत आल्या होत्या. आपण बंडांत सामील असल्याचा वहीम कंपनीसरकारास आला असून आपणांला पकडून पुण्यास पाठविण्याबद्दल गव्हर्नरसाहेबांनी हुकूम केला आहे, असेंहि प्रथम काशीराजांना सांगण्यांत आलें होतें. त्यांच्या मातोश्रींनाहि तसेंच

सांगण्यांत आलें. नंतर काशीमहाराज, प्रतापसिंहाच्या सेनापतीचे चिरंजीव आणि प्रतापसिंहाच्या सेनापतीचे चुलत्याचे चिरंजीव परशराम बाबा या तिघांना एका रथांत घालून त्यांच्या मागोमाग, माईसाहेब, राणीसाहेब, (आईसाहेब) आणि परशुराम–बाबांच्या पत्नी एका गाडींतून चालविल्या व त्यांना थेट खडकीला नेणेंत आलें."

त्यानंतर लेफ्टनंट केर याचेमार्फत बोवासाहेब शिर्क्यांचा वाडा इंग्रजांनी मातीस मिळविला. मग 'काकासाहेबासंबंधी' चौकशी करण्यांत आली आणि राजद्रोहाचा गुन्हा त्यांच्यावर शाबित झाला असें धरून त्यांची सर्व मालमिळकत तर जप्त करण्यांत आलीच पण त्यांना जन्मठेपेची शिक्षाहि देण्यांत आली. म्हाताऱ्याला हा अपमान सहन झाला नाही. त्यांना साताऱ्यांतून हलविण्याची तयारी होते, न होते, तोंच त्यांचा सात्विक संतापाने एकाएकीं मृत्यु ओढावला. त्यांच्या पोटच्या प्रजेला उपासमारीशिवाय कांही उरलें नाही. विनायक कोंडदेव ओकांच्या लेखणीलाहि तें दृश्य वर्णवेना !

साताऱच्या राजघराण्याचें आणि त्यांच्या सहाय्यकांचें दुर्दैव एवढयानेहि संपलें नाही. विनायक कोंडदेव ओक आपल्या 'शिपायांचें बंड' या पुस्तकांत लिहितात की, प्रतापसिंहांच्या मागे साताऱच्या गादीवर नाममात्र बसविलेल्या त्यांच्या भावाच्या म्हणजेच आप्पासाहेब महाराजांचे दत्तक चिरंजीव व्यंकोजी महाराज, अर्थात काशीराजाचे चुलत बंधु त्यांची दत्तक आई वगैरे मंडळींनाहि मुंबईच्या वाटेला इंग्रजांनी लावलें. कारण होळकर आणि १८५४ मध्ये इंग्लंडहून निराशेने परत आलेले रंगो बापूजी यांच्या चिथावणीनें ईस्ट इंडिया कंपनीच्या विरुद्ध कट करण्यांत सामील असल्याबद्दल साताऱच्या राजघराण्याला व विशेषतः त्यांतील राण्यांना जबाबदार धरलें होतें. त्या सर्व मंडळींची रवानगी मुंबईजवळील खाटिक-बेटांत १८५७ च्या ऑगस्टांत केली. शाहू व दुर्गासिंग यांनी बंडांतील सामीलीची कबुलीहि दिली. सर्वांना अहमदनगरच्या किल्ल्यांत १८५८ च्या मार्च महिन्यांत हलविण्यांत आलें; तरी त्यांतूनहि प्रतापसिंहपुत्र शाहूला उचलून कराची येथे स्थानबद्ध करण्यांत आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या लोकांनी रंगो बापूजीसाठी जीव पाखडला. पांचशे रुपयांचें बक्षीसहि पकडून देणारास लावलें. पण शेवटपर्यंत तो महाभाग इंग्रजांच्या हाती लागला नाही. तेव्हा त्याचा मुलगा सीताराम आणि त्याचे दुसरे सोळा साथीदार यांच्या मागे कंपनी हात धुवूनच लागली, म्हटलें तरी चालेल.

## रंगो बापूजी भूमिगत

ऑगस्ट ता. २७ च्या सुमारास कंपनी सरकारच्या संशोधनांत असें आढळून आलें की रंगो बापूजींचा कट रंगारूपाला आणण्यांत चांगल्या ऐंशी माणसांचे हात गुंतले असून त्यांतील चौतीस माणसे मातबर होती. ऑगस्टच्या मध्यास या चौतिसांपैकी सतरा कंपनीच्या हातीं लागली; पण कटाचा पुढारी रंगो बापूजी हा आपले सोळा साथी दौलतराव पवार, केशवराव किबे, गंगाराम भोसले, रावजी सोनार पावसकर, काळू कुणबी वगैरेसह जो तारीख ५ जुलई १८५७ पासून

इंग्रजांच्या नजरेपार झाला, तो असा की तेल घालून पहाणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीच्या डोळ्याला ह्यांपैकी एकहि आढळला नाही. मानसिंगाची दैवरेषा कशी उमटली याची कल्पना आल्याबरोबरच बाकी कटाचा सुगावा लागू नये या धोरणाने ही मंडळी भूमिगत झाली ती झालीच. तरीहि पांच एक कटवाल्यांच्या तलवारी इंग्रजांच्या हातीं लागल्या. आप्पा ऐतवडेकरांच्या सातशे अठ्ठयाणव चेंडू-गोळ्या त्यांना सांपडल्या, पंधरा माफीचे साक्षीदार आणि त्यांचे कबुलीजबाब त्यांना मिळाले. त्या पुराव्यावरून २७.ऑगस्ट १८५७ पासून ७ सप्टेंबर १८५७ पर्यंत चार्लस् फोर्बस् हा कार्याध्यक्ष आणि कर्नल जी. मालकम व कॅप्टन जे. रोज हे सभासद असलेल्या तिघांच्या लष्करी न्यायासनापुढे १८५७ च्या १४ व्या रेग्युलेशनखालील ७ व्या कलमाप्रमाणे खटला चालला. निकालाच्या दुसरेच दिवशी म्हणजे ता. ८ सप्टेंबर १८५७ रोजी (१) नारायण (नाना) बापू पावसकर ( सोनार ) (२) केशव नीळकंठ चित्रे (३) शिवराम मोरेश्वर बहुश्रुत ( कुलकर्णी ) (४) विठ्ठल कोंडी ( तात्या ) व (५) सीताराम रंगो गुप्ते या पांचजणांस मरेपर्यंत गळफांस लावून फांशी देण्यांत आले. मुनाजी ऊर्फ बापू (नारायण)बाबर ऊर्फ भांदिर्गे (२) सखाराम बळवंत शेटचे (३) बाब्या नाथ्या गायकवाड (मांग) (४) येशा नाथ्या गायकवाड (मांग) (५) गणेश सखाराम कारखानीस (६) नाना उमाजी रामोशी या सहाजणांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आले आणि (१)रामजी बापूजी ऊर्फ रामसिंग चव्हाण (२)बाब्या हणगू (कानगू) शिरतोडे ( रामोशी ) (३ ) नाम्या नाईक रामोशी (४) शिवाजी सोमाजी पोटाळे (५)पर्वती विठोजी (गणेश)पोटाळे(६)पाटलू येसू या सहाजणांस गोळ्या घालून ठार करण्यांत आले. कारण त्या सर्वांवर राजद्रोहाचा आरोप सिद्ध झाला होता. त्या सर्व अपराध्यांची खाजगी मालमत्ता जप्त करण्यांत आली व सर्वांचीं पाळेंमुळें खणण्यांत कमीपणा मानण्यांत आला नाही. कारण न्यायमंदिराच्या निकालपत्रांतच म्हटल्याचें प्रसिद्ध आहे की 'कठोर शिक्षेचे उदाहरण आरंभीच घालून देणें ही परिणामतः मोठ्यांत मोठी दया ठरते आणि गुन्हा घडल्याबरोबर ताबडतोब शिक्षा देण्याने इतर लोकांस इशारा म्हणून ती शिक्षा चांगलीच चमकावते.'

न्यायमंदिरापुढे आलेल्या पुराव्यावरून असे सिद्ध मानण्यांत आले की आपले चिरंजीव सीताराम, मेहुणे केशव नीलकंठ चित्रे आणि गणेश सखाराम कारखानीस यांच्या मदतीने प्रथम ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार लुळा-आंधळा करून टाका-वयाचा आणि कंपनीच्या जागी प्रतापसिंहाचा दत्तक मुलगा शाहू याला गादीवर बसवावयाचा, असा कट रंगो बापूजी गुप्ते यांनी रचला व तो पार पाडण्याची तारीख त्याने कानपुरास ज्या दिवशी नानासाहेब पेशवा भारतीय उठावांत सामील झाला, ती १२ जूनच धरली होती. कटाची पहिल्यापासून माहिती नाझर कोर्टांतील कारकून सखाराम दाजी काबाडे, जकातवाडीचा सोनार, हरी राघोजी देवरूख, भोर संस्थानांतील पाराहूरचा बाळकृष्ण वामन प्रधान, कुशाबा ऊर्फ कृष्णाजी दाजी प्रधान, आत्माराम ऊर्फ आप्पा बाबा भट ऐतवडेकर कुलकर्णी, काशीळचा गोपाळ रामचंद्र शेणवी, अरळें येथील अंताजी कारी क्षीरसागर, शिंदखेडचा मार्तंड भगवंत

( पण दत्तक म्हणून मार्तंड पांडुरंग ) दिघे, ल्हासुर्णाचा गणेश अनन्त गुभणे, ( वाळवे ) बोरगांवचा हैबती ऊर्फ हैबी वल्लद सकू, सातारचा वेंकू बाळशास्त्री नांदेकर, बोरगांवचा बळवंत नारोजी जाणकर, भोर संस्थानांतील धावडीचा बाळाजी हरी राऊत, गोडेखानगांवचा पीरखान वल्लद चांदखान शेख, तासगांव तालुक्यांतील चोरेगांवचा राघो व्यंकटेश बहुश्रुत कुलकर्णी, सातारचा सुपारी व्यापारी बाळाजी बापूजी यादव आणि मानसिंगाची बायको गंगा परदेशी, हीं सर्व मंडळी थोडीफार या कटांत मिसळलींच होतीं व त्यांचा हातहि त्यांत होता. पण एका परमेश्वराला आणि ईस्ट इंडिया कंपनीलाच ठाऊक असलेल्या कारणांसाठी त्यांना माफीने साक्षीदार करण्यांत आलें. त्यांनी चव्हाटचावर मांडलें की, भोर-पासून बेळगांवपर्यंतच्या पट्टचांत आपल्या कटासाठी मांग, रामोशी, कोळी या लोकांतून रंगो बापूजी रंगरूटभरती करीत होते. या वर्षी हिंदुस्थानभर बंड होणार असें भाकित अरळचाच्या नागाई देवीने केल्याचें पिकविण्यांत आलें. तथापि, खरसुंडीच्या देवीने तसाच कौल न दिल्याने लोकांचा पहिल्या पिकवलेल्या बात-मीवर बसावा तसा विश्वास बसला नाही. प्रचार म्हणून असेंहि सांगण्यांत येत होतें की सातारच्या गादीवर ईस्ट इंडिया कंपनीने केलेला अन्याय मुंबईच्या गव्हर्नर-साहेबांना पटला असून त्यानेच रंगो बापूजीला बंड उभारण्यास सांगितलें आहे व बंड उभें राहतांच तो शरण येणार आहे. तथापि बंडांत सामील झालेल्यांनी या प्रचाराला कांहीच मोजलें नव्हतें. सातारच्या गादीसंबंधी निष्ठा आणि स्वराज्यांत मिळणारी मानाची चाकरी, या दोनच प्रेरणा त्यांना होत्या, त्यामुळेच रंगो बापूजींशीं त्यांनी सामिली केली. बावीसाव्या फलटणीला मतवून टाकण्याची खात्री मानसिंगाला वाटत होती आणि बंडखोरांनी हल्ला केला म्हणजे एकहि स्वार फेरहल्ला करणार नाही, अशी दक्षता घेण्याचें दफ्तरदार कारखानीसांनी वचन दिलें होतें. सातारा गादीवरील आपल्या निष्ठेमुळेच कुंडलच्या नाना रामोश्यां-सारख्या गृहस्थांनी काशीराजाची संमति बंडाला असल्याची हमी मागितली होती. विठ्ठल कोंडी यांच्यामार्फत ती खात्री पटविण्यांत आली. या लोकांना हें पटलें की, काशीराजाने धोरण म्हणून जरी 'आळीमिळी गोमचिळी' केली असली तरी काकासाहेब म्हणजे सेनापतींचे चुलते यांची त्यांना हमी होती. त्यांनीच बंड उचलून धरलें होतें. तें लोकांस पुरेसें होतें. शिवराम मोरेश्वर बहुश्रुत कुलकर्णी हा कटाची चालती बोलती देवता असून रंगो बापूजींचे चिरंजीव सीताराम यांच्याकडे सर्व-साधारण देखरेख नि व्यवस्था होती. भरती झालेल्या रंगरूटांना उत्साह व उत्तेजन देण्याचें कामहि तो करी. रंगो बापूजी, सीताराम आणि कटाचा पहिल्यापासूनचा माहितगार सखाराम काबाडे यांच्यामध्ये परस्परांची खबर कळविण्यासाठी जोडदुवे सांभाळण्यांत आले होते. कऱ्हाडचा दौलता हरी पवार कोल्हापूरच्या चिमासाहेबांशीं प्रत्यक्ष संबंध राखणारा सातारचा अण्णा फडणीस, केशवराव किळसे आणि मल्या व सत्यासारखे रामोशीसुद्धा धरून कटांत जीं जीं मातबर माणसें सामील झालीं होतीं तीं तीं आपापल्या कार्यक्षेत्रांत वजनदार असल्याकारणाने रंगो बापूजींच्या बंडाला यश यावें म्हणून नखीं, बोटीं शिणून काम करीत होतीं. आप्पा ऐतवडे-कराने आपल्या शास्त्रीय अकलेने स्फोटक गोळे तयार केले, नारायण पावसकर

आणि त्याचे नातेवाईक यांनी हल्ले व अत्याचार करण्यांत पटाईत असलेल्या रामोशी मांगांच्या ओळखी पाडून रंगरूट जोडले. या सर्वांच्या प्रयत्नाला प्रेरक अशी सांखळी म्हणजे साताऱ्च्या गादीबद्दल निःस्वार्थीपणाने व जिवावर उदार होऊन करीत असलेले रंगो बापूजीचे प्रयत्न. रंगो बापूजींचे चिरंजीव ता. २० जून १८५७ ला बोरगांव ( वाळवे ) हून कृष्णेतून कोल्हापूरकडे जात असतां पकडले गेले. पण आपल्याला पकडेपर्यंत आपण बंडांत हिरिरीने भाग घेतला, हें सीतारामाने उघड उघड अभिमानाने सांगण्यास कमी केलें नाही.

## सरकारी नोकर सामील

वरील शिवाय या बंडासंबंधांत ज्ञानोदय ता. १९ नोव्हेंबर १८५८ वरून अशी माहिती मिळते की, साताऱच्या राजांच्या सेनापतींना ता. १५ मार्च १८५८ स पकडण्यांत आलें. त्यांच्या घराची झडती घेतली असतां तेथे नानासाहेब पेशव्यांकडून आलेलें एक पत्र मिळालें. सेनापतींनीं सातारा व पुणें येथील सर्व युरोपियनांस एकाच वेळी यमसदनाला पाठविण्याबद्दल दिग्दर्शन केलें असून शक्य तेवढ्या लवकर आपण नर्मदा उतरून येत आहों व पेशवाईचीं वस्त्रेंहि घेत आहों, असेंहि वचन नानासाहेबाने दिलें होतें. तें पत्र सांपडल्यावर साताऱच्या अनेक मातबर मंडळींच्या वांटणीला कैद आली. ज्ञानोदयाच्या १५ मार्च १८५८ च्या अंकांत या सगळ्या प्रकारची नोंद आढळेल. ती अभ्यासूंनी जरूर पहावी अशीच आहे. वर सांगितल्या-प्रमाणे ज्या मातबर मंडळींचे वांटणीला कैद आली त्यांत अंबाजी राजे ऊर्फ बोवासाहेब शिर्के, हैबतराव महाडीक ऊर्फ आप्पासाहेब तोफखाने, पुतळाजी बिन बावुराव सावंत, विठू बिन हणगू भोसले, विठू बिन सयाजी कुमकर, गणू बिन खंडू भोसले, विठू बिन बहिरू न्हावी, आबा बिन बापू कदम, नारोजी बिन लिंगोजी नाईक कासकर, खेळोजी बिन लिंगोजी नाईक कासकर, राघू बिन माना भोसले नारायण विश्वनाथ शेवडे, गोपाळ बिन शिवराम जोशी, अवघडबुवा (पाल) आणि केशव विनायक किवे अशीं बडी मंडळीं होतीं. त्यांचा खटला १५ मार्च १८५८ पासून चालला आणि २४ मार्चला संपला. ता. ५ एप्रिल १८५८ चा ज्ञानप्रकाश सांगतो की ' जानेवारी १८५६ पासून ता. ११ जून १८५७ पर्यंत या सर्व मंडळींनी असा कट रचत आणला होता की साताऱच्या सर्व युरोपियनाला ठार करावें, इंग्रजी राज्याची हकालपट्टी करावी, व प्रतापसिंहांचा दत्तक मुलगा शाहू याला साताऱच्या गादीवर बसवावें. हें आपलें ध्येय साध्य होण्यासाठीं हैदराबाद कोल्हापूर, गोमान्तक आणि सातारा जिल्ह्याचे रहिवाशी यांची मदत मिळविण्याची त्यांनी खटपट केली. आरोपीपैकी पहिला म्हणजे अंबाजी राजे शिर्के हा सरकारचा उच्च दर्जाचा नोकर असूनहि त्याने हें हलकट काम करण्यांत कमीपणा मानला नाही म्हणून त्याला देहान्ताची शिक्षा सांगण्यांत आली असून बाकीच्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यांत आली आहे. सगळ्यांच्या मिळकती जप्त करण्यांत आल्या. हैबतराव महाडीकापासून गोपाळराव जोशापर्यंत सर्व आरोपी ताबडतोब गुरुवारींच साताऱ्यांतून बाहेर काढण्यांत आले. ' बोवासाहेब शिर्के यांची शिक्षा साताऱ्यांतच अमलांत आली. ८ सप्टेंबर १८५७ चा नमुना याहि वेळी झाला.

## सातारच्या राजघराण्याचा वंशवेल

- मालोजीराव भोसले
  - शहाजीराजे
    - संभाजी
    - छत्रपती शिवाजी महाराज
      - संभाजी
        - शाहूमहाराज ( १ ले )
          - रामराजे ( कोल्हापूरच्या वेडया शिवाजीचे दत्तक घेतले ते )
            - शाहूमहाराज ( दुसरे ) धाकटे ऊर्फ आबासाहेब महाराज ( वावीच्या त्र्यंबकजी भोसल्यांचे दत्तक घेतले ते )
              - प्रतापसिंह ( १८३९ त पदच्युत )
                - शाहू ऊर्फ जंगलीमहाराज ऊर्फ काशीराजा ( १८५७ चे उठावांत )
              - राजाराम
              - शहाजी ऊर्फ आप्पासाहेब
                - व्यंकोजी
      - राजाराम

[ १२ ]

# कोल्हापूर–नागपूर–छत्रपतींकडील उठाव

## सर्व जातीमध्ये उठाव

खुद्द सातार्‍यांतील बंडाच्या उठावणीला कुरूप आलें, म्हणून दुसरीकडे जनता स्वस्थ होती असें नव्हें. मानसिंग परदेशी सातार्‍यास तोफेच्या तोंडीं गेल्यापासून एक महिन्यानें आणि सिताराम रंगो गुप्ते प्रभृतीवरील खटला सुरूं होण्याचे अगोदर सुमारे दीड महिना म्हणजे ता. १३ जुलै १८५७ रोजी पंढरपूर येथील ठाणें, खजिना आणि मामलेदार यांच्यावर हल्ला चढविण्यांत आला. हा हल्ला करणारांत कन्हय्यालाल जगन्नाथ मिश्र, कनोजी पंड्या; किसनलाल जगन्नाथ मिश्र असे दोन निजामहद्दींतील २८ व २६ वर्षांचे भाऊ भाऊ होते; उमराव परदेशी हा वीस वर्षांचा रजपूत होता; सीताराम-प्रसाद सुकुल हा २१ वर्षांचा कायस्थ ब्राह्मण व पिरा अप्पा पवार हा २० वर्षांचा मराठा असे सोलापूरचे उमदे तरुण होते; किसन संतुराम हा १६ वर्षाचा चिमुरडा अहमदनगरचा कायस्थ ब्राह्मण होता; कन्हैय्या वेळूजी व धर्मा सुभाना असे ऐन तिशींतले सातारचे दोन मांग होते; गणू बापू चव्हाण हा पंचविशींतील रामोशी आणि येडलू पाटलू बागल हा २८ वर्षांचा मराठा, असे दोन खुद्द पंढरपूरकरच होते. त्यांनी कैद्यांना सोडविण्याचाहि घाट घातला होता. त्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे मामलेदार नागेश राघवेन्द्र आणि त्यांचे दोन शिपाई शेख कासीम व शेख हुसेन हे कामास आले. येशा नांवाच्या एका इसमाला जखम झाली पण बारा दिवसांनी म्हणजे २५ जुलै १८५७ ला मरण पावला. विठोबा या महाराष्ट्राच्या दैवताचे क्षेत्रांत हा हल्ला झाला, त्याचा खटला सातार्‍यास चालला. पंढरपूर त्यावेळी सातारा जिल्ह्यांत होतें. गिरजाप्पा त्रिपण्णा वाणी या गृहस्थाने पुरावा केला; त्या तीस वर्षांच्या तरुणाला कांही पैसे देऊन कन्हय्यालालने विठ्ठल कृष्ण, बापू बाळूजी यांच्या विरुद्ध बालंट उभें केलें. पण उपयोग झाला नाही. ता. ३० जुलै पासून ३ ऑगस्टपर्यंत खटला चालला आणि ता. ४ ऑगस्ट रोजी मिश्रबंधूंना तोफेच्या तोंडीं देण्यांत येऊन बाकीच्यांना जन्मठेपेवर पाठविले. सदर शिक्षा योग्य अशाच झाल्याचा अभिप्राय ता. १० ऑगस्ट १८५७ च्या ज्ञानप्रकाशने व्यक्त केला असून ता. २४ सप्टेंबर १८५७ चा ज्ञानप्रकाश सांगतो की 'मामलेदारसाहेबांच्या पत्नीला सरकारने दरमहा तीस रुपयांचें पेन्शन सुरूं केलें असून मेलेल्या शिपायांच्या पत्न्यांला प्रत्येकी दोन रुपये पेन्शन दिलें आहे. ज्यांनी आरोपींना पकडून दिले त्या प्रत्येकाला शंभर रुपये बक्षीस कंपनी सरकारने दिलें.'

सातारा जिल्ह्यांतील या दोन उठावांची अशी वाट लागली तरी सातारचे लोक दबले नव्हते. १८५९ च्या एप्रिल अखेरीपर्यंत एका वा दुसर्‍या सातारकराचा इंग्रजांविरुद्ध उठाव झाल्याचा बोभाट होतच होता. स्वतःला सातारचा राजा

म्हणविणारा एक इसम कॅप्टन मरे याने दक्षिण हैद्राबादेस एप्रील १८५९ मध्येच पकडला होता. त्याच्या हातीं आणखी एक इसम लागला होता. या दुसऱ्या इसमाजवळ तर कर्नाटकांतील सूरपूरच्या बेंदरेना द्यावयाची कांही मोहोरबंद पत्रें आढळलीं. त्या पत्रांत इंग्रजाविरुद्ध उठाव करण्यास प्रोत्साहन देणारें एक सहीशिक्याचें आज्ञापत्रहि होतें. ता. १० एप्रिलेस एक ब्राम्हण गिरफदार करण्यांत आला, त्याच्याजवळ नानासाहेब पेशव्यांचे जाहीरनामे आणि भित्तिपत्रकें सांपडलीं. कॅप्टन बुलॉक याने त्या ब्राह्मणाचें खटलें चालविलें व त्याला देहांताची शिक्षा दिली. हैद्राबादेस असे झगझगीत उदाहरण व्हावयासच हवें असें आपलें मत ता. २३ एप्रिल १८५९ च्या इंग्लिशमन पत्राने दिलें असून त्याचबरोबर अशीहि बातमी दिली आहे कीं "हैद्राबाद रेसिडेंट हा ता. १५ डिसेंबर १८५७ पासून चौकशी चालवितो आहे की नारायण विठ्ठल भुणकर ऊर्फ नानाबुवा ही काय चीज आहे? या नानाबुवाचें वास्तव्य पैठणला असल्याचें बोलण्यांत आहे. त्याला पकडल्यावर सातारकडे पाठविण्याचे हुकूमहि दिले आहेत. हा यशवंतरावचा वकील दिसतो. राजांचें शिक्कामोर्तब त्याच्याजवळच होतें. प्रत्येकी वीस रुपये पगारावर अनेकानेक रंगरूट मिळवावेत, असें यशवंतरावाने या नानाबुवास लिहिलेलें दिसतें. अशा रंगरूटाकडून इंग्रजांना येथून घालवावयाचें आहे. पैठणांत असलेला सातारचा राजा गोसावी आहे."

सगळ्या हिंदुस्थानांत असलेल्या एकशेवीस भोसले घराण्यांपैकी सर्व स्वतःस राजे म्हणवून घेत असले तरी सातारचें व कोल्हापूरचें, अशीं दोनच घराणीं स्वतःला छत्रपती म्हणून घेत. त्यांपैकी वडील घराणें सातारचें. त्याने व त्याच्या अभिमान्यांनी सत्तावनच्या इंग्रजांविरुद्ध झालेल्या सार्वत्रिक उठावांत घेतलेल्या भागाचें व त्याच्या पर्यवसानाचें वर्णन 'चीत झालें तरी चेतना गेली नाही' या शब्दांनी केलेलें आढळतें. आतां साहजिकच आपलें लक्ष छत्रपतींच्या दुसऱ्या घराण्याकडे म्हणजे कोल्हापुराकडे वळेल. त्यावेळी सातारचा पदभ्रष्ट सेनापती आणि तोफखाने यांच्यावर बंड उभारण्यासंबंधांत नानासाहेब पेशव्याशीं पत्र–व्यवहाराचा आरोप सिद्ध धरल्यावर बंडांत सामील झालेल्यांचीं त्यांनी जेव्हा नांवें सांगितलीं, तेव्हा लष्करी न्यायमंदिराने उद्गार काढले कीं 'हे सगळे गरीब गाईचे बाप दिसले, पण वाघिणीचे पिताजी निघाले' या गोष्टीची आठवण ताजी झाल्याशिवाय रहाणार नाही आणि 'मला तोफेच्या तोंडीं द्या' अशी विनंति सेनापतीने केली असतां, त्याला इंग्रजांनी टांगून फांशी दिलें हेंहि स्मृतींतून जाणार नाही. ता. १ नोव्हेंबर १८५८ चा ज्ञानोदय या प्रसंगाची तपशीलवार स्मृति जागवून राहिला आहे.

त्या स्मृतीनिशीं कोल्हापूरकडे नजर वळतांच आपल्या चटकन् ध्यानांत येते की, बेळगांव–धारवाडच्या रेजिमेंटस्प्रमाणेच कोल्हापूरच्या रेजिमेंटनेहि ता. ३१

जुलै ५७ रोजीच बंड करण्याचें ठरविलें होतें. तेथपासून १८५८ च्या मार्चपर्यंत कोल्हापूराने उठाव घेतला होता. कोल्हापूरच्या राजाचा भाऊ चिमासाहेब हाच या उठावाचा पुढारी होता. त्याला सहाय्यक म्हणून त्याचा दिवाण यशवंत अप्पाजी फडणीस, सातारचे व कोल्हापूरचे वतनदार बळवंतराव ऊर्फ बाळासाहेब नाईक निंबाळकर, सातारचा अण्णा फडणीस आणि रामसिंग परदेशी असे चिमासाहेबांचे हस्तक होते. कोल्हापूर हे अगोदरच दक्षिण महाराष्ट्राचा तापदायक भाग म्हणून इंग्रजांच्या डोक्यांत भरला होता. त्यामुळे इंग्रजांनी तेथे लष्करहि ठेवलें होतें व रेसिडेंटहि ठेवला होता. सत्तावनच्या उठावाची उत्तरेची बातमी हळूहळू दक्षिणेंतून झिरपत झिरपत कोल्हापुरास येऊन थडकत होती. नानासाहेब पेशव्यांनी ज्योतिराव ऊर्फ भाऊसाहेब घाटगे यांना कोल्हापुरीं चिमासाहेबांकडे लावून देऊन लखनौ येथील एक शियापंथीय अक्षरसंदेश असलेली चांदीच्या मुठीची तलवार नजर म्हणून पाठविली होती आणि उठावाला उठाव आणण्याची विनंति केली होती. उत्तरेंत बंडाने उठाव घेण्याचे अगोदरच ग्वाल्हेर सोडून बाळासाहेब नाईक निंबाळकर यांनी येऊन २७ वी नेटिव इन्फट्री थोडीफार फोडली होती. त्यांना मदत करावयास राजेसाहेबांचे विश्वासू दौलतराव मोहिते आणि हंबीरराव मोहिते हे २७ व्या फलटणींतील कांही अधिकाऱ्यांच्या गांठी घेऊन कांही गडबड चालवून बसले होतें. अण्णा फडणीस या खाजगी कारभाऱ्याचे सातारच्या राजांच्या मुनीमांशी संबंध असल्यामुळे त्यानेहि कोल्हापूरची सत्ताविसावी नेटिव फलटण हाताळून ठेवली होती. १८४४–४५ पासून इंग्रजांविरुद्ध उठाव करण्यास सरावलेल्या रामसिंगने आपल्या बापासह गडकरी मंडळीस उत्तेजन दिलें. या रामसिंगाचा सातारच्या सीताराम रंगो बापू गुप्ते याशीं पत्रव्यवहारहि होता. अशा सर्व सज्जतेच्या भरंवशावर ता. ३१ जुलै १८५७ रोजी २७ व्या बॉम्बे नेटिव इन्फन्ट्रीच्या दोनशे माणसांनी कोल्हापुरांत बंड उभारलें.

## खजिन्याची लूट

त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांच्या राहत्या–राबत्यावरच प्रथम हल्ला चढविला. लिहितां वाचतां येणारांना वरच्या जागा मिळाल्या पाहिजेत आणि रामजी शिरसाट याला हवालदारांच्या खालच्या जागेवर घातल्या कारणाने न्यायमंदिराकडून चौकशी व्हावयास हवी, असा मागणीचा लकडा त्यांनी लावला होता. हल्ला होतांच, त्यांचा कॅप्टन कर्नल पॉवेल आणि दुसरेहि कांही अधिकारी यांनी रेसिडे–न्सीकडे सुरक्षिततेसाठी पळ काढला ! तथापि तीन सैनिकी अधिकाऱ्यांना रेसिडेन्सी गांठतां आली नाही त्यानी सोलंकूर या खेड्यांत तोंड लपविलें. पण तेथील पाटील व कुलकर्णी बंडखोरांनाच मिळाले मग उठांववाल्यांनी कँपमधील सरकारी खजि–न्याची लूट केली आणि त्या सैनिकी तीन अधिकाऱ्यांस सोलंकूर गांवांतच

वनवाश्यासारखे हाल हाल करून मारले. त्यानंतर उठाव-वाले बळकट तट असलेल्या पागेंत घुसले. त्यांच्या पाठीमागे लेफ्टेनंट केर धांवत आला. त्याच्याशीं तटाचा आश्रय घेऊन उठाव–वाल्यांनी सामना दिला. ता. ३ ऑगस्ट १८५७ रोजी उठाववाले टेकीला आले तरी शरण गेले नाहीत. मग फंदफितुरीची मात्रा इंग्रजांनी उगाळली. तटांतील गुप्त दरवाजाचा माग त्या फितुरीमुळे त्यांना लागला. त्या गुप्त दरवाजाने इंग्रजांनी प्रवेश मिळवतांच सामना हातघाईवर आला. तरीहि शरणाई देण्यापेक्षा उठाववाल्यांनी मरणघाई स्वीकारली.

हें प्रकरण एवढ्यावरच थांबणारें नाही, हे कोल्हापूरच्या महाराजांनी ओळखले होते. कोल्हापूरचे लोकांचा बंगाली सैन्याशीं पत्रव्यवहार चालू होता. तेव्हा तारीख १५ ऑगस्ट १८५७ रोजी कोल्हापूर महाराजांनी पोलिटिकल सुपरिंटेंडेंटाची गांठ घेतली आणि इंग्रजी पायदळावर पुढे पाठीमागे हल्ला होणार असल्याची भीति बोलून दाखविली. विनायक कोंडदेव ओकांच्या ‘ शिपायांचें बंड ’ या पुस्तकांत त्यासंबंधी सुरेख माहिती आलेली आहे. ता. १० ऑगस्ट १८५७ चा ज्ञानप्रकाश तर महाराजांच्या त्या भीतीवर लख्खच प्रकाश पडतो. कारण, शुक्रवार ता. ४ ऑगस्ट १८५७ रोजी रात्रौ ९ चे सुमारास २७ व्या नेटिव फलटणीच्या आवारांत पुरभय्ये व मुसलमान अशी शंभर एक मंडळी नवखी आढळली. त्यांनी प्रथम भटारखान्यांत पाय ठेवला पण तेथे कोणीच युरोपियन अधिकारी नव्हता. पोलिटिकल सुपरिंटेंडेंटला हें कळतांच कर्नल महानसाहेब यांचेकडून कोल्हापूर–पायदळ, दक्षिण-मराठा-रेग्युलर-घोडदळ आणि रिसाल्यांतील रेड्–शर्टस् यांच्यामधील निवडक मंडळी उठाववाल्यांवर घालण्यांत आली. तोपर्यंत उठाववाल्यांनी कँपमधील कांही दुकानें लुटलीं होतीं, कोल्हापूर शहरांत प्रवेश मिळवला होता आणि आदितवार व मंगळवार या वेसांचा कबजा केला होता. त्या दोन्ही वेसा मात्र त्यांना फोडतां आल्या नव्हत्या. त्यामुळे शुक्रवारी रात्रींच ४०।५० माणसांना अटक झाली होती. शनिवारी सकाळीं तर कर्नल मॅन्, कॅप्टन स्नेटर, डॉक्टर ब्रेटन यांनी आपल्याबरोबर कोल्हापूर पायदळाची एक तुकडी घेऊन मंगळवार वेशींत प्रवेश केला. तेथे त्यांची व उठाववाल्यांची झडलीच. कोल्हापूर–पायदळाला रेटत रेटत उठाववाल्यांनी पद्माळ्याच्या पागेंत रेटलें. तेथे उठाववाले सुरक्षितच होते. बोळ अरुंद होता आणि उठाववाल्यांवर हल्ला करणें पायदळ तुकडीला शक्य नव्हतें. ५०–६० उठाववाल्यांना गिरफदार करण्यासाठी पायदळाच्या तुकडीला जीव धोक्यांत घालावयास सांगणें कर्नलसाहेबांनाहि बरें वाटलें नाही. म्हणून ते मग बावड्यास गेले. तथापि उठाववाल्यांनी दुकानदारांना त्रास देऊं नये असा बंदोबस्त करून गेले. उठाववालेहि मग कागलमार्गें बेळगांवकडे रवाना झाले.

आणि तरीहि या ना त्या प्रकारांने इंग्रजांच्या विरुद्ध कारवाया चालूच होत्या. तेव्हा ऑगस्टच्या शेवटी शेवटी कर्नल जेकब भरपूर सैन्यबळ घेऊन

कोल्हापुरास आला, आणि त्याने जो जो म्हणून संशयित वाटला, त्याचीं त्याचीं शस्त्रें काढून घेतलीं, हिसकावून घेतलीं. उठाव-वाल्यांना तर त्याने लष्करी कोर्टापुढेच खेंचले व गोळ्या घालून यमसदनाला पाठविलें. ही क्रिया चालू असता, गोळी घालण्यासाठी एका जखमी माणसाला आणण्याची पाळी आली. दुसऱ्या लोकांच्या खांद्यावरून ज्यावेळी त्याला वाहून नेऊं लागले, त्यावेळी त्याने त्याना तिरस्काराने बाजूला सारलें आणि आपल्या जखमांचें सर्व दुखणें बाजूला ठेवून स्वारी आपल्या पायानी मरण-मोक्यावर जाऊं लागली. जवळच असलेल्या जेकबचें अंतःकरण त्यामुळे हललें. तो म्हणाला–" भल्या गृहस्था, तू केवढा शूर आहेस! तुझ्या दुर्दैवाची मला कींव येते ! पण तें तुझ्या राजद्रोहाचें फळ आहे. जीवावर उदार होऊन तूं भलत्या महत्त्वाकांक्षेच्या नादाला लागलास. त्या कामीं तुला कोणीं तरी भर दिली असली पाहिजे. जर तूं सत्य सांगशील, तर तुला क्षमा होईल, असें मी पाहीन. " या पांडित्याला तो शूर शिपाई नुसताच हंसला. तो एवढेंच उत्तरला की " साहेब जें काय मी केलें आहे, तें मी माझी जबाबदारी पूर्णपणे ओळखून केलें आहे. " उत्तराबरोबर त्याला अर्थातच गोळी बसली.

## कोल्हापूरचा कबजा

इंग्रजांच्या विरूद्ध उठावांत सामील झालेला एक सैनिकच अशा पीळाचा होता, असें नव्हे, तर मेजर ग्रॅहॅमने आपल्या १८५८ च्या रिपोर्टांत म्हल्याप्रमाणे कोल्हापूरची सर्व जनताच राष्ट्रीय भावनेने उद्दीपित झाली होती. इंग्रजांनी वाटेल तेवढा पैसा देऊं केला तरी परदेशांत लढाईला जावयास तर लोक तयार नव्हतेच; पण परकीय सत्तेखालीहि नोकर रहावयास तयार नव्हते. तेव्हा आपलें ईप्सित साध्य होणार अशा आत्मविश्वासाने कोल्हापूर महाराजांचा भाऊ चिमासाहेब याने सप्टेंबर १८५७ पासून आपलें नांव उठावाशीं जोडलें जाण्यांत कांही वावगें होते आहे, असें मानलें नाही. कोल्हापूरच्या आवतीं भोंवतींच्या खेडयांतून हळूहळू उठाव होऊं लागले आणि त्या सर्व मंडळींची एकजूट होऊन ता. ५ डिसेंबर १८५७ रोजी उठाववाल्यांनी कोल्हापूर शहरांतच प्रवेश केला. त्यांना २७ व्या नेटिव फलटणीचे लोक मिळाले. त्यांनी बाजार लुटला, हातीं आला तेवढा दारूगोळा लांबवला आणि पन्नास हजारांचा खजिना घेऊन गेले. २७ व्या नेटिव फलटणीला फितुर करण्याच्या आरोपावरून ता. १० आक्टोबर रोजी तीन माणसांना टांगून मारल्याचा दाखला ज्ञानोदयाच्या तारीख १ नोव्हेंबर १८५७ चे अंकांत मिळत असतांना दीडच महिन्यांत वरील घटना घडली हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कर्नल जेकब त्यांना तोंड द्यावयास खडाच होता. त्याला झुकांडी देऊन उठाववाल्यांनी सावंतवाडीकडील जंगलांचा आश्रय केला. फिरून ता. ६ डिसेंबर १८५७ चे सकाळीं पांच वाजतां उठाववाल्यांनी कोल्हापुरांत प्रवेश केला व सर्व वेशी बंद करून घेतल्या. सकाळीं ७ वाजतां कर्नल जेकबने सोमवारवेस फोडली आणि संध्याकाळपर्यंत त्याने सगळ्या

शहराचा कबजा केला. त्या एका दिवसांत ८ उठाववाले मारले गेले व ५० गिरफदार झाले. त्यांपैकी छत्तीस जणांची ताबडतोब चौकशी करण्यांत आली व राजवाड्यासमोरच त्यांना ताबडतोब फांशी देण्यांत आलें. त्याचवेळी दोन सरदारांनाहि गोळ्या घालण्यांत आल्या. हे दोन सरदार म्हणजे दिनकरराव गायकवाड आणि रावजी वाकनीस होत. त्यांच्या मिळकतीहि जप्त करण्यांत आल्या. यासंबंधांत ज्ञानोदयाच्या ता. १ जानेवारी १८५८ चें वर्णन व मेजर ग्रॅहॅम यांचा रिपोर्ट अभ्यासण्यासारखा आहे.

तेवढ्या एकाच दिवसाने जेकबच्या मागचा उद्योग संपला नाही. ता. १४ डिसेंबर १८५७ रोजी कर्नल जेकबने कोल्हापूरची शनिवार वेस फोडून शहरांत प्रवेश मिळवला. उठाव-वाल्यांनी मामलेदार कचेरींतील आणि कोतवाल चावडींतील सगळे कैदी मोकळे केले असल्याचें त्यास आढळून आलें. त्यांनी व उठाव-वाल्यांनी राजवाड्यालाहि वेढा घातल्याचें त्यास आढळलें. पण रात्री बारा वाजतां जेकबने सर्व बंड आटोक्यांत आणलें. उठाव-वाल्यांनी कोल्हापूरच्या महाराजावरहि हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. पण तो फसला. कारण तो 'चांगलाच वागला' असें जेकबचें मत आहे. कोतवाल चावडींतून कैदी सोडतांना दाजी देसाईला चांगलाच चोप मिळाल्याचें आढळलें. जेकबने त्या दोन सज्जनांच्या मदतीने पुष्कळसे उठाव–वाले पकडले आणि त्यांतील मुख्यमुख्य पुढाऱ्यांना फांशी देऊन बाकीच्यांस लहान मोठ्या मुदतीच्या शिक्षा ठोठावल्या. मेजर ग्रॅहॅम याने आपल्या १८५७ च्या रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणे वरील तऱ्हेने कोल्हापूर येथील सत्तावनचा उठाव पांच महिने गाजला. तथापि मार्च १८५८ पर्यंत त्यांच्या ताटकळ्या लोक देतच होते.

## चिमासाहेबांचा मृत्यु

कोल्हापूरच्या महाराजांचे धाकटे बंधु चिमासाहेब हेच या कोल्हापूरच्या बंडाचे पहिल्यापासून प्रमुख पुढारी होते. नानासाहेब पेशवे आदिकरून उत्तरेकडील उठाव-वाल्यांशीं आणि रंगो बापूजी सारख्या दक्षिणेंतील उठाव-वाल्यांशीं त्यांचें संगनमत असून दक्षिणेंतील उठाव-वाल्यांना त्यांनी हरतऱ्हेने मदत केली. ता. ५ व ६ डिसेंबर तारखांना कोल्हापुरास घडलेले प्रकार चिमासाहेबाशिवाय घडलेच नाहीत, याबद्दल इंग्रजांनी आपल्या मताशीं खात्री बाळगली होती. कारण ५ डिसेंबरला ज्यावेळी कॅप्टन स्नेडर मोठ्या शिताफीने राजवाड्यांत घुसला होता आणि त्याने राजवाड्याचा मधला चौक ताब्यांत घेतला होता, त्यावेळी तेथे एक छोटी बंदुक पडली होती आणि तिच्या शेजारीच एक मृत देह पडला होता. भोंवताली पुष्कळ लोक उभे, बसलेले होते अगर खिडक्यांखिडक्यांतून तें दृश्य पहात होतें. पण त्या सर्वांना सशस्त्र सैनिकांचें संरक्षण होतें. इंग्रजांची कड घेणाराची काय अवस्था होते, हें दृश्य दाखविण्याची ती करामत चिमासाहेबाशिवाय कोणाचीहि नाही, अशी खूणगांठ इंग्रजान पक्की बांधली होती. तेव्हा मार्च १८५७ मध्ये कोल्हापूरच्या

उठावाचा पुरेपुर बींमोड केल्यावर चिमासाहेबांना कराची येथे देशोधडीस लावून देण्यांत आलें, हें इंग्रजांच्या दृष्टीने सरळच होतें चिमासाहेबांनी इंग्रजांच्या कैदेंतच १८६९ साली कराचीस देह ठेवला ! ! !

कोल्हापूरच्या या उठावांत एकंदर त्रेपन्न उठाव-वाल्यांना फांशी जावें लागलें. त्याशिवाय चिमासाहेबांच्या सहाय्यकांस शिक्षा झाल्या त्या निराळचाच ! चिमासाहेबांचा दिवाण यशवंत अप्पाजी फडणीस याला जन्मठेपेची शिक्षा देऊन ठाण्याच्या तुरुंगांत ठेवले आणि चिमासाहेबांचा कट त्याने फोडावा म्हणून छळ करावयाची बाकी ठेवली नाही. पण, कांही झाले तरी निष्ठावंत दिवाणाने काडीचीहि दाद दिली नाही. कोल्हापूर गॅझीटीअर आणि मोडकक्रुत कोल्हापूरचा इतिहास याबाबत उद्‌बोधक आहेत. बाळासाहेब नाईक निंबाळकर यांना ग्वाल्हेर–हून ३० ऑगस्ट १८५७ रोजी व ज्योतिराव घाटग्यांना २९ सप्टेंबर १८५७ रोजी पुण्यांस पकडून कोल्हापूरास पाठविलें होतें. त्यांच्यावरहि कांही मात्रा चालली नाही. तेव्हा त्यांना आणि सातारकरांपैकी अण्णा फडणीस यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यांत आल्या.


सातारचे जंगली महाराज ऊर्फ बुवामहाराज ऊर्फ शाहू महाराज हे प्रत्यक्ष उठा-वाचीं सूत्रें १८५७ साली हलवीत नव्हते; पण हलविलीं जातील हें ते पहात होते व त्यांच्या मातोश्री अम्बिका राजेहि पहात होत्या. कोल्हापूरच्या छत्रपतींची तशी स्थिति नव्हती. तेथील शिवाजीराजे ऊर्फ बाबामहाराज तक्तनशीन असून " निष्पाप"च राहिले. पण त्यांचे बंधू चिमासाहेब ऊर्फ शंभूराजे यांनी इरीशिरी केली. छत्रपती भोसल्यांच्या या हालचालीबरोबरच नागपूरचे राजे भोसले यांचाहि भाग अभ्यास–कांच्या डोळचापुढे चटकन् उभा राहतो. या ना त्या कारणाचें निमित्त करून इंग्रजांच्या पारतंत्र्यांतून निसटूं पहाणारांचें तीर्थक्षेत्रच नागपूरचे राजे भोसले होते. १८१८ त पेशवाई इंग्रजांनी आपल्या पंजाखाली घेण्यापूर्वीच दोन वर्षे म्हणजे सन १८१६ मध्येच नागपूरच्या आप्पासाहेब राजे भोसल्यांनी इंग्रजांशीं दोस्तीचा तह केला होता. पण परिस्थिती इतक्या झपाटचाने बदलत चालली की वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षीं आणि ता. २५ नोव्हेंबर १८१७ लाच नागपूर येथे थाटाचा दरबार चालला असतां पेशव्यांच्याकडून सेनापतिपदाचीं वस्त्रें त्यांना आलीं होतीं. महाराष्ट्राच्या संघराज्याचा हा मान पेशव्यांनी ता. ५ नोव्हेंबर १८१७ रोजी पुण्यास इंग्रजांविरुद्ध मिळविलेल्या विजयानंतरचा होता. त्याचें मर्म व महत्त्व ब्रिटिश मुत्सद्यांनी बरोबर ओळखलें होतें. 'ब्रिटिशांशीं उघड युद्ध करणाऱ्या पेशव्यांकडून सेनापतिपदावर येणें म्हणजे ब्रिटिशांना युद्धाचें आव्हान देणेंच होय' असें दरबारचें आमंत्रण नागपूरचे रेसिडेंट जन्किन्स यांना द्यावयास गेलेल्या अप्पासाहेब भोसल्यांच्या मंत्र्यांना म्हणजे रामचंद्रपंत वाघांना साहेबाने दिलें होतें आणि ता. २६ नोव्हेंबर रोजीच सायंकाळी भोसल्यांच्या अरब सैनिकांनी ब्रिटिश

रेसिडेन्सीवर हल्ला चढविला होता. त्यांत सीताबर्डीच्या एका टेकडीवरून ब्रिटिशांना पळ काढावा लागला. पण पुढे सीताबर्डीची लढाई ही खडकीच्या लढाईची आवृत्ति ठरली. मग अप्पासाहेबांनी इंग्रजांशीं सहजच समेट केला होता. पण मनींची रुखरुख गेली नव्हती. म्हणून ते उठावाची हालचाल गुपचूपपणे करीतच होते. तेव्हा त्यांना व त्यांच्या दोन मंत्र्यांना ता. ३ मे १८१८ रोजी कैद करून अलाहाबादेकडे नेले होते. तेथून अप्पासाहेब भोसले ता. १२ मे रोजी शिपायाच्या गुप्त वेषाने इंग्रजांच्या तावडींतून सुटले. हा डाव इंग्रजांविरुद्ध अप्पासाहेबांच्या पत्नी उमाबाई यांनीच रचून पार पाडला होता. अप्पासाहेबांनी नंतर वीस हजार सैनिक जमविले. पंचमढीच्या गोंडापासून रणजितसिंगापर्यंत सहाय्यक घेऊनहि असीरगडांतून त्यांना इंग्रजांविरुद्ध जय मिळाला नाही. तेव्हा ते जोधपूरकरांच्या आश्रयाने १५ जुलै १८४० पर्यंत इहलोकीं होते. याच साली साताराची गादी इंग्रजांनी आपल्या हातचा रुमाल करून टाकली होती. त्यायोगें नागपूरचा नक्षा उतरण्याचा चंग बांधल्याशिवाय इंग्रजांना राहवलें नाही. १८५३ मध्येच म्हणजे साताराची गादी १८४९ मध्ये कायमची नेस्तनाबूद केल्यावर चारच वर्षांनी इंग्रजांनी नागपूर खालसा केलें. तरी पण १८५७ त लोक व लष्कर यांचें नागपुरांत संगनमत झालेंच. १३ जून १८५७ रोजी मोती बागेंतून ‘आगीचें विमान’ आकाशांत सोडून रेसिडेन्सीवर ते हल्ला करणारच होते. पण भोसले घराण्यांतील राणी बाकाबाई हिला ‘राजनिष्ठा’ आठवली आणि इंग्रजांचें काम साधलें !

मंडला जिल्ह्यांतील रायगडचा राजा लछमनसिंग १८५० त वारला. त्याचा एकुलता एक मुलगा विक्रमजित वेडसर होता. इंग्रजांनी राज्य खालसा केलें. राणीने इंग्रजांचा तहशीलदार उडवून लावून कारभार हातीं घेतला व आजूबाजूचे ठाकूर नि मालगुजार गोळा केले. रायगडचा बंदोबस्त वाढविला. ता. १ एप्रिल १८५८ रोजी ब्रिटिश फलटणीनी मंडल्याहून स्वारी केली. राणी लढली. जंगलाचा आश्रय करूनहि लढली. अखेर शत्रूच्या हातीं लागणार असा संभव दिसतांच एका सैनिकाची तलवार आपल्या हृदयांत खुपसून घेऊन ब्रिटिशांना तिने आपलें प्रेतच पहावयास ठेवलें !

स्त्रीच्या पराक्रमांनी पुरुषार्थाला कसें लाजवावें ? बनपूरच्या राजान ललितपूरचा ताबा घेतला. सागर येथील लष्कर बंड करून उठलें. दोन महिनेपर्यंत सागर ते नर्मदा हा प्रदेश उठाववाल्यांच्या भुवईसरसा हालत होता. चांदा येथील बापूराव व व्यंकटराव यांनी ब्रिटिशांचा उच्छाद मांडला. पण पुढे जबलपूरचा राजा शंकर शहा व त्याचे दोन मुलगे इंग्रजांच्या हातीं लागले ! बापाला फांशी झाली व चिरंजीवांना तोफेच्या तोंडीं जावें लागलें !! तसें सर्वत्र सामसूम झालें ! कारण झांशीच्या राणीचें नांव धारण करणाऱ्या एका जमीनदारणीनेच फितुरी करून तसा दिवा लावला होता !!

## कोल्हापूरच्या घराण्याचा वंशवेल





मराठ्यांच्या इतिहासांतील शेवटचा मुत्सद्दी
**रंगो बापुजी गुप्ते** ( रोहिडखोरेकर )
अठराशे सत्तावनच्या उठावांत इंग्रजांविरुद्ध आग उसळवून
५ जुलै १८५७ रोजीं भूमिगत झाले.

[ १३ ]

# जमखिंडी प्रकरण!

## जमखिंडींतील कारवाई

छत्रपती राजे भोसले घराण्यांतील मंडळींनी दक्षिणेंत प्रत्यक्ष केलेला उठाव अशा तऱ्हेने मार्गी लागला. पेशवे घराण्यांतील नानासाहेब पेशव्यांनी जसें उत्तरेंत युद्धपर्व आरंभून अखिल भारताचें पुढारीपण घेतलें, तसें दक्षिणेंत दिसत नाही. दक्षिणेंत पेशवे घराण्याने कांही केलेंच नाही, असें नाही. नानासाहेब पेशव्यांचें जनक घराणें ठाणें जिल्ह्यांतील वेण गांवचें. त्यांतील राघो विश्वनाथाने लोकांना चेतावणी देण्याचा उद्योग केला. त्याला अर्थांतच ठाण्याच्या तुरुंगाची हवा पहावी लागली. त्याशिवाय नानासाहेब पेशव्यांचा एक चुलत भाऊ माधवराव राजाराम म्हणून होता. त्याचा जन्मच ब्रह्मावर्ताला झाला होता. नानांचे जनक वडील महादेव भट. त्यांचे सख्खे बंधु राजाराम भट. ते दुसऱ्या बाजीरावांच्या आश्रयास ब्रह्मावर्ती झालेला तो माधवराव, तांब्यांच्या मनू ( जी पुढे झाशीची लक्ष्मी म्हणून प्रसिद्धी पावली ) प्रमाणेंच, नानासाहेब पेशव्यांचे देखरेखीखाली हत्यारें पाजळावयास, चालवावयास आणि परिणामकारकरीत्या हाताळावयास शिकला होता. त्याला दुसऱ्या बाजीरावसाहेबांनी दत्तकहि घेऊन टाकलें होतें. नानासाहेब पेशव्यांनी वर उत्तर हिंदुस्थानांत इंग्रजांविरुद्ध डोंब उभा करतांच, माधवरावालाहि राहवेना. त्याने दक्षिणेंत हैद्राबादच्या सरहद्दीवर गडबड करावयास प्रारंभ केला. सेनापती नेमले; अनेकानेक युरोपियनांची मातबर नांवें जाहीर करून त्यांना यमसदनाला पाठविणारांना बक्षीसें जाहीर केलीं. ता. १ मे १८६३ आणि त्यापूर्वीची कांही "ज्ञानोदय" या वृत्तपत्राची फाईल त्या माधवरावांच्या हालचालींबद्दल कितीतरी माहिती देते. माधवरावाच्या त्या प्रयत्नसातत्याचा परिणाम एवढाच झाला की, १८६३ मध्ये एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यांत सोलापूर येथे माधवरावाच्या मुसक्या बांधण्यांत येऊन त्याला लष्करी न्यायासनापुढे उभे करण्यांत आलें. न्यायासनाने त्याला देहान्त-प्रायःश्चित फर्मावलें. पण मुंबई हायकोर्टने त्या शिक्षेचें रूपांतर, हाल अपेष्टांनी पेशवे घराण्यांतील त्या पुरुषाला अद्दल घडावी म्हणून जन्मठेप काळे पाण्यांत केलें. पुण्यांत पेशव्यांचा जो 'बुधवारवाडा' होता, त्यांत रहाणाऱ्या युरोपियनांची कत्तल उडविणारांसहि बक्षीसें देण्याचे जाहीरनामे पुण्यांत १८५७ च्या सप्टेंबरांत लागले होते, नाही असें नाही. पण त्या जाहीरनाम्यांचा जनक इंग्रजांचे हातीं लागल्याचा मात्र कोठें दाखला नाही.

छत्रपती राजे-भोसले आणि भट पेशवे यांच्या घराण्यांतील मंडळींनी दक्षिणेंत इंग्रजांविरुद्ध असलेल्या सहाय्यक बंडाच्या या प्रयत्नांत भाग घेतला आणि

सातारच्या छत्रपतींच्या प्रभावळींतील भोरकर पंतसचीवांनी रंगो बापूजी आणि त्यांचे चिरंजीव सीताराम गुप्ते यांच्या उठावाला सांथ दिली; त्यापेक्षा पेशव्यांचे प्रभावळींतील जमखिंडीकर आप्पासाहेब पटवर्धनांनी अगदी उघड उघड निशाण उभारलें. पण स्वत:ला निशाणी करून घेतली नाही. नानासाहेब पेशव्यांनी उत्तरेंत उभारलेल्या बंडाची छोटी–मोठी कसलीच आवृत्ति दक्षिणेंत निघूं नये, निघूं लागलीच तर कळल्याबरोबर ती तावडतोब ठेचून काढावी आणि तिचा बभ्रा बिलकुल होऊं देऊं नये, असा कटाक्ष त्यावेळी इंग्रजांनी धरला असतांहि, जमखिंडीस 'इंग्रजांना नको असलेल्या गचाळ रेंद्यांत इंग्रजांशीं तहाने मांडलिकी पत्करलेल्या आप्पासाहेब पटवर्धनांनी आपले हात बरबटल्याचा संशय एक दिवस इंग्रजांस आलाच.' ईस्ट इंडिया कंपनीच्या दृष्टीने आप्पासाहेब जमखिंडीकरांची ती हालचाल राजद्रोहाची होती. १८५७ च्या ऑगस्ट महिन्यांतील गोष्ट. आप्पासाहेब पटवर्धन या जमखिंडीकर संस्थानिकांच्या नौकरींतील एक नौकर महिपालसिंग हा बेळगांवांत आढळला. एकोणिसाव्या फलटणींतील मंडळींशीं त्याचें कांही हितगुज चाललें होतें. आपल्या तरुण राजाच्या नांवाने तो त्या नेटिव फलटणींतील मातबर मनाच्या माणसांना ब्रिटिश सरकारची सत्ता झुगारून देण्याच्या कटांत ओढीत होता. इतकें ठरल्यावर महिपालसिंगाला वावरूं कोण देणार? त्याला हर प्रयत्नांनी पकडण्यांत आलें, न्यायालयांत खेचण्यांत आलें आणि शेवटी तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें. तोफेच्या तोंडीं जातांना महिपालसिंगाने कृष्णजन्माची आठवण करून दिली. देवकीच्या पोटीं आठवा 'गर्भ' येईल तो आपला नाश करणार म्हणून तो जन्मतांच यमसदनाला पाठवावयास कंस टपला होता. त्याला आढळली ती मुलगी. तिला शिळेवर आपटतांच, ती मरतां मरतां गरजली की 'कंसा तुझा काळ गोकुळांत आहे!' महिपालसिंगाने तसेंच केलें. तोफेच्या तोंडीं बसतांना त्याने स्पष्टच सांगितले की 'इंग्रजा, तुझा खरा शत्रू जमखिंडीला छोटूसिंग आहे.' हा छोटूसिंग जमखिंडीकडील शिपायांचा राजा होता. बंदुकीची दारू आणि लढाईची साधनसामुग्री निर्माण करण्याचा केवढा तरी व्याप छोटूसिंगाने उभारला होता. तो दारूगोळा किल्लेच्या किल्ले धाडधाड ढासळून पाडण्याजोगा होता. मग त्या छोटुसिंगाच्यासाठी धांवाधांव झाली. त्याला पकडण्यांत आलें. प्रथम त्याची रवानगी चौकशीसाठी रेसिडेंटाच्या बंगल्यावर आणि नंतर बेळगांव व धारवाड येथील तुरुंगाकडे झाली.

आतां चौकशी, चौकशी आणि चौकशी. याशिवाय जमखिंडीला दुसरें कांही आढळेनाच! जमखिंडीचा पोलिटिकल एजंट मॅन्सन् म्हणून होता. त्याची खात्री होऊन चुकली की जमखिंडीला चाललेल्या आंतल्या आवाजाला मुखवटा छोटुसिंगाचा असला तरी खरी मूर्ती अप्पासाहेब पटवर्धनांची आहे. या जमखिंडीच्या राजेसाहेबांचा खाजगीकडील एक नौकर आबा देवधर म्हणून होता. त्याला जमखिंडीस अटक करण्यांत आली. २२ मार्च १८५८ रोजी स्वतः अप्पासाहेब

जमखिंडीकर पटवर्धनांलाच कैदी म्हणून बेळगांवास रवाना करण्यांत आले. तेथे कांही दिवस काढल्यावर, तेथेहि जमखिंडीचे बंडखोर त्यांच्याशीं संगनमत करतात अशा संशयावरून, आप्पासाहेबांस वेंगुर्ला येथे हलविण्यांत आलें. याचवेळी पोलिटिकल एजंट मॅन्सन्च्या कपाळीं दुसरें एक तातडीचें कर्तव्य लागलें. नरगुंदच्या भावे संस्थानिकांनी केलेल्या गडबडीकडे त्याला लक्ष देणें भाग आलें. त्या कर्तव्यांत मग्न असतांना मॅन्सन्ला कंठस्नान घडलें, त्याचा कागदपत्रांचा रुमाल गळबटला आणि या सर्व गुंतागुंतीमुळे जमखिंडीच्या चौकशी-चौकशीला दिरंगाई जडत गेली. तरी ईस्ट इंडिया कंपनी पिच्छा पुरविल्याशिवाय कशी राहणार ! तिच्या पिच्छाला छोटूसिंग पुरून उरला. जमखिंडीला चाललेल्या साऱ्या मसलतीची जबाबदारी त्याने स्वतःच्या शिरावर घेतली. मग त्याला राजद्रोही ठरवून आक्टोबरमध्ये देहान्त प्रायःश्चित्ताला तयार करण्यास काय उशीर ? टिमकी वाजवून गांवोगांवचे लोक इंग्रजी सरकारने जमखिंडीजवळच्या मैदानांत गोळा केले आणि त्यांच्या देखत छोटुसिंगाला तोफेच्या तोंडीं देण्याचा विधि उरकण्यांत आला. बेळगांवपासून झांशीपर्यंत पुरूं शकेल एवढा दारूगोळा तयार करण्याच्या या खटाटोपांत छोटुसिंगाला आप्पासाहेब जमखिंडीकर पटवर्धनांचें कमालीचें सहाय्य असलें पाहिजे, असा दृढ, दाट आणि दांडगा संशय ईस्ट इंडिया कंपनीला होता; पण प्रयत्न कर करूनहि तसा पुरावा पुढे येईना ! त्यामुळे अप्पासाहेब पटवर्धनांला १८५९ च्या अगदी ता. ७ जानेवारीपर्यंत बंदीखान्यांत डांबून ठेवूनहि कंपनीसरकारला हात चोळीत चोळीत त्यांची त्या तारखेस सुटका करावी लागली. त्या दिवशीं व्हिक्टोरिया राणीच्या जाहिरनाम्याप्रमाणे अप्पासाहेब पटवर्धन बिनशर्त मुक्त झाले. पण, त्यांच्या ताब्यांतील सर्व किल्ले आणि बालेकिल्ले पटवर्धनांच्याच खर्चाने जमीनदोस्त करण्यांत आले, नवीन किल्ले उभारावयाचे नाहीत की नवीन बंदुका ओतावयाच्या नाहीत वा आणावयाच्या नाहीत अशी समज देण्यांत आली. जमखिंडीस असलेलीं शस्त्रास्त्रें आणि दारूगोळा जप्त करण्यांत आला. जमखिंडीकर अशा तऱ्हेने पुन्हा कैद्याचे ‘ राजे ’ झाले. तरी छोटुसिंगाची स्वामीनिष्ठा ते विसरले नाहीत. आपल्या पुणें येथील इस्टेटीचे बाग-व्यवस्थेंतून ते छोटुसिंगाच्या कुटुंबाला १८९५ पर्यंत महिन्याचे महिन्याला तनखा देत होते आणि पुण्यास मुक्काम असल्यावर छोटुसिंगाच्या कुटुंबियांना पंक्तीस घेतल्याशिवाय जेवत नव्हते.

छोटू आणि आप्पासाहेब यांची अशी वासलात लावतांना आबा देवधराचाहि कांटा कंपनीसरकारने काढण्यास कुचराई केली नव्हती. दक्षिण महाराष्ट्रांत त्याने प्रवेश करावयाचा नाही, या अटीवर त्याला हद्दपार करण्यांत आलें. तरी १८६१ मध्ये दक्षिण हैदराबादेहून आबाजी दामोदर या सहीने आपल्या आणखी दोन सवंगड्यासह इंग्रजाविरुद्ध बंड उभारण्याची भाषा जमखिंडीच्या राजांशीं आबा देवधर करीतच होता. तो पत्रव्यवहार हातीं लागल्यामुळे त्या मंडळीना ईस्ट इंडिया कंपनीने काळे पाणी दाखविलें. त्याची व जमखिंडीप्रकरणाची सुरस रम्य कथा कॅप्टन एडवर्ड डब्ल्यू वेस्ट यांच्या ‘ संस्थानांच्या आठवणी ’ (मेमॉयर्स ऑन् स्टेट्स)

या पुस्तकांत अगर सांगलीकरांकडील बिनीवाल्याचें डायरींतहि मिळण्यासारखी आहे. ज्ञानप्रकाशच्या ता. २ एप्रिल १८५९ चे अंकांत जमखिडीकरांना पुन्हा राज्याचे गादीवर सुपूर्त करतांना, त्यावेळचा पोलिटिकल एजंट लॉकेट याने केलेलें भाषण दिलें आहे. त्यावरून जमखिडी प्रकरणावर प्रकाश पडतो. तो असाः– ‘ गेलीं दोन वर्षें बंडासंबंधीं उत्साह, त्याला अनुसरून मोडतोड व अत्याचार यांचा जाहीर रीतीने एवढा अभिमान धरण्यांत आला होता की, त्यांना पराक्रम व शौर्य मानण्यांत येई ! ’ अशी सुरवात करून लॉकेट पुढे म्हणाला, “सरकारने हें जर चालूं दिलें असतें, तर देशाचा हा भाग विनाशाच्या कोणत्या खाईंत जाऊन पडला असता ! आणि बेळगांवच्या किल्ल्यांत कत्तलीचे आराखडे आंखले जात असतां आणि बेळगांवच्या कँपमध्ये तसलेच बेत चालले असतां, इंग्रजांचा जानी दोस्त बापूसाहेब शहापूरकर आणि बेळगांवचा फौजदार मुथुकुमार सर्व परिस्थिति आटोक्यांत आणण्यासाठी पुढे आले. देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत बंडखोरांच्या हालचालीवर नजर राखणारे गुप्त हेर पसरण्यांत आले आहेत. कंपनीसरकारच्या बाजूने अशी तयारी असली तरी बंडखोरांचीहि तशीच खंबीर तयारी आहे. त्यांतलेच कांही झोंड कोल्हापूर-बेळगांवपर्यंत आले आणि त्यांनी सरकारच्या सैन्याला फितूर करण्याचा घाट घातला. बेळगांवच्या एकोणतिसावे फलटणीमार्फत दंगा जमवा–वयाचा त्यांचा बेत होता; पण त्यांचा एक झोंड महिपालसिंग कंपनी सरकारच्या हातीं लागला आणि त्याला तोफेच्या तोंडीं जावे लागले. सूरपूरच्या राजानेहि बंडाचें निशाण उभारलें होतें पण कंपनीसरकारने त्याचें राज्य खालसा करून त्याच्या राजधानीची धुळधाण करून टाकली. या आणि अशा सर्व उठावांना जमखिडीहून येणारे निरोपे कारण होते. या निरोप्यांचा समावेश अप्पासाहेब जमखिडीकर पटवर्धनांच्या फौजेंत अगोदरच झाला होता. कोल्हापूर येथील सत्ताविसाव्या नेटिव फलटणींत बेदिली माजवून तिला बंडांत सामील करावयास गेलेला निरोप्या शंकर विन रामबकस जमखिडीच्या रेग्युलर बटॅलियनमधील नोकर होता. जमखिडीच्या त्या बटॅलियनचा मुख्य हुकूमशहा छोटूसिंग होता. त्याने शंकर बिन रामबकस याला कोल्हापूर येथे पत्र दिलें होतें. बेळगांवला अशाच कामीं महिपालसिंगाची योजना करण्यांत आली होती. तोहि जमखिडीच्या बटॅलियनमध्ये नोकर होता. सूरपूरच्या राजासंबंधी चौकशी करतांना याबाबतींत सरकारची खात्री पटली आहे.

“ जमखिडीच्या महाराजांच्या एका स्नेह्याने मॅन्सन्चा खून केला ! मॅन्सन्च्या मनांत नरगुंदच्या महाराजांना कैद करण्याचें होतें; पण जमखिडीचे महाराज अप्पासाहेब यांनी मॅन्सन्चे मनसुबे जमीनदोस्त केले. चौकशी कर-करून मॅन्सन् या निर्णयाला येऊन पोचला होता की, जमखिडीचे महाराज अप्पासाहेब पटवर्धन यांनी एक गुप्तकट–आणि तोहि महाभयंकर गुप्त कट–वाढीस लावला होता. अगदीं ताज्या केलेल्या बंदुकीच्या गोळ्या जमिनींत ठिकठिकाणी पेरून ठेवल्या होत्या अगर विहिरींतून आणि तळ्यांतून त्यांची लपवालपव केली होती.

नवीन बंदुकाहि ओतण्यांत आल्या होत्या आणि लढाईची हरएक तऱ्हेची तयारी जय्यत होती. त्यामुळेच मॅन्सन्ने अप्पासाहेबास अटक केली आणि त्यांना बेळगांवांत तुरुंगांत ठेवले. जमखिंडी त्यावेळी एक तप्तभू होती.

"ता. ९ एप्रिल रोजी नरगुंद येथे शान्तता प्रस्थापित करण्यास सरकारला यश आलें. नंतर गेल्या सालच्या जुलैमध्ये केलेल्या चौकशीचे कागदपत्र धुंडण्यांत आले. पण जमखिंडीच्या चौकशीचें सगळेच्या सगळे कागदपत्र गहाळ झालेले आढळून आले ! त्याने आम्हास जबरदस्त धक्काच बसला. कारण ज्या पेटींत ते होते, ती पोलादी पेटी जशीच्या तशी सांपडूनहि, तींत कागद मात्र नव्हते ! जमखिंडीच्या राजद्रोहाने आणि ब्राह्मणी तिढ्याने त्या भल्या मोठ्या युरोपियन सद्गृहस्थाच्या आयुष्याचा संहार केला ! कॅप्टन एथरीज याने जमखिंडीला भेट दिली आणि सरकारचा यथायोग्य प्रतिनिधी म्हणून त्याला तेथे नांदतां आले. मॅन्सन् याने गोळा केलेला होता तसा सगळा पुरावा त्याला फिरून गोळा करावा लागला. त्याचे जोरावरच त्याने छोटुसिंगाला तोफेच्या तोंडीं दिलें. परेडग्राऊंडवर हा प्रकार घडला. सर्व खानदानांच्या डोळ्यांदेखत छोटूसिंग तोफेच्या तोंडीं गेला ! छोटूसिंग हा एक धोकेबाज असला तरी एक सुशिक्षित नरशार्दूल होता. जमखिंडींत त्याचें वजन होतेंच, पण तें राजद्रोही स्वरूपाचें होतें. त्यावरून तो इंग्रजांचा प्रतिज्ञाबद्ध शत्रू होता, यांत शंकाच नाही."

लॉकेदच्या भाषणावरून जमखिंडीप्रकरणावर पडलेल्या प्रकाशांत एवढीच भर घातली पाहिजे की, छोटूसिंग बिन हीरासिंग हा जमखिंडीच्या बंडाचा सूत्रधार असला तरी त्याचा उजवा हात म्हणून लक्ष्मणप्रसाद बिन रूद्रमणी हा सर्व कामांत सहाय्य होता. ऑगस्ट १८५७ पासून महिपालसिंगाशीं त्यांचें सुताडें-गोताडें होतें. छोटुसिंगला पहिल्याने बेळगांवला अटक करण्यांत आले होते आणि पुढे धारवाडला तो कैदी होता. या परदेशी शिपायांचे कटांत आबा देवधर या जमखिंडीकरांच्या आश्रिताने आपली अक्कल खर्च करून निजामच्या सरहद्दीवरील सूरपूर संस्थानच्या अधिपतीशीं बंडाचे बाबत संधानें लावलीं होतीं. जमखिंडीच्या पोलिटिकल एजंटचें ता. ८ फेब्रुवारी १८५७ चें पत्र आणि इतरहि मुंबई सरकारच्या दप्तरांतील कागद सदर प्रकरणावर तपशीलवार प्रकाश पाडूं शकतील ! पण त्यापेक्षाहि असिस्टंट मॅजिस्ट्रेट कॅप्टन व्ही. सी. पार यांच्यापुढे विजापूरच्या मामलेदाराने दिलेली साक्ष खात्री पटविते की, जमखिंडीच्या महाराजांच्या हुकमानेच छोटुसिंगाने पावणेपंधरा मण बंदुकीची दारू तयार केली होती. जमखिंडीच्या डोंगरे यांच्या घरांत चाललेल्या या राजद्रोही कारखान्याची वर्दी पोलिसने देणें शक्य नव्हते, की तो राजद्रोही कारखाना ते बंद करूं शकत नव्हते. शिक्षा म्हणून पोलिस अधिकाऱ्याला विजापूरहून कऱ्हाड तालुक्यांत बदलण्यांत आले. जांबोटीच्या देसायांना पकडण्यांत आल्यानंतरच, बेळगांवचे मॅजिस्ट्रेट सेटावकर यांना रिपोर्ट करितां आला की, नानासाहेब पेशव्यांचा एक प्रतिनिधी जमखिंडी, कोल्हापूर आणि अक्कलकोट येथे घालमेली करून पुढे चालूं लागला. जमखिंडीच्या महाराजांना नानासाहेब पेशव्यांना

जाऊन मिळण्याची तीव्र इच्छा होती. त्यांच्यातर्फे नानासाहेबांस पुण्याहून, दुसऱ्या बाजीरावांचे एक सासरे म्हणजे दुसऱ्या पत्नीचे वडील नारोपंत गोखले यांनी पैशाची रसद केली होती. कॅप्टन एथरिजपुढे जो पुरावा झाला होता त्यांत तर या गोष्टी स्पष्टच होत्या की, २९ व्या नेटिव फलटणींतील बेदिली उत्पन्न करण्याच्या बेळगांव येथील कामगिरीचें मूळ जमखिडीकरांचे महिपालसिंगाला आलेल्या पत्रांतच होतें आणि कोल्हापूरच्या महाराजांशीं व सूरपूरच्या महाराजांशीं जमखिडीकरांचा बंडासंबंधीं चांगलाच पत्रव्यवहार होता.

जमखिडीच्या या प्रकाशकिरणांवरून हें स्पष्टच आहे की, इंग्रजी राज्या-बद्दलचा असंतोष नुसत्या राजेराजवाड्यांच्या गेलेल्या हक्कांत नव्हता. तर स्वतंत्र होण्याची लालसा जी सर्वत्र पसरली होती व जिने सामान्य माणसालाहि असामान्य धैर्य दिलें होतें त्या लालसेला चिकटूनच तो असंतोष होता. ठिकठिकाणी त्याच्या ठिणग्या कशा उडत होत्या व त्यांची अखिल भारतीय एकसूत्रता कशी होती यांचा अभ्यास हा एक रमणीय विषय आहे.

## नरगुंदचे भावे

जमखिडीच्या उठावाची चौकशी मध्येच सोडून दक्षिण महाराष्ट्राचा पोलि-टिकल एजंट मॅन्सन् याला ज्या नरगुंदकडे धावावें लागले, त्या नरगुंदकर भाव्यांच्या उठावाकडे आता आपलें लक्ष साहजिकच लागतें. धारवाड जिल्ह्यांत नरगुंद हें एक छोटेखानी शसूर असून तेथे एक डोंगरी किल्ला आहे. सतराव्या शतकापासून नरगुंदकर भाव्यांनी तेथे आपलें असें एक छोटेखानी संस्थान निर्माण केलें होतें. त्या संस्थानाच्या गादीवर १८४२ पासून भास्करराव ऊर्फ बाबासाहेब भावे राज्य करीत होते. शूर धारिष्टवान् आणि विद्वान् असा हा राजा होता. त्याच्या शीलाबद्दल त्याच्या प्रजाजनांत नितान्त आदर असे. १८४३ साली बाबासाहेब भाव्यांचा एकुलता एक मुलगा देवाघरीं गेल्याकारणाने, दत्तक घेण्यास आपणांस परवानगी मिळावी, अशी खटपट बाबासाहेब भावे यांनी चालविली होती. ब्रिटिश सरकारकडून त्यांना तशी परवानगी मिळाली नाही. उलट, शस्त्रास्त्रें ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन करून संस्थानांत निःशस्त्रीकरण करावें, असा हुकूम त्या संस्थानाला झाला. परकीय सत्तेच्या या धोरणाचा बाबासाहेब भाव्यांना मोठा संताप आला. ते अनुकूल कालाची वाट पहात बसले.

मुंधर्गीचे भीमराव हे बाबासाहेब भाव्यांचे दोस्त होते. त्यांनी इंग्रज सरकार-विरुद्ध बंड उभारलें, ही बातमी मिळतांच १८५८ च्या मे महिन्याचे शेवटचे आठवड्यांत बाबासाहेब भावे देखील बंड उभारून रामदुर्ग येथील आपल्या बंधूंचें सहकार्य मिळवण्याच्या प्रयत्नाला लागले. दक्षिण महाराष्ट्राचा ॲक्टिंग पोलिटिकल एजन्ट मॅन्सन् यावेळी कुरुंदवाडास होता. मुंधर्गीच्या भीमरावाचें बंड आणि नरगुंदकडील गडबड यांची वार्ता मॅन्सन्च्या कानावर जातांच,

२९ मे रोजीं तो रामदुर्ग येथे गेला. तेथे रामदुर्गच्या महाराजांकडून त्याला नरगुंदच्या उठावाची तपशीलवार हकीगत कळली. ती कळल्यावर निवडक असे बारा सैनिक घेऊन नरगुंदवर चालून जाण्याचा मॅन्सन्ने निश्चय केला. असा आततायीपणा करण्यांत कांही अर्थ नाही, असा इशारा रामदुर्गकरांनी वरचेवर देऊनहि उपयोग झाला नाही. मॅन्सन्नें आपलाच हट्ट चालविला आणि सुरीबाण या खेडेगांवीं जाऊन त्याने तळ दिला. रात्रीच्या मुक्कामांत आपल्याला कर्नल माल्कम् येऊन मिळेल, अशी मॅन्सन्ला अपेक्षा होती. पण मुंधर्गीचा उठाव आटोक्यांत आणण्यांत कर्नल माल्कम् गुंतल्याकारणाने त्याला वेळेवर येतां आलें नाही आणि?

मध्यान्ह रात्रीच्या सुमारास मॅन्सन्चे भोंवतीं कितीतरी माणसांचा गराडा पडला ! वेढा देणाऱ्या त्या मंडळींचा नायक नरगुंदकर भावे होता. दोघांची झटापट झाली. नरगुंदकर मंडळीपुढे मॅन्सन्च्या माणसांचें कांही चाललें नाही. त्या सर्वांना परलोकीं प्रयाण करावें लागलें. नरगुंदकर भाव्यांनी आपल्या विजयश्रीची प्रतिष्ठा म्हणून मॅन्सन्चे शिरकमल नरगुंदला मिरवित नेलें आणि आपल्या किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यावर तें लटकावून टाकलें ! तथापि नरगुंदकर भाव्यांचा हा महिमा अल्पायुषी ठरला. या आपत्तीची वार्ता धारवाडला धडकली. आणि क्षणाचाहि विलंब न करतां भरपूर दारूगोळा आणि कार्यक्षम सैनिक घेऊन माल्कम्ने नरगुंदवर मोर्चा केला. तारीख १ जून १८५८ रोजी, नरगुंदच्या शूर सैनिकांनी माल्कम्च्या सैन्यावर धाड घातली. आपल्यापेक्षा माल्कम्चे सैनिक किती तयारीचे आहेत, याची बिचाऱ्यांना कल्पना नसावी ! त्यामुळेच, हां ! हां ! म्हणतांच ते कामास आले ! आपल्या लोकांची वाताहत झालेली पाहून नरगुंदकर भावे 'पंढरीच्या वारकरी' वेषांत रातोरात नरगुंदांतून नाहीसे झाले. ता. २ जून रोजी कर्नल माल्कम्ने नरगुंदचा किल्ला हस्तगत केला. तेव्हा नरगुंदकर महाराजांच्या दोन पत्नी आणि दुसऱ्याहि कित्येक स्त्रियांनी स्वतःच्या अब्रूचें संरक्षणार्थ आत्महत्त्येचा मार्ग स्वीकारला.

पुढील दोन दिवसांतच, त्यावेळचे डी. एस्. पी. ने. नरगुंदकर बाबासाहेब भावे यांस गिरफदार केले आणि बेळगांवला नेले. तेथे त्यांचा खटला चालला ते दोषी ठरले आणि १२ जून १८५८ रोजी फांशीं गेले. ता. ३ जून रोजीच नरगुंदचा सारा मुलूख जप्त करण्यांत आला होता आणि त्याचा समावेश ब्रिटिश रियासतींत झाला होता. बेळगांव-धारवाडच्या गॅझीटीअरांतून, वेस्ट मेमॉयर्सवरून आणि मोडकांच्या कोल्हापूर व दक्षिणी संस्थानें यांच्या इतिहासावरून नरगुंदकरांचे बंडासंबंधी वरील तऱ्हेची माहिती घेत असतां एक गोष्ट निदर्शनाला येते की सूरीबाण येथे ॲक्टिंग पोलिटिकल एजंट मॅन्सन् यांचें शिरावेगळें धड झालें तें धारवाडजवळील हाराकी या गांवच्या विष्णु कुलकर्ण्याने केलें होतें. नरगुंदचा बंडावा मोडल्यापासून तो भूमिगत झाला होता. अहमदनगर येथे प्रसिद्ध होणाऱ्या ता. १५ नोव्हेंबर १८६३ च्या ज्ञानोदयाने म्हटल्याप्रमाणे, त्या विष्णु कुलकर्णी या गृहस्थाला पंढरपूरच्या यात्रेंत पकडण्यांत आले आणि फांशीहि चढविण्यांत आलें ! !

## मुंधर्गीचा उठाव

अशा तऱ्हेने नरगुंद प्रकरण हातावेगळें होत असतांच, नरगुंदकर भावे यांनी ज्या दोस्ताच्या बंडावरून उठाव घेतला, त्या मुंधर्गीच्या कुलकर्ण्याचे बंडाकडे साहजिकच आपलें लक्ष जातें. धारवाड जिल्ह्यांतील मुंधर्गी या गांवचा वतनदार कुलकर्णी म्हणजेच इंग्रजांचा ' बंडखोर भीमराव ! ' डुंबलच्या देसाई घराण्याकडून भीमरावच्या पूर्वजांना कुलकर्णी-वतन मिळालें होतें. या डुंबलच्या देसायांस १८०० साली फांशी चढवून त्याची माल–मिळकत कर्नल वेलस्लीने ब्रिटिश सरकारकडे जमा केली होती. आपल्या अन्नदात्याबद्दलचे कृतज्ञतेनेच मुंधर्गीचे कुलकर्णी हे ब्रिटिश सत्तेचे शत्रू बनले होते. आणि बदला घेण्याची संधि पहात होते. १८५७–५८ साली उत्तरेंत ब्रिटिश सरकारविरुद्ध उठाव झाल्याबरोबर दक्षिणेंतील हवा तापत चालली. तेव्हा मुंधर्गीचा भीमराव, शिरहट्टीचे देसाई आणि नरगुंदचे भावे यांनी बंड उभारण्याचें ठरविलें. परकीय सत्ता उलथून पाडावयाची आणि नव्या गुलामगिरींतून मोकळें व्हावयाचें, असा त्यांचा रोख होता. पण शिरहट्टीकर देसायांचे नोकरींतील एका चहाडखोराने धारवाडच्या कलेक्टरचे कान भरले आणि एके दिवशीं कलेक्टरसाहेबांचे हुकूमाने शिरहट्टी खालील ' हमगी ' या गांवीं जप्ती वॉरंट घेऊन फौजदारसाहेब आले. हमगी येथे उठाववाल्यांनी दारूगोळा जमा करून ठेवला होता. त्याचा कानोसाहि फारसा कोणास नव्हता. पण फितुरीने दगा दिला असें कळल्याबरोबर मुंधर्गीच्या भीमरावांनी हमगी या गांवावरच हल्ला चढविला. आलेल्या पोलिसांचा समाचार घेतला आणि स्वत: फितुराला यमसदनास पाठविलें. त्यानंतर भीमरावांनी हुडकून हुडकून ठाणीं कबजांत घेतलीं. भीमरावाला शिरहट्टीच्या देसायांनी आणि १८०० साली फांशीं गेलेल्या डुंबलच्या देसायांचे नातवानें सांथ दिली. ब्रिटिश तुकडचा या सर्वांचा पाठलाग करीतच होत्या. त्यामुळे हे सर्व उठाव-वाले निजामहद्दींतील कोपाळ किल्ल्याच्या आश्रयाला गेले. तेव्हा मद्रास-सैन्यांतील एका फौजी तुकडीने मेजर ह्यूगेट याच्या नेतृत्वाखाली कोपाळचा किल्ला १८५८ मध्ये उडविला. त्या मातबर लढाईंत भीमराव, शिरहट्टीचे देसाई आणि दुसरे कित्येक वीर रणांगणावर कामास आले. या संबंधांत तपशीलवार अभ्यास करावयास धारवाड गॅझीटिअर आणि मोडककृत कोल्हापूरचा इतिहास हीं पुस्तकें विशेष उपयोगी पडणारीं आहेत, एवढें सांगून ज्या सूरपूरच्या राजांचा उल्लेख जमखिंडी प्रकरणांत आला आहे, त्यांच्या कथानकाकडे वळणें इष्ट होईल.

## सूरपूरचा सूर

ब्रिटिश रियासतीविरुद्ध उभ्या राहिलेल्या अनेकानेक उठावाशीं सूरपूरच्या राजांचा संबंध आलेला आहे. मुंबई-इलाख्यांतील विजापूर व सोलापूर जिल्ह्यांच्या

सरहद्दीवरील निजामशहाच्या मुलखांत सूरपूर मोडे. सूरपूरच्या त्या निधड्या छातीच्या राजाचें नांव वेंकप्पा नाईक बळवंत बेहरी असें होतें. नानासाहेब पेशव्यांकडून येणाऱ्या प्रतिनिधींचीं श्रीमान् वेंकप्पांशीं खुणाखलबतें चालत.

सूरपूरच्या राजांचे ब्रिटिशांशीं घासण्याचें कारण म्हणजे ब्रिटिशांनी राजांच्या सत्तेखालील कांही प्रदेश आपल्या टांचेंखाली घेतला होता व त्याचें वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांहून कमी नव्हतें. तो प्रदेश परत मिळविण्यासाठी आपल्या मेहुण्याचे हातीं सैन्य देऊन 'कोठू' या इंग्रजी ठाण्यावर हल्ला सूरपूरच्या राजांनी चढविला होता, पण त्यांत त्यांना अपयश आलें होतें. त्यामुळे अनुकूल काळाची वाट राजे पहात होते. १८५७ च्या ऑगस्ट महिन्यांत आपल्या पदरचा एक शिपाई महिपा-लसिंग बिन जटाहिरसिंग याला सूरपूरकर राजांनी बेळगांवास २९ वी नेटिव फलटण ब्रिटिशांविरुद्ध बेदिल करण्याकरतां धाडला. त्याला कांही यश मिळण्याच्या अगोदरच तो पकडला गेला व तोफेच्या तोंडीं जाण्यापूर्वी त्याने जमखिंडीच्या छोटुसिंगच्या कारवाईची ओळख इंग्रजांना दिली !

हा आराखडा हुकला म्हणून सूरपूरचे राजे स्वस्थ नव्हते. विजापूर जिल्ह्यां-तील हिपर्गी तालुक्यांत जांबगीचे देशमुख या आसामीशीं राजांचीं खलबतें सुरू झालीं. या खलबतांतील मध्यस्थ म्हणून सूरपूर गांवचे गुंडाप्पा पाटील होते. त्यांच्यामार्फत बंडाचा वणवा चांदकवठ्याचे व शिरहट्टीचे देशमुख बसलिंगाप्पा यांच्यापर्यंत विजापूर जिल्ह्यांत इतका पसरला की बसलिंगाप्पांनी बंडासाठी एक खडें सैन्य उभारण्याची बातमी आणि त्याचप्रमाणे दारूगोळा तयार ठेवल्याची वार्ता १८५७ च्या जानेवारी महिन्यांत सोलापूरचे कलेक्टर कचेरींत येऊन थडकली. नानासाहेब पेशवे लवकरच सोलापूरास येऊन थडकणार असाहि पुकारा त्याचवेळी झाला. म्हणून ब्रिटिश पोलिसांनी जांबगी येथील देशमुखांच्या राहत्या वाड्याला व कोटनाळ येथील त्यांच्या किल्ल्यास वेढा दिला. झडती झाली. बंडाचा पुढारी बसलिंगाप्पा आणि त्याचा मुलगा यांना गिरफदार करण्यांत आले. राजद्रोहाच्या गुन्ह्यासाठी त्यांचेवर खटला चालला. त्यांच्या मिळकती जप्त करण्यांत आल्या आणि कोटनाळाचा किल्ला होता की नव्हता असा करण्यांत आला.

चौकशींत असेंहि आढळून आलें की सूरपूरच्या राजाने जतच्या जहागीर-दाराशीं सहकार केला होता. त्यामुळे सोलापूरच्या मॅजिस्ट्रेटांनी भीमा व कृष्णा या दोन नद्यांमधील प्रदेशाचें संरक्षण करण्यासाठी 'एडन' ट्रुप्स पाठविल्या. आढळ असा झाला की कल्लाडगीच्या लोकांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध उठाव केला होता. तेव्हा कर्नल माल्कम् आणि लेफ्टेनंट केर यांनी त्या उठावाचा थोडक्याच काळांत बीमोड केला.

# [ १४ ]

# सावंतवाडी ते बडोदा

## फोंड सावंत

जमखिडीच्या बंडाव्याशीं निगडीत असलेले धागेदोरे अशा रीतीने समजावून घेतल्यावर सावंतवाडीचे फोंड सावंताचे हालचालीकडे साहजिकच अभ्यासकांचें लक्ष जातें. १८४५ च्या सामानगडापासून उभ्या राहिलेल्या गडकऱ्यांच्या बंडांतून सावंतवाडीचे फोंड सावंतांनी भाग घेतल्यामुळे त्यांना आपल्या राज्याबाहेर दिवस कंठावे लागले होते. तो त्यांचा वनवास १८५० साली संपला व आपल्या घरीं येऊन तेव्हापासून ते राहूं लागले. तरी स्वत: फोंडसावंत आणि त्यांचे तीन मोठे चिरंजीव नाना, बाबा आणि हनुमंत देसाई यांना माफी मिळाली नव्हतीच. त्या तिघा बंधूनीच १८५८ च्या फेब्रुवारी महिन्यापासून सावंतवाडी ते कानडा जिल्ह्याच्या सरहद्दीवर बंडाळी मांडली. ताळेवाडीच्या पोलीसठाण्यावर दोनशे माणसांनी हल्ला चढविला आणि पुढे वरकुंड येथील जकातनाकें भस्मसात केलें. दिडवळ येथील जकातनाकेंहि जमीनदोस्त करण्यांत आलें. याच्यावर तोडगा म्हणून ब्रिटिश सरकारला शेतसनदीचा उपयोग करणें आले. नेटिव इन्फंट्रीची २८ वी तुकडी आणि ५० निवडक युरोपियन यांना मुलकी अधिकाऱ्यांच्या हाताखाली देण्यांत आलें. ब्रिगेडियरच्या सल्लामसलतीनेच हें सर्व झालें. उठाव-वाले मात्र याने दबले नाहीत. ताळेवाडीच्या खालच्या बाजूस खेलाघाटांतील कानडा जिल्ह्याच्या सरहद्दीवर 'दर्शनी-गड्डा' टेकडीवर ते असें ठाण मांडून बसले की १८५९ च्या फेब्रुवारीपर्यंत ब्रिटिश सरकार त्यांचे कांहीहि करूं शकले नाही. १८५९ च्या फेब्रुवारीचे प्रारंभी बिडी गांवचा पोलिस पाटील सोमण्णा मल्लापा आणि सेमंत-मारी या बिडी तालुक्यांतील गांवचा शेतसनदी रामा बिन रुद्राप्पा यांना ब्रिटिश सरकारने त्यांच्या त्यांच्या अधिकारावरून दूर केले आणि होत असलेल्या बंडाव्यांत त्यांचा हात असल्याचे आढळून आल्यामुळे त्यांची सारी मालमिळकत जप्त केली. त्यापूर्वीच दर्शनी गड्डयावर ठाण मांडून बसलेल्या बंडखोरांवर जीवाच्या उदारीने हल्ला करण्यांत आला होता आणि त्याचा परिणाम बंडखोरांनी जरी पळ काढला होता तरी पुष्कळ काळपर्यंत त्यांच्याकडून त्रास झाल्याशिवाय राहिला नाही. या बंडाव्याचे पुढारी जे नाना, बाबा व हनुमंत सावंत यांना पकडून देण्याबद्दल जाडींजुडीं बक्षिसेंहि लावण्यांत आलीं. घाटांतून त्यांनी इकडच्या मुलखांत फिरकूं नये म्हणून बंदोबस्तहि राखण्यांत आला. उठाव-वाले आणि त्यांचे पुढारी यांना राघोबा ऊर्फ रावबा, चिंतोबा आणि शामबा फडणवीस यांचें मार्गदर्शन असल्याचें वृत्तहि ब्रिटिश सरकारास ठाऊक होतें. बंडखोर उठाववाल्यांचा एक संघटक पुढारी म्हणून बॅस्टिअन नांवाचा सिद्दी असल्याचा दाखलाहि इंग्रजांस पटला होता. बिडी तालुक्याचे व कानडा जिल्ह्याचे जंगलांत या मंडळींना निवान्त आश्रय मिळत असे,

त्यामुळे त्या बाजूने हल्ले प्रतिहल्ले होता होता १८५९ च्या जुलै महिन्यांत हामोदच्या जंगलांत चितोबा फडणवीस कामास आले. चितोबांच्या हाताखालील उठाववाल्यांची तुकडी ५० ते ६० असामींची होती. त्यांचा पाठलाग करून त्यांना जेरीस आणण्याचें काम जीर्टझेन आणि ड्रेवार या लेफ्टेनंट्सकडे सोंपविण्यांत आलें होतें. त्यांच्या हाताखाली दोन नाईक, बारा निवडक सैनिक आणि पोर्तुगीज लष्कराचा कर्नल सिल्व्हा हे काम करीत होते. त्यांनी हरप्रयत्न करूनहि उठाव–वाल्यांना जेरीस आणणें त्यांना नोव्हेंबरअखेर शक्य झालें नाही. ' कानडा बंड ' म्हणून ब्रिटिशांनी नोंद करून ठेवलेला हा उठाव तारीख ५ डिसेंबर १८५८ रोजी गोव्याच्यासरहद्दीवरील कानडा जिल्ह्याच्या डिंगोर्लीच्या जंगलांतील डिग्गी गांवच्या जवळील टेकड्यांवर शेवटीं वितळला. तरीहि शत्रूच्या हातीं न लागण्याच्या निश्चयाने धडपड करणाऱ्या बाबा, रावबा आणि शामबा यांना मृत्यूला तोंड द्यावें लागलें व अंतीं मृत्युमुखीं पडावेंहि लागलें. मग, कांही निसटले पण बहुतेकांस युद्धकैदी होऊन बंडखोरांच्या ललाटरेषेस सादर व्हावे लागले. बेळगांव गॅझीटीअर आणि वेस्टमेमॉयर्स या ग्रंथांतील वर्णनाइतकीच महत्वाची माहिती मुंबई सरकारच्या दप्तरींहि असेल. ती मिळवून या कानडाबंडाचा इतिहास साद्यंत कोणी लिहिला तर सामान्य माणसेंहि १८५७ च्या उठावांत कशीं तल्लीन झालीं होतीं, याच्यावर चांगलाच प्रकाश पडेल.

## नाशिक जिल्ह्यांत

सावंतवाडीच्या फोंडसावंतांचे नंतर लक्ष वेधणारी महाराष्ट्रीय बंडखोरांची संघटना नाशिक जिल्ह्यांतील ' पेठ ' गांवचीच होय १८५७ च्या नोव्हेंबर महिन्याचे प्रारंभी पेठच्या राजाने बंड उभारण्याचा बेत केला. हजार ते बाराशे माणसें सशस्त्र होऊन हुरसूळ गांवच्या बाहेरील मैदानांत जमत. नोव्हेंबरच्या एका सुप्रभातीं अशी मंडळी जमली असतां, पेठच्या राणीसाहेबांचा दिवाण फत्ते महंमद आणि प्रांतऑफिसरांचे हाताखालील एक नाईक व एक शिपाई त्या जमावाला मिळाले. सर्वांनी मिळून शहरांत प्रवेश केला. कारकूनशिपाई मंडळींना बांधून घातलें, सरकारी तिजोरी लुटली व सरकारी दप्तर आग आणि पाणी यांच्या जोरावर खलास करण्यांत आलें. तारीख ९ डिसेंबर १८५७ रोजी भिल्लांचा पुढारी भागोजी नाईक पेठच्या संस्थानांत बंडखोरांना मदत करण्यासाठीच घुसला. सशस्त्र बंडखोरांची साथ संस्थानी मुलुखांतील लोकांनी केल्यामुळे, सरकारी खात्यांतील बाकीच्या कारकून मंडळींनी आणि अधिकाऱ्यांनी नाशिकचा रस्ता सुधारला. सदर हकीगत त्या सालच्या ठाणें येथील ॲक्टिंग मॅजिस्ट्रेटनेच नमूद करून ठेवली आहे. पेठ संस्थानांतील चोवीस गांवांचा नामधारी राजा भागवत नीलकंठ होता. मुख्य मुख्य उठाव–वाले त्याच्यासमोर जाऊन मुजरे–मान देऊं लागले. या संबंधांत ब्रिटिश सरकारने चौकशीचा तगादा लावून राजाने ताकास तूर लागूं दिली नाही. मग, नेटिव इन्फंट्रीच्या १० व्या तुकडींतील लोक आणि ठाणें–पोलिस यांना पेठवर

पाठविण्यांत आलें. खजिना लुटणाऱ्या टोळींतील दोन मुख्यांना त्यांनी झडपलें, दुसऱ्यांना डांबून ठेवलें; पण ते अचूक निसटले. दुसऱ्या हल्ल्यांत रात्रींच्यावेळी पेठचा पाटील भाऊ माळेकर आणि त्याचा भाऊ माळेकर हाच वंडखोरांचा सूत्रधार आणि राजेसाहेबांचे हस्तकांतील मुख्य होता.त्यांचे साथीदारांनाहि पकडण्यांत आले. ता. २८ डिसेंबर १८५७ रोजी खुद्द पेठच्या राजेसाहेबांनाच चतुर्भुज करण्यांत आले. त्यांचेवर राजद्रोहाचा खटला चालविण्यांत आला. त्यांची मालमत्ता जप्त करण्यांत आली आणि त्यांचा महसूल ब्रिटिश सरकारचे नांवें वसूल करण्यांत आला. भाऊ माळेकर ऊर्फ भगवान् विठ्ठल याचा खटला बॉस्वेल् आणि कॅप्टन वॉकर यांनी चालविला व फत्तेमहंमद बरोबरच भाऊ माळेकरास फांशीं चढविण्यांत आलें. त्यानंतर सर्व गांवांस निःशस्त्र करण्यांत आले आणि लोकांना शांततेचा आत्मविश्वास येण्यासाठी लष्करची तुकडीहि कांही दिवस ठेवण्यांत आली.

## बडोद्याचे गायकवाड

नाशिक जिल्ह्यांतून वर नजर टाकल्यास अभ्यासकांचें लक्ष साहजिकच बडोद्याकडें वळतें. १८५७ च्या मे महिन्याच्या तिसरे आठवडयांत नॉर्थवेस्ट प्रॉव्हिन्स आणि दिल्ली उठाव-वाल्यांच्या हातीं पडली होती. लोक व त्यांतल्यात्यांत मुसलमान मंडळी आणि तीहि विशेषेंकरून शहरी विभागांतील, सर्वच हिंदुस्थानभर खवळलेले आढळत होते. मोंगल बादशहा बहादूरशहा हा अखिल भारतीय पुढाऱ्यांपैकी महत्त्वाचा असल्याकारणाने सुरतेच्या मशीदी-मशीदींतून त्याला यश मिळण्याबद्दल प्रार्थना झाल्या. १५ मेपासून पारशी मुसलमीन दंगलींनी भडोच अस्वस्थ झालें व भोंवतालच्या खेडयापाडयांतील मुसलमान बेचैन बनूं लागले. तेव्हा बडोद्यांतील मुसलमानांचीहि भावना झाली की बंड उभारावयास बडोद्यांत आतां काल परिपक्व आहे.

याच वेळी गुजराथमध्ये भरपूर युरोपियन फलटण आपणांस ठेवतां येत नाही ही रुखरुख ब्रिटिश सरकारास होतीच. अधिकारी वा नागरिक युरोपियन बडोदा संस्थानशीं प्रेमाचे स्नेहसंबंध ठेवण्याची पराकाष्ठा करीत होते. ब्रिटिश हद्दींत बडोदा संस्थानची हद्द कुलूपबंद आहे, हाच त्यांचा एकमेव आधार होता.

बडोद्यास या वेळी सामर्थ्य आणि उत्साह यांची केवळ मूर्ति असा रेसिडेन्ट होता. त्याचे नांव सर आर्. शेक्सपीअर. बडोदानरेशांना मार्गदर्शन करीत करीत गुजराथ ब्रिटिशांना काबूत ठेवतां येईलच येईल, असा शेक्सपीअरसाहेबांचा विश्वास होता.

बडोदे सरकारहि राजनिष्ठेने सहकार करील असें आश्वासन शेक्सपीअरसाहेबांनी मिळवलें होतें. ब्रिटिश सरकारने केव्हाहि आपल्या सैन्याचा, दारूगोळयाचा आणि स्वतः बडोदानरेशांचा उपयोग करावा, असें आश्वासन बडोदानरेशांनी ब्रिटिश सरकारास दिलें होतें. लॉर्ड व्हायकाऊंट कॅनिंग यांना

२८ मे १८५७ रोजी महाराजा खंडेराव यांनी लिहिलेला खलिता वरील विधानाला प्रमाण आहे.

१८५७ च्या जूनचे मध्यास बडोद्यासच चलबिचल झाली. सर्व ख्रिश्चनांना प्रभु येशूच्या पायीं पाठवावे, असा मुसलमान मंडळीनी मनसुभा केला. ता. २५ जून रोजी बडोद्यांत दोन राजद्रोहास उत्तेजक अशीं भित्तिपत्रकें लागलीं. त्यामुळे समाजाच्या खालच्या थरांत व व्यापारी वर्गांत थोडी खळबळहि झाली. ता. २६ जूनला गायकवाड सरकारने जाहीरनामा लावला की, राजद्रोह्यांना तोफेच्या तोंडीं उडविण्यांत येईल. गुन्हेगार पकडून देणारास हजार रुपयांचे बक्षीस जाहीर झालें. ता. २६ जून रोजी अशी लोकसमजूत करून देण्यांत आली की कॅन्टोन-मेंटच्या पुलावर एक मोठा पुढारी लोकांस दर्शन देणार आहे, लोकांनी आपले जडजवाहीर पुरून ठेवण्यास सुरवात केली. पुलाशेजारील महत्त्वाच्या जागेवर अधिकारी मंडळींनी तोफा हलवून सज्ज करून ठेवल्या. घोडदळ व पायदळ यांच्या फलटणीहि पुलाच्या आसपास ठेवण्यांत आल्या. त्यामुळें तर सर्व मुसलमान समाजांत खळबळ उडाल्यावांचून राहिली नाही. मुसलमान समाजांत असंतोष पसरविण्याचें काम सय्यद व पिरजादे करीत होते. म्हणून बडोद्यांतील ती मंडळी प्रथम चतुर्भुज करण्यांत आली.

तरीसुद्धा स्वतः बडोदानरेशांच्या राजनिष्ठेबद्दलच ब्रिटिश सरकार संशयग्रस्त होते. कॅप्टन हॉड्‌ग्सन्‌सारख्या जबाबदार अधिकाऱ्याने ता. १० जुलै १८५७ रोजी मेजर क्रॉफर्डला जें पत्र लिहिलें आहे, त्यावरून ब्रिटिश सरकारची मनोवृत्ति स्पष्ट होते. बडोद्यांतील बंडाळीचा प्रणेता, बडोदानरेशाकडील एक मुनशीच होता, हें त्या संशयाचें प्रमुख कारण असावें. त्या हिंदुस्थानी मुनशीच्या जोडीला एक वरचा, अरबांचा एक बलुची जामदार आणि नवाब सरफरास अल्ली हेहि साथीदार होते. त्यामुळे कॅप्टन हॉड्‌ग्सन्‌ याने बडोदानरेशाबद्दल संशय प्रगट केला तर नवल नव्हतें. थेट रत्नागिरीपर्यंत अशी वार्ता पसरली होती की, बडोदेसरकार बाह्यतः ब्रिटिश सरकारला मदत करण्याकरतां पण वस्तुतः बंडवाल्यांना मदत करण्याकरतां प्रजेंतून पैसा उभारीत असून त्याच भक्कम पायावर भिल्ल, कोळी वगैरे लोकांशीं बडोदेसरकारचे करारमदार चालले आहेत.

या अशा वार्ता-अफवांचा एक परिणाम असा झाला की, अहमदाबाद व बडोदा येथील कांही मंडळींनी गायकवाड सरकारचीच उचलबांगडी करण्याचा कट केला. असा कट करणारांत गायकवाड सरकारचे सावत्र बंधू बापूसाहेब गायकवाड हेच एक होते. गायकवाड सरकारचे दुसरे एक बंधु मल्हारराव यांच्या मदतीने बापूसाहेब, त्यांचे सहाय्यक भाऊसाहेब पवार आणि स्वतःला राजे भोसले म्हणविणारे एक सरदार यांनी असा कट रचला की बडोदा अहमदाबाद व खेडा येथील युरोपियनांना ख्रिस्तवासी करावें आणि साताराच्या राजाचे नांवाने राज्य

स्थापावें. बॉंबे गॅझीटिअर भाग १ व गुजराथचा इतिहास या ग्रंथांतून हें प्रकरण वाचलें असतां, आणखी असेंहि कळतें की अहमदाबाद लुटावें, माहीवर चाल करून जावें, खेडा जिल्ह्यांतील कोळी गोळा करावेत आणि मग थेट बडोद्यावरच हल्ला चढवावा, असाहि कट होता.

इंदोर येथे होळकरांच्या सैन्याने बंड करून ब्रिटिश रेसीडेन्सीवर हल्ला चढविल्यावर, गुजरातमध्ये अशी एक सार्वत्रिक समजूत होती की, ग्वाल्हेरच्या बायजाबाई शिंद्यांनी एक भलें मोठें सैन्य रवाना केलें असून, त्यांचाच एक नातेवाईक ' गोविंदराव ' यासच बडोद्याच्या गादीवर बसवावयाचें आहे. गोविंदराव ऊर्फ बापूसाहेब गायकवाड म्हणजे फत्तेसिंग गायकवाडांच्या पत्नी राधाबाई यांनी दत्तक घेतलेला मुलगा होय. ता. २८ एप्रिल १८३० रोजीच १२४०० रुपयांची वार्षिक नेमणूक बापूसाहेबांना झाली होती. तथापि तक्ताधिष्ठित गायकवाड सरकारला न जुमानण्याची त्यांची उच्छृंखल कृति त्यांना अशी बाधली की ब्रिटिश सरकारने त्यांना बडोद्यांतून हलविलें. १८३२ च्या २७ मार्चला त्यांना सनद देण्यांत आली. १८३३ पासून ते अहमदाबादेंत राहूं लागले. तेथे ते मॅजिस्ट्रेटच्या देखरेखीखाली होते. १८३६ मध्ये परवानगीवांचून त्यांनी अहमदाबाद सोडलें; गायकवाड सरकारच्या उत्तर हद्दींत प्रवेश केला आणि तसेंच ते बडोद्याच्या नजीक आले. तेव्हा साहजिकच बडोदा सरकारने त्यांना गिरफदार केलें. पुन्हा अहमदाबादेस त्यांना उक्त पहाऱ्याखाली रहावें लागलें. १८५७ साली उत्तरेंतून बंडाच्या बातम्या येऊं लागल्यावर फिरून आपला जुना उद्योग उभारण्याची त्याला हुक्की आली. उत्तरेकडील बंडवाल्यांनी त्याच्याकडे अहमदाबादच्या ब्रिटिश सैन्यांत बेदिली निर्माण करण्याची कामगिरी सोपविली. शाहीबागजवळील त्यांच्या राहत्या जागीं वरचेवर शिपायांची ये जा सुरू झाली. त्यामुळे अहमदाबादेस अगर कोणत्याहि लष्करी शहरांत बापूसाहेबांना राहू देतां कामा नये, असा अभिप्राय मॅजिस्ट्रेटने प्रगट केला.

परिणामतः १८५७ च्या मध्यास गायवाडच्या सैन्यानेच बापूसाहेबांना बडोद्यास आणून ठेवलें, त्याचवेळी खेराळू, बुर्नागर व बायजापूर या गायकवाडांच्या परगण्यांतून कोळ्यांनी बंड उभारलें होतें. खेडा जिल्ह्यांतील खानापूरच्या ठाकूरसाहेबांनी गायकवाड सरकारच्या प्रधानसाहेबांना लिहिलें की, दोन हजारावर कोळी खेडा येथे आणि महिकांठा जिल्ह्यांत एकत्र झाले असून बडोद्यावर चाल करण्याचा त्यांचा उद्देश दिसतो.

रेवाणकांठांतील भांदुर्गाच्या ठाकूरसाहेबांनी बडोद्याच्या रेसिडेंटला लिहिलें की, बडोद्याचे दोन दक्षिणी रहिवासी माहीच्या खेडा जिल्ह्यालगतच्या प्रतापपूर या गांवीं मुक्कामास असून त्यांनी भोंवतालच्या खेड्यांतून सहाशे मंडळी गोळा केली आहेत व त्यांना दारूगोळा खरेदी करण्यासाठी पैसे पुरविले आहेत; त्यांना

बडोद्याच्या कँपमध्ये गोंधळ घालावयाचा आहे. या पत्राउप्परहि बडोद्याच्या मंत्र्यांना वाटलें की, महाराजांच्या नोकरींतून कमी झालेला एक मुसलमान गेले दोन महिने लोकांना दंगे करण्यास चिथावत आहे, त्याचाच प्रतिध्वनि तें पत्र असावें. उत्तरेंत दिल्ली बंडखोरांच्या हातून निसटल्यावर याच गृहस्थाने येऊन आपला सारा कट उघड केला. गायकवाडच्या अधिकाऱ्यांनी पंचवीस इसमास अटक केली. पण याच सुमारास बारूनगरच्या कमाविसदाराने रिपोर्ट केला की, महिकांठामध्ये कोळी लोक बंड करून उठण्याचा संभव आहे. ता. १३ आक्टोबर १८५७ च्या बेताची ही गोष्ट असावी आणि अशा तऱ्हेने सातारकरादिकांनी राजघराणीं, पेशवे आदिकरून मंडळींचीं मांडलिक घराणीं, इतमामांची सरंजामी घराणीं ब्रिटिशांविरुद्ध बंड करून उठत असतां, तें वारें जनसामान्यामध्ये कसें पसरत चाललें होतें, याचा मासला अभ्यासू नजरेंतून सुटला नाही आणि तरीहि जनसामान्यांचा म्हणून जो विशेष भाग १८५७ च्या उठावांत नजरेमध्ये स्वतंत्रपणे भरतो, त्याकडे लक्ष देणेंहि मनोरंजक व बोधप्रद आहे. तेव्हा तिकडेच आतां वळूं.

# [ १५ ]

# जनसामान्यांचा उठाव

इराणकडे युद्धाच्या आघाडीवर १८५७ मध्ये युरोपियन सैन्याच्या तुकड्या धाडण्यांत आल्या होत्या; त्यांत बेळगांवच्याहि होत्या. ब्रिटिशांच्या विरुद्ध भारतीयांनी उठाव केल्याबरोबर बेळगांवलाहि गडबड सुरू झाली. एतद्देशीय दोन फलटणींनी आणि युरोपियन तोफखान्याच्या एका तुकडीने बेळगांव सतावलें. एतद्देशीय सैनिक बंडाचा दण्ड ठोकण्याच्या बेतांत होते. तेव्हा मुंबईहून सहाय्य मागविण्याची तत्परता ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दाखविला. त्याच वेळी कोल्हापूर आणि धारवाड येथीलहि एतद्देशीय फलटणींनी बंडाची तयारी केली होती. ता. ३१ जुलै १८५७ ही उठावाची तारीख म्हणून सर्वांचीच ठरली होती. पुण्याच्या वहाबी पंथाचा एक अनुयायी आणि बेळगांवचा रहिवासी मुनशी नांवाचा एक गृहस्थ होता, तो ह्या सर्व एतद्देशीय फलटणींचें स्फूर्तिस्थान होता. दक्षिणेंतील सर्व लष्करी ठाण्यावरील आपल्या सहानुभूतिकांशीं त्या मुनशीचा पत्रव्यवहार होता. दक्षिणेंत बंडाचा डोंब उठवावा असा अर्थातच मुनशीचा बेत होता. याच काळांत बेळगांव येथे पोलिस खात्यांत मुथ्थुकुमार या नांवाचा बाटचा नोकर होता. त्याने मुनशीजीचें गुह्य जनरल लिस्टरजवळ फोडलें. बेळगांव रेजिमेंटचा कमांडिंग ऑफिसर लिस्टर होता. लिस्टर हा मोठा धीमा आणि धूर्त अधिकारी होता. त्याने बाह्यतः ढवळाढवळ कांहीच केली नाही; तरी आंतल्या बाजूने संभवनीय बंडाविरुद्ध उपाययोजना त्याने चालविली होती. ता. १० ऑगस्ट १८५७ च्या सुमारास मुंबईहून इंग्रजी सैनिकांची कुमक गोव्याच्या बाजूने येऊन मिळाल्यावर लिस्टरने हयगय केली नाही. त्याने मुनशी आणि त्याचा एक दोस्त यांच्यावर एकदम झडप घातली. २९ व्या तुकडींतील बेळगांवचे पांच पुढारीहि पकडण्यांत आले. त्यांच्यावर रीतसर खटले भरण्यांत आले, त्यापैकी चार शिपायांना हद्दपारीच्या शिक्षा झाल्या. बेळगांव जिल्हा गॅझीटीअरमध्ये ४१०-४१२ पृष्ठांवर या संबंधांतील हकीकत तपशीलवार आली आहे. मुनशीला फांशीं देण्यांत आले. मुनशीचे सद्गुरू पुण्याचे मौलवी नूरउल हुदा यांना पुढे हद्दपार करण्यांत आले, असें ज्ञानोदयाच्या ता. १ मार्च १८५८ चे अंकावरून समजतें. बंडाची बातमी देणारा बेळगांवचा फौजदार मुथ्थुकुमार अय्या याला दरसाल पांचशें रुपये उत्पन्न देणारी जमीनगांव ब्रिटिश सरकारने बक्षिस दिलें, तर बेळगांवच्या सर्व युरोपियनांनी त्याला पन्नास गिनी किंमतीची तलवार बक्षीस दिली.

एतद्देशीय फलटणींत जशी दक्षिणेंत गडबड उडेल अशी इंग्रजांना कल्पना नव्हती, तशीच मुंबई-नागरिकांतहि गडबड उडेल अशी इंग्रजांस कल्पना नव्हती. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराशीं मुंबई एक शतकाच्यावर रुळली होती. कित्येक इंग्रज अधिकाऱ्यांचे मुंबईच्या रहिवाश्यांबरोबरचे संबंध घरोब्याचे व स्नेहाचे होते.

आणि तरीहि उत्तर हिंदुस्थानांत इंग्रजांविरुद्ध उठाव होताच त्याचें वातचक्र मुंबईला प्रभाव पाडल्याशिवाय राहिलें नाही.

उठावाच्या सर्व कालखंडांत मुंबईचे युरोपियन बेचैनच होते. मुंबईचे नगरशेठ जगन्नाथ शंकरशेठ यांच्यावरहि जुन्या काळच्या रामा कामत शेठप्रमाणेच " राज–द्रोहाचा संशय " घेण्यापर्यंत युरोपियनांचें डोकें फिरलें होतें. तथापि लॉर्ड एल्फि–न्स्टन हा शांत, निश्चयी आणि भोंवतालच्या परिस्थितीवर बारीक नजर देऊन बसलेला होता. त्याने मुंबईचा पोलिस–कमिशनर चार्लस् फोर्जेट याच्याकडून तपास काढविला आणि त्याने " संशयाची बाधा न हो कदाकाळीं। सर्व सन्तमंडळी सुखी असो ।। " असा आपल्या तपासाचा रिपोर्ट दिला. डी. ई. वाच्छा यांचें " मुंबईच्या वाळवंटांतील शिंपले " हें पुस्तक वरील संबंधांत वाचण्यासारखें आहे.

आणि तरीहि १८५७ च्या मेपासून सप्टेंबरपर्यंतचे दिवस मुंबईला मोठे चिंतेचेच गेले. दादोबा पांडुरंग तर्खडकरांच्या आत्मचरित्रांतील पृ. २२३ वरून समजतें की, मुंबईच्या युरोपियन मंडळींनी त्या काळी आपलीं बायकापोरें विलायतला पोंचविण्यासाठी बोटींतच बसवून ठेवलीं होतीं. मुंबई-बेटांत त्यावेळी तीन सैनिक तुकडचा होत्या. फक्त चारशे युरोपियनांचीच फलटण काय ती ब्रिगेडियर शॉर्ट यांच्या हाताखाली तेथे होती. एतद्देशीय फलटणीवर त्यांच्या अधिकाऱ्यांचा नितांत विश्वास होता. युरोपियनाला भीति वाटत होती, ती मुंबईच्या दीडलक्ष मुसलमान मंडळींची. दिल्लीला बंडवाल्यांनी बहादूरशहाच्या नांवाने द्वाही फिरवल्यापासून ही भीति युरोपियनांस वाटत होती. तथापि मुंबईचा पोलिस कमिशनर चार्लस् फोर्जेट ही इंग्रजांच्याजवळ अशी एक चीज होती की, तो त्यांचा हुकमी पत्ता म्हटला तरी चालेल ! धट्टाकट्टा, उन्हातान्हांतून वावरलेला, नाटकीपणांत मुरलेला, असा हा गडी हिंदुस्थानांतच जन्मला व लहानाचा मोठा झाला होता. तो एकदां एतद्देशीयासारखा नटून बाहेर पडला की त्याला युरोपियन म्हणण्याची कोणाची छाती नव्हती. फोर्जेटला कळून चुकलें होतें की, एतद्देशीय सैनिक बंड करण्याच्या फंदांत आहेत. म्हणून ब्रिगेडियरला आवडलें नाही तरी फोर्जेटने आपलें मत दडवून ठेवलें नाही. युरोपियन सैनिकांचे व पोलिसांचे छोटे छोटे गट करून संरक्षणाची व्यवस्था सरकारने केली. पण फोर्जेटला तसले कांही पसंतच नव्हतें. जेथे बंड उद्भवण्याची शक्यता आहे, तेथे युरोपियनांनी सामुदायिक शक्तीने झकास प्रतिकार करावयास हवा, असें फोर्जेटचें स्पष्ट मत होतें.

मोहरमचा सण सुरूं झाल्यावर रोज रात्रौ एतद्देशीय पोशाख करून फोर्जेट हिंडू लागला. हिंदुस्थानांतील इतर भागांत उठाववाल्यांनी मिळवलेल्या विजयाच्या बातम्यांची चर्चा करीत असलेले कोणी आढळले की, फोर्जेटने शिट्टी वाजवून

आपल्या हाताखालील लोकांना इषारा केलाच ! तसा खाक्याच पडला होता म्हणाना !! तशा तऱ्हेने बंदीवान् झालेल्या माणसांच्या अनुभवामुळे लोकांनी एवढी धास्ती खाल्ली की, त्यांनी थोड्याच दिवसांत हूं की चूं करावयाचे देखील बंद केलें. मोहरमच्या अखेरीअखेरीस सैनिकांच्या तुकडीपैकी एकाने हिंदूच्या एका धार्मिक मिरवणुकीचा अपमान केला. पालखींतील देवच त्यांनी खालीं पाडला. फोर्जेटने त्यास ताबडतोब अटक केली. हा कैदी आपल्या तुकडीचा ताशेवाला ( ड्रमर ) होता. त्याच्या अटकेची वार्ता लागतांच, त्याच्या तुकडींतील त्याचे दोस्त तुरुंगावर चाल करून गेले, त्या ढोलकेवाल्याला त्यांनी सोडवून घेतले आणि बरोबर तुरुंगावरचेच दोन शिपाई घेऊन आपल्या कँपमध्ये निघून गेले. त्यावर पोलीसदलांपैकी एक युरोपियन कॉन्स्टेबल आणि चार एतद्देशीय पोलीस यांनी कँपमध्ये जाऊन आपले दोन सहकारी पोलीस व तो आरोपी ढोलकेवाला याला ताब्यांत देण्याबद्दल त्या सैनिक तुकडीजवळ मागणी केली,

त्यांना हातघाईने प्रतिकार झाला. पोलिसांनी आपले ते दोन सहकारी बान्धव मेलेत असें समजून, दोन हात करीत करीतच त्या कँपमधून आपला रस्ता काढला. अशा परिस्थितीला तोंड द्यावयास फोर्जेट हा एकच समर्थ अधिकारी होता. त्याने आपल्या युरोपियन पोलीस अधिकाऱ्यांना आपल्याबरोबर यावयास हुकूम केला. आपण स्वतः घोड्यावर नीटनेटकी स्वारी भरून, फोर्जेटने त्या बंडाच्या धुमीकडे म्हणजे सैनिक तुकडीकडे मोर्चा वळवला. आपल्या कँपमधून बाहेर निसटण्याची पराकाष्टा सैनिक करीत आहेत आणि त्यांचे अधिकारी हाती तलवार घेऊन थोपवित आहेत, असा देखावा फोर्जेटच्या दृष्टीस पडला. फोर्जेटला पाहतांच, सैन्याचे अधिकारी ओरडून म्हणाले, " देवाची शपथ आहे ! फोर्जेट तूं कृपा करून परत जा !! " फोर्जेट आपल्या घोड्यावरील स्वारीमधूनच ज्या वेळी त्या सैनिकांना प्रतिरोध करूं लागला, त्यावेळी सैनिकांची हालचाल थांबली. लवकरच फोर्जेटचा असिस्टंट आणि चोपन्न युरोपियन शिपाई तेथे येऊन दाखल झाले. फोर्जेटने हुकूम केला. " फाटकें उघडा. मी त्यांचा समाचार घ्यावयास खंबीर आहे. " या फोर्जेटच्या तयारीला हमरीतुमरीने ताबडतोब तोंड द्यावयास सैनिकांची तयारी नव्हती. पराक्रमाचे परमोच्चत्व विवेकांत असतें, याचा प्रत्यय त्यांनी आणून दिला.

थोड्याच दिवसांनी पोलिस कचेरीजवळ फोर्जेटने एक वधस्तंभ उभा केला. ज्यांना ब्रिटिश राजवटीबद्दल घृणा निर्माण झाल्याची शंका फोर्जेटला होती, त्या मुंबईच्या नागरिकांना तेथे एक वा अन्य कारणांसाठी आणवून, फोर्जेटने त्यांच्या मनावर बिंबवलें की, ज्यांच्या निष्ठेसंबंधी संशयाचें घर ब्रिटिश सरकारचे मनांत थोडें तरी होईल, तो कोणी कां असेना, त्याच्या कपाळी हा वधस्तंभ येईल. असें

झालें तरी कांही सैनिक गंगाप्रसाद (परदेशी) याच्या घरीं गुप्त बैठकी घेऊन कट करीत असल्याची बातमी फोर्जेटला लागलीच. फोर्जेटने गंगाप्रसादला अटक केली. दुसरे दिवशीं, गंगाप्रसादाच्या भिंतीला एक भोकसा होता त्यांतून पण भिंतीच्या आड उभे राहून ऐकल्यामुळे त्याला कळून चुकलें की आक्टोबरमध्ये दिपवाळीच्या मुहूर्तावर बंडाचें निशाण उभारण्याचा त्या सैनिकांचा बेत होता. त्या वेळी धनत्रयोदशीला शहर लुटावयाचें, आणि मगच मुंबई बेट सोडावयाचे असा एक आराखड्याचा भाग होता. फोर्जेटने हा रिपोर्ट दिल्यावर त्याच्याकडे कोणाहि जबाबदार अधिकाऱ्यास गंभीरपणाने लक्ष देण्याची आवश्यकता वाटली नाही. त्यामुळे फोर्जेटने मेजर बॅरोला आपल्याबरोबर गंगाप्रसादच्या घरापर्यंत चलण्याचा आग्रह धरला व त्याला घेऊन गेला. ब्रिगेडियर शॉर्ट यास सर्व हकीगत कळल्यावर तो उद्‌गारला की, " सरते शेवटीं फोर्जेटने आम्हाला धरलें खरें !! " मग ताबडतोब लष्करी न्यायमंदिराची कचेरी भरवली. मरीन बटॅलियनचा एक एतद्देशीय अधिकारी व दहाव्या एतद्देशीय फलटणीचा एक सैनिक यांना एस्प्लनेड मैदानावर नोव्हेंबर महिन्यामध्ये तोफेच्या तोंडीं देण्यांत आले आणि गंगाप्रसादासह त्याच्या सात साथीदारांना जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा सुनावण्यांत आली. मुंबई शहर गॅझीटिअरची पृष्ठें १५७ ते १५९ आणि सर डी. ई. वाच्छा याचे " मुंबईच्या वाळवंटांतील शिंपले " हे ग्रंथ अभ्यासकांनी वरील बाबतींत नजरेखालून घालण्यासारखे आहेत.

दक्षिणेंतील सैनिक मंडळींनी घेतलेल्या उठावांचें वरीलप्रमाणे निरीक्षण केल्यावर कांही प्रतिष्ठित व्यक्तींनी आपापल्या जबाबदारीवर उठावाला लावलेल्या हातभाराकडें लक्ष लागतें. त्यांपैकी अगदी प्रथम उल्लेख करावयास हवा तो बंडाचा एक नानासाहेब पेशवे यांच्या सहानुभूतिकांचा. १८५७ च्या सप्टेंबरमध्ये पुण्यांत एक अशी भित्तिपत्रिका लागली की पेशव्यांच्या बुधवार वाड्यांत रहाणाऱ्या युरोपिनांला यमसदनाला पाठविणारांस बक्षिसें देण्यांत येतील. दादोबा पांडुरंग तर्खडकरांच्या आत्मचरित्रांत पृ. २२३ वर सांगितल्याप्रमाणे त्याच भित्तिपत्रकांत असेंहि म्हटलें होतें की, नानासाहेब पेशवे लवकरच पुण्यांत येतील आणि पेशवाईचीं वस्त्रें धारण करून आपला राजकीय अंमल सुरू करतील. हा जाहीरनामा ऑगस्टच्या अखेरीस प्रथम तुळशीबागेवर व एका शाळेवरहि लागला होता म्हणून तुळशीबाग मंदिराला इनाम असलेलीं गांवें जमा करावीत आणि उपरि उल्लेखित शाळाहि बंद करावी, असा बूट निघाला होता. पण पुढे चौकशींत त्या संस्थांचा सदर प्रकरणी कांहीच संबंध नसल्याचें आढळून आलें, असें नगरच्या 'ज्ञानोदय' पत्राच्या १ एप्रिल १८५८ चे अंकांत म्हटलें आहे. मात्र, पुण्याच्या पोलिस सुपरिंटेंडेंटसाहेबांनी बंडाच्या उठावाला मदत करीत असल्याच्या संशयावरून एका

ब्रह्मचारी बुवास अटक करून ठेवल्याचें त्याच ज्ञानोदयाच्या १ मे १८५८ चे अंकावरून कळतें.

पुण्याला नुसता जाहीरनामा तरी लागला. पण गुजराथच्या विजापूर परगण्यांतील भिल्लांना कोणीतरी वजनदार आसामी बंडाची उठावणी देत आहे, असा इंग्रज सरकारला संशय होता. तो १९ आक्टोबर १८५७ रोजी मेजर व्हाट लॉकच्या कानाला एडूरचा राजा लागला तेव्हा बळकटच झाला भिल्ल लोक हव्या तितक्या संख्येने शपथपूर्वक आपल्या बंडाच्या उठावांत सामील झाले की, नानासाहेब त्यांच्यासह अहमदाबादेवर चाल करून येणार आणि तें शहर लुटून ती लूट भिल्लांना वाटून देणार, अशी एडूरच्या राजांची बातमी होती. ती ऐकल्यावर इंग्रज सरकार चिंतातुर झालें असल्यास नवल काय ? एवढ्याच कारणावरून नव्हे, पण नानासाहेब पेशव्यांच्या इतरहि हालचालीवरून नानासाहेब पेशव्यांना गिरफदार करण्यासाठी ब्रिटिश सरकार अगदी उतावीळ झालें होतें. म्हणून १५ एप्रिल १८५८ रोजी प्रथम गव्हर्नर जनरलने बक्षीस जाहीर केलें. त्याबावत लोकांतून फारशी कोणाची हालचाल दिसत नाही, असें पाहिल्यावर बक्षीसाचीं रक्कम एक लाख रुपयांची करण्यांत आली. त्यासरसा मात्र पुणे ऑब्झर्व्हरवरून माहिती कळते त्याप्रमाणे, तें बक्षीस मिळवण्याची खटपट माजी गणपतराव गायकवाड सरकार यांचे प्रसिद्ध दिवाण भाऊ तांबवेकर यांनी केली. तिचा वास लागतांच नानासाहेब पेशव्यांनी एक दिवस तांबवेकरावर झडप घालून, त्याला व त्याच्या सहा साथीदारांना सरळ फांशीं दिलें.

नानासाहेब पेशव्याप्रमाणेच तात्या टोपेहि दक्षिणेंत उतरत असल्याच्या बातम्या कमी नव्हत्या. बडोद्यापासून सांठ मैलावर असलेल्या उदेपुरास तात्या टोपे सहा हजार माणसांनिशीं चाल करून येत आहे अशी बातमी १८५८ च्या डिसेंबर महिन्याचे प्रारंभी पसरली होती. तेव्हा भीतीने बडोद्यांतील सर्व दुकानें व उद्योगधंदे आणि व्यवहार तीन दिवस बंद पडले होते, असें ता. १३ डिसेंबर १८५८ च्या ज्ञानप्रकाशावरून आढळतें.

कोल्हापूरच्या आळतें पेटचांतील वाठारचे निंबाळकरांचा एक वंशज बाजी साळुंखे या रिसालदाराने बंडांत भाग घेतल्याच्या संशयावरून त्याच्यावर सक्त नजर ठेवण्यांत आली होती, असा कोल्हापूर गॅझीटिअरमध्ये उल्लेख असून ता. १५ फेब्रुवारी १८५८ चा नगर येथील 'ज्ञानोदय' सांगतो की, नाशिक जिल्ह्यांतील त्र्यंबकेश्वराच्या देवळाचा एक पुजारी दामोदर रावजी या नांवाचा होता, त्याने बंडाचा उठाव करण्याचा प्रयत्न केला. आपल्या त्या भागाचा राजा व्हावयाचें त्याच्या मनांत होतें, असेंहि सांगतात. त्याच्या नशिबाने मात्र त्याला अटकहि

झाली व पुढे फांशींहि झाली. महाराष्ट्रांतल्या या अशा वैयक्तिक उठावापेक्षा गुजराथेंतील वैयक्तिक उठाव अधिक लक्ष वेधणारे आहेत. मागे उल्लेखलेल्या नानासाहेब पेशव्यांच्या स्फूर्तीने उठाव करणाऱ्या, गुजराथेंतील विजापूर महालांतील भिल्लाप्रमाणेच कोळ्यांनीहि कांही संघटना केली होती. ता. २२ आक्टोबर १८५७ पूर्वीच, त्यांच्या पुढाऱ्यांना गायकवाडांनी पकडले. त्या बंडखोरांचा पुढारी एक व्यापारी होता. बडोद्याचा मगनलाल तो. पैशाची तुंबडी भरून एक दिवस स्वारी डोंगरकपारीच्या तारींगा गांवीं एकदम उतरली आणि घोडे खरेदी करावयास व माणसें जमवावयास त्याने सुरवात केली. शंभर असामी आणि तीस घोडेस्वार घेऊन मगनलालची स्वारी बुरेनगरला पावली. तेथून तो विजापूरलाच आला. दिवसानुदिवस त्याचें सैन्य वाढतच होतें. त्याने पुकारा करून टाकला होता की, उत्तरेकडून अहमदाबादेवर उतरणाऱ्या सैन्याचे आपण फक्त वाटचालीचे म्होरके आहोंत. त्याच्याजवळ दोन हजार सैन्य आणि दीडशे घोडेस्वार झाल्यावर तो मानसाकडे चाल करून जाऊं लागला. वाटेने तो एकजात जंगलांतून तळ टाकित जाई आणि ठराविक माणसाचें अन्न गांवांगांवांतून मागवी. लोद्रा या गांवाने त्याच्या मागणीला विरोध केला, तेव्हा लढत झाली. लोद्राचे दोन लोक कामाला आले आणि चार जखमी झाले.

तेथून अहमदाबादला मगनलाल जावयाचा होता. वाटेंत साबरमतीच्या कांठावर एक जुना किल्ला असलेले एन्डोसी नांवाचें फार बळकटीचें गांव होतें. साद्रा गांवावरहि हल्ला चढवावा, असें स्वारीच्या मनांत होतें. तें त्याला काबीज करावयाचें होतें. या दोनहि ठिकाणी सैन्यें धाडण्यांत आलीं. इंग्रजांचा मेजर अगार हाहि साद्रा येथे शंभर कोळी पोलीस व हुसेनखानाने पुरवलेले शंभर लोक घेऊन मगनलाल यास सामना द्यावयास आला. पण दरम्यान मान्सा येथूनच मगनलाल यांस सोडून जाण्याची दक्षता भोंवताली जमलेल्या लोकांनी घेतली होती. त्यामुळे साद्राकडे न वळतां उत्तरेकडे निसटून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या मगनलालला सम्मळ येथे गायकवाड या ठाणेदाराने अकरा असामी, पांच घोडेस्वार आणि कांही दारूगोळा यांसह पकडलें. त्यानंतर त्या सर्वांना " कादी " येथे नेण्यांत आलें. जनरल रॉबर्टस् व हॅडो ( अहमदाबादचा कलेक्टर ) यांच्यापुढे त्यांचा खटला १८५७ च्या १४ व्या कायद्याप्रमाणे चालून त्यांच्या पैकी तिघांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें, तिघांना फांशी झाली व बाकीच्यांना जन्मठेप हद्दपारी मिळाली.

मगनलालप्रमाणेच बडोद्याच्या जव्हेरी निहालचंद फत्तेचंद या शेटजींनी खेडा जिल्हयांतील माहीच्या कांठच्या कोळ्यांचा उठाव करण्याचें मनावर घेतलें होतें. बडोदा दरबारने निहालसिंगाला चतुर्भुज केल्यावर त्याने सांगितलें की " गोविंदराव गायकवाडांचे मेहुणे बडोद्यास आले, कँटोनमेंटमध्ये राहिले व मगनलालशीं गुफ्तगू

करून गेले." त्यासरसा घराचा मालक, गोविंदरावाचा मेहुणा व मगनलाल हे अहमदाबादच्या उत्तरेस कोळ्यांचा उठाव करणेस गेले आणि निहालचंद वगैरे मंडळींनी माहीमकडचा कार्यभाग पत्करला. प्रतापपूर येथे सहाशे मंडळी जमली होती. त्यावेळी दिल्ली नुकतीच बंडवाल्यांच्या हातांत पडली होती. पण मुसलमानांनी चहाडी केली व पंचवीस एक मंडळींना पकडण्यांत आले. या पकडापकडीने बडोदा शहरांत लोक भयभीत झाले. निहालसिंगाचे सगळे बेत कॅप्टन हॅच याचा तोफखाना आणि अहमदाबादेहून ८९ क्रमांकची फलटण येतांच जागच्या जागीं जिरले. गोजावरून ते आले होते.

वरील मंडळी कांही प्रतिष्ठेची तरी मानली जातील; पण दोहदला झालेलें बंडाच्या उठावाचें काम तर तुलेयादरखान याच्यासारख्या अगदी सामान्य माणसानें उभें केलें होतें. इंदोर येथे बंडाचा उठाव झाल्याची बातमी पंचमहालमध्ये पोंचण्याचा अवकाश, शिंद्याच्या अखत्यारींतील त्या भागचा एक कानुगा आणखी कांही मुसलमोन वतनदार यांनी आपले अनुयायी जमविले आणि दोहद येथील कॅप्टन बकलच्या ठाणेदारावर हल्ला दिला चढवून ! दोन तोफा आणि एतद्देशीय आठव्या फलटणीचे दोनशे लोक घेऊन, ता. ६ जुलै १८५७ रोजी तुलेयादरखान या कानुगाने उभारलेल्या त्या बंडाचा बीमोड करावयास, कॅप्टन बकल ता. ८ जुलै रोजी निघाला. आणि ता. १३ रोजी दोहदला पोचला. कॅप्टन बकलने एवढीहि काळजी घेतली नसती तर गोध्र्याचे मुसलमानांनीदेखील उचल खाल्ली असती ! ता. १३ रोजी बकलने किल्ल्याचा ताबा घेतांच, सगळे असंतुष्ट पार पळून गेले. तेव्हा तुलेयादरखानाचे कृत्याने इनाम २५०० रुपयांचें होतें, ते ५०० वर आलें. मामलेदार आणि इतर अधिकारी यांना किल्ल्यांत कोंडून ठेवले होते, तेथेच शिंद्यांचे चवदा पोलिस होते, सुभेदार हुसेनशहा खान आणि आठ पठाण, चोवीस कुसबती आणि चवदा स्वार होते. या सर्वांना ता. ६ पासून ११ पर्यंत बंडवाल्यांनी झगडा करून जेरीस आणले होते. सरकारी कागदपत्रांचा ताबा बंडवाल्यांनी मागितल्याबरोबर मामलेदाराने दिला होता. हेतु असा की, त्यायोगे आपल्याला बंडाचा कांही सुगावा लागावा. तिघे देसाई, काजी, पुधी हवालदार कारकून, सूदीचंद शेठजी आणि वूणा मेहता हे दोघे पेढीवाले, इतकी मंडळी ता. ७ रोजीच किल्ल्याच्या बाहेर पडली होती आणि कानुगाला त्यांनी विचारलेंहि होतें की, बंड करावयास शिंद्यांनी कांही अधिकारपत्र त्याला दिलें होतें की, काय ? कानुगाने उत्तर केलें होतें की, "जिल्ह्याचा ताबा घेणेंच अपरिहार्य होतें" आणि त्या उत्तराबरोबर सुभेदार हुसेनखान बंडखोरास मिळाला होता. कॅप्टन बकलने किल्ला ताब्यांत घेतल्यावर राजद्रोहाच्या आरोपाखाली पंधराजणांना कैद केले. त्यांपैकी एकजणाला चौदा वर्षांची हद्दपारी, चौघांना तोफेच्या तोंडीं, नऊ जणांना जन्मठेप

काळेपाणी अशा शिक्षा होऊन एकजण निर्दोषी सुटला. या सर्व शिक्षा ता. २४ ऑगस्ट रोजी अमलांत आल्या.

वरील मंडळींच्या जोडीला महाराष्ट्रांतील खाजीसिंगाच्या कर्तबगारीचाहि उल्लेख केला पाहिजे. १८५७ च्या आक्टोबरमध्ये हा खाजीसिंग बंडखोर भिल्लांना मिळाला. सदर इसम हा एक वजनदार नाईक होता. त्याच्या अनुयायांची संख्या मोठी. त्याने सुलतानपूर, थुलनायर आणि चोपडा तालुक्यामधील गांवें लुटलीं. खानदेशांतील या कामगिरीला भर म्हणून त्याने मुंबई-आग्रा रस्त्यावरील तारा तोडविल्या आणि प्रवास म्हणून कसा तो अशक्य करून सोडला ! ! सदर रस्त्यावरून आठ लाखांचा खजिना तीनशे लोकांच्या पहाऱ्यांत जाणार असल्याची बातमी खाजीसिंगाला लागतांच, त्याने आपल्या सरंजामानिशीं वाटमारीचा घाट घातला आणि सगळा खजिना लुटला, मग त्याने पठाण रोहिल्यांनी एक पगारी फलटणच्या फलटण तयार केली आणि होळकरांकडील बंडखोरांनाहि त्याने सामील करून घेतले. असें त्याचें सैन्य पांच हजारांपर्यंत झालें. या सैन्याला नवव्या एतद्देशीय फलटणीला घेऊन मेजर इव्हॅन्स याने अम्बापाणी येथे तळ ठोकून तोंड देण्याचें ठरविलें. ता. १० एप्रिल १८५८ रोजी खाजीसिंगाच्या सैन्यावर इव्हॅन्सने हल्ला केला. सात तास लढा झाला. ब्रिटिशांचे सत्तर लोक कामास आले. रक्तपाताच्या डोहांतून रस्ता काटीतच इव्हॅन्सला खाजीसिंगाचा समाचार घ्यावा लागला. नाइलाज झाला तेव्हाच खाजीसिंग शरण गेला. १८५७-५८ सालच्या ब्रिटिश इंडियाच्या कारभारी अहवालांतील हकीगत वरील प्रकरणासंबंधांत कलकत्त्याच्याच दफ्तरखान्यांत अभ्यासूंना सांपडेल व खाजीसिंग हें एकंदर प्रकरण काय होतें याची नीट कल्पना येईल.

वरील मंडळीशिवाय २६ आक्टोबर १८५७ ला लष्करी खटल्यांत दोहद येथे पंचमहालचा मुनीराम शाळीग्राम या ब्राह्मण पोलिस नाईकाला गोध्रा येथे तोफेच्या तोंडीं दिलें. अशी आपापल्यापरीने बंडखोरीचीं उदाहरणें कमी नसतील. पण, फितुरीचीं उदाहरणेंहि कांही कमी नाहीत. आतापर्यंत आलेल्या इतिहासांतील तसल्या पुरुषांचा उल्लेख लक्षांत येईलच. पण शिवाय, अहमदाबादचे १८६०-६१ चे सुमाराचे कलेक्टर फॉसेट यांना कॉंटिनेंटल् कस्टम्स आणि एक्साईजचा एकवेळचा कलेक्टर जॅक्सन याने जें पत्र लिहिलें होतें, याचा उताराच येथे केला म्हणजे परधार्जिणे चहाडखोर कसे होते व इंग्रजांनी ते कसे जवळ केले होते, याचेंहि चित्र विचारवन्तांच्या पुढे स्पष्ट होईल. फॉसेटला जॅक्सन लिहितो की–

" १८५७-५८ च्या घडामोडींच्या काळांत, हुसेनखान अहमदाबादेस होता आणि स्थानिक अधिकाऱ्यांना त्याने बंडखोरांच्या हालचाली, आराखडे आणि हेतु

यांची विश्वासार्ह माहिती देऊन स्थानिक अधिकाऱ्यांना बहुमोल मदत केली. त्यावेळी बंडखोरांच्या असंख्य टोळ्या होत्या. एकाला लागून एक असलेल्या संस्थानांतून त्या आश्रय घेत. लपून छपून कधी कधी त्या परराष्ट्रीय मुलखांतहि मधून मधून नांदत. ब्रिटिश जिल्ह्यांवर हल्ला करून योग्य वेळी अराजक माजविण्यासाठीच योग्य संधि साधण्याचाच त्या बंडखोरांचा हेतु वरील तऱ्हेने वागण्यांत होता.

त्यामुळेच हुसेनखानाच्या सल्लामसलतीनेच आणि मुख्यतः म्हणजे त्याच्याच मदतीने फारच थोड्या काळांत दोन हजार शिबंदी आणि शंभर घोडेस्वार यांची फलटण तयार करणेंत आली. या सैन्याच्या खर्चासाठी हुसेनखान याच्याच सूचनेवरून गांवांतील लोकांकडून वर्गणी गोळा करण्यांत आली. आमचें सामर्थ्य वाढावें आणि त्याच प्रमाणांत आमच्या सामनेवाल्याचें कमी व्हावें हा हेतु धरून, ब्रिटिश राज्यांतील असंतुष्टांनी परक्या कोणाला आपल्या मदतीस बोलवूं नये, त्यांचा तो मार्गच खुंटावा, यासाठी ती वर्गणी होती. लष्करच्या नोकऱ्या धुंडत फिरणाऱ्या परदेशी लढवय्यांच्या टोळ्या त्यावेळी बेकारीमुळे हिंडतहि असत. हुसेनखानाने जमवून आणलेले रंगरूट गुजराथेंतील अनेक भागांत, विशेषतः महीकांठा व पालनपूर जिल्ह्यांत ब्रिटिश सरकारने सुरजमल ठाकोरच्या वगैरे विरुद्ध उपयोगांत आणलेच."

निजामच्या राज्यांत जवळ जवळ वीस हजार लोक जून–जुलै १८५७ पूर्वीच बंड करावयास तयार होते. औरंगाबाद, बुलढाणा येथे ता. १२ जुलैपूर्वीच कित्येकांस फांशीं तर कित्येकांस तोफेच्या तोंडीं देण्यांत आल्याकारणाने, दहशतीने लोक दबले. इंग्रजविरोधाची त्यांची परंपरा एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभा–पासूनच म्हणजे वसईच्या तहापासूनच होती. राजा महिपतराम, इस्माईल यारजंग, रावरंभा निंबाळकर, नुरुल उमरा हीं मंडळीं १८०० साली बारा आक्टोबरला निजामाशीं जो इंग्रजांचा तह झाला, त्याचें तुकडे झाले पाहिजेत, असें निमित्त करून उचल करीत होती. खुद्द तैनाती फौजेंत आणि राखीव सैन्यांत १८२७, १८४१ व १८५२ या वर्षी इंग्रज अधिकाऱ्यांचे खून व कित्येकांवर प्राणघातक हल्ले हा क्रम होऊन बसला होता.

१८५७ च्या मे महिन्याचे कितीतरी अगोदर हैद्राबादेंत इंग्रजविरोधी कारस्थानें शिजत होतीं. त्यांत हिंदु-मुसलमान दोन्हीं जमाती होत्या. १८५९ मध्ये रंगराव रत्नाकर पागे नरखेडकर याचें कारस्थान उघडकीस आलें. १८५७ च्या जानेवारींत नानासाहेब पेशव्यांचे नांवें पत्रें लिहून जहागिरदार सोनाजी पंडिताने रंगरावाला ब्रह्मावर्तास पाठविलें होतें. नानासाहेबांकडून रंगरावाने आज्ञापत्रें

मिळविलीं. " हिंदु व मुसलमान लोकांनी दीनासाठी बिघडून इंग्रज लोक यांस परागंदा करणेचा इरादा धरून सर्वत्रांनी दीनांकडे ख्याल करून इंग्रज लोक याचा नाश करावा " अशा आशयाचीं तीं पत्रें असत.

ता. १२ जून १८५७. औरंगाबाद येथे तैनात असलेल्या कॉन्टिजंट फौजेचें तिसरें घोडदळ मालेगांवला पाठविण्यांत आलें होतें. हें घोडदळ दिल्लीच्या बादशहाविरुद्ध पाठविण्यांत येणार असा रंग दिसतांच, लोक चिडले. जनरल वूडबर्नच्या नेतृत्वाखाली बंडखोरांचें पारिपत्य करण्याकरतां इंग्रजाने सेना धाडली. कॅप्टन ॲबटवर एका सैनिकाने गोळी झाडली. त्याला दुसरे दिवशीं फांशीं झाली. ९४ शिपाई पकडण्यांत आले. महिनाभर चौकशी झाली. तिघांना तोफेच्या तोंडीं, एकवीसजणांना गोळ्या आणि चाळीसजणांना हद्दपारी व बाकीच्यांना चाबकाचा चोप मिळाला. १७ जुलै १८५७ रोजी पांच हजार लोकांचा जमाव रेसिडेन्सीवर चालून गेला. आंतून तोफांचा भडिमार झाला. बंडखोरांपैकी बत्तीस कामीं आले. अल्लाउद्दीन व तुर्रेबाजखान यांना पकडण्यांत आले. काळ्या पाण्यांतून अल्लाउद्दीन निसटला. त्याला पकडण्याच्या प्रयत्नांत १८५७ चे जानेवारींत त्याचा खून झाला. त्याचें प्रेत हैदराबादेंत सार्वजनिक ठिकाणी टांगून ठेवण्यांत आलें होतें.

१८६२ मध्ये हैद्राबाद येथे रावसाहेब पेशवे अचानक येऊन त्यांनी उठावणी करण्याचा प्रयत्न केला. बेगमबझारांत नर्मदागीर गोसावी यांच्या मठांत ते राहिले होते. पण फितुरी दगा देत आहे, असें दिसतांच रावसाहेब निसटले.

आणि असें असलें तरी सरंजामशाहीच्या त्या काळांत अगदी सामान्य माणसांपर्यंत ब्रिटिश राजवटीबद्दल असंतोष पसरला असल्याकारणाने रानटी म्हटल्या गेलेल्या मंडळींनीहि ब्रिटिश सरकारविरुद्ध कसें हत्यार उपसलें होतें, हें पाहणें मोठें रम्य आहे. मागासलेल्या लोकांचा तो सामुदायिक उठावहि १८५७ च्या क्रांतिकाळांतील एक बोधप्रद प्रकरण आहे.

[ १६ ]

# शेवटच्या थरांतील विरोध

ब्रिटिश राजवटीबद्दलचा असंतोष समाजाच्या अगदी खालच्या तळापर्यंत कसा पोंचला होता, याचें प्रत्यंतर खाजीसिंगाच्या उदाहरणावरूनहि आले असेल, तसेंच त्याच्याच थोड्या फार मदतीनें व एक रजपूत जमीनदार कल्लूबुवा याच्या मदतीने भिल्लांचा पुढारी भीमा नाईक याने केलेल्या उठावावरूनहि ब्रिटिश रियासतींतील प्रजेच्या बेदिलीचें प्रत्यंतर येईल.

बुखाणी संस्थानचा एक आश्रित असा हा भीमा नाईक, खानदेशांतील सुलतानपूर तालुक्यांत बंडाचें निशाण उभारून लुटालूट करूं लागला.

लेफ्टेनंट कॅनडी याने भिल्लांचीच एक तुकडी घेऊन भीमा नाईकावर हल्ला चढवतांच, भीमाचें महत्व एवढें वाढलें की कॅनडीचा हल्ला तर फोल झालाच, पण नर्मदेचे उत्तरेकडील एक रजपूत जमीनदार कल्लूबोवा याने अरकाणी परगण्यावर हक्क मांडून त्या भागांतील भिल्लांना बंडास प्रवृत्त केले. ब्रिटिशांची राजवट हिंदु संस्थानांतून खलास झाली, अशी समजूत करून घेऊन, भिल्ल कामाला लागले. तेथील शेतसाराहि कल्लुबुवाने वसूल केला. व सार्वभौमाचें सर्व अधिकार गाजवले. पुढे कॅप्टन सीली याने येऊन त्याचा समाचार घेतला.

भिल्ल, कोळी, रामोशी, रोहिले, अरब, ठाकूर सर्वचजण बंडांत भाग घ्यावयास पुढे सरसावले. यांपैकी पुष्कळसे दक्षिण नाशिक आणि उत्तर नगर या प्रदेशांतीलच होते. यांची संख्या सातएक हजार होती. त्यांच्या नाईकमंडळींनीच मुख्यतः त्यांचा उठाव केला होता; पण त्र्यंबकेश्वराचा पुजारी दामोदर रावजी यांच्या सारख्याचा हातहि या उठावाला कमी नव्हता. सिन्नर भागांतील भागोजी नाईक शिंगटे याच्या पुढारीपणाखालील उठाव हाच १८५७ च्या बंडांतील भिल्लांचा पहिला उठाव म्हणण्यास हरकत नाही. हा भागोजी नाईक शिंगटे १८३८ पासूनच असल्या राजकीय उठाठेवींच्या गटांत असे. ता. ७ आक्टोबर १८५७ रोजी अहमदनगर जिल्ह्यांतील चारशे भिल्लांनी पालणशेर हें खेडें लुटलें. त्यांनी तारा तोडल्या. भीमा नाईकाच्या नेतृत्वाखाली आठशे भिल्लांनी, ता. १२ आक्टोबर १८५७ चा पुणें ऑब्झर्व्हर म्हणतो त्याप्रमाणे सर्व वहातूक बंद पाडली. व ब्रिटिश सरकारवर आपत्काळ ओढवून ठेवला. भागोजी नाईकांचे टोळीने तर कहर मांडला. सप्टेंबर १८५७ च्या शेवटी शेवटी तें ब्रिटिश सरकारच्या डोळ्यांवर सिन्नर भागांत चांगलेंच आलें. तेव्हा ४ आक्टोबर १८५७ रोजी त्यांच्यावर लेफ्टेनंट हेन्रीचे देखरेखीखाली अहमदनगरच्या पोलीस तुकडीने हल्ला चढविला.

पण भिल्लांनी दिली हुलकावणी. संगमनेरजवळील चंदनपुरीचे टेकडीवर हेन्री संपला. खानदेशांतील महादेवाचे डोंगरावर भागोजीने ठाण मांडलें. कर्नल थॅचर व मॅकन यांनी शिकस्त करून त्याला डांग-मध्ये पळावयास लावलें. टाइम्स ऑफ इंडियाच्या १७ आक्टोबरचे अंकांत म्हटल्याप्रमाणे ता. ११ आक्टोबर १८५७ रोजी भिल्लांनी नाशिक जिल्ह्यांतील तासगांवचा बाजार लुटला आणि तीन व्यापाऱ्याकडून तीनशे रुपये छिनवले; दहा मण गहूं व बाजारांत होतें नव्हतें तेवढें सर्व कापड खाकेंत मारून नेलें टाईम्स ऑफ इंडियाचे १९ आक्टोबर व ज्ञानप्रकाशचे २ नोव्हेंबर १८५७ मधील वरील प्रकारासंबंधीची हकीगत वाचण्यासारखी आहे. त्यानंतर ३ डिसेंबर रोजी कॅप्टन नट्टॉल हा १६० पायदळ व १५० घोडदळ घेऊन भिल्ल मेळावा करून राहिले होते, त्या सुलगाणें गांवावर चाल करून गेला. तोंच ६ डिसेंबर १८५७ ला बातमी आली की, भिल्लांनी आणि ठाकूरांनी त्र्यंबक येथील खजिना लुटला. या भिल्लांपैकी एक पांडुरंग होता. पुढे धरपकड झाल्यावर त्याने कबूल केलें की हें सर्व बंड करावयास आम्हांस ब्राह्मणांनी प्रोत्साहन दिलें. ता. १२ डिसेंबर रोजी "हरशाळा" वर हल्ला झाला, सरकारी दफ्तर जाळून भस्मसात् करण्यांत आलें, कारकूनांस अद्दल घडली. कॅप्टन नट्टॉल यांस पळतां भुई थोडी झाली. दुसरे दिवशीं म्हणजे ता. १३ डिसेंबर रोजी भागोजी नाईक साठ माणसें घेऊन तेथे गेला. मग तारीख १९ डिसेंबरला सुरतेहून कॅप्टन वॉकरचे नेतृत्वाखाली कुमक आणवणें इंग्रजांला भागच पडलें. मग सर्वत्र शांतता झाली असें दिसतें !

याच वेळेला पेठ येथील बंडाव्याचा एक पुढारी भवानराव नीळकंठराव ऊर्फ भाऊराजा या नानासाहेब पेशव्यांचा पत्रव्यवहारी सहकाऱ्याला त्याच्या पंधरा अनुयायांसह १५ डिसेंबर १८५७ रोजी नाशिक येथे फांशी दिल्याची वार्ता आली. या वार्तेने आणि कॅप्टन वॉकरच्या मोहिमेने सगळ्या भिल्ल जनतेंत खळबळ उडवून सोडली. अहमदनगर जिल्ह्यांतील राहुरीच्या पुथर्जी नाईकाने शंभरएक भिल्लांची तुकडी उभारली होती. ती दि. १८ आक्टोबरच्या सुमाराला. त्याला स्फूर्ति भागोजी नाईकांचीच होती. अहमदनगर जिल्ह्यांतील समशेरपूरचे डोंगरांत भागोजी नाईकाची मंडळी आणि ब्रिटिशांचें सैन्य, यांची चकमक पुथर्जीने न्याहाळली होती. ता. २० डिसेंबर १८५७ रोजी कॅप्टन् नट्टॉल आणि भागोजी नाईकाचा भाऊ महिपत नाईक यांचा सरळ सामना झाला. त्यांत महिपत नाईक कामास आला. तरी त्याने कॅप्टन् नट्टॉलचा घोडा निकामी करून सोडला. दुसऱ्या चकमकींत दुसऱ्या एका बंडखोराने कॅप्टन् नट्टॉलचा दुसरा एक घोडा निकामी केला. अशारीतीने हल्ल्यावर हल्ले होत असले तरी भागोजी नाईकाची अनुयायी मंडळी वाढतच चालली. ता. २० जानेवारी १८५८ रोजी नांदगांव भागांतील माणद्वारा

जवळ मेजर मॉंटगॉमेरी भिल्ल, रोहिले व अरब यांचेवर चालून गेला. पण त्या कामीं झालेली ब्रिटिशांची नुकसानी न मोजण्याइतकी मोठी झाली ! मग ब्रिटिश सरकार चांगलेंच चिडलें. एक महिन्याच्या आंत म्हणजे ता. १९ फेब्रुवारी १८५८ रोजी कोळी लोकांची एक मोठीच मोठी फलटण घेऊन मेजर पॉटिन्जर व कॅप्टन नट्टॉल यांनी निजाम हद्दीवर असलेल्या काका–साकीच्या किल्ल्यानजीक झुडुप जंगलांत भागोजीच्या सैनिकांवर हल्ला चढविला. सबंध १८५८ आणि १८५९ च्या पुष्कळशा काळांत कॅप्टन नट्टॉल तरी भागोजीच्या मागे हात धुवून लागला होता. ४ जानेवारी १८५९ रोजी कॅप्टन नट्टॉल याने अजंठापर्यंत चाल नेली. तेथे दोन तीन हजार रोहिले जमले होते. त्यांनी कॅप्टनसाहेब येण्यापूर्वीच गांवें लुटून पोबारा केला होता. एप्रिल व मे १८५९ मध्ये भागोजी नाईक व हरजी नाईक यांनी अमली लूट चालवलीच.

अम्मोदऱ्याजवळ ५ जुलै १८५९ रोजी संगमनेरच्या आग्नेयीस आठ मैलावर, भागोजी व हरजी नाईक यांनी बळकट ठाण मांडलें. इंग्रजांशी त्यांच्या अनेक चकमकी झाल्या. त्यांत भागोजीचा मुलगा यशवंत कामास आला व हरजी नाईक इंग्रजांच्या कैदेंत पडला. तरी भिल्लांनी चिकाटी सोडली नव्हती. आक्टोबर १८५९ मध्ये भागोजीला मिळण्यासाठी निजामच्या सरहद्दीवर ते एकत्र मिळून राहिले होते. ता. १६ आक्टोबर रोजी भागोजीने कोपरगांव भागांतील कोर्हाळा गांव कबजांत घेतांना कर्नल ग्रॅहॅम व चॅपमन् यांना जखमी केलें. कॅप्टन् नट्टॉलने त्याचेशीं एक पंधरवडा सामना केला आणि त्याला कोकणांत हटविला. ता. ११ नोव्हेंबर १८५९ रोजी सिन्नरच्या आसपास मीठसागरजवळ भागोजीचे बंडखोरावर इंग्रजांनी चाल केली. तेथील नदीच्या खोल खडकाळ पात्रांत भागोजी इंग्रजांच्या आटोक्याबाहेर नांदत होता. त्याच्यावर तोफेच्या गोळ्यांचा नुसता वर्षाव करण्यांत आला. त्यांतून ज्या थोडयाफार लोकांचें जीव वाचले, त्यांना त्या खडकाळ पात्राबाहेर पडण्याची परवानगी देण्यांत आली. भागोजीला शरणाई मरणप्राय होती. त्याचें मरण ओढवलें. निजाम हद्दींतील भिल्लांची लेफ्टेनंट पेडलर याने दाणादाण उडवून दिली. ती तारीख २० नोव्हेंबर १८५९ होती. त्याच्या अगोदर ९ च दिवस नेवाशें गांवाहून ता. १२ नोव्हेंबर रोजीच भागोजीचा एक नातेवाईक त्याला मदतीचा हात देण्यास निघाला होता. भागोजीच्या मृत्यूची बातमी ऐकून तो खानदेशकडे पतरला. पुढे भागोजीच्या सर्व मंडळींना आस्ते आस्ते आपापल्या गांवीं परतावयास इंग्रजांनी परवानगी दिली तरी भागोजीच्या या नातेवाईकाला म्हणजे प्रत्यक्ष कांहीहि इंग्रजांचा अपराध न केलेल्या म्हारडयाजीला इंग्रजांनी पकडलें व फांसावर चढविलें. अहमदनगर, नाशिक, खानदेश गॅझीटिअरांतून, भागोजीचें बंडासंबंधीची हकिगत अभ्यासूंनी वाचण्यासारखी आहे.

तथापि इंग्रजांना हालवून वा हाकलून आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या असल्या किरकोळ मंडळींच्या प्रयत्नांपेक्षा सर्व हिंदुस्थानभर बंडाचा डोंबाळा उठलेला पाहून बेभान झालेल्या इंग्रज सरकारनी निःशस्त्रीकरणाचा जो बूट काढला, त्यामुळे खालचा समाज जेवढा चिडला, तेवढा वरचा समाज चिडला चरफडला नाही. याबाबत ता. १५ जुलै १८५८ चा ज्ञानोदय म्हणतो की "मुंबई इलाख्यांत लोकांच्या हातांतील शस्त्रास्त्रें आता काढून घेण्यांत येत असून घिसाड्या-कडून त्या शस्त्रास्त्रांचा चक्काचूर करण्यांत येत आहे." इंग्रजांच्या डोक्यांत प्रजेच्या नि:शस्त्रीकरणाची ही कल्पना १८५७ च्या जून-जुलै पासूनच घोळत असावी. आस्ते कदम त्यांनी ती कशी अमलांत आणली हें पहाणें मोठें उद्बोधक आहे.

ता. १५ जुलै १८५७ रोजी गुजराथेंतील लुणावरा संस्थानच्या गादीवर आपला हक्क आहे, असें सांगून कोणा एका सूरजमल याने त्या शहराला घेरलें. सूरजमल याने आपलें नेहमीचें राहण्याचें ठिकाण डाकोर सोडूं नये व आपल्या अमलाखालील हद्दींत तर मुळींच प्रवेश करूं नये, असा इशारा कॅप्टन बकल याने त्याला अगोदरच दिला होता.. पण सूरजमलने बकल यांस कांही टाळाटाळीचीं उत्तरें देऊन पल्ला गांवच्या चरण-इनामदाराचे येथे आधार मिळविला होता. कान्हादास हें त्या इनामदाराचें नांव. हा कान्हादास लुणावरच्या राजाचा पक्का शत्रू होता.

एवढे झाल्यावर कॅप्टन बकलने मेजर अॅन्ड्र्यूजकडे ऐनजिनसी तें इनाम गांवच उडवून लावण्याची कामगिरी सोंपविली. अँड्र्यूजचे हुकुमाप्रमाणे लेफ्टेनंट एफ्. एल्. आलबन याने छोटीशी तुकडी बरोबर घेऊन पल्ला गांवचा पल्ला गांठला व वेशीवर तळ दिला. नंतर त्याने सर्व गांवाला घोडेस्वारांचा वेढा दिला आणि गांवांतील प्रत्येक घराची झडती शस्त्रास्त्रें तपासण्यासाठी घेतली. दोन तासाच्या आंत बायका मुलांनी घराच्या बाहेर पडावें, असा प्रथम त्याने जाहीर हुकूम केला. गांवच्या पाटलाने तें घडविलें. लेफ्टेनंट आलबन याने सर्व गांव पेचकटून धरलें. थोड्याच वेळांत त्याने तें सर्व गांवच धुळीला मिळवण्याबद्दल हुकूम सोडले. दरम्यान बापू परताळ या नांवाचा एक चारणहि लेफ्टेनंट आलबन याने कैद केला. हेतू असा की सूरजमलच्या हालचालींची कांही बातमी आपणांस लागावी. गुजराथें-तीलच दुसरें उदाहरण खानापूरचें आहे. तेथील पाटलास सरकारचें बोलावणें आले. बोलावणें करावयास आलेल्या घोडस्वाराचाच पाटलाने अपमान केला. त्याला मृत्यूचीच धमकी दिली. त्यामुळे त्या गांवाला धडा देऊन सरकारच्या रागाचें एक उदाहरण प्रजेपुढे ठेवण्याचा निश्चय असिस्टंट पोलिटिकल एजंटने केला. कॅप्टन सी. बकलने लिहिलें की "खानापूर आणि शेजारच्या डोंगराळ भागांतील व जंगलांतील कोळी लोकांना लुणावरा येथील राजाने कधीच काबूत आणले नव्हते. लुणावराच्या राजाशीं त्यांचें प्रजेचें नातें नुसतें नांवापुरतें चालत

आलें आहे. म्हणून त्या राजाकडून उपाययोजना करवणें अगर त्याच्या सहकार्याची अपेक्षा करणें चूक आहे " म्हणून सी. बकलने मध्यरात्रीला आपली चाल सुरू केली. लोकांना आश्चर्याने घेरले. पहाटेच्या वेळी खानापूरच्या प्रत्येक महत्वाच्या घराभोंवती घोडेस्वाराचा पहारा बसला. गांवचा पाटील, दुसरी मंडळी यांना पकडण्यांत आलें. नंतर सगळें गांवच पेटविण्यांत आलें. गांवाचें भरपूर वाटोळे झालें आहे, असें आढळून आल्यावर घोडेस्वारांना परत फिरण्याचा हुकूम झाला. या सर्व प्रकाराने शेजारील प्रदेशांतील कोळी मंडळींत खळबळ उडून गेली. म्हणून बकलचे घोडेस्वार परत जात असतां त्यांनी त्या तुकडीच्या आघाडी पिछाडीस हल्ले चढविले. लेफ्टेनंट मोरे यांच्या बंदुकीने एकाचा बळी घेऊन दोघातिघांना जखमी झालेले पाहिल्यावर कोळी मंडळी जंगलांत गडप झाली.

बकलच्या घोडेस्वारांची तुकडी मही नदींत शिरून ती पार पडत असतांच त्यांच्या पिछाडीवर कोळी मंडळींनी झडप मारली आणि मग जो संग्राम झाला त्यांत कोळी मंडळींची दाणादाण उडाली. झुडपाझुडपा गणिक हल्लेखोरांचा पाठ-लाग करण्यांत आला. दोन्ही बाजूचें नुकसान लक्षांत भरण्यासारखेंच झालें. महीच्या उत्तर किनाऱ्यावर पोंचल्यावर कांही काळ लढा स्थगित होता; पण पुढे कोळी मंडळी सुद्धा पळावयालाहि कंटाळली आहेत हें लक्षांत येतांच इंग्रज घोडेस्वारांनी पाठलाग नेटाने चालविला. पुढे सरकारच्या विरुद्ध बंड केल्याच्या आरोपावरून पाटलावर खटला चालविण्यांत आला. त्याला निर्णयाबरोबर गोळी घालण्यांत आली. ज्याने बंडाला उत्तेजन दिल्याचें सिद्ध झालें, अशा दुसऱ्या एका माणसाला जन्मठेप काळ्या पाण्यावर पाठविण्यांत आले. हा सारा प्रकार डिसेंबर १८५७ मध्ये घडला.

मग तर प्रजेला निःशस्त्र करण्याचा निश्चयाचा पारा जास्तच चढला. पण कानेरिया गांवाने त्या बाबतचा हुकूम धाब्यावर बसवला. कानेरिया हा गांव चोरांचा बाजार म्हणून कुप्रसिद्धच होतें. ब्रिगेडियर जनरल शेक्सपीयर याने मेजर व्हाईट लॉक यास असा हुकूम सोडला की कान्हेरिया गांवी जाऊन तेथील प्रति-ष्ठेच्या म्हणून जेवढ्या गोष्टी असतील, तेवढ्या सर्व मातीला मिळवावयाच्या आणि सर्व लोकांना गांवाबाहेर उघड्यावर जाऊन रहावयास सांगावयाचे. सर्व पडझड होत असतांना इंग्रजाचें घोडदळ अडकून पडूं नये; पण लोक एकदां बाहेर पडले म्हणजे त्यांनी आपलीं सर्व शस्त्रास्त्रें सरकारच्या स्वाधीन करावीत आणि गांवावरून गाढवाचें नांगर फिरवावेत. मही नदीच्या कांठचें उगार आणि खेडा जिल्ह्यांतील प्रतापपूर या दोन गांवावर सदरचा प्रयोग अगोदरच होऊन गेला होता. म्हणून ४ मे १८५८ रोजी १७ तोफा, हजार युरोपियन पायदळ, १५० कोळी शिपाई व दोनशे गुजराथ इन्फंट्रीचे स्वार यांची रवानगी कान्हेरिया या गांवी झाली. गांवच्या डाव्या बगलेस कोळी मंडळी घोळक्याने जमली होती. अॅक्टिंग पोलिटिकल एजंट लेफ्टेनंट लॉ त्यांच्याजवळ घोड्यावर बसल्या बसल्याच गेला.

कोळी मंडळींनी सरळ त्यास परत जावयास सांगितलें व बजावलें की आम्ही चार हजार आहोंत आणि शस्त्रें मुळीच परत करणार नाही. त्यांच्यावर गोळीबार करण्यांत आला. पण ते सर्व चतुराईने वेशींत शिरले व त्यांनी वेस जाम बंद करून घेतली. त्या खेड्याचा नंतर अक्षरशः सत्यानाश करण्यांत आला.

गायकवाडींतील दुभोरा गांवावरहि तसाच प्रसंग ओढवला. शेजारचे ठाकूराचें एक खेडेगांव मौदन्ती यांचें व आमचें जीवावर बेतण्याइतके वांकडे असल्याकारणाने आम्ही शस्त्रास्त्रें सरकारच्या स्वाधीन करणार नाही, असा खडखडित जबाब शस्त्रबंदीच्या हुकमाला दुभोरा गांवाने दिला. आपल्या हातचें शस्त्रास्त्र गेलें की मौदन्तीचा ठाकूर जीवराजमल याच्याच दयेवर आपण आपली मिळकत आणि आपलें जीवन अवलंबून राहणार अशी भीति सर्वांनाच होती तथापि गांवकऱ्याच्या रदबदलीचा रेसभरहि उपयोग झाला नाही. त्यांना कल्पना येऊं न देतां, त्यांच्यावर असा हल्ला इंग्रजानी केला की ज्याचें नांव तें !!! दुर्दैव इंग्रजाचें ! तें असेंच कांही करतील, असा अंदाज गांवकऱ्यांचा असल्यामुळे सरकारी सैन्य येण्यापूर्वीच चार दिवस तें गांव त्यांनी सोडलें होतें. तरी पण त्या गांवची आठशेच्या आठशे घरें इंग्रजांनी भस्मसात केलींच. ता ५ जून १८५८ रोजी ब्रिगेडियर जनरल सर आर. शेक्सपीयर, पोलिटिकल कमिशनर लिहितो की, " मला किंवा मेजर व्हाईट लॉकला गायकवाड दरबारकडून गांवाचा एकादाहि भाग उध्वस्त करण्याबद्दल अधिकारपत्र नव्हतें.

हिंदुस्थानांत इंग्रजांनी केल्या त्या सगळ्याच गोष्टी अधिकाराने केल्या, असें आहे कोठें ? आपल्याला हवी असलेली गोष्टं घडवावयाची, या एकाच ध्येयावर भर !"

गुजराथेंत वरील प्रकारांनी निःशस्त्रीकरणाची कथा झाली, तर मुधोळला त्यापेक्षा निराळेंच चित्र रंगलें. १८५७ च्या नोव्हेंबरमध्ये ब्रिटिश सरकारने हुकूम काढले की, लोकांनी आपापल्या जवळचीं शस्त्रास्त्रें सरकारच्या स्वाधीन बिनचूक करावीत. शस्त्रास्त्रें बाळगावयास जे लोक सरकारच्या दृष्टीने लायक असतील, त्यांना सरकार परवाना देईल. व शस्त्रेंहि परत करील. सगळीकडे हे हुकूम फिरले तसे ते मुधोळलाहि आले. कारभारी कृष्णरावांनी सगळ्या मुधोळ संस्थानांत तें कळविलें. मुधोळच्या प्रतिष्ठितांना आपापलीं शस्त्रास्त्रें सरकार चरणीं वाहणें कमीपणाचें वाटलें. आणि म्हणून त्यांनी समाज जमविला. मुधोळचे बाहेर २।३ मैलावर बसले व चांगले ३ दिवस त्यांनी विचार करत काढले.

मुधोळच्या प्रतिष्ठितांच्या कृतीची बातमी हां हां म्हणतां सर्व संस्थानभर पसरली. हलगलीच्या बेरडांनी डोक्यांत घेतलें की, आपण तरी मुधोळच्या प्रतिष्ठितांसारखे कां वागूं नये ? बेरडांना आपल्या जमिनीच्या सनदा होत्या म्हणून कारभाऱ्यांनी बेरडांचा पुढारी बोलावला, त्याला सरकारचा हेतू समजावून

सांगितला. त्याला स्वतःला शस्त्राचा परवाना दिला आणि त्याची शस्त्रेंहि त्याला परत केलीं. आपल्या जातभाईंची "तू समजूत घाल." अशी विनंतीहि कारभाऱ्यांनी त्या बेरड पुढाऱ्याला केली. त्या पुढाऱ्याने आपल्या परी प्रयत्न केले. पण जमातीशीं बेइमान झाल्याचा आरोप त्याच्यावर ठेवून जमातीने त्याच्यावर बहिष्कार घातला. तेवढ्यावरच ते थांबले नाहीत. त्यांनी आपल्यांतल्या ४–५ डोकेबाज माणसांची निवड करून प्रचारासाठी गांवोगांव पाठविले. प्रचाराचा परिणाम झालाच. शस्त्रास्त्रें परत करावयाच्या हुकमाचा निषेध म्हणून सुमारें पांचशे बेरड हलगलीला जमले. आतां काय करावें तें कारभाऱ्यांना कळेना. म्हणून त्यांनी पोलिटिकल एजंट केर यांजकडे सर्व परिस्थितीचा आढावा धाडला. केरने विजापूरास लिहून हलगलीला सैन्याच्या तुकड्या मागविल्या. बेरडांचें तें बंड मोडलेंच पाहिजे, अशी चीडच केरच्या मनाने घेतली होती. तथापि सैन्याच्या प्रमुखाने हलगलींत गेल्यावर एकदम कांही हल्ला अगर नासधूस न करतां गांवच्या पुढाऱ्यांना समजुतीच्या चार गोष्टी सांगाव्यात असाहि केरने सल्ला दिला होता. लष्करच्या नेत्याने त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला. खडकासारखे खंबीर बेरड होते. लष्करी अधिकारी आर्जवून काय सांगताहेत तें निदान ऐकून घ्यावें तें न घेतांच, लष्करांतील चार घोडेस्वारांची खोडच बेरडांनी काढली ! त्यामुळे रात्र पडल्यावर काळोखांत काय प्रसंग ओढवेल याचा नेम नाही असें पाहून लष्करने पुन्हा गांवांत प्रवेश केला. शंभर घोडेस्वारांनी हलगली गांवांत शिरून हवेंत बार काढले व एकतऱ्हेच्या भीतीचें वातावरण निर्माण केलें. स्वतः केरच्याच देखरेखीखाली सगळ्या गांवाला वेढा देण्यांत आला. मग सैनिक सरळ गांवांत शिरले. आता जो कोणी वाटेंत येईल त्याचा कांटा काढण्यांत येऊं लागला. सुमारे १५० बेरड बंदुकीच्या गोळ्यांना बळी गेले! हलगलींतील लोक मग सैरावैरा धावूं लागले. कित्येक दारें लावून घेऊन दडून बसले. दडपलेल्या दारांचीं घरें पेटवावयास मग लष्करच्या माणसांनी सुरवात केली. मग अर्थातच सर्व बेरडांनी शरणचिठ्ठी दिली, ज्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला होता त्यांना कैद करण्याचे हुकूम झाले. या सर्व प्रकाराला फळ आलें. बेरडांनी आपलीं शस्त्रास्त्रें सरकारच्या स्वाधीन केलीं. कित्तूरकर देसायांनी बेरडांना भरीला घातल्याचा पुरावा मिळाल्यामुळे त्यांची हजेरी घेण्यांत आली. बेरडांपैकी जे बंडखोर अपराधी होते त्यांनाहि कैदेच्या शिक्षा झाल्या. १८५७ च्या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटी बेरडांच्या अव्वल बंडखोरांना गोळ्या घालण्यांत येऊन ठार केलें.

हलगलीच्या बेरडांचें भवितव्य पाहून मुधोळच्या प्रतिष्ठितांनी मुकाट्याने आपलीं शस्त्रास्त्रें सरकारच्या कशीं स्वाधीन केलीं याचें वर्णन सांगलींतील बिनीवाले रोजनिशीच्या ता. ६ व ८ डिसेंबरच्या ( १८५७ ) नोंदींतून अभ्यासण्यासारखें आहे.

[१७]

# उठावांतील आठव

परकीय सत्तेचें जूं जावें आणि स्वकीय सत्तेची प्रस्थापना व्हावी म्हणून सरंजामशाहीच्या जमान्यांतहि, अठराशे सत्तावन साली राजे-राजवाडयांपासून तो समाजाच्या शेवटच्या थरांतील लोकांपर्यंत आपापल्या परीने सर्वांनी केलेल्या खटपटींतील खटाटोप, त्यांतील खट आणि आटोप यांच्यासह, पाहिल्यानंतर, एकंदर उठावांतील जे आठव फिरून फिरून डोळयांपुढे आल्याशिवाय रहात नाहीत ते असे.

१ **औटरॅम:–** ब्रिटिश सेनापति. १८५६ साली आयोध्येच्या चीफ कमिशनर. ५६-५७ च्या इराणवरील मोहिमेंत हा नेता होता. १८५७ च्या उठावांत कानपूर येथे हा हॅवलॉकच्या मदतीला होता. या कामगिरीबद्दल त्याला लेफ्टेनंट जनरल करण्यांत आले.

२ **सर ह्यू रोज:–** याचा दरारा मोठा होता. याचें युद्धशास्त्र इतकें नवीन आणि अलौकिक होतें की, कसलाहि बाका किल्ला असो, त्याच्या माऱ्यापुढे नामोहरम झाल्याशिवाय रहात नसे. रठगड, सागर, चंदेरी हे अवघड डोंगरी किल्ले त्याने असेच मारून काढले. हा १९ सप्टेंबर १८५७ रोजी हिंदुस्थानांत आला होता.

३ **विष्णुबुवा ब्रह्मचारी:–** यास १८५७ साली सार्वजनिक व्याख्याने देण्यास बंदी करण्यांत आली होती. हा ख्रिस्ती मिशनऱ्यांविरुद्ध वेदान्तधर्माचें मंडन करी.

४ **रावराजे सर दिनकरराव रघुनाथ राजवाडे** ( १८१९ ते १८९६ ):– ग्वाल्हेरचे दिवाण. मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील निवें गांवचें. यांनी तवरधारच्या सुभ्याची कामगिरी बजावल्यामुळे १८५२ त दिवाण झाले. जयाजीराव शिंदे अल्पवयी असल्यामुळे त्यांनी पुष्कळ सुधारणा करून संस्थानचा विश्वास संपादन केला. १८५७ मध्ये महाराजांसह आग्र्यास गेले. नंतर सर ह्यू रोजच्या सहाय्याने यांनीच जयाजीरावांना पुन्हा गादीवर बसविलें.

५ **दादोबा पांडुरंग तर्खडकर** (१८१४–१८८२):– आद्य मराठी व्याकरणकार. १८५७ च्या उठावाचे वेळी अहमदनगरास भिल्लांनी उचल केली. त्यावेळी दादोबा नगरास डेप्युटी कलेक्टर होते. मोठ्या चातुर्याने त्यांनी भिल्लांना काबूत आणलें.

६ **डॉ. विश्राम रामजी घोले**:– हे पुण्याचे डॉक्टर व पुढारी. १८५७ च्या प्रसंगांत ते अकरा ठिकाणी हिंडल्याचा उल्लेख आढळतो. ते मेजर वॉर्ड यांच्या हाताखालील तिसऱ्या युरोपियन फलटणींत काम करीत होते. झांशीचे वेढ्याचे वेळी ते जातीने हजर होते. ग्वाल्हेरच्या प्रसंगी राणी लक्ष्मीबाई घोड्यावरून खाली आल्या त्यावेळीहि ते तेथे होते.

७ **ब्रह्मवर्ताचा राजवाडा**:–इंग्लंड व इतर परदेश पाहून आलेल्या अझीमुल्लाखांने तत्कालीन परिस्थितीचें निवेदन श्रीमंत नानासाहेब पेशव्यांपुढे या वाड्यांत मांडलें व पहिलें खलबत येथे झालें. मग त्या पेशवे वाड्यांत तात्या टोपे, लक्ष्मीबाई, रावसाहेब आणि खालसा झालेल्या राजांचे दूत जमूं लागले. उगीच नाही ब्रह्मावर्ताचा पेशवेवाडा ता. ११ डिसेंबर १८५७ रोजी इंग्रजांनी आकसाने उध्वस्त केला ! !

८ बहादूरशहा:–एकदा १८५७ च्या उठावांत सामील झाल्यावर बहादूरशहाने भारतांतील सर्व लोकांना आवाहन केलें की, “ माझी अशी तीव्र इच्छा आहे की, वाटेल त्या मार्गाने व पडेल त्या किंमतीने फिरंग्यांना हिंदुस्थानांतून घालवून दिलें पाहिजे. इंग्रज येथून निघून गेले तरीसुद्धा राज्यावर राहण्याची आता माझी इच्छा नाही. जर तुम्ही सर्व हिंदु राजे इंग्रजांना घालवून देण्यासाठी शस्त्र उपसणार असाल तर मी आनंदाने राज्याधिकार सोडून देण्यास तयार आहें. इतकेंच नव्हे तर संघराज्य स्थापन करण्यालाहि माझी तयारी आहे.” बादशहाच्या याच मोठ्या अपराधाबद्दल ता. २० सप्टेंबर १८५७ रोजी त्याला कैद करण्यांत आलें. ता. २१ सप्टेंबर रोजी त्याच्या देखत सेनापती हॉडसनने मिर्झा मोगल, मिर्झा किहारी सुलतामत व अबूबख्त यास गोळ्या घालून ठार केले ! !

९ **रावसाहेब पेशवा**:– बाजीराव साहेबांच्या विधवेने हा दत्तक घेतल्यामुळे नानासाहेब पेशव्यांचा हा भाऊ. १८५७ सालच्या उठावाचे वेळी हा अवघा वीस वर्षांचा होता. हा बहुधा तात्या टोप्यांच्या हाताखाली काम करी. नानासाहेब फत्तेपूरला गेल्यावर ब्रह्मावर्ताहून फत्तेपूर येथे भोपाळसिंग चौधरीकडे तात्या गेले, त्यांच्याबरोबर हा होता. कानपुर–शिरोजपूरचे सामने झाल्यावर नाना झोका–घाटाजवळ तात्या गंगेपार झाले, त्या अवघड प्रसंगींहि रावसाहेब त्यांच्याबरोबर होता. तेथून गेल्यावर त्यानेच तात्यांना काल्पीला धाडले व मग आपणहि गेला. झांशीचे राणीचे निरोपाबरोबर तिच्या मदतीला त्यानेच तात्यांना “ जा ” म्हणून त्वरा केली. झांशीची राणी काल्पीला पोंचलेवर, पुन्हा इंग्रजांशी सामना द्यावयास रावसाहेबाने आपलें सर्व सैन्य तिला दिलें. तरीसुद्धा खुद्द काल्पीस इंग्रजांशीं रावसाहेबाने स्वतः सामना केला. मात्र, पराभव झाल्यावर तो गोपाळपुरास निघून गेला. गोपाळपुराहून तात्यासह तो ग्वाल्हेरला गेला. शिंद्यांचा पराभव झाल्यावर त्यांची

सर्व फौज रावसाहेबाला मिळाली. त्यानंतर पारीनच्या राजावर तात्यांनी मात करीपर्यंत सर्व संग्रामांत रावसाहेब लढत होताच. निगा किल्ल्याच्या मार्गाने सिरोजला पोंचल्यावर इसानगडला रावसाहेब पोंचला. तेथून चंदेरीवर तात्यांना त्याने पाठवून दिले. रावसाहेब ललतपूरला गेला. तेथून त्याने जाकळूणशी लढाई मारली. इंग्रज फौज वाढली व वेढा देणार हें कळतांच राजगडला वळसा घालून तात्यानी व रावसाहेबांनी नर्मदा ओलांडली. अशातऱ्हेने देवगड वारीपर्यंतच्या सर्व खटाटोपांत रावसाहेब तात्यांचा साथी होता. पण पुढे त्यांचें बिनसलें. तात्या परोणकडे गेले. त्यावेळी रावसाहेबाजवळ सहा हजार फौजफाटा होता. तिच्या जोरावर त्याने इंग्रजास पुष्कळ दिवस दाद दिली नाही. पण पुढे तो पकडला गेला व ता. २० ऑगस्ट १८६२ रोजी कानपूर येथे फांशी गेला.

**१० कोल्हापूरचे चिमासाहेबः–** कोल्हापूरचे चिमासाहेब हे (१८५७ तील) शिवाजी राजांचे भाऊ. त्यांचें नांव शंभुराजे. १८५७ चे उठावांतील दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक–कोकणभागांतील ती प्रेरकशक्ति होती. म्हणून त्यांना कराचीस स्थानबद्ध करण्यांत आले. त्यांच्याबरोबर पाबळ खोऱ्यांतील आठशे लोक स्वखुशीने कराचीस जाऊन स्थायिक झाले. १८६९ साली त्यांचा इहलोकवास संपला. कराचीस त्यांची छत्री आहे.

**११ प्रतापसिंह पुत्र "जंगलीमहाराज":–**प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करून काशीस नेत असतांना त्यांचा सेनापति व जवळचा आप्त बळवंतराव राजाज्ञे याची बायको खानदेशच्या रानांत सांगवीजवळ अत्यंत अडचणींत १२ जानेवारी १८४० रोजी प्रसूत झाली. इच्या मुलाचें नांव त्र्यंबकजी ठेवण्यांत आलें, तरी जंगलीमहाराज म्हणूनच तो संबोधला गेला. प्रतापसिंहानी त्यास ता. २५ जानेवारी १८४७ रोजी दत्तक घेऊन त्याचें नांव शाहू असें ठेविलें. त्याचे जनक वडील त्याचे जन्मा–नंतर दोनच महिन्यांनी महूजवळ वारले होते. १८५७ च्या स्वातंत्र्यसंगरांत रंगो बापूजी या स्वामीनिष्ठाने आपली आहुति देण्याचें ठरवून साताऱ्च्या गादीवर सदर शाहूस बसवावयाचा घाट घातला. १८५४ साली काशीहून प्रतापसिंहाचे राजकुटुंब साताऱ्यास परत आल्यापासून आपला चुलत भाऊ व्यंकोजी यांजबरोबर शाहूहि एकाच वाड्यांत रहात असे. त्याकारणाने १८५७ मध्ये रंगो बापूजींचे मदतनीस म्हणून खटपट करण्यांत आपल्या वडील दत्तक आईचे म्हणजे श्री. अंबिकाराजे यांचे संमतीने शाहूने ऊर्फ "काशीराजा" ने व व्यंकोजीने कमी केलें नाही. अर्थात् साताऱचे सर्व राजकुटुंब मुंबईजवळच्या खाटीक–बेटावर प्रथम स्थानबद्ध करण्यांत आलें व १८५८ च्या मार्चमध्ये शाहूस कराचीस हलविण्यांत आलें. तेथून शाहूला १८८५ च्या जुलै महिन्यांत सोडण्यांत आलें. शाहू थेट पुण्यास आला व भवानी पेठ घर नं. ५४३ मध्ये राहूं लागला. देवेंद्रनाथ टागोरांचें "श्री

ब्राह्मधर्म " या पुस्तकाचें ओवीबद्ध रूपान्तर या राजपुत्राने केलें असून, शाहूपेक्षा शहाजी हें स्वत:ला आवडणारें नांवच त्या पुस्तकावर त्याने घातलें आहे. ''ब्राह्मस्मृति' या नांवाचें त्याचें दुसरेंहि पुस्तक आहे. कराचीस असतांनाच या राजपुत्राने ब्रह्मोसमाजाची दीक्षा घेतली असावी. १८९२ च्या तारीख १ जूनला सदर राजपुत्र इहलोक सोडून गेला. त्याची छत्री पुण्याच्या भवानी पेठेंत आहे. याला होळकर दरबारांतून अठ्ठावीस हजारांची नेमणूक होती.

१२ **भास्करराव ऊर्फ बाबासाहेब भावे**:– १८५७ साली नरगुंदचा संस्थानिक भास्करराव ऊर्फ बाबासाहेब भावे याने इंग्रजाविरुद्ध बंड उभारलें. १८०५ मध्ये याचा जन्म झाला. आपल्या वेळच्या संस्थानिकांत हा सर्वांपेक्षा जास्त स्वाभिमानी होता. नानासाहेब पेशवे व रंगो बापूजी यांच्याशीं यांचा पत्रव्यवहार व संकेतबद्ध उठावाचा पुरस्कार होता. सुरिवान गांवी दख्खनचा पोलिटिकल एजंट मॅन्सन् आहे अशी बातमी कळल्यावर आठशे लोकांनिशी चाल करून जाऊन भाव्यांनी त्याचें शिर कापून आणून नरगुंदचे वेशीवर ता. १ मे १८५८ रोजी टांगलें. इंग्रज चालून आले आणि पुढे रीतसर व्हावयाचें तें होऊनच भावे १२ जून १८५८ ला फांशी गेला. नरगुंदचा किल्ला पडला. इतक्यांत बाबासाहेबांची आई यमुनाबाई व बायको सावित्रीबाई या बाहेर पडल्या व खेडोपाडीं भटकत राहिल्या. धारवाड जिल्ह्यांतील संगळ गांवी राहणाऱ्या आत्याने आपत्तिच्या वेळी आश्रय न दिल्याने हताश झालेल्या त्या दोन राजस्त्रियांनी एकामेकींना पदराने बांधून घेऊन मलप्रभेच्या डोहांत जलसमाधि घेतली. त्यांचीं प्रेतें बदली तालुक्यांतील दागनूर गांवीं कांठास लागलीं. तेथील मामलेदाराने ओळखून त्यांस अग्निसंस्कार केला.

१३ **रंगो बापूजी गुप्ते ( रोहिडखोरेकर )**:– मराठ्यांच्या इतिहासांतील शेवटचा मुत्सद्दी. प्रतापसिंहास साताराच्या गादीवरून पदच्युत व्हावें लागल्या– कारणाने त्याची बाजू ब्रिटिश पार्लमेंटपुढे मांडण्यासाठी इंग्लंडमध्ये राहून तेरा वर्षें रंगोबापूजींनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. विलायतेंत घडलेली सर्व हकीगत आपल्या मोडी लिपींत २२५ पानी पुस्तकांत रंगो बापूजीनी लिहून ठेवलीं आहे. सत्तावनच्या उठावांत इंग्रजाविरुद्ध आग उसळवून रंगो बापूजी ५ जुलै १८५७ रोजी भूमिगत झाले ते कायमचेच !

१४ **सीताराम गुप्ते**:– हे रंगो बापूजींचे करारी व कणखर चिरंजीव. यांच्याकडे भोर-बेळगांव-भागांतील १८५७ च्या उठावाची देखरेख व व्यवस्था होती. फितुरीने दगा दिल्याचें कळल्यावर हे बहे-बोरगांव मार्गे कोल्हापुरास रवाना होऊन चिमासाहेब कोल्हापूरकर यांच्या आश्रयास जात असतां पकडले गेले. लष्करी कोर्टापुढे त्यांनी बेडर जबाब दिला.

१५ **श्री. न्यायाधीश सरकार राजेश्री पंतप्रधानः– परवाना सरकार श्रीमंत महाराज पंतप्रधान पेशवा बहाद्दूरः**– दक्षिण प्रांतांतील जिल्हे सोलापूर व जिल्हे नगर प्रांतांतील रईत लोक देशमुख, देशपांडे व राजे बगाजी पाटील, कुलकर्णी वगैरे व सर्व शिपाई अफसरांस व सर्वत्र लोकांस जाहीर व्हावें की, इकडे **हिंदुस्थानीं सर्वत्र हिंदु व मुसलमान लोकांनी दीनासाठी बिघडून इंग्रेज लोक यांस परागंदा करणेचा इरादा करून सर्व ठिकाणच्या छावण्यांतील साहेब लोक मारून टाकिले** आणि त्या जिल्हयांत अद्यापि सामील झाले नाही. त्यावरून तुम्हांस लिहिलें जातें की, तेथून राजेश्री रंगराव रत्नाकर पागे नरखेडकर व सोनाजीपंत नि।। हैदराबादवाले या उभयतांस तेथील बंदोबस्ताची योजना करून लिहिलें जाते. तरी सर्वत्रांनी दीनांकडे ख्याल करून **इंग्रेज लोक यांचा नाश करावा.** यांत हिंदुमुसलमान यांशीं दीन राहील व जो कोणी पुढे होऊन काम करील त्याचे हक्कांत बहुत चांगलें होईल आणि इनामहि दिलें जाईल. छ ४ रमजान माहे वैशाख शुद्ध पंचमी रविवार शके १७८०.

१६ **तात्या टोपे यांचें सैन्यः**–यांच्या सैन्यांत बुंदेले, विलायती, भिल्ल, रामोशी इत्यादींची भरती होती. उंट व घोडी यावरून ते मजल मारीत. इंग्रजी सैन्य आलें की धावपळ होऊन ते पांगत. पण खुणेने नेमके एखाद्या झाडाखाली पुन्हा कांही तासांतच जमत. इंग्रजी सैन्य एकदा एका फर्लांगांत असतांहि, तात्या टोपे यांचें सैन्य तसेंच निसटून गेलें. तात्यांचे शोधांत एक सेनापति आग्र्याजवळ गेला. तर दुसरा त्याचा पाठलाग दक्षिणेच्या सरहद्दीवर करीत होता!! नर्मदा ओलांडून महाराष्ट्रांत येण्याचा तात्या प्रयत्न करीत असतां, इंग्रजी सैन्य आडवें आल्यामुळे तापीनदीच्या खोऱ्यांत उतरून तात्या राजपुतान्यांत शिरला. तेथे रावसाहेब पेशवे व दिल्लीचा राजपुत्र फेरोजशहा यांच्याशीं तात्याने हातमिळवणी केली. तात्यांच्या सैन्यांतील मागे राहिलेल्या माणसांना इंग्रज फांशी देत. एके दिवशीं त्यांच्याचपैकी दोघांनी इंग्रजांस तात्यांचा पत्ता सांगितला. सकाळीं लगबग करून इंग्रज त्या तात्यांच्या तळावर गेले, तों तात्यांचा पत्ता लागला नाहीच; पण इंग्रजांना बातमी देणाऱ्या त्या दोन चहाडखोरांना समोरा समोर फांशीं दिलेलें दृश्य मात्र इंग्रजांना दिसलें. इतकें तात्या टोपे याचें हेरखातें अचूक कार्यक्षम होतें. राणीचा जाहीरनामा निघाला त्यावेळी रावसाहेब पेशवे व फिरोजखान मध्यस्थामार्फत शरण येतील, म्हणून इंग्रजांच्या तोंडाला पाणी सुटलें होतें. पण मध्यस्थामार्फत बोलणीं करून सवलती मिळविण्याचा बहाणा करण्यांत वेळ दवडून आग्रा-ट्रंक-रोड ओलांडून रावसाहेब पेशवे व फिरोजशहा नरसिंगगडच्या जंगलांत पसार झाले. मराठ्यांचा गनिमी कावा इंग्रजांना शेवटपर्यंत असा नडत होता!!

१७ **निंबाजी व नरसाजी कोठावळे ( सिंहासने ):–** ही मूळची परळीची मंडळी. हे दोघेहि भाऊभाऊ छत्रपति प्रतापसिंहांच्या सेवेंत होते. छत्रपतींना काशी येथे स्थानबद्धता झाल्यावर, निंबाजी व नरसाजी यांनी हैदराबादेपासून बदामीपर्यंत उठाव करण्याची शिकस्त केलीच. पण १८५७ त देखील निंबाजीने हैदराबादमधील लिंगायतस्वामींच्या सहाय्याने पांच हजार सैनिक जमवून उठाव केला. त्यांत तो इटारसीच्या आसपास कामास आला. नरसाजी आपल्या भावास सातार्‍यापासून कल्याणपर्यंत साथ देत राहिला. तो १८५९ मध्ये इंग्रजांच्या हातीं लागला व तोफेच्या तोंडीं गेला.

१८ **उठावाचे प्रतिध्वनिः–**हिंदुस्थानांतील १५०० किल्ले इंग्रजांनी जमीनदोस्त केले. सर्वत्र बंडांत अपराधी होते. पण ज्यांच्यावर आरोप सिद्ध होऊं शकला नाही अगर जे माफीत निघाले त्यांच्या डाव्या कुशीवर M व फरारी सांपडल्यावर त्यांच्या डाव्या कुशीवर D असा एक इंची शिक्का मारण्यांत येई. आणि तरीहि त्या उठाव-वाल्यांचें समाधान होतें की "जगाच्या इतिहासांत जे त्रेचाळीस सुप्रसिद्ध वेढे आहेत त्यांतील १८५७ मध्ये दिल्लीस ब्रिटिशांनी घातलेला एकतीस दिवसांचा व लखनौस उठाव-वाल्यांनी घातलेला एकशे एकूणपन्नास दिवसांचा वेढा हे अविस्मरणीय आहेत." १८५७ च्या उठावामुळे डिस्राईलीने पार्लमेंटमध्ये तीन तास भाषण केलें. इटली, स्वित्सलंड वगैरे देशांतील स्वातंत्र्याच्या लढ्यांचें उदाहरण देऊन हिंदुस्थानलाहि हेंच वारें लागलें आहे, असें तो म्हणाला. हिंदुस्थानांतील उठावामुळे सर्व इंग्लंडवर काळजीची छाया पसरली. मुख्य प्रधानांची निष्काळजीपणाबद्दल खूप थट्टा झाली. उठावामुळे, केवळ ब्रिटनलाच नव्हे तर सर्व जगाला हिंदुस्थानच्या जिवंतपणाची जाणीव झाली. तो चिरडण्यासाठी इंग्रज सरकारने आपल्या एकूण सैन्यापैकी एक लक्ष बारा हजार सैनिक हिंदुस्थानांत आणले होते. याशिवाय तीन लक्ष दहा हजारांची हिंदुस्थानांत भरती करण्यांत आली होती. पण एवढ्यानेच त्यांचें भागलें नाही. खजिन्यांची लूट, कर वसूलींतील अडथळे व सार्वजनिक मालमत्तेचा नाश यापायी पंधरा कोटी रुपयांची तूट इंग्रजांना आली. १८५७ च्या आक्टोबरमध्ये बँक ऑफ बंगालने सरकारी रोख्यांवर कर्ज देण्याचें नाकारलें. हिंदुस्थानांतील अंतर्गत व्यापार बंद पडला. इंग्लंडहून येणारी आयात थंडावली. तांदुळासारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढल्या.

अशा रीतीने हिंदुस्थानचें अस्तित्व जगाच्या नजरेत भरणार्‍या उठावाचें एकंदर शमन झालें तरी, त्यांतून स्वकीय सत्तेच्या स्थापनेची उबळ खच्ची झाली नव्हती. तिने पुढे थोडा दम खाऊन डोकें वर करण्याचा प्रयत्न करावयास कमी केलें नाही " नोच्चोर्थो विफलोपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः ।" हाच बोध ती उबळ सतत देत राहिली आहे.

# [ १८ ]

# उरलेला उमाळा

## गोपाळ अंताजीचें बंड

" A deadly National Rebellion, more fierce and sanguinary than ever occurred in France."

मुंबईसरकारने वरील तऱ्हेचा अभिप्राय १८५९ साली ज्या भारतीय उठावाबद्दल व्यक्त केला, त्यासंबंधी ' दि बॉंबे टाईम्स अॅन्ड जर्नल ऑफ कॉमर्स ' या वृत्तपत्राचे ता. ५ जानेवारी १८५९ च्या अंकांत संपादकीय असें व्यक्त झालें आहे की– " हिंदुस्थानचे आम्ही युरोपियन रहिवासी आमच्या जिवाभावांच्या नातेवाईकांना गमवून बसलों; त्यांना सरकार परत आणून देऊं शकणार नाही; पण आमचीं घरें गेलीं; घरादारांतली सारी, सारी मालमत्ता हातोहात गेली; वीस वीस, तीस तीस आणि कधी कधी तर चाळीस चाळीस वर्षांच्या परिश्रमांनी एका परकीय देशांत घाम गाळून उभारलेली ती मिळकत होती. सरकारने तिची भरपाई करून दिली पाहिजे. कारण त्या मिळकतीबाबत आम्ही नागवलों गेलों याला मुख्यतः सरकारच कारण आहे. सरकारनेच येथील लोकांचा विश्वासघात केला; मुसलमानांशी आणि हिंदु राजेरजवाड्यांशीं आपले संबंध सुखा-समाधानाचे राखण्यासाठी सरकारनेच पवित्र हिंदु कायद्यांची पायमल्ली केली; महसूल वसुलीसाठी जुलमी आणि अघुरे कायदे केले; दिवाणी आणि फौजदारी न्यायदानासाठी गोंधळच गोंधळ माजवून ठेवला. आमच्या झालेल्या सर्व तऱ्हांच्या नुकसानीबद्दल आम्ही सरकारचे व सरकारच्या वरील तऱ्हांच्या धोरणाचे ऋणी आहोंत. ! "

हिंदुस्थानच्या युरोपियन रहिवाशांची ही रडकथा होती. मेजर जे. सी. मेडली याने ता. ६ जून १८६५ रोजी या संबंधांत जरा खुलासेवार लिहिलें आहे. तें अधिक उद्‌बोधक आहे. तो लिहितो की– " १८५७ सालच्या सुरवातीला पूर्ण शांतता नांदत होती. इराणमधील युद्ध थांबलें होतें. बुशायरचा तह झाला होता. हिंदी सैनिक मुंबईला परतूं लागले होते. यापूर्वीचीं वीस वर्षें हिंदुस्थान लढायांच्या मोहिमांत गुंतला होता. तरी दुसरा कोठला शत्रु निर्माण होईल, अशी कल्पना करणें धाष्टर्याचें होतें. रिकामटेकडेपणापेक्षा पिहिओ येथे इंग्रजांवर कोसळून पडलेल्या अनर्थाच्या बदल्यासाठी चीनमध्ये पाठविण्यांत येणाऱ्या मोहिमेंत आपला अंतर्भाव व्हावा, अशी सैन्यांतील अधिकाऱ्यांनी इच्छा व्यक्त केली होती. ता. ९ मे १८५७ ला हिंदुस्थानांतील असह्य उष्मा व थंड हवा यांचाच विचार अधिकारी बहुधा करीत होते. पण इंग्रज सैनिक महाग व त्यांची भरती अवघड; प्रादेशिक

वाढीबरोबर हिंदी सैनिक वाढले. १८५७ त मुंबई, मद्रास, कलकत्ता या तीन इलाख्यांत विखुरलेल्या घोडदळ, पायदळ, तोफखान्याच्या तीनशे रेजिमेन्ट्स्; पण त्यांच्या दसपट अधिक दोन लक्ष पन्नास हजार नेटिव सैनिक होते. सिंहाच्या अधिपत्याखालील मेंढरांची टोळी. मेंढरांच्या अधिपत्याखालील सिंहाच्या टोळीचा पराभव करूं शकते. अर्काटच्या वेढयांत क्लाईव्हला, नेपाळच्या युद्धांत सर डेव्हिड ऑक्टरलोनीच्या फलटणीला, चिलियनवाला येथील भयंकर हल्ल्याच्या वेळी रॉबर्ट सेलच्या नेतृत्वाखालील जलालबादेच्या फलटणीला स्मरून वरील अनुभव नमूद केला आहे. एतद्देशीय सैनिक रणांगणावर शूर, छावणींत मर्यादशील, हालचालींत शिपाईबाण्याचा पण जातीविषयी, धर्माविषयी अपार प्रेम बाळगणारा. वेलोर, बराकपूर येथे होऊन गेलेले दंगे हीं चांगलीं उदाहरणें होतीं. त्यावरून काडतुसांना लावलेल्या चरबीच्या बाबतींत सरकारने समजूतदारपणा दाखवावयास हवा होता. फेब्रुवारींतच १९ व्या फलटणीने बऱ्हाणपूर येथे बंडाळी माजविली होती. ३४ व्या पायदळाने ड्रिलच्या वेळी ॲडज्यूटंट जनरलना मारलें होतें. ता. ९ मे रोजीच मीरत येथील तिसरें घोडदळ बिघडलें होतें. त्यांत बहुजनसमाजापासून सरकारची फारकत होऊं लागली होती आणि महत्त्वाकांक्षी लोकांच्या आशा तेजाळूं लागल्या होत्या" त्यामुळे २७ जुलै १८४७ रोजीच लॉर्ड एल्फिन्स्टन याने कर्नल ड्यूरांड याला लिहिल्याप्रमाणे "आमच्या (इंग्रजां) विरुद्ध सैन्याच्या तुकड्या तितक्याशा उठल्या आहेत असें नाही, तर सर्व लोकच्या लोक उठले आहेत" याचें प्रत्यंतर इंग्रजांना दिवसेंदिवस अधिकाधिक येत गेलें. "ऑक्स्फोर्ड हिस्टरी ऑफ इंडिया" च्या पृष्ठ ७२२ वर म्हटल्याप्रमाणे "असंतोष व अस्वस्थता इतक्या व्यापक प्रमाणावर पसरल्या होत्या की मुलकी लोकांतून आणि कित्येक ठाण्याठाण्यावरसुद्धा शिपायांनी सुरुवात करण्यापूर्वीच सामान्य जनतेने उठावाला सुरुवात केली."

## दमदार वृत्तीचा गोपाळ अंताजी

ही झाली उठावाच्या दोन वर्षांतील हिंदुस्थानभर असलेली परिस्थिति. महाराष्ट्रीय मंडळी तर, वसईच्या तहापासून इंग्रजांना हातपाय पसरावयाला मिळालेली ओसरी व अनुषंगाने सगळें घर परत कसें मिळवावयाचें या सक्रिय विवंचनेंतच होती. साताराच्या चतुरसिंग राजे भोसल्यांच्या बंडापासून सत्तावनच्या अखिल भारतीय क्रांतियुद्धापर्यंत महाराष्ट्रीय नेतृत्वानेच इंग्रजांना आपलें चंबुगबाळें आटोपण्यासाठी सारखा हात दाखविला. १८५७ च्या उठावाचा उपशम दोन वर्षांत झाला आणि नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झांशीच्या राणीपासून कोल्हापूरचे चिमासाहेब, नरगुंदकर भावे, रंगो बापूजी गुप्ते यांच्यापर्यंत सगळ्यांचे प्रयत्न लुळे पडले. तथापि, या दैवाच्या तडाख्याने इंग्रजांविरुद्ध बंड करून उठण्याची महाराष्ट्रीय उर्मि शमली नव्हती. ती चालूच होती. त्या उर्मिपैकीच गोपाळ अंताजी ऊर्फ कृष्णगुरूचें बंड एक संस्मरणीय उर्मि होय.

"बचेंगे तो और भी लढेंगे" या दमदार वृत्तीची ही मूर्ति होती. १८५७ च्या क्रांतियुद्धाचे नायक नानासाहेब ऊर्फ धोंडोपंत बाजीराव भट पेशवे यांचे बाळासाहेब नांवाचे एक बंधु होते. या बाळासाहेबांना दोन मुलगे. त्यांतीलच एक गोपाळ अंताजी असावेत ! पेशव्यांचा एक शागीर्द भुजंगराव काशिनाथ राजिवडेकर याला हाताशीं धरून गोपाळ अंताजी १८५७ च्या उठावांत नानासाहेब पेशव्यांच्या कार्याला हातभार लावीत असे. रघुनाथराव (बाळ) गोविंद (कृष्ण) आणि तसेच हरिदास माधवदास रा. बागलाण (जि. खानदेश) हेहि १८५७ मधील नानासाहेब पेशव्यांचे सहकारी होते. उठावाचा उपशम झाल्यावर ही चारहि मंडळी दक्षिणेंत उतरली. निराशेने ती ग्रासली होती. बंडवाल्यांकडील दोषमालिकेचा त्यांनी कर कर विचार केला. गोपाळकृष्ण (गोपाळ अंताजी ऊर्फ कृष्णगुरु) आणि रघुनाथराव यांनी "करडूची वाडी" येथे बैठक मारून खूप विचार केला आणि नानासाहेबांच्या पराभवाचा पुरेपुर बदला घ्यावयाचा असा निश्चय केला. पंढरपूरभागांत आणि सातपुड्याच्या दरीकपारींत सिंहगर्जना करून आपणांस लोकांचा पाठिंबा कसा काय मिळतो याची त्यांनी परीक्षा केली. अशी परीक्षा करीत करीत ते गुजराथमध्ये आले. पंढरपूर आणि सातपुडा या भागापेक्षा गुजराथमध्ये सशस्त्र बंड अधिक यशस्वी होईल, असा त्यांनी कयास बांधला. काठेवाडचा भागहि त्यांना इष्ट वाटला. त्यामुळे त्यांनी बडोदा-अहमदाबाद-द्वारका अशा टापूंत आपला तळ टाकला. त्यानी आपलीं नांवें बदललीं; पोशाख उलटले; बहुरूपी बनले; सांकेतिक भाषांनी ते व्यवहार करूं लागले; पण इंग्रजांविरुद्ध उठाव करण्याच्या एकाच ध्येयाने चालले.

गोपाळ अंताजीने आपण स्वतःच आता नवा पेशवा होण्याचें ठरविलें. बंडाच्या नव्या उठावासाठी त्याने डाकोर–सिद्धपूर-पाटण-द्वारका असा पट्टा पसंत केला. द्वारकेस त्याने जयराम शिवाजीवाला यांच्या धर्मशाळेंत मुक्काम ठोकला. तेथून जवळच टकरास्वामींचा एक मठ होता. तेथे गोपाळ अंताजी कथा–कीर्तन–पुराण–श्रवणास जाई. टकरास्वामी हा एक म्हातारा होता. त्याच्याशीं गोपाळ अंताजीने मैत्रीच मांडली. शम्भू दौलत आणि मुरलीधर बापूजी देशपांडे असेहि दोन मित्र तेथेच जोडण्यांत आले. कसलीहि वार्ता आली, मिळाली तरी ती टकरास्वामीकडे सुपूर्त व्हावयाची व त्यांच्या सल्लामसलतीने चालावयाचे असें ठरलें. स्वामींचा सल्ला धर्माज्ञेसारखा मानला जाई. स्वामींच्या नजरेखालील त्या गुजराथी टापूंत वाघेर लोक राहत. जात्याच ते हूड. त्यांचा एक पुढारी मुळू माणिक हा त्यावेळी लोकांच्या डोळ्यांवर आला होता. त्याचें साहाय्य आपल्या बंडाच्या कामी व्हावें, म्हणून १८६३ मध्ये खटपट करण्याची विनंती स्वामींना नव्या पेशवेसरकारांनी केली. शम्भू दौलताच्या मध्यस्थीने टकरास्वामीनी ती

गोष्ट साध्य केली. मुळू माणिक हें रत्न ब्रिटिश सरकारच्या ".पाहिजे" यादींत होतें. या वस्तुस्थितींत आणखीहि हें सांगितले पाहिजे की, मुळू माणिकला चतुर्भुज करण्याची कामगिरी ब्रिटिश सरकारने शम्भू दौलताकडेच सोपविली होती. जमीनदाराची नोकरी करीत असल्यामुळें, शम्भू दौलता त्या भागांत कांही वजन मारूनहि होता. त्या वजनाचा उपयोग त्याने वाघेरांचा आणखी एक पुढारी रेवा माणिक याजवर करून नव्या पेशव्यांच्या करामतीला मुळू माणिक याचें सहाय्य मिळण्याची व्यवस्था केली. नव्या पेशव्यांच्या गट्टींत मुळू माणिक आला, तो पांचशे रुपयांचा नजराणा शम्भू दौलताच्या मार्फतीने त्याला पावता झाल्यावरच. द्वारकेचा कमाविसदार मुरलीधर बापूजी देशपांडे यांनी ती रक्कम स्वतःच मोजली होती.

## नव्या पेशव्यांचा दरबार

वहिवाटी, हक्क आणि कायदे यांचें ज्ञान मुरलीधर बापूजीला कमालीचें होतें. म्हणून नव्या पेशव्यांच्या नव्या बंडाचा बौद्धिक सूत्रचालक तोच होऊन बसला असें म्हटलें तरी चालेल. द्वारका-डाकोर या पट्ट्यांत मुरलीधर बापूजीइतका डोकेबाजहि कोणी नव्हता. १८६३ मध्ये अशाच रीतीने जरूर तेवढी सर्व जुळवाजुळव झाल्यावर मुळू माणिक राम-लक्ष्मण-मंदिरांत नव्या पेशव्यांना भेटला. हे राम-लक्ष्मण-मंदिर द्वारकेजवळील दाट जंगलांत बांधलेलें होतें. नव्या बंडासाठी चारशे शिपाई द्यावयाचें वचन मुळू माणिक याने नव्या पेशव्यांना दिलें. तेथे आणखीहि असें ठरलें की पुढे जें जें कांही व्हावयाचें, करावयाचें त्याची बित्तंबातमी टकरास्वामीकडे पोचवावयाची, त्या कामीं जरूर पडल्यास पत्रें लिहावयाचीं तीं गोपाळ कृष्णांनी लिहावयाचीं आणि द्वारकेंतील खैमा काळा गुगली याचा पत्ता त्या पत्रावर असावयाचा. गोपाळ कृष्णांच्यावर मुळू माणिकचा नितांत विश्वास आणि मुळू माणिक गोपाळ कृष्णांच्या शब्दांतला. टकरास्वामींच्या सल्ल्याशिवाय पान हलावयाचें नाही, हें सगळ्यांचेंच एकमत. खैमा काळा गुगली याच्या नांवावर पत्रें जावयाचीं असें जें ठरविण्यांत आलें होतें, त्यालाहि तसेंच जबरदस्त कारण होतें. या गुगलीचा अहमदाबाद-पट्ट्याशी बराच पत्रव्यवहार असे. तेव्हा त्या भागांतील नव्या बंडवाल्यांना कांही गोष्टी कळविण्याची जेव्हा व जशी जरूर भासेल, तेव्हा व तसें करणें गुगलीला सहजसाध्य होतें. हे सारे बेतबात हरिदास माधवदास यांच्या कानावर साहजिकपणेंच घालण्यांत आले. कारण, नवे पेशवे गोपाळ अंताजी आणि त्यांचे सहकारी रघुनाथराव गोविंद यांच्यामधील जोडदुवा हरिदास माधवदासच होता. हरिदास माधवदास आणि त्यांचा एक स्नेही काशिनाथ अनंत या दोघांचे दाट संबंध व्यवहाराच्या दृष्टीने द्वारका, फुलेत्रा, पाटण वगैरे भागांत होते. त्यामुळे दोघांनाहि नव्या बंडवाल्यांना सतत तीन वर्षें मदतीचा हात पोचवितां आला.

आपण मुक्काम केलेल्या टापूंतच एवढी व्यवस्था करीत नवे पेशवे राहिले नाहीत; त्यांनी आपल्या सहीशिक्क्यानिशी नव्याने बंडाची आघाडी उघडण्यासाठी हिंदुस्थानांतील अनेक मातबर व कर्तबगार मंडळींना पत्रें पाठविलीं. पुढे बडोद्यांत मोहन लालजीकडे मुक्काम ठोकून दाजी भगवान् भट आणि प्राणशंकर हरिनारायण असे दोन जिगरदोस्त पेशव्यांनी मिळवले. दाजी भगवान् हे वैदिक ब्राह्मण होते तर प्राणशंकर हरिनारायण हे एक मोठे कापडव्यापारी होते. हे दोघेहि नव्या उठावाचे उत्साही उत्तेजकच बनले. जरूर त्या सर्व माणसांच्या भेटीगाठी गाजावाजा न करता घेणें, संकेताचीं पत्रें गुप्तपणें सुखरूप ज्याचीं त्यांस पोचविणें आणि असलेंच पडेल तें काम करणें हें व्रतच जणूं त्यांनी घेतलें होतें. मात्र, आपलें कार्यक्षेत्र बडोदा-द्वारका हा पट्टा हें त्यांनी स्पष्ट केलें होतें. वरील दोघांप्रमाणेच नारायण रामचंद्र, लल्लू रणछोड आणि कृष्णंभट जगन्नाथ असेहि तीन जिव्हाळ्याचे संवगडी नव्या पेशव्यांनी जोडले. १८६२ ते १८६४ या काळांत मिळेल ती सर्व बातमी पोचविणें, नव्या बंडाची जास्तींत जास्त उठावणी होण्यासाठी प्रचार करणें आणि बंडाला कांही म्हणून कांही कमी पडूं द्यावयाचें नाही, या अिषीमीने खटपट करणें एवढा एकच ध्यास नारायण रामचंद्रांनी घेतला होता. बडोदा व अहमदाबाद या दोनहि ठिकाणीं स्वतःच्या पेढ्या असल्याकारणाने लल्लू रणछोड हे पेशव्यांचे खजिनदार होऊन चुकले होते. आपल्या पदरचे आणि जरूर तर लोकांच्याहि पदरचे हुकमी पैसे पेशव्यांना पुरवण्यांत शेठजी मोठे पटाईत होते. फुलेत्रामहालापासून द्वारकेपर्यंतचा पट्टा अगदी नजरेंतला असल्याकारणाने कृष्णंभट जगन्नाथाला तेथील खडान् खडा माहिती लागे आणि त्यायोगे नव्या बंडासाठी पेशव्यांच्या सेवेला कमालीचे ' रंगरूट ' त्यांनी जमविले. स्वाभाविकपणेंच सिद्धपूर, द्वारका वगैरे भागांत पेशव्यांच्या सर्व सरंजामी इतमामाने नव्या पेशव्यांची स्वारी निघणें सोपें झालें. खुद्द अहमदाबादेस नव्या पेशव्यांचें स्वागत मोठ्या थाटामाटाने झालें. नारायण लक्ष्मीराम व्यास यांच्याकडे नवे पेशवे आणि त्यांचे साथी रघुनाथराव गोविंद यांचा मुक्काम होता. १८६४ मध्ये तर व्यासांचें देवालय हेंच सर्व नव्या बंडवाल्यांचें आश्रयस्थान होतें. तेथे त्यांना अन्नपुरवठा, संरक्षण, पैसा आणि शिपाई यांची हवी तेवढी चंगळ होत असे. नारायण लक्ष्मीराम व्यासांच्यामुळेच अम्बाशंकर महाशंकर भट्टासारखा बडोद्याचा एक नामांकित वकील याने नव्या पेशव्यासाठी ओळखपत्रें, पैसे आणि नजराणे एवढे मिळविले की नव्या पेशव्यांचा दरबार ' मोती ' त्रिकम यांच्या येथे भरला आणि पेशव्यांनी आपल्या नव्या सरदारांना इतमामाने पगडी पोशाख दिले.

मोती त्रिकम जैनी हा खरोखर एक कारकुनी पेशाचा नोकर. 'कादी' येथे तो कामावर असे. त्याचा दुसरा एक दोस्त अनुपराम जगजीवनराम या नांवाचा होता. हाहि सरकारी नोकरच होता. हा मिया गांवाला असे. या दोघां दोस्तांनी

१८६३-६४ या काळांत नव्या पेशव्यांच्या नव्या बंडासाठी शिपाई मिळविण्यांत कशी ती कसूर केली नाही. त्यांच्या मदतीला नव्या पेशव्यांच्या गुप्तहेरखात्याचे प्रमुख म्हणून बडोद्याचे रामभट एकंभट ऊर्फ रोटीराम काम करीत आणि अहमदाबाद, फुलेत्रा, सिद्धपूर या टापूंत चालणाऱ्या सर्व गोष्टींची इत्थंभूत माहिती त्यांना असे. अशा तऱ्हेने सर्व बाजूंनी अनुकूलता प्राप्त होत गेल्याने नव्या बंडांत यशाची खात्री नवे पेशवे बाळगून राहिले.

## फितुरीने येथेहि डाव साधला

द्वारकेकडेच आपल्या सर्व शक्ति कामास लावावयाच्या असें मुख्यत: नव्या पेशव्यांनी ठरविलें होतें, तर रघुनाथराव गोविंदांनी अहमदाबादच्या विभागांत आपण काम करावयाचें असें मुक्रर केलें होतें. भुजंगराव काशीनाथ हा मूळ शागीर्दांपैकी असला तरी जिवाला जीव देणारा होता. या भुजंगरावाच्या खटपटीने 'कादी' चा मोती त्रिकम जैनी नव्या पेशव्यांना मिळाला होता. कादीला त्यावेळी रघुनाथ व्यंकटेश, हरि बल्लाळ आणि चिंतामण कृष्ण असे तीन कारकून होते. त्यांनीच रघुनाथराव गोविंद व भुजंगराव काशीनाथ यांची व मोतीराम त्रिकम जैनीची ओळख करून दिली होती. एकदा ही ओळख झाल्यावर होईल त्या प्रत्येक घटनेवर आणि नजरेंत येईल त्या प्रत्येक व्यक्तीवर भुजंगराव काशीनाथाचें बारीक लक्ष होतें. १८६२ पासून १८६४ पर्यंत असा काळ तयारींत घालविल्यावर मोतीरामाला दम निघेना. त्याने १८६४ त रघुनाथराव गोविंदाला बंडाचें निशाण उभारण्यास भलती भर दिली. कादीच्या उमरखान सय्यदलाहि भरीला घातलें. पांच हजारपर्यंत 'रंगरूट' भरती करीन, नाहीतर नांवाचा मोतीराम नव्हे, अशी प्रतिज्ञाहि त्याने भोगली. उमरखान रसूलखान पठाण हा मूळचा अहमदाबादचा. लष्करांत शिपाई राहणें हाच त्याचा जन्माचा उद्योग. रघुनाथराव गोविंदांनी अहमदाबादेहून बालमुकुंद आणि हा उमरखान अशी जोडगोळी 'कादीस' आणली होती. मोती त्रिकमसारख्या एका कारकुनाचा बंडासंबंधांत उत्साह पाहून रघुनाथराव गोविंदाला स्वारशिबंदी पुरवण्याचें वचन पठाणाने दिलें व जमेल तर पैसे चारूनहि सरकारी अधिकाऱ्यांसहि बंडांत सामील व्हावयास तयार करण्याचें कामहि पठाणाने अंगावर घेतलें. या पठाणाच्या संमतिसल्यानेच सरकारी नोकरींत असलेले सरदारखान महमदखान यांनी फुलेत्रामहालांत रघुनाथराव गोविंदांना हरतऱ्हेची मदत करावयाचें मनावर घेतलें. मियागांवच्या लोकांनी आणि डाकोरच्या राजपुत्राने बंडांत सामील व्हावें, म्हणून त्यांचें मन वळवण्यांत आलें. उमरखान पठाण याचा खाक्या उघड उघड होता. तो थेट अहमदाबादेसहि गेला आणि तेथील 'काळचा' व 'तांबडचा' पलटणी फोडण्याचाहि त्याने प्रयत्न केला. उमरखानाची ही तयारी पाहिल्यावर अहमदा-बादच्या ढोलका विभागांतील हकीम हैदरखान अन्वरखान पठाण व बडोद्याचे वकील

दाजी मोरेश्वर मुळे ही का स्वस्थ बसणारीं माणसें होतीं ? त्यांनी नव्या पेशव्यांना नुसते 'रंगरूट' मिळवून दिले नाहीत, तर स्वतःच्या खर्चाने त्यांनी शिपायांना लष्करी पोशाखहि पुरवले.

याच मोक्यावर बंडाचा मांड कसा मांडावा हें सांगावयास, नारायण उत्तमराज पाठक हे बडोद्याचे ज्योतिषीहि पुढे आले. अहमदाबादेस नारायण लक्ष्मीराम व्यास यांच्या घरींच ज्योतिषीबुवांनी आराखडा तयार करून दिला. मनोहर गंगादासासारखा एक भिक्षुक, माधवलाल लल्लूभाईसारखा एक सरकारी नोकर आणि परशुराम हरिभाओसारखा एक पुराणिक, अशीं बारकींसारकीं माणसेंहि आपण होवून त्या बंडाच्या आराखड्याला हातभार लावावयाला पुढे आलीं. मदारभाई आणि सुंदर पैलवान यांनी बंडांतील मंडळींना हव्या त्या ठिकाणीं आणि हवा तेवढा दाणा–गोटा पुरवावा अशीहि व्यवस्था झाली.

गोपाळ अंताजी ऊर्फ कृष्णगुरु ऊर्फ नवे पेशवे यांना आता अहमदाबादेंत आणण्यांत आलें. उघड बंडाची सर्व तयारी झाली होती व कांही पावलेंहि टाकलीं गेलीं. पण "दैवयोग–दुर्विपाक" आडवा आला. महाराष्ट्रीयाच्या पांचवीला पुजलेल्या फितुरीने येथेहि डाव साधला. टाकलेल्या पावलांनी बंडाला कांही तेज चढण्यापूर्वीच बंडाचा सारा कटच्या कट बडोदे-दरबारकडे गोर देवीदास हंसराज याने फोडला. गोर देवीदासाच्या सच्चेपणाची साक्ष मूळजी वीरजीने भरली. मूळजी वीरजीने आणखीहि दरबारला अशी माहिती दिली की नडियादला माझी व दाजीभटांमार्फत कृष्णंभटाची गाठभेट झाली असून, नव्या पेशव्यांच्या सही–शिक्क्याचा सर्व पत्रव्यवहार ज्याचा त्याच्याकडे पोचविण्याचें काम कृष्णंभटाने पत्करलें आहे. मूळजी वीरजीचे त्या माहितीला लक्ष्मीदास हरनंद आणि दुर्गापंचम यांनी साथ तर दिलीच, पण वर दरबारला असेंहि कळविलें की बंडवाले द्वारकेहून अहमदाबादेस येऊन दाखल झाले आहेत.

## तीस आरोपीवरील खटला

बडोदे-दरबार मग ताबडतोब आपल्या हद्दींतील बंडखोरांना गिरफदार करण्याच्या मार्गाला लागला. नव्या पेशव्यांचे शिक्कामोर्तब ज्याने तयार केले होते तो जेठा सकाळा आणि गणपतराम नांवाचा दुसरा एक गृहस्थ यांना बेड्या घाल–तांच त्यांनी माफी मागितली व ती त्यांना देण्यांत आली. ज्यूसा भगन, जयसिंग कारजी, गणेश गेहेला हे सर्व कोळी मंडळींतील बंडखोरांचे पुढारी आपण होऊन पायां पडत दरबाराकडे आले आणि त्यांना पेशव्यांनी दिलेले पोशाख ज्यांनी बडोदे दरबारच्या स्वाधीन केले. याच कोळी पुढाऱ्यांच्या मदतीने बडोदे–दरबारला बंडासंबंधीचा सगळा कागदोपत्री पुरावा मिळत गेला. त्या हातीं आलेल्या पुराव्याच्या जोरावर बडोदेदरबारने असिस्टंट रेसिडेंट हॅथवे यांस बंडाच्या कटाची सगळी

माहिती कळवली आणि अहमदाबादेस आवश्यक ते लोक बंदी करण्याबद्दल विनंती केली. फितुरीने आपल्याला दगा दिला, याची जाणीव अगदी याच वेळी बंडाच्या नेत्यांसहि झाली. म्हणूनच असिस्टंट रेसिडेंट हॅथवे याने कोणावरहि हात टाकण्यापूर्वीच रघुनाथराव गोविंद, बाळ गोविंद लक्ष्मीराम आणि आणखी एक गृहस्थ सुंदर पहेलवान हे सरकारच्या हातावर तुरी देऊन निसटले. तथापि, नव्या बंडखोरांपैकी बरेच महत्वाचे पुढारी बडोदें, द्वारका आणि अहमदाबाद येथे धरण्यात आले आणि त्यांच्यावर बंड करून प्रस्थापित सरकारशीं युद्ध पुकारल्याच्या आरोपाखाली बडोद्याचे हुजूर फौजदारी कामदार नारायण भाऊ शिंदे यांच्या न्यायमंदिरांत खटला भरण्यांत आला. प्रत्यक्ष तीस आरोपींवर खटला चालला. बंड उघडकीला येण्यापूर्वीच मदारभाई वारला होता आणि पकडला जात असतांच, झटापटींत रेवा माणिक मारला गेला. खटल्यांत छत्तीस साक्षीदार तपासण्यांत आले. श्रावण वद्य १३ संवत १९२० ( सन १८६३ ) चें एक आज्ञापत्र, टकरास्वामींनी सांकेतिक भाषेंत लिहिलेलें एक पत्र, तशींच दुसऱ्यांचीं सतरा पत्रें ( दहा मराठी व सात गुजराथी ), एक गुजराथी व दोन मराठी जाहीरनामे अशा महत्त्वाच्या निशाण्या, एकंदर एकशे सहासष्ट निशाण्यांत होत्या असें म्हणतात.

ज्या तीस महाभागांवर खटला झाला, त्यांपैकी गोपाळ अंताजी ऊर्फ कृष्णगुरु (वय ३५), शम्भू दौलता कदम (वय ४३), मुरलीधर बापूजी देशपांडे (वय ४०) मोतीराम त्रिकम जैनी (वय ४०), दाजी भगवान भट ( वय २८ ), प्राणशंकर हरिनारायण ( वय २८ ), नारायण लक्ष्मीराम व्यास ( वय ५५ ), टकरास्वामी (वय ६०), नारायण रामचंद्र ( सातारचे ) क्षीरसागर ( वय ३५ ), भुजंगराव काशीनाथ राजिवडेकर ( वय ३५ फलटण संस्थानापैकी चुरखी गांवचे ), खैमा काळ गुगली (वय ३५), कृष्णंभट जगन्नाथ (मूळ नरसोबाच्या वाडीचे वय २४), अम्बाशंकर महाशंकर भट्ट (वय ५२), रामभट एकंभट ऊर्फ रोटीराम (वय ३८), गणेश कृष्ण (वय ४५), काशीनाथ अनंत ( मूळ विजयदुर्गकडील खिशी गांवचे, वय २५ ) अशा सोळा जणांनी आपण बंड उभारलें, असें उघड कबूल केलें. लल्लू रणछोड ( वय ५० ), अनुपराम जगजीवन ( वय ३५ ) हैदरखान अन्वरखान (वय ३५), दाजी मोरेश्वर मुळे (वय ५०), सरदारखान महंमदखान (वय २२), हरिदास माधवदास वय(५०), नंदराम उत्तमराम पाठक (वय ६८), मनोहर गंगादास (वय ३०), माधवदास लल्लूभाई (वय २४), परशुराम हरिभाई (वय २४), रघुनाथ व्यंकटेश (वय ३७), हरि बल्लाळ (वय ४७), आणि चिंतामण कृष्ण (वय ३५), या तेरा जणांनी आपल्यावरील आरोप नाकबूल केला. उमरखान रसूलखान ( वय ६४ ) याने प्रथम बंड केल्याचें सांगितलें पण न्यायमंदिरांत तो उलटला.

## स्वातंत्र्यलालसेची तीव्रता

खटल्याचा निर्णय म्हणून शिंदेसाहेबांनी नवे पेशवे, शम्भू दौलता, मुरलीधर बापूजी आणि मोती त्रिकम यांना जन्मठेप काळे पाण्याची शिक्षा दिली; दाजी भगवान, प्राणशंकर हरि नारायण, नारायण लक्ष्मीराम व्यास आणि टकरास्वामी यांना चौदा वर्षे प्रत्येकी सक्तमजुरी सांगितली; नारायण रामचंद्र क्षीरसागर, भुजंगराव काशिनाथ राजिवडेकर आणि खेमा गांगली यांना दहा वर्षे सक्तमजुरी फर्मावली. उमरखान रसूलखान, लल्लू रणछोड, कृष्णंभट जगन्नाथ, अनुपराम जगजीवन आणि अम्बाशंकर यांना सात वर्षे सक्तमजुरी सुनावली; रामभट एकंभट ऊर्फ रोटीराम यांस पांच वर्षे सक्तमजुरी सांगितली; गणेश कृष्णांना तीन वर्षे सक्तमजुरीवर पाठविलें; हैदरखान, दाजी मोरेश्वर, काशीनाथ अनंत, सरदारखान महंमदखान आणि हरिदास माधवदास यांना एक वर्षाची सक्तमजुरी बांधली; नंदराम उत्तमराम पाठक, मनोहर गंगादास, माधवदास लल्लूभाई आणि परशुराम हरिभाई यांना कच्च्या कैदेंत झालेली शिक्षा पुरेशी आहे, म्हणून सोडून देण्यांत आलें; रघुनाथ व्यंकटेश, हरि बल्लाळ आणि चिंतामण कृष्ण यांना पुराव्याच्या अभावीं सोडून देण्यांत आलें.

## ब्रह्मावर्ताचे गोविंदशास्त्री

याच १८६२ चे पुढील काळांत आणखीहि एक उठाव झाला. ता. ७ जानेवारी १८६२ पूर्वी भिल्लांनी बुरवाणीमध्ये जो उठाव केला तो रावसाहेब पेशव्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्या सोळा माणसांनी केला असून रावसाहेबांचा पुतण्या पंचवीसशे माणसांसमवेत आसपास असावा, याची खात्री मेजर आर. आय. मीडस् यांनी करून घेतली होती, असें पत्र मुंबईच्या पारसनाथाचा पुजारी दादू बम्मन याने लिहिल्याचें सरकारचे हातींच लागले. ब्रह्मावर्ताचे गोविंदशास्त्री अशा पत्रांची देवघेव करीत हिंडत असलेकारणाने, त्यांनाच सरकारने पकडल्यावर रावसाहेब पेशव्यांचे दूत दख्खनमध्ये व गुजराथमध्ये इंग्रजांविरुद्ध उठाव करण्याचा कसा प्रयत्न करीत हिंडत होते, याबद्दलचाहि कागदपत्र गोविंदशास्त्र्याजवळ सांपडला. शिंदे सरकारच्या अधिकाऱ्यांनी सदर गोविंदशास्त्र्यास खानछत्रे येथे ता. २६ डिसेंबर १८६१ चे सुमारास पकडून भीमगडावर कैदी म्हणून ठेवला होता. या गोविंदशास्त्र्याचे साथी म्हणून कोण होते असें विचाराल तर औरंगाबादचा बालपरशद्‌गर, मारवाडचा उमा हज्जन, जानपूरचा शाळिग्राम, औंध-सुलतानपूरचा बस्तीशेट आणि द्रौदिया खेडचाचा रामबक्ष. हा गोविंदशास्त्री म्हणजे १८६० च्या पावसाळचांत नरसिंहगडाहून निसटलेलाच शास्त्री असावा. त्याच्याजवळील मराठी पत्रावरून हें उघड झालें की निजामच्या हद्दींतील एका जिल्ह्याचा कबजा करून तोच आपल्या उठावासाठी दारूचें कोठार बनवावयाचा असा बेत रावसाहेबानें केला होता. हा बेत डोकेबाजीचा असून त्यासाठी आपला हस्तक विष्णुपंत नारायणराव मुत्सद्दी यांना जुलै १८६१ मध्ये ग्वाल्हेरीहून पैसे आणण्यासाठी त्याने योजिलें होतें. १८६१ च्या मे पासून सप्टेंबरपर्यंतच्या त्यांच्या पत्रव्यवहारावरून उघड आहे की ग्वाल्हेरहून काशीबाई ( पेशवे ) व वामनराव ठाकूर यांनी जुलैमध्ये

जयपूरला हुंडी पाठविली. १८६१ च्या २५ मेलाच मुंबईच्या भेंडीबाजारांतील पारसनाथाचे देवळांत दुर्गादास चोभे, सूरदास आणि गुजराज यांना पाठवून देण्याची सूचना देणेंत आली होती.

तात्या टोप्यांच्या सैन्यांत दक्षिणी पंडित रामराव जयराम हा एक बक्षी होता. भावेरच्या राजाला तात्या मिळाले त्यावेळी रामरावहि बरोबर होता. त्यांना अजितसिंग आणि कुमार नारायणसिंगहि मिळाले. भावेरच्या राजाला मेजर मेडोजने हरवल्यावर तात्या निसटले. पण रामरावने रामराव ठाकूराकडे मल्हार–गडाला नौकरी धरली होती. १८६० त तो उज्जनीस आला होता. रंगरूट गोळा करून रावसाहेबांना मिळण्याचा त्याचा बेत होता. पकडल्या गेलेल्या गोविंदशास्त्रींना व काका फडक्यांना सोडवावे असाहि त्यांना रावसाहेब पेशव्यांचा आदेश होता. या सर्व मंडळींना पैशाचा पुरवठा व्हावा म्हणून रावसाहेब पेशव्यांच्या ठेवी अशा होत्याः– खिल्जीपूरच्या महाराजांजवळ दहा हजार रुपये; देवगड बोरियाच्या महाराजांजवळ रत्नांचे दोन डबे; चतुरपूरच्या राणीजवळ दोनहजार मोहरा; भावेरच्या राजाजवळ पांचशे मोहरा व दोन घोडे. याशिवाय कांही तरतूदी करून रावसाहेब पेशवा स्वतःस रामराव रघुनाथराव म्हणवून घेत घेत १८६१ मध्ये हैद्राबादेस कट रचित राहिलाच. त्याच्या बंदोबस्तासाठी पुण्याहून मार्चमध्ये मोठें सैन्य रवाना झालें. हैद्राबाद बंडाचा पुढारी कृष्णराव याला २८ मार्चला पकडण्यांत आल्यावर त्याने आपलें नांव बाळकृष्ण जोशी म्हणून सांगितले. असा दगा पाहिल्यावर रावसाहेब हैद्राबादेंतून निसटले. पण पुढे पकडलेहि गेले.

यशापयशाचा भाग बाजूला ठेवला, तर ब्रिटिश सरकारविरुद्ध सामान्य जनतेच्या सर्व थरांत असंतोष पसरला होता आणि तो उठाव घेवूं लागतांच महाराष्ट्रीय नेतृत्वाला महाराष्ट्रीय गुणांचा जसा उपयोग झाला, तसेंच दोषांचा उपसर्गहि कसा पोचला याचें उदाहरण वरील उठावांत आढळेल. बंडाचा उपशम करून ब्रिटिश सरकारने आपल्यापरी सुस्कारा टाकला, त्याला अर्ध्या तपाचाहि कालावधि झाला नाही तोंच महाराष्ट्रीयांची स्वातंत्र्यलालसा साधेल तेव्हा उसळी मारल्याशिवाय राहत नसे, एवढे तरी वरील उदाहरणानीं स्पष्ट आहे.या स्वातंत्र्य-लालसेला लोकशाहीचें स्वरूप नव्हतें; सरंजामशाहीचेंच होतें ही गोष्ट खरी; पण सामान्य जनांत स्वातंत्र्य–लालसेने एवढें मूळ धरलें होतें की, ब्रिटिशांचा अधिकृत इतिहासकार व्हिन्सेंट स्मिथ नमूद करून बसला आहे की "प्राप्त परिस्थितींत घडणें शक्य होतें तेवढे गुलामगिरीविरुद्ध असे–'राष्ट्रीय बंडच'–तें होतें." ( The Mutiny was as nearly a national revolt against slavery as could happen in the circumstances. )

# १८५७ चा वारसा

१८५७ चा उठाव हा सार्वत्रिक असंतोषांतून उद्‌भवला होता; पण असंघटित मनुष्यबळाने संघटित शक्तीशीं विरोध करतांना आणि ताज्या दमाच्या पल्लेदार शस्त्रास्त्रांना तोंड देतांना, भारतवासीयांना निभलें नाही आणि तरीहि " ध्येयं वा साधयेत्, देहं वा पातयेत् " या पैकी कांहीच न साधलेले व्रती पुन्हा घरीं गेले नाहीत की संसारांत पडले नाहीत. ओळख पटली तर कित्येकांस तोफेच्या तोंडीं जावें लागलें असतें, हें खरें; पण ही मंडळी कांही मृत्यूला भिणारी नव्हती. म्हणून त्यांच्या मनाने असें घेतलें कीं आपल्या सर्व उठावाला असावें तसें परमेश्वराचें अधिष्ठान नसल्यामुळेच आपणांवर नामुष्कीचा प्रसंग आला. त्यामुळे ते सर्व संन्यासी, बैरागी किंवा फकीर झाले. पुण्यांतील जंगली महाराज आदि करून मंडळी त्यांतीलच होतीं. जळगांव येथे प्रसिद्ध होणाऱ्या राष्ट्रसेवकाचे ता. ७ जून १९५५ चे अंकांत म्हटलें आहे की " सर्व बंडाच्या धामधुमीचें शान्तवन झाल्यावर, कांही बंडवाल्यांनी खानदेशांत प्रवेश केला होता. अमळनेर मठांत त्यांनी फरारी म्हणून दिवस काढल्याचा दाखला मिळतो. काशी मठ, हरिहरेश्वर मठ, पिंपळगांव, वाघोबा वगैरे ठिकाणें त्या परमेश्वराचें अधिष्ठान शोधणाऱ्या १८५७ च्या ' परत आलेल्या ' वीरवरांचींच होत. त्यांपैकी कांहीजण नारायण बोवा, गोविन्द बोवा, बाबाजी बोवा, केशव बोवा, श्रीधर स्वामी अशा नांवाने अजूनहि लोकांच्या स्मरणांत आहेत. " जें खानदेशांत तेंच सर्वत्र.

ज्ञानोदय (नगर) च्या ता. १५ मे १८४९ च्या अंकांत म्हटल्याप्रमाणे त्यावेळेसच म्हणजे प्रत्यक्ष बंडाचा उठाव होण्यापूर्वी आठ वर्षें आणि सातारची गादी इंग्रजांनी खलास केली, त्या सुमारास " इंग्रजांची जिरवायला कोणी तरी अवतार घ्यावा अशी पुष्कळ माणसांची इच्छा आहे. पण असले दैव-वादाचे नमुने आता दिवसें दिवस कमी होत जातील. इंग्रज आज हिंदुस्थानांतील लोकांना शिक्षण देत आहेत, पण हे शिक्षित लोक इंग्रजांशीं इमानेंइतबारें वागतील असा नियम नाही ! हे शिक्षित लोकच प्रामुख्याने इंग्रजांविरुद्ध जातील, असाच दाट संभव आहे. या भूमीच्या मूळ सुकन्यांचें व सुपुत्रांचें कल्याण इंग्रजी राज्यकर्त्यांचे डोळ्यां-पुढे मुळीच नाही. त्यामुळे ते लोक जसजसे शहाणे होत जातील, तसतसे आपले हक्क इंग्रजांपासून हिरावून घेतील आणि त्यांना जर कां विरोध झाला तर ते इंग्रजांना या (हिंदुस्थान) देशांतून चालते व्हा, असें स्पष्ट सांगतील. " तसें सांगण्याचा प्रारंभ म्हणूनच १८५७-५८ चा उठाव झाला आणि फसला. तो फसवयास मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन् याचेसारख्या ईस्ट इंडिया कंपनीच्या

प्रामाणिक नौकरांची चतुराई व चपळाई कारण झाली. उत्तर हिंदुस्थानांत झालेल्या उठावाची बातमी मिळतांच एल्फिन्स्टन्ने मुंबई-आग्रा-रस्ता वाहतूक-बंद व्हावा म्हणून मेजर जनरल वूडबर्न याच्या नेतृत्वाखाली एक लष्करी तुकडी रवाना केली. एवढेंच नव्हे, तर पुढे त्यास महूपर्यंतहि एल्फिन्स्टन याने पाठविलें. ता. ८ जून १८५७ पासून पुण्याहून वूडबर्न निघाला. त्याच्याबरोबर अहमदाबादचे घोडदळहि निघालें. पण त्यांनी दिल्लीविरुद्ध चाल करण्याचें नाकारलें. कारण तें घोडदळ सर्व मुसलमान बांधवांचें होतें. ता. १३ जून १८५७ रोजी वूडबर्नने औरंगाबादेकडे मोर्चा वळवण्यास हुकूम दिला आणि सब्सिडिअरी सैन्याला शस्त्रें स्वाधीन करण्याचा हुकूम सोडला. पहिल्या तुकडीवाचून बाकीच्या सैन्याने तो हुकूम पाळला. पहिल्या तुकडीला सहा मिनिटांची फुरसत देण्यांत आली. ते घोडे फेकूं लागले. एकाने कॅप्टन् ॲबट्ला ठार मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ताबडतोब लष्करी न्याय-निवाडा होऊन त्याला दुसरे दिवशीं फांशीं देण्यांत आलें.

एल्फिन्स्टन्सारख्यांच्या नजरेखालील मुसलमान बांधवांची वृत्ति अशी आढळली, म्हणून १८५७ च्या उठावांत सगळे मुसलमान आत्मीयतेने सामील होते, असें मानण्याचें कारण नाही. सेंट जेम्सच्या गॅझीटचे ता. १५ डिसेंबर १८८४ च्या अंकांत म्हटल्याप्रमाणे, " १८५७ च्या उठावांत एकंदरीने मुसलमानांनी फारसें डोकें वर केलें नाही...... १८५७ साली हिंदु-मुसलमान दोघांनीहि आमच्यावर नुसता बहिष्कार घातला असता तर आमची तारांबळ झाली असती. व आमचा पराभवहि पण झाला असता ! "

. पण तसें व्हावयाचें नव्हतें. " हिंदुस्थानच्या लोकांत एक-दिल सातत्याने प्रतिकार करण्याचा दमच नाही," असा वरील गॅझीटकाराचा आरोप आहे. म्हणूनच ज्ञानोदयाच्या ता. ८ ऑक्टोबर १८५७ च्या अंकांत म्हटल्याप्रमाणे "रविवार ता. ४ ऑक्टोबर १८५७ हा बंड शमावें म्हणून परमेश्वराची प्रार्थना करण्याचा दिवस इंग्रजांनी जाहीर करतांच पुण्याच्या तुळशीबागेंत कृष्णशास्त्री चिपळूनकरादि सर्व विद्वान् प्रार्थनेसाठी जमले, मशीदींत प्रार्थना केल्या गेल्या आणि इंग्रज सरकारला विजय मिळवण्याबद्दल ठिकठिकाणी परमेश्वराच्या आळवण्या झाल्या. " या प्रकारांवरून इंग्रजाने हिंदुस्थानचें अवसान ओळखलें. आणि १८५८ साली " प्रजेचा संतोष तेंच आमचें पारितोषिक " अशी ग्वाही देणारा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. ता. १ नोव्हेंबर १८५८ रोजी सायंकाळी ५ वाजतां त्या " राणीच्या जाहीरनाम्याचें ठिकठिकाणी स्वागतपूर्वक वाचन झालें. " अहमदनगर-सारख्या ठिकाणी त्या जाहीरनाम्याला एकशेएक तोफांची सलामीहि दिल्याचा उल्लेख ज्ञानोदयाच्या ता. १५ नोव्हेंबर १८५७ च्या अंकांत आहे. हिंदुस्थानांतील 'बंडवाल्यांच्या' फसलेल्या प्रयत्नानंतर प्रजेला मिळालेला " मॅग्नाचार्टा " म्हणूनहि त्या जाहीरनाम्याचें कोडकौतुक

करणारे भोळे जीव त्यावेळीच काय, पण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत हिंदुस्थानांत कांही कमी नव्हते.

पण स्वत: इंग्रज सरकारचे अधिकारीच त्या राणीच्या जाहीरनाम्याला कसें मोजत होते, याचा एक नमुना म्हणून १८७६ ते १८८० मध्ये हिंदुस्थानचे व्हाइसरॉय असलेले लॉर्ड लिटन यांनी त्यावेळच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटला जें सुप्रसिद्ध "गुह्यांतील गुह्य" म्हणून पत्र लिहिलें आहे, तें पहाण्यासारखें आहे. सदर पत्रीं लॉर्ड लिटन लिहितात:–

"१८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने वचन दिल्याप्रमाणे युरोपियनांशीं हिंदवासीयांची संपूर्ण समानता व अधिकाराच्या आकांक्षा आणि हक्क यांची अंमलबजावणीं केव्हाच करतां येण्यासारखी नाही, हें आपण सर्वजण ओळखतोंच. त्यांना ( हिंदवासियांना ) वंदी घालणें आणि त्यांची फसगत करणें, यांपैकी काय करावयाचें, एवढाच आपल्यापुढे प्रश्न होता आणि आपण कमींत कमी सरळपणाचा मार्ग तेवढा पतकरला. वचन म्हणून जे शब्द कानांत सांगितले ते छातींत धस्स होईल अशा बेताने मोडण्यासाठी हातीं असलेल्या सर्व साधनांचा हिंदुस्थानसरकारने व इंग्लंडच्या सरकारने उपयोग केला, हा जो आरोप हिंदवासियांकडून होत असतो, त्याला समाधानकारक उत्तर देणें कोणत्याच सरकारला शक्य नाही."

तात्पर्य, १८५७ सालीं झालेला उठाव दाबून टाकण्याकरतां इंग्रज सरकारला चाळीस कोटी रुपये खर्च आला आणि अर्थशास्त्रज्ञ विलसनच्या मतें, दरसाल दोन कोटी रुपये त्यावर व्याज देणें आलें, तें सर्व देणें हिंदुस्थानच्याच टाळक्यावर लादण्यासाठी आणि तें लोकांनी बिनतक्रार लादून घ्यावें म्हणून राणीच्या जाहीरनाम्याची जादू इंग्रजांनी केली व ती सफलहि झाली.

अशा युक्त्या-प्रयुक्त्यानीच केवळ १८५७ च्या उठावाचा बीमोड इंग्रजांनी केला असें मात्र म्हणावयाचें नाही. बंडाचा बीमोड करावयास इंग्रजांच्या जवळचीं पल्लेदार अशीं तारीख-तागायत हत्यारेंहि उपयोगी पडलीं. इंग्रजांनीच हिंदुस्थानांत आपल्या राज्याच्या बळकटीला व लष्करी हालचालीला विशेष उपयुक्त ठरावीत, म्हणून सुरूं केलेलीं रेल्वे, टपाल, तारयंत्रें त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांच्या सेवेस आलीं. उठाव-वाल्यांच्या जवळ तशीं कांहीच साधनें नव्हतीं. वैयक्तिक शूरपणा आणि ब्रिटिशांबद्दलचा असंतोष एवढींच काय तीं त्यांचीं खात्रीचीं सामर्थ्यें होतीं. रंगो बापूजी आपल्या जीवित-कार्याहून हिंदुस्थानांत परत आल्यावर, ब्रिटिशांबद्दलचा राग काढावयाचा या एका भूमिकेवर बहादूरशहाच्या मंडळीपासून सर्वांचें एक मत झालें असलें व त्यासाठी संकेताने साधारणपणें वेळ आणि पद्धत ठरविली गेली असली तरी, विजय होत जाईल तसें अगर अंतीम विजयानंतर काय करावयाचें, सर्व हिंदुस्थानची राज्यव्यवस्था कशी मांडावयाची, हें सर्व कटवाल्यांनी

भवितव्यतेवर सोपविल्यासारखें होतें. एरवीं, गुजराथ–पुणें–बेळगांव–पासूनचे मुसलमान बहादूरशहाच्या बादशाहीपुरतें पहात राहिले नसते आणि काल्पीचा विजय होतांच, पेशव्यांनी पेशवाई स्थापण्याचा उतावीळपणा दाखविला, तसा दाखविला नसता ! मुसलमानांला आपल्या पूर्व वैभवाचा दिमाख हवा होता. पण हिंदूंनी आतां तो चालूं दिला नसता. तथापि बंडवाल्यांच्या अखिल भारतीय पुढाऱ्यांत सर्वांमध्ये वयाने लहान असलेल्या झांशीच्या लक्ष्मीला जी दूरदृष्टी होती ती दुसऱ्या कोणाजवळ चमकलीच नाही. हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणी बंडाचा उठाव झाला, पण शीख–गुरखे–निजाम ही मंडळी तर बाजूला राहिलीच; शिवाय, बंडाचे प्रमुख पुढारी महाराष्ट्रीय असून आणि इंग्रजी राजवटीबद्दल महाराष्ट्रीय मंडळींचा पहिल्यापासून राग असूनहि शिंदे वगैरे मातबर महाराष्ट्रीय मंडळी इंग्रजांस अनुकूल राहिली. ती बंडवाल्यांना मिळवून घेतां आली नाहीत. अशा कारणांच्या भरीला, महाराष्ट्राची घमेंड की ब्रिटिश राजवट आपल्या दयेची दासी आहे ! पण मसण–देवता जी फंदफितुरी तीहि कांहीं कमी प्रभावी नव्हती. लॉर्ड रॉबर्टने लिहिलेलें " हिंदुस्थानांतील एकेचाळीस वर्षें " हें पुस्तक याबाबत वाचनीय आहे. बंड फसलें आणि इंग्रजी राज्य अधिक उठावाने हिंदुस्थानच्या डोक्यावर बसलें. तरी पारतंत्र्याचा वीट हा वारसा बंडवाल्यांनी "पुढीलांकरितां" एवढ्या प्रमाणांत ठेवला की, मराठ्यांना लष्करी दृष्ट्या खच्ची केले तरी पील कमिटीच्या रिपोर्टांत म्हटल्या-प्रमाणें हिंदी व त्यांतल्या त्यांत बंडवाल्यांच्या धर्तीवर स्वातंत्र्याचे साधतील तसे प्रयत्न करीत राहण्याचें व्रत पुढील पन्नास वर्षें अनेक देशभक्तांनी चालविलें. तशा युद्ध-प्रयत्नांचा उपयोग नाही, असें कालौघाचा चिकित्सापूर्वक विचार करून ज्यांचें मत झालें होतें, त्यांनीहि आपलीं साधनें व भाषा बदलली असली तरी ब्रिटिश राजवटी-बद्दलचा असंतोष आणि स्वाभिमानजागृति यांचा वारसा अखंडपणें चालविण्यांत भूषणच मानलें. बंडवाल्यांच्या वारस देशभक्तांना आपला सारा उठाव अर्थातच नव्या जमान्यांत करावा लागला. कारण बंडाचा एक तात्कालिक परिणाम असा झाला होता की, ईस्ट इंडिया कंपनीला कारभार करतां येत नाही, असें इंग्लंडचें लोकमत प्रक्षुब्ध झालें होतें. म्हणून इंग्लंडच्या राज्यसंस्थेनेच हिंदुस्थानचा राज्य–कारभार हातीं घेतला होता. मग ?

पदवीधरांचे मुगटमणी न्या. रानडे यांनी राष्ट्राच्या खऱ्या उन्नतीच्या मार्गांसाठी राजकीय, तशाच सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व संशोधक अशा सर्वच क्षेत्रांत समन्वयी प्रगती होत राहिली पाहिजे असा सिद्धांत मांडला. भारताचें दास्य गेलेंच पाहिजे व त्याला मानाचें स्थान स्वाभिमानपूर्वक मिळालें पाहिजे या ध्येयावरील लक्ष रानड्यांनी विचलित होऊं दिलें नव्हतें. त्यापेक्षाहि भारताच्या उन्नतीसाठी इंग्रजी पार्लमेंटांतच भारतीय प्रतिनिधि असावेत अशी खटपट न्या. मंडलिकांनी केली. अशा गोष्टी करतांना या सर्व पुढाऱ्यांच्या

डोळयापुढे राजकारणांत बहुजन-समाजाची प्रवृत्ति--प्रकृति प्रतिबिंबित झाली पाहिजे ही गोष्ट होतीच. मिशनच्यापेक्षा मिशनरी होऊन पतितांना पावन करून त्यांना मानाचे हक्क दिले पाहिजेत हे महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या कार्य-तत्परतेने समजाविले. १८७० च्या आसपास पुण्याचे सार्वजनिक काका, साताराचे स्वदेशी कीर्तनकार माटे, इंदापूरचे देशपांडे, वसईचे गोविंद बाबाजी जोशी आणि काशिनाथ त्रिंबक खरे, दिनकर बल्लाळ चक्रदेव, विष्णु परशरामशास्त्री पंडित यांनी नव्या काळाला व राजवटीला अनुसरून लोकसमाजाने कसें नवें वळण घेतलें पाहिजे यांचा प्रचार धूमधडाक्याने तालुक्याच्या गांवापर्यंत तरी चालविला. नव्या परिचित झालेल्या सुधारणा-संशोधनांचा सदुपयोग भारताने करून घेतांना आपल्या हजारों वर्षांच्या इतिहासाचा धिक्कार करण्याचे कारण नाही; उलट स्वतःच्या पायावर स्वतःच्या अकलेने उभे राहून आपलें स्वातंत्र्य कमावलें, राखलें व तेजाळलें पाहिजे, असा संजीवनी-मंत्र निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी महाराष्ट्रास दिला.

सत्तावनच्या कथा आणि संग्रामगीतें लोकांच्या कानांत व मनांत तेव्हा घुमतच होतीं. त्यामुळेच शस्त्र-बंदी, मीठकर, उत्पन्नकर यांच्या प्रयोगाचे वेळी लोकांनी परकीय सत्तेला युक्तिपेक्षा शक्तीने विरोध केला. दुष्काळाचे वेळी चार चार वर्षें पोटें मारावयास लागलेल्या प्रजेची दाद लागेना. म्हणून वासुदेव बळवंत फडक्यांनी १८७९ साली इंग्रजी राजवटीला गनिमी काव्याने लढत देण्याचा प्रयत्न केला. तो फसला तरी त्याचा व सगळ्या इतिहासाचा प्रबोध घेऊन विचारवंतांनी लोक-संघटनेचा मार्ग आखला. त्यांतूनच कॉंग्रेसचा जन्म झाला. त्यानंतर, राष्ट्राचे सर्वांगीण सुधारणेवर तीव्रतेने भर दिली पाहिजे व आपापल्या कर्तृत्वाचें क्षेत्र निवडून तरुण मडळींनी कार्याची उभारणी सगळ्या बाजूंनी केली पाहिजे; भारताच्या मूळ यज्ञमय संस्कृतीला मोगल साम्राज्याने जी उपभोगरतीची संस्कृति जोडून दिली तिच्यांत इंग्रजी राजवटीने ओळख करून दिलेल्या उद्यमरतीच्या संस्कृतीचे धागेदोरे विणून भारताने नव्या संस्कृतीचा ब्रह्मदेव झाले पाहिजे असा गोपाळराव आगरकरांचा कटाक्ष होता. तथापि ज्याच्या हातीं सत्ता त्याच्याकडे भविष्याचा मक्ता हा व्यावहारिक न्याय जाणून राजकीय पारतंत्र्याचें उच्चाटन पहिल्या प्रथम कसें होईल यावर विचारवंत मंडळींनी भर ठेवला पाहिजे व ज्ञानपूर्वक नव्या राष्ट्राची उभारणी केली पाहिजे, या प्रेरणेने शिवाजी-गणपती उत्सवांतून लहानथोर राष्ट्रभक्तीने शहारून सोडण्याचा उद्योग लो. टिळकांनी उभारला आणि इंग्रजी राजवटीचा "कधीच न मावळणारा सूर्य" एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत समजून चुकला की, शिक्षणाचे संस्कार न झालेला बहुजन समाज आणि पाश्चिमात्य शिक्षणाने तार लागलेले बोलके विद्वान हे राजकारणांतील भावनेने तरी एकच आहेत.

१८९३ हें साल महाराष्ट्राच्या व भारताच्या जीवनक्रमांत स्थित्यंतराचेंच ठरले. शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेंत हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून जाऊन 'हें विश्वचि माझें घर ' अशी शिकवण देणाऱ्या भारतीय संस्कृतीची ओळख विवेकानंदांनी जगाला करून दिली. याच वर्षांत, दादाभाई नवरोजी ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद झाले व बाबु अरविंद घोष हिंदुस्थानांत परत येऊन त्यांच्या ' जुन्या जागीं नवे दिवे ' या लेखमालेमुळे अर्ज-आर्जवांनी राष्ट्रीय जीवनाचा गाडा चालविणाऱ्या " भल्या बुद्धीच्या सागरांना " धक्के बसले. या पुढील युगाचे पुढारी लो. टिळक आहेत हे याच सालापासून प्रतीत होऊं लागले; आणि शिवाजी क्लबांच्या स्थापना होऊन भारतीय क्रांतीकारकांच्या संघटनाहि निर्माण झाल्या. " इंग्लंडची अडचण तीच आमचें संधिसाधन " या तत्त्वावर पुढे चळवळीची दिशा गेली. अगदी सनदशीर चळवळी शांततेने आणि सहनशीलतेनें चालविण्यांत आल्या; कायदेमंडळांत आणि कायदेमंडळाच्या बाहेर परकीय सत्तेला कायद्यांच्या चौकटींतून आणि महात्मा गांधीप्रणित कायदेभंगांतून विरोध करण्यांत आला; वैयक्तिक व सामूहिक तालमी-आखाड्यापासून ऐन सैन्यांत फितुरी घडवून आणण्यापर्यंत आणि देशगौरव सुभाषचंद्रबोसांनी आझादसैन्य उभारण्यापर्यंत व जगन्नाथराव भोसले जनरल म्हणून पुढाकार घेण्यापर्यंत स्वराज्यासाठी सशस्त्र प्रयत्न करण्यांत आले; स्वदेशीच्या चळवळीने आर्थिक नाकेबंदी करण्यापासून ऐनजिनसी करबंदी करण्यापर्यंत आन्दोलनें उभारण्यांत आलीं. लोकमान्यांच्या होमरूल चळवळीने जगाला हिंदुस्थानच्या जिवंतपणाची जाणीव झाली होती. पुढे १९४२ साली महात्मागांधीजींनी "चलेजाव" च्या चळवळीला चालना दिली. १८५७ च्या उठावाने जो वारसा भारतीयांना ठेवला होता त्याचींच अनेकांगांनी विकसित झालेलीं हीं रूपरूपान्तरें होतीं. १८५७ च्या उठावांत ज्या उणीवा आढळल्या त्याहि भरून काढण्याचा त्यापुढील सर्व चळवळींतून पराकाष्ठेचा प्रयत्न झाला. शीख-गुरखे-पंजाबी-मुसलमान या सर्वांना राष्ट्रीय भूमिकेवर घेऊन भारताच्या एकजिनसी राष्ट्रीयत्वाचे आणि आन्दोलनांचे कार्यक्रम व ध्येयें स्पष्ट करून सगळे उठाव करण्यांत आले. स्वदेशाप्रमाणेच परदेशांतहि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल सहानुभूती निर्माण करण्यांत आली. इंग्रज सरकारनेहि झोडफोडीच्या धोरणाने अनेक वाद येथे अगदी शेवटपर्यंत निर्माण केले. त्यांतल्या १८५७ पासूनच थोडाशा अलग ठेवलेल्या मुसलमानांचे बाबतींत इंग्रजांनी शेवटपर्यंत हात मारला. पण त्या चुचकारलेल्या मुसलमानांसह सर्व हिंदुस्थानवरील राजकीय सत्ता सोडून जाण्यांतच आपली अब्रू कांही राहील, याची जाणीव नव्वद वर्षांनी इंग्रजांना झाली व स्वदेशावरील अन्यायामुळे तळमळत देह ठेवणाऱ्या छत्रपति प्रतापसिंहाच्या देहावसानानंतर बरोबर शंभर वर्षांनी इंग्रजांना हिंदुस्थानवरील आपली मगरमिठी सोडावी लागून १९४७ सालीं हिंदुस्थान स्वतंत्र झाला.